म. ग्रं. सं. ठाणें
विषय भ्रू प्रवास
सं. क्र. २८९

# मंजल
# दरमजल

रा. भि. जोशी

मौज प्रकाशन
मौज
प्रकाशन
गृह

REFBK-C012197
REFBK-0012197

मजल

दरमजल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 30९७९ दि: 9/5/77
क्रमांक 2८९ नों: दि: 23/7/79

REFBK-0012197

REFBK-0012197

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. १२१९७
ठाणे

■ ■

# लेखकाचीं इतर पुस्तकें

**स्वतंत्र**

काचेचें कवच (कथासंग्रह)
झम्मन (कथासंग्रह)
वाटचाल (प्रवासलेखसंग्रह)
साहित्यसंवाद (साहित्यविषयक लेख)

**अनुवादित**

वाताहत (कादंबरी)
मीलाद शरीफ (कथासंग्रह)
अनोळखी वाटा (कथासंग्रह)

**संपादित**

आधुनिक मराठी गद्य (वेचे)

# मजल दरमजल

रा. भि. जोशी

मौज
प्रकाशन
गृह

मौज प्रकाशन : ५५

पहिली आवृत्ति :
१ मे, १९६१

किंमत पांच रुपये

© १९६१, रा. भि. जोशी

वेष्टनावरील चित्र :
द. ग. गोडसे

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

■ ■

Eothen च्या

लेखकास

# अनुक्रम


प्रवासलेखन सहा

ब्रह्याची नगरी १

दुर्गराज देवगिरी ९

तें ऋद्धिपुर देखिलें १४

अळजपुर निकें नगर २३

वऱ्हाडांत तीन पावलें ३०

आम्ही असतों याचि ग्रामीं ३८

प्रभूचा कट्टा ४५

विठो पालवीत आहे ५१

वैराजक्षेत्रं उत्तमम्! ५७

श्रीमूळपीठ आणि हेन्री सूर ६७

कऱ्हाडनगरी कृष्णातीरीं [illegible]

मजल दरमजल ८२

दिल्ली अजून दिल्लीच आहे १०७

फिर्दौस बरूए ज़मीं ११४

मथुरा देवनिर्मिता १२१

अयोध्यापुरी देखतां १२८

बिठूर १३५

धनुष्कोडी १४४

# प्रवासलेखन

प्रवासलेखन हें जेव्हा नुसतें केलेल्या प्रवासाचें आणि पाहिलेल्या स्थलांचें वर्णन असतें तेव्हा त्यासंबंधी लेखन-प्रकार म्हणून फारसा विचार करण्याचें कारण पडत नाही. कारण बोलूनचालून तो एक प्रकारचा अहवाल असतो. मात्र अशा प्रकारच्या वर्णनात्मक किंवा वृत्तांतात्मक लेखनाला महत्त्व नसतें असें नाही. असा वृत्तांत एखाद्या अज्ञात, कुतूहलाचा विषय असलेल्या किंवा महत्त्वाच्या प्रदेशांतून केलेल्या प्रवासा-संबंधी लिहिलेला असला, त्यांत समाविष्ट झालेली माहिती नवी, महत्त्वाची आणि विश्वसनीय असली, तर त्या प्रवासवृत्तांताला महत्त्व येतें. अशा वृत्तांताचा लेखक संवेदनक्षम, सुसंस्कृत, जिज्ञासु, चतुर, जगरहाटी डोळसपणे पाहणारा असला, प्रवास करण्यांत त्याचा एखादा विशिष्ट उद्देश किंवा दृष्टिकोण असला, तर ह्या प्रवासवृत्तांत समृद्ध, उद्बोधक आणि मनोवेधकहि होऊं शकतो, आणि कांही काळानंतर असे प्रवासवृत्तांत इतिहासाच्या अभ्यासाची फार महत्त्वाची सामग्री होऊं शकतात. फाहियान, ह्यू एन त्संग, इत्सिंग, बर्नियर, टॅव्हर्नियर, मानुची ह्यांनी लिहून ठेवलेल्या प्रवासवृत्तांतांमुळे भारताचा इतिहास कळण्याला फार मोठी मदत झाली आहे. आपल्या अगदी जवळचें वरसईकर गोडसे भटजींचें उदाहरण घेतलें तर त्यांच्या ‘ माझा प्रवास ’ ह्या पुस्तकावरून १८५७च्या बंडाच्या वेळच्या ग्वालेर, झांशी, कानपूर, बिठूर

इत्यादि ठिकाणच्या किती तरी गोष्टी कळतात. शिवाय, असा प्रवासवृत्तांत किती मनोवेधक होऊं शकतो तेंहि दिसून येतें. अशा प्रवासवृत्तांतांत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वानुसार अजाणतेपणे ललित, काव्यात्म मजकूरहि कसा येऊन जातो तेंहि ह्या पुस्तकांत दिसतें. ह्याच्या उलट, असें केवळ वृत्तांतात्मक प्रवासलेखन माहितीपूर्ण आणि उपयुक्त असलें तरी किती सम-विषम होऊं शकतें हें नेरळच्या फडक्यांचीं प्रवासवर्णनें पाहिलीं म्हणजे कळून येतें. फडक्यांनी केवळ धर्मभावनेने देशांतल्या सर्व तीर्थक्षेत्रांची यात्रा केली. लोक साधारणपणे ज्या ठिकाणीं जायला कंटाळतात अशाहि कोनाकोपऱ्यांतल्या ठिकाणीं ते गेले. प्रवासांतल्या अडीअडचणी, खाचा-खळगे, ठिकठिकाणचे बरेवाईट अनुभव, क्षेत्रोक्षेत्रींच्या दंतकथा-आख्यायिका, सगळें त्यांनी आपल्या प्रवासलेखनांत दिलें आहे. त्यामुळे त्यांचे लेख उपयुक्त आणि 'वाचनीय'हि झाले आहेत. पण गोडसे भटजींची व्युत्पन्नता, रसिकता इत्यादि त्यांच्या ठिकाणीं नसल्यामुळे त्यांच्या लेखनाला गोडसे भटजींच्या लेखनाची अभिजातता आली नाही.

अशा प्रकारचें प्रवासलेखन कितीहि मनोरंजक झालें तरी त्याची गणना 'ललित' ह्या प्रकारांत होत नाही. कारण त्याचा उद्देश मुख्यतः आपण केलेला प्रवास आणि पाहिलेलीं स्थळें ह्यांविषयी माहिती देणें हा असतो.

ह्याखेरीज किंवा ह्यांतच मिसळलेला असा दुसराहि प्रवासलेखनाचा प्रकार आहे आणि तो ललित लेखनाच्या अधिक जवळ येतोसा दिसतो. कारण त्यांत लेखक अधिक प्रामुख्याने वावरत असतो. त्या प्रकारांत लेखक जें जें पाहतो त्यावर भाष्य करीत असतो. तो जर आर्थिक, राजकीय, सामाजिक घडामोडीं-विषयी, साहित्य-चित्र-मूर्ति इत्यादि कलांविषयी आस्था बाळगणारा असला, त्या त्या विषयांतला जाणता असला, त्या त्या घडामोडींच्या किंवा कलांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची त्याला जाणीव असली, त्यांसंबंधी त्याला तुलनात्मक ज्ञान असलें, तर तो तिथे जें पाहील त्याविषयी त्याला भाष्य करावेंसें वाटणें आणि त्याने तसें करणें हें स्वाभाविक आहे. अशी पात्रता आणि अशी दृष्टि असलेल्या लेखकाने केलेलें अशा प्रकारचें भाष्य हें वाचकाला उद्बोधक, मार्गदर्शक आणि मनोवेधक वाटेल. त्या त्या स्थळांसंबंधी किंवा घटनांसंबंधी त्याला आधीपासून ज्ञान असेल तर तें अधिक डोळस आणि चौरस होण्याचा संभव आहे. आणि कांही ज्ञान नसेल तर अशा लेखांच्या वाचनामुळे तें मिळण्याचा संभव आहे.

उदाहरणार्थ, दिल्ली आणि आग्रा ह्यांसंबंधी लिहितांना जर एखाद्याने दिल्लींतला

हुमायूनचा मकबरा आणि आग्र्याचा ताजमहाल ह्यांची तुलना करून त्यांमधला सारखेपणा आणि तफावत तपशिलाच्या बारकाव्यांनिशीं दाखवलीं, आणि त्याच संदर्भांत हुमायूनच्या मकबऱ्यापलीकडल्या खाने-खानांच्या मकबऱ्याकडे लक्ष वेधलें; किंवा कुतुबमिनारजवळच्या कुव्वतुलइस्लाम मसजिदीपासून मधलीं शतकें ओलांडीत सफदरजंगच्या मकबऱ्यापर्यंत येऊन दिल्लींतल्या मुस्लिम बांधकामाचा विकासक्रम रसिकपणे विशद केला; किंवा फतेपूर-सीक्री, आग्रा येथले अकबराचे वाडे आणि वृंदावनांतलीं कांही मंदिरें ह्यांच्या बांधकामांतला हिंदु-मुस्लिम वैशिष्ट्यांचा संगम आणि अहमदाबादमधल्या मसजिदींच्या बांधकामांत दिसणारा हिंदु-मुस्लिम वैशिष्ट्यांचा संगम ह्यांची तुलना करून दाखविली, तर अशा प्रवासलेखांमुळे वाचकांची रसिकता अधिक समंजस आणि पैलूदार होण्याला मदत होईल, लेखनाला वजन येईल आणि त्याबरोबरच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची संपन्नता आणि सुसंस्कृतता प्रत्ययाला येईल. हीं किंवा अशीं इतर स्थळें पाहत असतांना त्याला जो आनंद झालेला असेल किंवा नसेल त्यांत तो आपल्या वाचकांना बुद्धिपुरस्सर आपल्याबरोबर घेईल.

ह्या प्रकारचें प्रवासलेखन ललित लेखनप्रकारांच्या पुष्कळच जवळ जातांना दिसत असलें तरी त्याचीहि गणना ‘ललित’ प्रकारांत होणार नाही. कारण ह्याहि लेखनाचा उद्देश—भाष्यासह कां होईना, पण—आपण केलेल्या प्रवासाची आणि पाहिलेल्या स्थळांची माहिती देणें हाच असतो आणि त्या दृष्टीने त्याला महत्त्व आहेच.

परंतु पहिल्या प्रकारच्या प्रवासलेखनांत सहसा न शिरणारा असा एक दोष ह्या दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे भाष्ययुक्त प्रवासलेखनांत शिरण्याचा संभव असतो. पहिल्या प्रकारच्या लेखनामध्ये वृत्तांतकथनापेक्षा अधिक कांही लेखक करीत नसतो. तो एका परीने नुसता साक्षी किंवा निवेदक असतो. पण ह्या दुसऱ्या प्रकारच्या लेखनांत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रकटनाला अधिक वाव असतो. त्यांत तो लेखनविषयाच्या अधिक जवळ गेल्यासारखा दिसतो. अशा प्रकारच्या लेखनामुळे लेखाला वजन येतें आणि आपलें व्यक्तिमत्त्व अधिक सुसंस्कृत आणि अभिरुचिसंपन्न दिसतें ह्या समजुतीमुळे प्रवासवृत्तांत लिहितांना मधूनमधून भाष्यें केलीं पाहिजेत असें लेखकाला वाटूं लागतें, आणि मग तो एखाद्या विषयासंबंधी जाणतेपणा असला किंवा नसला तरी त्यासंबंधी भाष्ययुक्त लिहूं लागतो. केव्हा तो स्वतःला नकळत रूढीला बळी पडूनहि अशा

प्रकारें लिहील. परंतु त्याचा परिणाम मात्र त्या लेखनाला बाधक होतो. आणि लेखकाचें व्यक्तिमत्त्व संपन्न दिसण्याऐवजी त्याचा अभावच जाणवतो.

निव्वळ वृत्तांतात्मक आणि भाष्ययुक्त अशा दोन्ही प्रकारच्या प्रवासलेखनाला ऐतिहासिक, चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक महत्त्व मिळण्याची शक्यता असते. पहिल्या प्रकारांत त्याची विश्वसनीयता आणि माहितीचें महत्त्व आणि नावीन्य जितकें अधिक तितकें त्या लेखनाचें महत्त्व राहील आणि दुसऱ्या प्रकारांत लेखकाचें व्यक्तिमत्त्व खरोखर ज्या प्रमाणांत सुसंस्कृत, संवेदनक्षम आणि संपन्न असेल त्या प्रमाणांत त्याचें महत्त्व राहील.

अलीकडे कांही वर्षांत मराठींत जें आणखी एका प्रकारचें प्रवासलेखन झालें आहे तें ललित निबंधाच्या जवळ जाणारें आहे. हें प्रवासलेखन वाच्यार्थानें प्रवासलेखन नसतें. त्यांत प्रवास कसकसा केला आणि प्रवासांत अनुभव कोणकोणते आले ह्याचा यथाक्रम वृत्तांत नसतो. तें स्थलवर्णनहि नसतें. कारण त्यांत वर्ण्य स्थलासंबंधी मार्गदर्शक किंवा मनोरंजक माहिति नसते. निदान त्यांत आलेली माहिति त्या उद्देशाने दिलेली नसते. आपण केलेला प्रवास इतरांनीहि करावा, आपण पाहिलेलीं स्थलें इतरांनीहि पाहावीं, त्यासाठी इतरांना उद्युक्त करावें म्हणून देखील हें प्रवासलेखन झालेलें नसतें. वाचकांना सुसंस्कृत करावें, त्यांची रसिकता वाढवावी, हाहि ह्या प्रवासलेखनाचा हेतु नसतो. हें लेखन लेखकाने त्या स्थलाशीं शक्य तितकें एकरूप होऊन स्वतःसाठी—किंवा त्या स्थलासाठी—केलेलें असतें. ललित निबंधाचा विषय जसा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाशीं एकरूप झालेला असतो आणि निबंधाचें रूप घेऊन बाहेर पडतांना त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा घेऊन बाहेर पडतो, तसेंच ह्या प्रकारच्या प्रवासलेखनाचें आहे. लेखनाचा विषय झालेलें स्थल हें जणु त्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वांत शिरतें. तिथे मुरतें. तिथे त्या स्थलाची आणि लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची एक प्रकारची परस्परांवर क्रिया-प्रतिक्रिया होते, आणि त्यांतून त्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा घेऊन तें स्थल लेखरूपाने प्रकट होतें.

त्याबरोबरच त्या स्थलाचेंहि एक विशेष प्रकारचें व्यक्तिमत्त्व त्या लेखांतून प्रकट होत असतें. एका अर्थी त्या स्थलाचें व्यक्तिमत्त्व आणि लेखकाचें व्यक्तिमत्त्व हीं जणु एकमेकांना आव्हान देत असतात, आणि त्या आव्हानस्वीकारांतून तो लेख निर्माण होत असतो. एखादा चित्रकार एखाद्या स्थलाचें जशास तसें, रंगाला रंग, मापाला माप ठेवून प्रतिबिंबरूप चित्र काढील, तर दुसरा एखादा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
२०९५८

चित्रकार त्या स्थलाचें व्यक्तिमत्त्व जाणून घेऊन त्याचें चित्र काढील. आणि त्यांत चित्रकाराचेंहि व्यक्तिमत्त्व प्रकट झालेलें असेल. तें त्या स्थलाचें जसेंच्या तसें चित्र नसेल, पण कदाचित् अधिक 'खरें', अधिक अंतःस्पर्शी चित्र असेल. तसेंच ह्या प्रकारच्या प्रवासलेखनाचें आहे. असा प्रवासलेख म्हणजे एक प्रकारें त्या स्थलाची लेखकाने केलेली नवनिर्मिति असते. आणि ह्या अर्थानेच तो लेख 'ललित' होऊं शकतो. म्हणूनच कदाचित् ह्या प्रकारच्या प्रवास-लेखनाला पुष्कळदा प्रवासवर्णन न म्हणतां 'प्रवासचित्र' म्हटलें जात असावें.

हें प्रवासलेखन ललित निबंधाच्या जातीचें असलें तरी त्या दोहोंत फरक आहे. ललित निबंधलेखनाचा व्यापार हा पुष्कळसा एकपाखी असतो. निबंधाचा विषय तिथे प्रतिकाररहित असतो. (नेहमीच तसा असेल असें नाही ह्याची मला जाणीव आहे.) त्याला कोणता आकार किंवा कोणतें रूप द्यायचें हें पुष्कळसें त्या लेखकाच्या मर्जीवर अवलंबून असतें. पण प्रवास-लेखनाचा व्यापार हा दुपाखी आहे. त्या स्थलाचें व्यक्तिमत्त्व तिथे विचारांत घ्यावें लागतें. कारण तें तिथे असतें. आणि तें पुष्कळदा चांगलें भक्कम, कणखर असतें. तें नुसतें गृहीत धरून नव्हे, तर त्याचा मान राखून लेखन करावें लागतें.

स्थलाचें हें व्यक्तिमत्त्व अनेक घटकांतून निर्माण झालेलें असतें. निसर्गाने केलेली एखाद्या स्थलाची रचना, त्याने त्याला दिलेला खडबडीतपणा, खरखरीतपणा, रूक्षपणा, भकासपणा, भव्यपणा, कोतेपणा, रेखीवपणा, रमणीय-पणा इत्यादि त्याला व्यक्तिमत्त्व देतात. एखाद्या गावाचें गावठाण, त्याची मांडणी, त्यांतल्या घरांची बांधणी, त्यांतल्या रस्त्यांचे परस्पर संबंध हीं त्या त्या गावाला व्यक्तिमत्त्व देतात. त्याखेरीज ऋतुमानानुसार किंवा प्रसंगविशेषानुसार एखाद्या गावा-स्थलाला किंवा भूप्रदेशाला रूपविशेष किंवा भावविशेष प्राप्त होतो तो वेगळाच. हीं झालीं त्या त्या स्थानाचीं दृश्य वैशिष्ट्यें किंवा व्यक्तिमत्त्वें. ह्यांखेरीज त्या त्या स्थानाचा किंवा गावाचा इतिहास, त्याच्याशीं निगडित असलेल्या खऱ्या-खोट्या—पण त्याला वैशिष्ट्य देणाऱ्या—दंतकथा-आख्यायिका, त्या गावांतल्या लोकांचे आपसांतले आणि इतरांबरोबरचे संबंध, त्यांचे मान-अभिमान, त्यांचीं मर्में-वर्में, त्यांचीं सुख-दुःखें, त्यांच्या आशा-निराशा अशा अमूर्त गोष्टीहि—किंबहुना त्याच मुख्यतः—त्या गावाचें व्यक्तिमत्त्व बनवीत असतात. ह्या गोष्टी म्हणजेच त्याचें व्यक्तिमत्त्व. त्या त्या स्थलाचें हें व्यक्तिमत्त्व

जाणवल्याखेरीज लेखकाचें व्यक्तिमत्त्व त्याला समोरें जाऊं शकणार नाही, आणि तसें तें सामोरें गेल्याखेरीज त्या स्थलाचें सजीव चित्र निर्माण होऊं शकणार नाही.

पण लेखकाला स्थलाचें हें व्यक्तिमत्त्व जाणवायचें कसें? तें कांही त्या स्थलाच्या कपाळावर लिहिलेलें नसतें. त्यांतला दृश्य भाग तेवढा फार तर लेखकाला दिसूं शकेल. पण त्यांतला जो अदृश्य-अमूर्त भाग असतो तो लेखकाला जाणवायचा कसा?

तो जाणवायचा असेल तर लेखकाचें मन शिक्षित आणि पूर्वसंस्कारित असून संवेदनक्षम असायला पाहिजे. कॅमेऱ्यांतल्या काचेसारखें केवळ स्थला-प्रसंगांचें प्रतिबिंब पाडून घेणारें नव्हे, तर सक्रियपणे परिणाम करून घेणारें हवें. एकच स्थल वेगवेगळ्या मनांवर वेगवेगळी प्रतिक्रिया करील, त्यांना तें वेगवेगळेपणे जाणवेल. आपल्या पूर्वजांनी शतकाशतकांच्या परिश्रमांनी डोंगरांतून कोरून काढलेलीं लेणीं भटक्या जमातींच्या दृष्टीने पावसाळ्यांत निवाऱ्यासाठी सोयीचीं ठिकाणें असतील (तशीं तीं होतींच), आणि हौशी लोकांच्या दृष्टीने सुटीच्या दिवसांत गर्दी आणि गोंगाट करण्यासाठी सोयिस्कर ठिकाणें—'पिकनिक स्पॉट्स्'—असतील (तशीं तीं आहेतच). ह्या दोन्ही प्रकारच्या लोकांच्या दृष्टीने त्या लेण्यांतल्या, भव्यपणाने स्तिमित करणाऱ्या किंवा नाजुक वळणदारपणाने उत्कंपित करणाऱ्या, मूर्तींना कांहीहि अर्थ नाही. किंबहुना त्यांना अस्तित्वहि नाही. आणि त्या लेण्यांना कांही व्यक्तिमत्त्व नाही.

वाई गावाशेजारच्या पुलावर उभें राहून पाहणाऱ्याला पुढ्यांतली नदी, तिच्यावरचे घाट, घाटावरचीं मंदिरें, त्यांच्यामागलें गाव, आणि त्याच्यामागले डोंगर हें सगळें सुंदर दिसेल. पण त्याच्या लेखीं त्या गावाचें वैशिष्ट्य म्हणजे कृष्णेकाठचें एक सुंदर गाव, एवढेंच. भाऊशास्त्री लेल्यांसारखा एक कर्मठ विद्वान् आणि नारायणशास्त्री मराठ्यांसारखा एक प्रगतिपर विद्वान् ह्या गावाला लाभले; 'धनुर्धारी'नी 'वेक्फील्डच्या व्हिकार'ला 'वाईकर भटजी' केलें; ह्या 'सनातनी' गावांत फार वर्षांपासून एक ब्राम्हसमाज आहे; ह्या गावापासून जवळच नाना फडणिसांचें मेणवली हें गाव आहे; अफझुलखानाच्या लष्कराचा ह्या गावांत तळ होता; बेदरचा दिवाण महमूद गावान ह्याला गोव्याच्या मोहिमेवर जातांना इथल्या फौजांची कुमक मिळाली होती; ह्या किंवा इतर गोष्टी वाईसंबंधी ज्याला माहीत असतील त्याच्या दृष्टीने वाईचें व्यक्तिमत्त्व कांही वेगळेंच होईल.

पण लेखकाला अशा गोष्टी माहीत असणें किंवा माहीत होणें एवढाच मनाच्या पूर्वतयारीचा, पूर्वसंस्कारितेचा अर्थ नाही. हा नुसता माहिती गोळा करण्याचा प्रश्न नाही. त्याला माहिती गोळा करावी लागेलच किंवा माहिती गोळा होत राहीलहि. प्रश्न आहे तो ही माहिती लेखकाच्या मनांत गेल्यावर तिथे त्याच्या संस्कारसंचिताशीं तिचा कशा प्रकारचा संबंध जडतो ? ती तिथे अडगळीसारखी पडून राहते, केव्हा तरी वापरतां येईल म्हणून ठेवली जाते, की त्याच्या व्यक्तिमत्त्वांत सामावून जाऊन त्याला आकार देण्यांत भाग घेते ह्यावर त्या माहितीची सार्थकता अवलंबून असते.

स्थलाला त्याचें असें व्यक्तिमत्त्व असलें तरी लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श झाल्याखेरीज तें प्रकट होत नाही. इतिहासांत, वर्तमानांत, भूप्रदेशवैशिष्ट्यांत सामावलेल्या त्याच्या त्या व्यक्तिमत्त्वांतले कांही भाग लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्पर्शाने उठून एकत्र येतात आणि त्यांना एक विशेष आकार प्राप्त होतो. हा आकार म्हणजे त्या लेखकाच्या लेखणींतून उतरलेला लेख. ह्या लेखांत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वांतून स्थलाच्या व्यक्तिमत्त्वाचें दर्शन होत असतें आणि त्या स्थलचित्राच्या द्वारा लेखकाचेंहि व्यक्तिमत्त्व प्रकट होत असतें. ह्या प्रकारचें लेखन दुपाखी असतें असें जें वरती म्हटलें तें ह्या अर्थानें. हा दुपाखी संबंध मोठा नाजुक असतो. स्थलाचें व्यक्तिमत्त्व प्रकट करणें हें ह्या लेखनाचें मुख्य कार्य असल्यामुळे लेखकाचें व्यक्तिमत्त्व गौण ठरतें. पण लेखकाच्या व्यक्तिमत्त्वांतूनच स्थलाचें व्यक्तिमत्त्व प्रकट होत असल्यामुळे आणि त्याची जात आणि प्रत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावरच अवलंबून असल्यामुळे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला विशेष महत्त्व असतें.

परंतु ह्या प्रकारच्या, म्हणजे ललित निबंधसदृश, प्रवासलेखनांत प्रकट होणारें लेखकाचें व्यक्तिमत्त्व हें भाष्ययुक्त प्रवासलेखनांत प्रकट होणाऱ्या व्यक्तिमत्त्वापेक्षा वेगळ्या जातीचें असतें. 'आत्मवृत्तां'तला 'मी' आणि ते 'आत्मवृत्त' लिहिणारे धोंडो केशव कर्वे ह्या दोन्ही एकच व्यक्ति आहेत. त्यांचें व्यक्तिमत्त्व एकच आहे. पण 'स्मृतिलहरीं'तील 'मी' आणि त्या 'स्मृतिलहरी' लिहिणारे वामन मल्हार जोशी हे एक नव्हेत. भाष्ययुक्त प्रवासलेखनांतला 'मी' हा आत्मवृत्तलेखक 'मी', लौकिक पातळीवरचा 'मी' असतो. तर ललित प्रवासलेखनांतला 'मी' कलात्मक पातळीवरचा 'मी' असतो.

पण प्रवासलेखन—ललित प्रवासलेखनसुद्धा—कविता किंवा कथा ह्यांच्या-

सारखें शुद्ध कलात्मक असूं शकत नाही. कारण स्थल आणि त्याचा इतिहास-भूगोल ह्यांच्या चतुःसीमेंत, त्यांचीं बंधनें पाळूनच, लेखकाला आपलें लेखन करावें लागतें. त्यामुळे ह्या प्रकारचें लेखन संपूर्णपणे कलात्मक पातळीवर राहूं शकत नाही. म्हणून ह्या लेखनांत लौकिक पातळीवरचा 'मी' आणि कलात्मक पातळीवरचा 'मी' ह्या भूमिका सतत किंवा आलटून-पालटून एकमेकींत मिसळत असतात, आणि त्यांतूनच ह्या प्रकारच्या लेखनांतल्या कांही अडचणी निर्माण होतात.

ललित निबंधाच्या लेखनांत विषय बाजूला सारून लेखकच पुढे आला तर त्या निबंधाचा तोल जाऊन त्याची जातहि बदलण्याचा जसा संभव असतो तसाच प्रकार ह्या प्रवासलेखनांतहि होण्याचा संभव असतो. अशा प्रकारचें लेखन प्रथमपुरुषी होत असल्यामुळे केव्हा केव्हा स्थल मागे सरून लेखक 'मी'च पुढे येण्याची किंवा लेखक 'मी' वाजवीपेक्षा मोठा होण्याची, आणि त्यामुळे स्थल दिसेनासें होण्याची किंवा ओळखूं न येण्याची आणि लेखनाचें स्वरूप बदलून जाण्याची शक्यता असते. ह्या प्रकारच्या लेखनांतून स्थलाचें व्यक्तिमत्त्व वेगळेपणाने आणि ठळकपणाने प्रकट झालें तरच तें लेखन यशस्वी झालें असें म्हणतां येईल, नाही तर तो लेख प्रवासलेख न होतां दुसरेंच कांही तरी होईल.

एकीकडे प्रवास आणि स्थल हें मुख्य आणि लेखक हा केवळ निवेदक, आणि दुसरीकडे लेखक हा मुख्य आणि प्रवास किंवा स्थल हें आपण काय केलें-पाहिलें हें सांगण्यासाठी केवळ निमित्त अशा दोन टोकांच्या मध्ये सगळेंच प्रवास-लेखन वावरत असतें. त्यांतून ललित स्वरूपाचें प्रवासलेखन हें दोन डगरींवर पाय ठेवण्यासारखें कठीण काम आहे. स्थलासंबंधी यथातथ्यपणा ठेवण्याच्या प्रयत्नांत माहितीची गर्दी होण्याची भीति असते. ती जोडल्यासारखी—भरल्या-सारखी—होते आणि लेखनाचा तोल, तसाच एकसंधपणा बिघडतो. माहिती न द्यावी तर स्थल आकार आणि रूप घेईल की नाही ह्याची शंका वाटूं लागते. लेखनाचें स्वरूप आत्मनिष्ठ असल्यामुळे आपण काय केलें, काय पाहिलें; आपल्याला काय आवडलें-नावडलें; काय वाटलें, काय वाटलें नाही; हें सांगण्यावर अधिक भर दिला गेला तर 'मी' हा त्या स्थलापेक्षा मोठा होतो आणि लेखनाची जातच बदलते. लेखन मनोवेधक करण्यासाठी सजवूं गेलें, विशेषणें-क्रियाविशेषणें, उपमा-रूपकें वापरूं लागलें तर त्याला कृत्रिमपण येतो; तसें न केलें तर लेख काव्यात्म होणार नाही की काय, अशी भीति वाटते.

ही भीति अर्थात् काव्यात्मतेसंबंधीच्या खोट्या—रूढ—समजुतींतून आलेली असते. पण पुष्कळांना तशी भीति वाटते हें दिसतें. लेखन हसतें-खेळतें करण्याच्या प्रयत्नाला लागलें तर तें वजनांत कमी होईल की काय अशी शंका येते.

एखाद्या चांगल्या प्रवासलेखाचें विश्लेषण केलें तर त्यांत हे सगळे किंवा ह्यांतले बरेच घटक आढळतील, हें उघड आहे. पण ह्या घटकांची बेरीज केल्याने असला लेख तयार होत नाही. तर सर्वांचा सांधा साधावा लागतो. तो साधणें हें तें स्थल आणि तो लेखक कशीं, कोणत्या प्रकाराने, कोणत्या वृत्तीने एकमेकांना सामोरीं येतात ह्यावर अवलंबून राहतें. हें कसें घडतें हें सांगणें कठीण आहे. सर्वच प्रकारच्या कलानिर्मितीच्या प्रक्रियेंत जसा एक गूढतेचा भाग असतो तसाच ह्याहि बाबतींत असतो. एकमेकांकडे ओढल्या जाणाऱ्या प्रियकर-प्रेयसीच्या एकत्र येण्यासारखें हें आहे असें कदाचित् म्हणतां येईल.

एखाद्या स्थलासंबंधी लिहिण्याला प्रवृत्त होतांच लेखकाची त्या स्थलासंबंधी कांही एक विशिष्ट वृत्ति बनते किंवा बनलेली असते. ती वृत्ति हें जणु त्या संबंध लेखनाचें आकर्षण-केंद्र असतें. त्या वृत्तीच्या अनुरोधाने आणि तिच्या भोवती त्या स्थलासंबंधीच्या त्याच्या भावना आणि त्यांना अनुकूल अशा घटक-वस्तू गोळा होत जातात. आणि गोळा होत असतांनाच त्या सगळ्यांना मिळून एक आकार येत जातो. एखाद्या लोहचुंबकाभोवती गोळा होणाऱ्या लोखंडाच्या कणांना चुंबकक्षेत्रांत येतो तसा. हा आकार त्याला आला तर तें स्थळ आपलीं कांही वैशिष्ट्यें घेऊन जिवंत होऊन उभें राहतें आणि मग तो लेख 'साधला' असें आपण म्हणतों. असा लेख मग वस्तुनिष्ठ असूनहि 'ललित' होतो. माहिती देत असूनहि माहिती देत नसतो, आणि माहिती न देतांहि किती तरी सांगू शकतो. आणि दोन डगरींवर पाय ठेवूनहि ठामपणे उभा राहू शकतो.

—रा. भि. जोशी

# ब्रह्म्याची नगरी

सृष्टि रचण्याचें सगळें काम पुरें झाल्यावर ब्रह्मदेवाने कृतकृत्यतेचा एक निःश्वास सोडला, आणि मग ती अशी आपल्यासमोर धरून तो विचार करूं लागला, की ह्या सृष्टींत आता आपल्याला राहण्यासाठी कोणतें ठिकाण निवडावें. शेवटी आपल्या आठहि डोळ्यांनी आपण रचलेल्या सृष्टीचें चौफेर निरीक्षण करून त्याने महाराष्ट्राच्या साधारण मधोमध येणारें, गोदावरी नदीच्या उत्तर तीरावरचें, एक ठिकाण निवडलें, आणि आपल्या सृष्टीची केवळ सुप्रतिष्ठाच ठरेल असें प्रतिष्ठान नांवाचें नगर तिथे उभें केलें. कल्पान्तापर्यंत तें नगर उभें राहायचें असल्यामुळे ती वेळ केव्हा येणार तें आपल्याला कळावें म्हणून त्याने नदीच्या काठापासून कांही अंतरावर एका उंच जागीं एक सुंदर कोरीव काम केलेला दगडी खांब उभा केला. ह्या खांबाच्या शेंड्यावर बसून चिमणी पिऊं शकेल इतकें गोदावरीचें पाणी चढलें म्हणजे सृष्टीवर प्रलय होणार, आणि ब्रह्मदेवाला मग पुन्हा रचनेच्या कामाला आरंभ करावा लागणार. तो खांब अजून पैठणांत उभा आहे.

ब्रह्मदेवाने स्वतःसाठी जें नगर निर्माण केलें तें एखाद्या राज्याची राजधानी व्हावें; चौल, ठाणें, सोपारा अशा लांबलांबच्या बंदरांतून मिसरसारख्या समुद्रपारच्या देशांतला माल तिथे यावा आणि तिथून चारी ठिकाणीं जावा; तें विद्यांचें आगर, धर्माचें न्यायपीठ, कथा-काव्यांचें अधिष्ठान आणि कवींचें संमेलन-स्थान

व्हावें; मातीच्या माणसांना पराक्रमाची प्रेरणा देणाऱ्या शालिवाहनाने तिथे आपलें कर्तृत्व गाजवावें; हाल राजासारखा कविवत्सल, रसिक, पराक्रमी, आणि अद्भुतरम्य दिव्यमानुषी कथांचा नायक होण्याइतका लोकप्रिय राजा त्या नगराला लाभावा आणि त्याने पैठणची कीर्ति आणि प्रतिष्ठा कळसाला चढवावी ह्यांत नवल काय?

हालाच्या ह्या वैभवशाली राजधानींतल्या वाड्यांच्या घोटीव भिंतींत प्रतिबिंबित झालेल्या प्रणयक्रीडा वाटसरांचीं चित्तें विचलित करीत, आणि त्या नगरांतल्या विलासिनींच्या स्तनतटावरून धुतल्या गेलेल्या अंगरागाने रंगलेला गोदावरीचा प्रवाह पाहून, इंद्रधनुष्य भूमीवर उतरलें की काय असा अंतरिक्षांत संचार करणाऱ्या यक्षगंधर्वांना संभ्रम उत्पन्न होई.

पैठणांत आजहि प्रचंड वाडे आहेत. 'त्यांच्या आंतल्या भिंतीहि तशाच घोटीव असतील काय? आणि असल्या तर त्यांत आज काय प्रतिबिंबित होत असेल?' असें मनाला विचारीत रस्त्याची वाळू चर्रचर्र तुडवीत चाललों होतों तेवढ्यांत,

"हा वानोडे सावकारांचा वाडा. ह्याला चौदा चौक आहेत. म्हणजे होते. आता कांही आहेत, कांही नाहीत. निर्वंश आहे. हा लधू सावकारांचा वाडा. हे पेशव्यांचे सावकार होते. निर्वंश आहे. हा आमक्याचा वाडा. ह्यांनी आपल्या पाहुण्यांसाठी गंगेच्या घाटापासून आपल्या घराच्या दारापर्यंत रुपयांच्या पायघड्या घातल्या. निर्वंश आहे. हा देऊळगावच्या राजेसाहेबांचा वाडा. हालीं मरम्मत नाही."

असे आमच्या वाटाड्या भटजींचे शब्द कानांवर पडले, आणि मी भानावर आलों. भटजी एकामागून एक मोठमोठे वाडे दाखवीत होते आणि "निर्वंश आहे, निर्वंश आहे." असें "नेति, नेति"च्या धाटींत सांगत होते. त्यांनी असे किती तरी वाडे दाखवले. जोतें आणि पहिला मजला दगडाचा, वर विटांचें काम. दगडाला दगड, विटेला वीट, इतकी घट्ट भिडलेली की वर्षें लोटलीं तरी कागद शिरकवायला फट नाही. वाड्याचे कोपरे बाहेरून गोल केलेले. अगदी तासून काढल्यासारखे सफाईदार. आणि त्या गोलपणाला उठाव देण्यासाठी वरच्या अंगाला कोपऱ्यांतूनच पुढे आलेली एक सजेदार सुबक खिडकी. दाराच्या दारवंठ्यावर आणि गणेश-पट्टीवर नजर वेधून घेणारें नाजुक रेखीव कोरीवकाम. वाडा लहान मोठा कसाहि असो, नमुना एक. पण बहुतेक वाड्यांच्या बाहेरच्या भिंती तेवढ्या नारळाच्या कठीण करवंटीसारख्या शाबूत आहेत. आंतलें खोबरें काळाने कुरतडून टाकलें आहे. "भिंत खचली कलथून खांब गेला" अशी स्थिति बहुतेक आहे. वर्षानुवर्षांच्या बंदिवासांतून

मुक्त झाल्याप्रमाणे वाड्यांचे चौक, दालनें, ओसऱ्या, पडव्या, उन्हा-पावसाचें, वाऱ्या-वादळाचें खुल्या हृदयाने स्वागत करताहेत. बाहेरच्या आणि आंतल्या भागांमधला माणसाने निर्माण केलेला आडपडदा दूर झाल्यामुळे वाऱ्याने तिथे रानांतल्या सर्व वनस्पतींचीं बीजें आणून टाकलीं, पावसाने तीं रुजवलीं, उन्हाने वाढवलीं. त्यांचीं लहानमोठीं झाडेंझुडपें आतां बाहेरच्या देवडीपासून आंत देवघरा-स्वयंपाकघरापर्यंत सर्वत्र फोफावताहेत. एवढ्या थोर गजान्त श्रीमंत सावकारांच्या वाड्यांच्या भिंती चोरांना फोडतां येऊं नयेत म्हणून दगडाच्या असाव्या हें स्वाभाविकच आहे. आज चोरांची भीति बाळगण्यासारखें आंत कांही राहिलेलें नसलें तरी कांही कर्तव्यनिष्ठ भिंती मात्र उभ्या आहेत. आणि 'अहो आश्चर्यम्!' दारांना कुलुपें आहेत. दाराशेजारच्या भगदाडांतून तुम्ही वाटल्यास आंत जा, पण दारांतून जायला मनाई आहे. कारण त्या वाड्याचा अजून कुणी तरी मालक आहे. तें गंजलेलें, लावल्यापासून कधीच न उघडलेलें, कदाचित् कधीच उघडलें न जाणारें कुलुप त्याचें आहे.

ज्या वाटेने हे वाडे गेले, त्याच वाटेने धोंडीबावांचा (शिवदिनकेसरींचा : 'नवनीतां'त ह्यांची तुमची ओळख झालीच असेल) वाडा चालला आहे. पुरुषभर उंचीचें दणकट दगडी जोतें असलेला हा वाडा कुबट, दमट, आणि कोंदट झाला आहे. पाय आंत जाईल इतका जमिनीचा भुगा झाला आहे. दारांतून पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे डाव्या अंगाला देवडीवर एक अरब दिसतो. त्या वाड्याचा, त्यांतल्या मालमत्तेचा आणि समोर चौकाच्या पलीकडे देव्हाऱ्यांत बसलेले देव आहेत त्यांचा वाली-रखवाली तो आहे. देवांमध्ये एक बेलफळा-एवढा मोठा तपकिरी रंगाचा सूर्यबाण आणि कवठाएवढा मोठा स्फटिक गोल आहे. त्या सर्वांवर धूळ चढली आहे. त्यांची कधी पूजा होते, कधी होत नाही. कधी पहाऱ्यावरच्या अरबालाच तें पाहवत नाही. आणि तो आपल्या खांद्यावरच्या रुमालाच्या पदराने ती धूळ झटकून टाकतो. त्याच्या धर्माशीं तें विसंगत असेल. त्याचा तो विचार करीत नाही.

मागल्या अंगाला धोंडीबावांची स्नानसंध्येची, खाजगी देवपूजेची जागा आहे. तिथे दुसरें छोटें देवघर आहे. ह्या इथल्या छोट्या चौकाभोवतीच्या लाकडी कमानींवरचें, वरच्या माडीच्या कठड्यांचें, खांबांवरचें, लाकडांतलें कोरीव काम,

हस्तिदंतावरच्या कामाची आठवण व्हावी इतकें नाजुक, सुरेख, सुबक आहे. नक्षीची विविधता, मेहरपींचा डौल, आणि रचनेचा समतोलपणा नजरबंदी करणारा आहे. पण चौकाच्या मागच्या बाजूची वरची एक तुळई मध्येच खचली आहे. तिने दुसऱ्या तुळया खाली ओढल्या आहेत. ठिकठिकाणाहून सुटलेल्या लाकुड-कामाचा अंगणांत ढीग उभा झाला आहे. त्यांत रोज भर पडते आहे. तेलपाणी नसल्यामुळे लाकडांना फटी पडलेल्या आहेत, आणि त्यांत चरे उठताहेत.

वाड्याशींच समानशील अशी शिवदिनकेसरींच्या समाधीची वास्तु गोदेच्या काठीं आहे. सभामंडपाच्या भुईचा उकीर झाला आहे. तीवर चारी बाजूंनी पावसाळ्यांत वरून पागोळ्या गळतात त्यांच्या थेंबांनी केलेल्या छोट्या-छोट्या खळग्यांची सुतांत ओवल्यासारखी सरळ ओळ पडली आहे. तीच त्या सभाभूमीची आज शोभा. भोवतालच्या लाकडी मेहरपींवरचे मोर मानेच्या कमानी करून, छातीवर चोची टेकून ऐटींत बसले आहेत, पण आंत पावसाची झड येत आहे, समोर मेघांनी व्यापलेलें आकाश दिसतें आहे, तरी (लाकडाचा देह मिळाल्या-मुळे) टाहो फोडतां येत नाही किंवा झेप घेऊन उडून जातां येत नाही म्हणून खिन्न झालेले दिसताहेत. गाभाऱ्याच्या दारावर वरल्या अंगाला उभे असलेले नवनाथ हा भकासपणा उघड्या डोळ्यांनी पाहताहेत. गुरूच्या हाकेला 'ओ' देऊन जो शेणपुंजींतून बाहेर आला तोहि त्यांतच उभा राहून ह्या वास्तूची शेणपुंजी होतांना पाहतो आहे. आणि त्यांच्याच समोरच्या बाजूला, समुद्रावरून सहज उडी मारून जाणारा मारुति, इथे आपल्याला कांही करतां येत नाही म्हणून, नुसताच पवित्रा घेऊन आखडल्यासारखा उभा आहे.

एखाद्या मातबर माणसाच्या बेफिकीर मालकींतलें, धड प्रतिष्ठाहि नाही आणि धड अप्रतिष्ठाहि नाही, असें हें उपेक्षित जिणें जगणाऱ्या ह्या असल्या वास्तूंपेक्षा उघड्या घाटावर उन्हापावसाचे तडाखे खात उभीं असलेलीं देवळें शतपट बरीं. गोदेच्या काठीं नागघाटावर खरोखरच एक घाटदार देवळी आहे. देवळींतली ती नागाची पुष्ट, वळणदार, सुश्लिष्ट प्रतिमा पाहतांना मनांत आलें, 'श्रुतार्थेवर अनुरक्त होऊन तिच्याशीं गांधर्वविवाह करणाऱ्या वासुकीच्या पुतण्याची—कीर्तिसेनाची—तर ही प्रतिमा नसेल! तसें असेल तर श्रुतार्थेनेहि योग्य पुरुषावर प्रेम केलें असें म्हटलें पाहिजे.' मी ह्यासंबंधी कांही बोललों तेव्हा,

"श्रुतार्था म्हणजे गुणाढ्याची आई ना?" माझ्या बरोबरच्या मित्रांनी विचारलें.

मीं 'होय' म्हटलें. त्यावर ते म्हणाले,

"तुमचं सगळंच चुकलं. गुणाढ्य मुळी पैठणचा नव्हेच. त्याचं गाव तिकडे कुठे मध्यप्रदेशांत आहे असं कांही विद्वान म्हणतात."

गुणाढ्य पैठणचा नाही, म्हणजे मग "मोदकैस्ताडय माम्" असें मलयवतीने म्हटल्यावर तिच्यावर फेकून मारण्यासाठी हालाने लाडवांचें ताट मागवल्याची गोष्टहि खोटीच का? आणि मग, पैठण सोडावें लागल्यामुळे परदेशी झालेल्या गुणाढ्याने रचलेल्या कथा रात्रंदिवस ऐकून ह्याच पैठणच्या बाहेरच्या रानांतल्या पशुपक्ष्यांनी ढळढळा अश्रु ढाळले तेंहि खोटेंच? मग ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडून वेद वदवले ती तरी कथा खरी की खोटी? भागवतावरची 'हरिवरदा' टीका लिहिल्यामुळे कृष्णदयार्णवांचें कुष्ठ गेलें हें तरी खरें ना? आणि "श्री एकनाथसदनीं माधवजी स्वकरें चंदन घासुनि गंगेचें पाणी कावडी भरीत होते" हें तरी खरें कशावरून? पण हें खोटें म्हणतां येणार नाही. कारण ज्ञानेश्वरांनी ज्या रेड्याच्या मुखाने वेद बोलवले त्याचा प्रतिनिधि नागघाटाशेजारीच, एका भितीवर, दगडांत आराखड्यासारखा उभा आहे. रोड आहे. वेडावाकडा आहे. आखडल्या-सारखा आहे. पण आहे. कृष्णदयार्णवांचें कुष्ठ गेलें असो की नसो, वळणदार अक्षरांतली त्यांच्या हातची 'हरिवरदा' ग्रंथाची पोथी आणि त्यांची पूजेंतली गंडकी शिळेची काळी तकतकीत श्रीकृष्णाची मूर्ति पैठणला त्यांच्या मठांत आजहि विद्यमान आहे. आणि एकनाथांच्या वाड्यांत आजहि 'तो' रांजण आहे. आणि अजूनहि नाथषष्ठीच्या दिवशीं कुणाच्या तरी रूपाने माधवजी तिथे येतात, आणि त्यांची घागर रांजणांत ओतली गेली म्हणजेच रांजण भरतो. एरव्ही नाही. नाथांच्या वंशजांचीं अनेक घरें झालीं असलीं, ते 'गोसावी-जहागिरदार' झाले असले, तरी त्यांच्या घराण्यावर माधवजींची अजून कृपा आहे हें ह्यावरून स्पष्ट दिसतें.

पैठणचेंहि नाथांवर प्रेम दिसतें. आज पैठण 'नाथांचें पैठण' म्हणून ओळखलें जातें. ज्या पैठणकर पंडितांनी "बाहुल्यें श्री चांगदेव राउळाचा ठायीं स्त्रियांसींचि वेधु" असा आरोप ठेवून चक्रधराला अवयवच्छेदाची शिक्षा फर्मावली, आणि अंमलांत आणली; ज्या पैठणकर पंडितांनी संन्याशाचीं पोरें म्हणून निवृत्ति-ज्ञानदेवादिकांना मुंजीची अनुज्ञा नाकारली; त्या पैठणने वास्तविक नाथांना वाळींत टाकून त्यांच्या घरादाराला आग लावायला हवी होती. गंगेच्या कावडींतलें पाणी गाढवाला पाजायचें, श्राद्धाच्या ब्राह्मणांसाठी शिजवलेलें अन्न महारांना

वाढायचें, आणि महाराच्या शेंबड्या पोराला उचलून कडेवर घ्यायचें, हीं पैठणकर ब्राह्मणांच्या दृष्टीने अब्रह्मण्यें ठरावींत. पण त्यांच्या ह्या 'सुधारकी' आचरणा-विरुद्ध नाखुषी त्यांच्या मुलानेच काय ती दाखवलेली दिसते. पैठणकर पंडितांनी नाथांची गय केली ती ते सुखवस्तु प्रतिष्ठित गृहस्थ होते म्हणून, की नाथांच्या साधुत्वाने त्यांना जिंकलें म्हणून? बाकी एकशेआठ वेळां अंगावर थुंकणाऱ्या यवनाला ज्यांनी आपल्या संयमाने आणि सौजन्याने वश करून घेतलें त्यांना पैठणकर पंडितांना वश करून घेणें कठीण गेलें नसेल.

पैठण नाथांचें आहे आणि नाथषष्ठीला तिथे थोर मांदी जमते हेंहि खरें आहे. तरी पैठणला आता पूर्वीची कळा राहिलेली नाही. वळचणी वाकल्या आहेत, आढीं दुभंगलीं आहेत, कौलें घरंगळताहेत, माती भुळभुळते आहे, आणि खिनझडपांच्या दारा-खिडक्यांचीं तोंडें सदाचीं भकासपणे वासलेलीं आहेत, अशीं घरें दर दहापांच पावलावर दिसूं लागलीं म्हणजे इतिहासाचीं चाकें ह्या नगरावरून किती निर्घृणपणे फिरलीं आहेत तें जाणवल्यावाचून राहत नाही.

विद्यापीठ आणि धर्मपीठ म्हणून काशीचें दक्षिणेंतलें प्रतिस्पर्धी असलेल्या पैठणांत आज विद्या विद्यमान नाही. एका काळीं तिथल्या ब्राह्मणांचीं मुखें विद्येच्या तेजाने तळपत असतील. आज तीं काळकलेलीं आणि करपलेलीं दिसतात. सनातन हिंदु धर्माचा ध्वज उंच धरणाऱ्या पैठणमधल्या मुसलमान काजीच्या वाड्याचा दरवाजा त्याच्या अवाढव्यपणामुळे उरावर येतोसा वाटतो आणि त्याच्यावरचे रानडुकराच्या सुळ्यांसारखे लोखंडी खिळे डोळ्यांबरोबरच काळजांतहि घुसतात. आणि त्याच्या शेजारचीच उंचावरली प्रशस्त मसजिद मुसलमानी सल्तनतीची मोहोर ह्या हिंदु धर्मपीठावर किती ठसठशीत उठली आहे तें दाखवते. ज्या पैठणांत सातशे साळीवाडा आणि नऊशे मोमीनवाडा सुखाने नांदला, आणि ज्या पैठणाने पैठणीला आपलें नांव आणि देशोदेशीं ख्याति दिली, त्या पैठणां-तले पांच-पंचवीस साळी-मोमीन आज श्रीमंत शोकिनांकडून आलेल्या वर्दीनुसार काठ-पदर विणून जेमतेम रोजी मिळवताहेत, आणि पैठणचा पैठणीशीं संबंध कोशांतच काय तो राहिला आहे.

आज पैठणांत शालिवाहनाचा वाडा म्हणून अंगणांत रान माजलेली एक मसजिद तेवढी शिल्लक राहिली आहे. आणि हालाचें कांहीच राहिलें नाही.

नांवसुद्धा. पण तिथली गोदावरी अजून त्यांच्या वेळीं जशी वाहत होती तशीच वाहते आहे. तिच्या काठीं तेव्हा जशीं शेतें होतीं तशींच आजहि आहेत. तुम्ही त्या त्या ऋतूंत तिथे गेलांत तर त्या शेतांतले राजगिऱ्याचे तुरे आपली लाल-किरमिजी ऐट तुमच्यापुढे ऐसपैस मिरवतील, आणि तरोट्यांवरच्या फुलांचे पिवळे-धमक झुबके "तुम्ही आम्हांला विसरलां नाहीत ना?" असें आर्जवून विचारतील. कपाशीचीं पिवळीं फुलें तुमचें मोकळ्या अंतःकरणाने उज्ज्वल स्वागत करतील किंवा त्यांचीं किंचित् उमललेलीं बोंडें शुचिस्मिताने आपलें निर्मळ अंतःकरण सूचित करतील. उभ्या आडोशाच्या आधाराने त्या शेतांतल्या मऊ मातींत आजहि तिथल्या गावढ्यांतलीं तरुण-तरुणी—हलिकपुत्र आणि हलिक-स्नुषा—त्या काळच्या सारखीच बेभान किंवा बुजरी प्रणयक्रीडा करीत असतील. पण तेव्हासारखा आज कोणी 'प्राकृत' कवि त्यांच्यावर कविता करीत असेल की नाही कोण जाणे. त्या 'गोला' नदींत आजहि मरहट्ट वधू तेव्हाप्रमाणेच अंगें धुतात. पण त्यांच्या स्तनतटांवरून धुतल्या गेलेल्या अंगरागाने आज तिचें पाणी रंगत नाही. आणि म्हणूनच कदाचित् यक्षगंधर्वहि अंतरिक्षांत संचार करीत नाहीत.

पण जुन्याच्या आठवणींनी पैठणला अजिबात सोडलें आहे असें नाही. एखादा कबूतरबाज आपल्या कबूतरांना हाक देतो तशी जर तुम्ही त्यांना हाक दिलीत तर आजहि त्या तुमच्या भोवती गोळा होतील. शालिवाहनाचें पैठण कसें दिसत असेल तें पाहावें म्हणून पालथ्या पैठणचा पापुद्रा नागघाटाशेजारीच एका ठिकाणीं खरवडून काढला आहे. तिथे गेलांत तर पैठणच्या पोटांत तुम्हांला डोकावून पाहतां येईल. नागघाटावरच उभें राहून डावीकडे लांब अंतरावर दृष्टि टाकलीत तर तुम्हांला श्रीचक्रधराच्या पहिल्या शिष्येचा—बाइसाचा—मठ दिसेल. तुमच्या ब्राह्मण वाटाड्याला "बाइसाचा मठ कुठे आहे?" असें तुम्ही विचारलेंत तर तो सांगणार नाही. आणि तुम्ही "तो नाही का तिथे?" असें बोटाने दाखवलेंत तर तो मान झटकून म्हणेल, "छेः, आपल्याला नाही बा ठाऊक तिकडे काय आहे तें. आपुन कधी तिथं गेलों नाही. आन् आपल्यासारख्यांनीय जाऊं नये." पण त्याने कांही म्हटलें तरी तिथे तो आहे. थोडा उदास आहे. भकास आहे. पण आहे. ज्ञानेश्वराची आठवण करून देणारा रेडा तर नागघाटाच्या शेजारी तुमच्या मागेच आहे. तसेंच नदीकाठाने उजवीकडे बघत गेलांत तर शिवदिन-केसरींची समाधि, नारायणगडकरांचा मठ, कृष्णदयार्णवांचा मठ, ह्यांवरून तुमची

दृष्टि वरच्या बाजूला गंगेकाठच्या नाथांच्या समाधीच्या—बाहेरच्या नाथांच्या—दिशेने जाईल. कदाचित् तिथपर्यंत पोचणार नाही. पण तिथे नाथांची समाधि आहे. भव्य, प्रशस्त आहे. बाइसाचा मठ आणि बाहेरचे नाथ ह्या दोन टोकांच्या मध्ये प्राचीन महाराष्ट्राचा प्राण, आणि मराठीच्या अभिमानाचें अधिष्ठान आहे. पैठणला आल्यावर बोणेबाईने श्रीचक्रधरांना म्हटलें, "बा मुनिदेया हें थोर नगर: एथ तुम्ही चुकाल." तसें तें आता थोर नाही. पण थोरच आहे.

# दुर्गराज देवगिरी

"बाहेरचा तो तासून काढलेला सवाशे-दीडशे हात उंच कडा. त्याच्यासमोरचा चाळीस हात रुंद आणि पन्नास हात खोल, पाण्याने भरलेला खंदक. ह्यांच्यांतून आधी दुस्मन इथपर्यंत यायची पंचाईत. जर आलाच तर ह्या भुयारांत सापडायचा. आणि हें पाहा इथं..."

आम्ही देवगिरीच्या भुयारांतून वळणें घेत घेत वर चढत होतों. आपल्या हातांतला पलिता उंच डोक्यावर धरून वाटाड्या आम्हांला सांगत होता,

"इकडं पुढं वाट नाही. भूल-भूलैय्यासारखं आहे. इथं सापडला की कापून काढायचा. आणि हीं इथं बळदं आहेत. इथं शिपाई लपून राहायचे आणि शत्रूचे लोक आले की त्यानला मारायचे. आन् इथून बी पुढं आले तर हें भोकसं केलंय् इथून ढकललं का थडाड्थडाड् मार खात खाली खंदकांत—पाण्यांत पडायचा...आता असं या. संपलीच वाट आता—आन् इथ्थोर जर का दुस्मन जिता आला तर इथं ह्यो वरती तवा हाय् ह्यो तापवायाचा लाल-लाल, लाकडं घालून. का संपलाच इथं..."

आधी शत्रूला किल्ल्यांत प्रवेश करतां येऊं नये, आणि केलाच प्रवेश तर वरपर्यंत चढतां येऊं नये, ह्यासाठी कल्पना लढवून जेवढें म्हणून करतां येण्यासारखें होतें तेवढें सगळें देवगिरीचा किल्ला बांधणाऱ्यांनी केलेलें होतें. तें अगदी अद्‌भुत होतें. तसें म्हटलें तर अद्‌भुत नव्हतेंहि. कारण पलीकडे तीन-

चार कोसांवर वेरूळचीं प्रचंड लेणीं ज्यांनी खोदलीं, आणि अवघा डोंगर पोकळ, 'कोणी एथीचें रिगणें निगणें जाणेना—' असा करून ठेवला, त्यांना किंवा त्यांच्या वंशजांना देवगिरीचा कडा तासणें आणि त्यांत भुयार करणें मुळींच कठीण नव्हतें. त्याची ती बाहेरच्या बाजूची, पाहतांक्षणींच जाणवणारी भयानकता, त्यामागोमाग डोंगराचें पोट पोखरीत जाणारें हें वळणावळणांचें भुयार—ह्यांनी जीव आधीच दडपल्यासारखा झाला होता. त्यामुळे वाटाड्या जें जें पलित्याच्या पिवळ्या, मंद, अस्थिर प्रकाशाच्या साहाय्याने दाखवीत होता आणि जें आपल्या मराठमोळ्यां भाषेंत सांगत होता तें डोळे आणि कान घाईघाईने साठवून घेत होते. पलित्याच्या साहाय्याने वाट दाखवणारा माणूस आम्हांला तिथे भेटला नसता, तर श्रीचक्रधरांना आणि त्यांच्या शिष्यांना जसें वेरूळच्या लेण्यांतून हिंडतांना 'यरामागें यरातें धरूनि वीवरें वीवरें बीजें—' करावें लागलें, तसेंच करावें लागलें असतें.

वाटाड्या सांगत होता तें कान अधीरपणे ऐकून साठवीत होते. पण हें वर्णन त्या डोंगराने त्याच्याकडून शेकडो वेळां ऐकलें असेल. आणि त्या वाटाड्यापेक्षा किती तरी अधिक गोष्टी त्याने पाहिल्या आहेत. आपल्या अभेद्यतेचें आणि दुर्गमतेचें त्या वाटाड्याने केलेलें तें वर्णन ऐकून त्याला हसूं आलें असेल.

आणि कां हसूं येऊं नये? नियतीने त्याला विसंवादाचे जे खेळ दाखवले ते एकाच वेळीं हसूं आणि रडूं आणणारे होते. आणि मग शेवटी 'अति झालें नि हसूं आलें' ह्या न्यायाने रडूं गेलें आणि रूक्ष हसूं तेवढें राहिलें.

ज्याची अभेद्यता आणि दुर्गमता एवढी कौतुकाची गोष्ट होती, त्याला त्यांची कसोटी पाहण्याची वेळ कधीच आली नाही. त्याच्यावर जो पहिलाच घाव बसला तो त्याच्यापर्यंत न पोचतांच परतवला गेला. पराक्रमाने नव्हे, द्रव्याने. आपली आणि आपल्या राज्याची सुटका करून घेण्यासाठी रामदेवराव जाधवाने अल्ला-उद्दीन खिलजीला पंचवीस हजार रत्तल चांदी, पंधरा हजार रत्तल सोनें, सहाशे मण मोत्यें आणि दोनशे मण हिरेंमाणकें इतकें द्रव्य दिलें. इतके रत्तल धान्य जर त्याच्याजवळ किल्ल्यांत असतें तर किल्ल्याच्या अभेद्यतेची कसोटी लागती. पण धान्याचीं म्हणून जीं पोतीं किल्ल्यांत गेलीं होतीं तीं मिठाने भरलेलीं होतीं. खाल्ल्या मिठाशीं बेइमानी करण्यासाठी मीठच वापरल्याचें इतिहासांत हें बहुधा एकटें एकच उदाहरण असावें.

एवढें मोटें द्रव्य देणारा रामदेवराव जाधव नुसताच आपला श्रीमंत होता,

आणि त्याचें राज्य मात्र एवढेंसेंच होतें, असेंहि नाही. त्याच्या राज्याच्या सीमा सगळा महाराष्ट्र व्यापून खाली कर्नाटकांत शिरल्या होत्या. 'द्वारावती पुरवराधीश' असें बिरुद मिरवणारा यादव वंशाचा राजा होता तो.

पण नादानी, गाफिली आणि फितुरी जिथे आहेत तिथे किल्ल्याची अभेद्यता काय करणार? धर्मांप्रमाणेच 'दुर्गो रक्षति रक्षितः' हेंच खरें.

नियतीचा हा विसंवाद इथेच संपला नव्हता. रामदेवरावाचें राज्य जसें मोठें होतें तसें तें विद्येने आणि उद्यमानेहि समृद्ध होतें. चौल, ठाणें, सोपारा ह्या बंदरांतून परदेशांतला नानापरीचा माल पैठणला येत असे. आणि गंगातीरचे व्यापारी कापडचोपड घेऊन विंध्य ओलांडून माळव्यांत व्यापाराला जात. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या रामदेवरावाची राजवट म्हणजे महाराष्ट्राच्या जागृतीचा उषःकाल मानला जातो. हेमाद्रीसारखा प्रकांडपंडित आणि कट्टर धर्माभिमानी त्याचा करणाधिप होता. नाना विषयांवर संकलनात्मक आणि टीकात्मक ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिले जात होते. आणि त्याबरोबरच आणि त्याच्याच राजवटींत मराठी वाङ्मयाचा पाया रचला जात होता. त्याच्याच राज्यांत वऱ्हाडांत ऋद्धिपूर येथे, म्हाइंभटाने 'लीळाचरित्र' आणि 'ऋद्धिपुरवर्णन' लिहून मराठी चरित्रलेखनाचा श्रीगणेशा केला. त्याच्याच राजवटींत त्याच ऋद्धिपुरांत महादाइसेने धवळे रचले. त्याच्याच राजवटींत नेवासें येथे ज्ञानेश्वराने 'ज्ञानदेवी' लिहिली. आणि खुद्द त्याच्या सभेंत नरेन्द्राने आपलें रुक्मिणीस्वयंवराचें काव्य वाचून दाखवलें. इतकेंच नव्हे तर त्या काव्याला आपलें नांव जोडावें, असें राजाने—रामदेवरावाने—ओवीगणिक भरपूर द्रव्य देऊं करून सुचवतांच "न राजे हो, आमुचेया कविकुला बोलु लागैल" असें बाणेदार उत्तर देऊन कविपणाची प्रतिष्ठा राखली.

वैश्या-शूद्रांना मोक्षाचा मार्ग मोकळा करून देणाऱ्या भागवत धर्माचा पाया त्याच्याच राजवटींत घातला गेला. आणि त्याच्याच जोडीने वैश्या-शूद्रांना व्यवहारतःहि कमी न मानणाऱ्या महानुभाव पंथाचा प्रसार झाला. अशा ह्या रामदेवरावाने उमाप द्रव्य ओपून आपला आणि आपल्या राज्याचा बचाव केला.

एवढ्यानेच भागलें नाही.

अल्लाउद्दीन परत गेल्यावर, आपलें सैन्य वाढवून व किल्लेकोट अधिक बळकट करून, पुन्हा अल्लाउद्दिनाला दक्षिणेकडे नजर वळवण्याची हिंमत होणार नाही अशी जागृत सिद्धता त्याने ठेवली नाही. तो दिल्लीच्या बादशहाचा मांडलिक

झाला. सर्व मांडलिकांच्या शिरस्त्याप्रमाणे खंडणी भरण्याची त्याने टाळाटाळ केली. पुन्हा पुन्हा देवगिरीवर आक्रमण ओढवून घेतलें. आणि सगळ्यांत मोठा चमत्कार म्हणजे शेजारचीं राज्यें नष्ट करण्याला दिल्लीच्या सुलतानाला त्याने साहाय्य केलें.

ही अवनति देवगिरीने पाहिली. रामदेवरावाच्या मृत्यूनंतर दहा वर्षांच्या आंत त्याच्या मुलाचा दिल्लीच्या सुलतानाने अमानुषपणे वध केला. आणि त्याच्या जावयाच्या अंगाचीं सालडीं सोलून त्याचें शिर देवगिरीच्या महाद्वारांत लटकत ठेवलें.

हेंहि देवगिरीने पाहिलें.

आणि ह्यानंतर एखाद्या बाजारी वस्तूप्रमाणे तो ह्याच्या हातून त्याच्या हातीं जात-येत राहिला. मध्येच बारापंधरा वर्षें त्याला दिल्लीच्या तुगलक सलतनतीची दारुस्सलनत होण्याचें भाग्य लाभलें. ह्या अवधींत त्याचें जुनें संस्कृत नांव जाऊन त्याला 'दौलताबाद' हें म्लेंच्छ नांव मिळालें. पोरसवदा एकनाथाला आपल्यावर आलेलें परचक्र निवारतांना त्याने पाहिलें. दत्तात्रेयाने एकनाथाला मलंगवेशांत दर्शन दिलें तेंहि त्याच्याच साक्षीने. ज्या शहाजीचें जिजाबाईशीं मोठ्या थाटांत लग्न झालेलें त्याने पाहिलें, त्याच शहाजीच्या नातसुनेला आणि पणतवंडाला—संभाजीच्या बायको-मुलाला—कैदी म्हणून इथे आलेलेंहि त्याने पाहिलें. गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीच्या शेवटच्या सुलतानाचा—अबुल हसन तानाशहाचा—चिनी महलमधला चौदा वर्षांचा तुरुंगवास त्याने पाहिला. तसाच परवा भारताचीं सैन्यें पोलिस कारवाईसाठी निजामाच्या राज्यांत शिरलीं तेव्हा एक चुटपुटता संग्रामहि त्याने पाहिला.

नियतीचा हा विसंवाद, काळाने चालवलेला हा सांइखड्याचा खेळ, ज्याने शतकानुशतकें पाहिला, त्याला भाडोत्री वाटाड्याच्या तोंडचे आपल्या अभेद्यतेचे पवाडे ऐकून हसूं येऊं नये तर काय व्हावें ?

तो तासून काढलेला उभाच्या उभा कडा, त्याच्या शेजारचा भयानक खंदक, तें डोंगराच्या पोटांत शिरून वळसे घेणारें भुयार—तीं होतीं तशींच आजहि आहेत. आणि शतकानुशतकें त्यांची साथ करणाऱ्या वृक्षवल्ली, त्याहि आहेत. तुम्ही पावसाळा सरल्यावर तिथे गेलांत तर डोंगराच्या सर्वांगावर फुललेलीं पांढरीं, पिवळीं, निळीं फुलें तुमचें सस्मित स्वागत करतील. गवतांचे तुरे माना डोलावून त्यांना साथ देतील. वृक्ष तुम्हांला सावली देतील. जनार्दनस्वामीची समाधि

एकनाथाची—त्या कर्त्या साधु सुधारकाची—आठवण करून देईल. एका अडक्याच्या शोधासाठी एकनाथाने सारी रात्र जागून काढली, ती कुठे म्हणून तुम्ही इकडेतिकडे पाहूं लागाल.

इथपर्यंत चढून तुम्हांला शीण आलेलाच असेल. पण इथला गार वारा तुम्हांला पुन्हा ताजेंतवानें करील. आणि रानजाईचा धुंद सुवास उल्हसित करील. त्याच्याहिवर जाऊन चौफेर दृष्टी फिरवलीत, तर निसर्गाच्या दर्शनाने हरखून जावें, माणसाच्या कर्तृत्वाचें कौतुक करावें, की नियतीचे विसंवाद पाहून सुखदुःखें सम करण्याला शिकावें, असा तुम्हांला संभ्रम पडेल.

▪ ▪

# तें ऋद्धिपुर देखिलें

"बामनायुच्या आंगाले सोनं लागलेलं असते काय हो? आन् कुनब्यायुच्या आंगाले काय माती असते?"

"होय मातीच असते." असें उत्तर मी देणार होतों. पण चांदूर बाजाराहून ऋद्धिपूरकडे मला आपल्या तांग्यांतून नेत असलेला तो तांगेवाला उच्च भूमिकेवरून आणि कळकळीने बोलत होता, म्हणून त्याला तसें थिल्लर उत्तर माझ्याच्याने देववलें नाही.

"आमच्या पंथांत ऊच–नीच नाही, भाऊ." तो मला महानुभाव पंथाचें वैशिष्ट्य सांगत होता. "आमचे गोविंदप्रभु कुनब्याच्याय् घरीं ज्यवले, शिंप्याच्याय् ज्यवले, आन् मांगाच्याय् ज्यवले. आपून आमच्यांतलेच काय?"

मीं म्हटलें, "नाही." आणि मग थोडा वेळ थांबून विचारलें, "मग तुम्हांला कोणाच्याहि हातचं जेवणबिवण चालत असेल?"

"मी उपदेशी आहों जी. आम्ही गृहस्थाच्या धर्मानं, आपल्या जातीच्या धर्मानं, चालतों."

चांदूर बाजाराहून ऋद्धिपूरपर्यंत सडक आहे, पण तिच्यावरची खडी सगळी निखळून वर आली होती. ती घोड्याच्या पायांना बोचत होती. त्यामुळे तांगा हळूहळू चालला होता.

"हें आमचं सरकार! होट मांगतांना आमची आठवण आली त्यायले.

आतां विसरले. चार वर्षं झाले. रस्त्यावरून रूळ फिरला नाही." टांगेवाला एकसारखा बोलत होता.

उमरावतीपासून चांदूर बाजारपर्यंतच्या तेवीस मैलांचा मोटरचा प्रवास थांबत-थांबतसुद्धा, एका तासांत, किती सुखांत झाला होता! सकाळची थंड वेळ होती. रस्त्याच्या दोन्हीकडे शेतांत पऱ्हाटी उभी होती. त्यांचीं बोंडें फुटून कापूस बाहेर डोकावत होता. दहाबारा ओळी ठेंगण्या पऱ्हाटीच्या आणि एक ओळ उंच तुऱ्हाटीची. त्या हिरव्यावरचा पऱ्हाटीचा पांढरा शिडकावा आणि तुरीच्या सोनेरीपिवळ्या फुलांची विभाजक रांग. त्यांतच मध्ये मध्ये गर्द झाडें. सगळें कसें उत्फुल्ल—समृद्ध—प्रसन्न होतें! खारी रस्त्यापासून झाडांवर, झाडांवरून रस्त्यावर, तुरुतुरु येरझारा करीत. मोटरीचें येणें जाणवलें की, जागच्या जागीं एकदम थबकत. आणि मोहरा वळवून मागे फिरत, त्या एकदम झाडांवर. सडपातळ, आटपशीर अंगलटींचे तपकिरी-तांबूस रंगाचे कवडे यंत्रासारख्या खालीवर माना करीत रस्त्यावर किडे-दाणे टिपीत. मोटरीची चाहूल लागली की, फड-फड-फड पंख वाजवीत झाडांवर नाही तर कुंपणावर उडून जात. काजळी-काळ्या तोंडाच्या थोराड वानरांचे कळप ऊन खात, उवा काढीत रस्त्यांवर बसलेले असत. ते मोटरीची धडधड-घरघर कानावर पडतांच एकदा मोटारीकडे पाहत आणि मग मोटारीला भिववण्यासाठी गंभीर—खरोखरच माणसांना भेवडावणारा—भुभुःकार करीत करीत स्वतःच भिऊन पळूं लागत. आणि झाडांच्या बुंधांवर चढून मोटर निघून जाईपर्यंत अर्ध्या उंचीवर बुंधांना मिठी मारून राहत.

खारी, कवडे, साळुंक्या, वानरें—सगळ्यांचे रंग, मातट, तांबूस, तपकिरी मातीशीं जुळणारे होते. तसेंच मातीच्या रंगाशीं जुळणारे कपडे घातलेलीं माणसेंहि रस्त्यावर मध्येंच ऊन खायला बसलेलीं असत. तो रस्ता खारींचा, कवड्यांचा, वानरांचा, साळुंक्यांचा तसाच त्यांचाहि होता. त्यांच्याहून अधिक. त्यांच्याच बापजाद्यांनी, भाऊबंदांनी, कोणीं तरी तो तयार केला असेल. मोटरीचा कर्णा वाजला, आणि तो त्यांच्या कानापर्यंत पोचला म्हणजे तेहि रस्त्यावरून सावकाश उठत आणि कडेला उभे राहून, आपल्या हक्कावर अति-क्रमण करणाऱ्या त्या मोटरीकडे, आणि ज्यांच्या जिवावर ती हें अतिक्रमण करीत होती त्या उतारूंकडे कांही चेष्टेने, कांही मत्सराने, पाहत. मोटर पुढे जाऊन धूळ विरली की, पुन्हा मूळ जागेवर येऊन बसत. आणि मग

वानरें, कवडे, साळुंक्या, खारी हींहि, जणुं मध्ये कांहीच अडथळा आला नाही अशा निर्विकारपणे, थोडा वेळ खंडित झालेला आपला उद्योग पुढे चालू करीत.

त्यांची गंमत पाहतां पाहतां ते तेवीस मैल आणि तो तास कसा गेला तें कळलें नाही. आताचा हा चारच मैलांचा प्रवास होता, आणि त्यालाहि जवळजवळ तासभर लागला. तांगेवाला चांगला बोलका होता म्हणूनच कसा तरी वेळ गेला.

मध्येच एखादें देवळीसारखें कांही दिसलें म्हणजे तो म्हणायचा, "हें आपलंच होय, बरं का!" 'आपलंच' म्हणजे पंथाचें. होतां होतां गाव येत चाललें. भगवी लुंगी, भगवा सदरा आणि भगवी कानटोपी घातलेला आडव्या अंगाचा एक मनुष्य म्हैस हाकीत समोरून येत होता त्याने तांगेवाल्याला खूण करून "पाहुणे कोण?" म्हणून विचारलें. आणि तांगेवाल्याने "मुंबईचे आहेत. आपलेच आहेत. दर्शनाला आलेत." म्हणून सांगितलें. आणि तो पलिकडे नजरेआड झाल्यावर तांगेवाला मला म्हणाला, "महंत आहेत." आणि मग डाव्या नाकपुडीवर एक बोट ठेवून, हाताचीं कोपरें उंचावून "त्याने एक चांगली पुष्ट बाई ठेवली आहे!" ही त्याची खाजगी माहितीहि त्याने मला दिली. मीं त्यांच्यापैकी नाही हें सांगितलें असूनसुद्धा तो माझ्याबद्दल "आपलेच आहेत" असें सांगत होता. त्यांत त्याचा उद्देश त्या लोकांच्या मनांत माझ्याविषयी विश्वास उत्पन्न करावा असाच असला पाहिजे.

गावाच्या अलिकडे नदी लागली. कांही म्हशी पाण्यांत समाधि लावून बसल्या होत्या. कांही महंतांकडून अंग चोळून धुवून घेत होत्या. कांही महंत स्नानें करून आपलीं 'काषायें' धूत वाळवीत होते. आणि मग पुढे गाव आला तशीं "अटन विशेषें हालचाली करितें भिक्षुकें" हि दिसूं लागलीं.

"तुम्हांला राजमठांत जायाचं का जळक्या हवेलींत?" तांगेवाल्याने मला विचारलें. मीं म्हटलें, "मला कांही ठाऊक नाही. तूंच कुठे न्यायचं तें ठरव."

मग त्याने तांगा गावाबाहेर सोडला आणि आम्ही भगतराज बुवांचा मठ, जळकी हवेली (हिच्या गेरूने रंगवलेल्या भव्य लाकडी दाराच्या गणेशपट्टीवर "हिंमते मर्दा मदद खुदा। पुरुस करेसो होय गा॥" हे "मदायत्तं तु पौरुषं" वृत्तीचे शब्द पाहून मला जरा गंमत वाटली.) पाहत पाहत राजमठाकडे चाललों. रस्ता चढणीचा होता. वाटेने अनेक घरांच्या दारांत आणि ओट्यांवर काळ्या लुंग्या, काळीं कुडतीं ल्यायलेले, मुंडन केलेले, कुणी तोंड धुताहेत, कुणी नुसतेच

ओट्याच्या भिंतीला टेकून बसले आहेत, कुणी हातांत जपमाळ ओढताहेत असे बरेच लोक दिसले. आणि पहिल्या प्रथम तरी मला ते कोणी तरी मुसलमान सूफी फकीर असावेत असें वाटलें. पण तसल्या फकिरांच्या गळ्यांत तांबड्या-पिवळ्या केरबा मण्यांच्या माळा असतात, तशा ह्यांच्या गळ्यांत नव्हत्या. आणि ते लोक केसबीस विंचरून आपण जरा बरें दिसावें असें करतात तसेंहि ह्या कृष्णवस्त्रधाऱ्यांचें नव्हतें. आपण कसे दिसतों ह्याबद्दल त्यांना यत्किंचितहि पर्वा दिसत नव्हती. मग मला चटकन आठवण झाली, महानुभाव संन्याश्यांपैकी हे काळें परिधान करणारे होते. थोडेंसें पुढे गेल्यावर तशाच बायकाहि दिसूं लागल्या. मुंडन केलेल्या, काळें ल्यालेल्या. नजर कुठून उचलावी आणि कुठे ठेवावी तें कळेना. नजरेच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करीत तांगेवाल्याच्या मागून मुकाट्याने पुढे चाललों.

चढण संपवून आम्ही राजमठापाशी आलों. हें श्रीगोविंदप्रभूंचें निवासस्थान.

"हें महाद्वार." एक महंत मला स्थान दाखवून सांगत होते. "श्रीगोविंदप्रभु इथे उभे होते. श्रीचक्रधर इथे." माझ्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह दिसलें असावें म्हणून ते पुढे म्हणाले, "श्रीगोविंदप्रभूंची आणि श्रीचक्रधरांची पहिली भेट झाली तें स्थान हें नव्हे. मी तें तुम्हांला नंतर दाखवतों."

महाद्वारांत जिथे श्रीगोविंदप्रभु आणि श्रीचक्रधर उभे होते त्या ठिकाणीं आता चांगले उंच ओटे बांधलेले आहेत.

"धर्म सुवर्णकाराचें यंत्रु । कीं मोक्षसिद्धीचें विवरु ॥" असें त्या वेळचें महाद्वार आता मंदिराच्या गाभाऱ्यासारखें झालें आहे. त्यावर शिखर चढलें आहे. पण आजूबाजूला दृष्टि टाकली म्हणजे मन विषण्ण होतें. जिथे पूर्वी श्रीगोविंद-प्रभूंचें मुख्य निवासस्थान आणि नृसिंहाचा 'मढ' होता तिथे आता मसजिद आहे. आवाराचा उरलेला भाग पडल्याझडल्या बांधकामाचीं खंडारीं आणि बोरीबाभळी, घाणेरी, तरोटा ह्यांनी व्यापला आहे. त्यांतच एका कोपऱ्यांत नुकत्याच उकरल्यासारख्या खोलगट जागेंत खोलेश्वर आहे. ज्या विहिरीवर बसून मराठीचा आद्य चरित्रकार म्हाइंभट जेवण करीत असे ती विहीर शेजारीच आहे. पलीकडे त्रिपुरुषाचा 'मढ' आहे. जिकडेतिकडे पडलेल्या भिंतींचे ढिगारे आहेत, दगड-गोटे आहेत.

स्वतःच्या विवाहाचा समारंभ व्हावा अशी एकदा श्रीगोविंदप्रभूंना इच्छा झाली. त्याप्रमाणे सगळीं वऱ्हाडाची 'आइती' झाली. बाहेर "मांडवाच्या द्वारीं मंगळ तुरे वाद्यंतरें" वाजूं लागलीं. आणि "आवो मेली गायेना—चक्रधराचे सीरीं धरुनियां चरण ऐसें गाये—" असें म्हणून श्रीगोविंदप्रभूंनी महदाइसेकडून आपल्या विवाह-मंगलाचे धवळे गाववून घेतले, आणि एक प्रकारें मराठी स्त्री-गीतांचा पाया घातला, तो इथेच. तो सोहळा इथेच कुठे तरी झाला असेल. एका अर्थीं हा राजमठ म्हणजे मराठी भाषा आणि साहित्य ह्यांच्या मूळपीठां-पैकीच एक आहे. त्याची आजची राखट भग्नता आणि रितेपण मनाला एक प्रकारचा उदासपणा आणतात.

महानुभावपुऱ्यांतून निघून पुढे जातांना "हा मुसलमानपुरा, हा मांगपुरा." असें महंत दाखवीत होते. ते मध्येच म्हणाले, "ही 'वेदशाळा.' इथे श्रीगोविंदप्रभूंचें वेदाध्ययन झालें. त्यांची बुद्धि इतकी तीव्र होती की, इतरांना जें शिकायला महिना लागायचा तें ह्यांना एक दिवसांत येई. आणि इतर जें वर्षांत शिकत तें श्रीप्रभु महिन्यांत शिकत. हें 'तिको पाध्यांचें आवार'. ह्यांच्याकडे श्रीप्रभु पुष्कळ वर्षं होते. हा 'उडवेश्वर'. 'उडवी' म्हणजे गोवऱ्या ठेवण्यासाठी केलेलें कूड. ह्या गोवऱ्यांच्या खोलींत श्रीप्रभु निजत असत. एकदा असेंच ते निजले असतांना मध्यरात्रीच्या वेळेला तिथून एकदम झगझगीत प्रकाश निघाला. तो अंतराळांत चढला. तिकोपाध्यांच्या ब्राह्मणीला वाटलें, 'वेड्यापिशा' गुंडमाने आग लावली आणि तिने आरडाओरडा केला. ती आग नव्हती. तो प्रकाश गुंडमाच्या शरिरांतून निघाला होता. असा त्याच्या अंगांतून दोनचार वेळां प्रकाश निघाला होता. आकाशापर्यंत पोचला होता. आणि परत संकोचून त्याच्या शरिरांत लुप्त झाला होता. ऋद्धिपूरच्या लोकांना हें माहीत होतें. म्हणूनच ते म्हणत, 'नेणीजे हा गुंडो कोणु: हा ईश्वर अवतारु होय.'"

चालतांचालतां महंत एकेक ठिकाण मला दाखवीत होते. त्याचें माहात्म्य सांगत होते. मध्येच वाटेने भेटणारे लोक महंतांना दंडवत करीत होते. महंत त्यांना "देव रक्षो!" म्हणून आशीर्वाद देत होते. महंत मराठींतच बोलत होते. पण तें कानाला थोडें वेगळें लागत होतें. मी विचारलें तेव्हा कळलें, महंत पंजाबी आहेत. पुढे पाहिलें तो पुष्कळच महंत पंजाबी दिसले. पांचशे वर्षांपूर्वी

पंजाबांतल्या तलागंग तहसिलींतल्या कोटसारंग गावच्या कृशनचंद्र खत्र्याची आणि एका महानुभाव महंताची गाठ पडली. त्याने पंथाचा स्वीकार करून पंजाबांत प्रसार केला तो आजतागायत चालू आहे. माझ्याबरोबरचे महंत म्हणाले, "आमच्या घराण्यांत प्रत्येक पिढीला एक तरी मनुष्य महंत झाला आहे. असं किती तरी पिढ्या चाललं आहे."

थोडीशी चढण चढून गावाबाहेर एका मोकळ्या माळावर आलों. एका ठिकाणीं दोन बैठे ओटे एकमेकासमोर दिसले. तिथे पोचतांच महंत म्हणाले,

"हा रांधवण हाट. इथेच श्रीगोविंदप्रभूंची आणि हरिपाल यांची भेट झाली आणि हरिपालदेव 'श्रीचक्रधर' झाले."

ऐकून मी क्षणभर स्तब्ध राहिलों. एका महान क्षणाचा ठसा घेतलेली जागा होती ती.

रांधवण हाट म्हणजे गावाच्या बाजारपेठेंतली हलवायांचीं दुकानें असलेली जागा. माळीयांचा हाट, भुसारहाट, गांधीहाट, सोवणीहाट, कासारहाट, सिंपेहाट, असे अनेक हाट असलेला हा गाव त्या काळीं पुष्कळच मोठा होता. तें नांवाप्रमाणेच 'ऋद्धि'पुर होतें. आज त्या हाटांचीं नुसतीं नांवें आठवणींत आहेत. आज आवतीभोवती शेतें, ओसाडी आणि झाडेंझुडपें असलेल्या ह्या रांधवण हाटांत एक दिवस श्रीगोविंदप्रभु क्रीडा करीत होते. सावळी मूर्ति, बेंबीपर्यंत पोचणारी दाढी, नेसलेल्याच वस्त्राचें एक टोक अंगावर, डावा डोळा अर्धवट झाकलेला, डाव्या हाताची करंगळी वाकलेली, मधून आकाशाकडे पाहायचें, मधूनच आपल्याशींच बोलायचें, असें ध्यान होतें. तें गावाच्या ओळखीचें होतें. त्या दिवशींहि रांधवण हाटांत ते नेहमीप्रमाणेच आकाशाकडे पाहत आपल्याशींच बोलत, हलवायाच्या दुकानांतली वस्तु उचलून घेऊन खात-खेळत होते. पण तो दिवस इतिहासांत फार महत्त्वाचा ठरला. रांधवणाच्या घरीं ते तसा खेळ करीत होते. आणि भडोचच्या प्रधानाचा मुलगा हरिपालदेव, घरदार, बायको-मुलगा टाकून रामटेकच्या यात्रेला निघाला होता तो देऊळवाड्याला नोकराला तसाच सोडून एकटाच ऋद्धिपुराला आला आणि रांधवण हाटांत चाललेला गुंडमप्रभूचा हा खेळ पाहत राहिला. गुंडमप्रभू सेंगुलें-बुडुडें खात होते, तें त्यांनी प्रसाद म्हणून पुढे करून, "अरे घे घे घे" म्हणत 'सर्वज्ञां'कडे टाकिलें. मग

तें "सर्वज्ञ वरिचेयावरी झेलिलें : श्रीमुकुटावरि धरिलें : मग आरोगिलें (खादलें) : तेथ प्रभु सर्वज्ञा ज्ञानशक्ति दिधली : तें सर्वज्ञ स्वीकारिली ॥" आणि त्याच वेळीं "अरे मेला जाय : चक्रा होय : चक्रु होय म्हणे : नव्हे म्हणे : श्रीचक्रधरु होयाचि म्हणे." असें म्हणून गोविंदप्रभूंनी हरिपालदेवाचें 'श्रीचक्रधर' नामकरण केलें.

ऋद्धिपुरांतला खडान् खडा श्रीगोविंदप्रभूंच्या विचरणाने, खेळांनी, खोड्यांनी, लीलांनी पावन झाला आहे. लहानपणीं काटसुऱ्याहून ऋद्धिपुरांत राहायला आल्यापासून, गांवभर भटकावें; कोणी मुलें जेवीत असतील त्यांच्या ताटांतलें उचलून आपण खावें; जेवायला बसलें म्हणजे आपलें ताट उचलून डोक्यावर घ्यावें; मांगाच्या घरीं, परटाच्या घरीं, कुणब्याच्या घरीं, तेल्याच्या घरीं मन मानेल तेव्हा जावें, जेवायला-खायला मागावें, भांडून मागून घ्यावें, त्यांच्या मुलांना खेळवावें-निजवावें;—असा त्यांचा उद्योग. म्हणूनच त्यांना लोक "राऊळ वेडें, राऊळ पिसें" म्हणत. पण त्यांना त्यांचें कौतुकहि होतें. ते गाव सोडून गेले तेव्हा त्यांना त्यांनी मुद्दाम बोलावून आणलें. त्यांनी गावांतल्या मेलेल्या मुलांना जिवंत केलें होतें. मरणाची पूर्वसूचना दिली होती. दुःखितांना दिलासा दिला होता. थंडीच्या दिवसांत एकदा सूर्याला "आवो वरता वरता येना" म्हणून "पाहार यकाचेनि मानें" वरती आणलें होतें. असा तो पोरांत पोर, थोरांत थोर, सगळ्यांपेक्षा वेगळा पण सगळ्यांचा जिव्हाळ्याचा सखा होता. हें गाव त्याचें म्हणून तर तें पवित्र आहेच. पण गुरुभेटीसाठी ह्या गावाला श्रीचक्रधरांनी दिलेल्या अनेक भेटींमुळे त्याची पवित्रता वाढली आहे. महानुभावांची ती काशी झाली आहे.

सासूसुनेची विहीर, कालिका, कोलारी ह्यांचीं देवळें वगैरे स्थानं दाखवीत दाखवीत महंतांनी मला भैरव बुरुजापाशीं आणलें. भैरवाच्या मंदिरांत एकदा श्रीचक्रधरांचें 'अवस्थान' असतांना श्रीगोविंदप्रभु तिथे आले आणि श्रीचक्रधरांच्या नाकाला, कानाला, डोळ्याला, निढळाला हात लावून त्यांनी "हा देवो" म्हणून "देवो प्रकाशिला."

भैरव बुरुजापाशीं गावाची प्रदक्षिणा पूर्ण झाली. मला निरोप देण्यासाठी महंत थोडे पुढे तांग्यापर्यंत आले. शेजारीं एका आवारांत एक पोक्तशी बाई कांही काम करीत होती तिला उद्देशून म्हणाले,

" नव्या वावरांत मानसं धाडले काय ?"

आणि मग माझ्याकडे बघून म्हणाले,

" पंधराक येकर जमीन आमच्याकडं आली यंदाच. वावरांतला कापूस काढणं चाललंय."

म्हातारी म्हणाली, " धाळ्ळे जी."

" बर. मंग उद्या पाह्यटीच लक्षिम्यायले घेऊन ये जो."

" जी."

ह्या संभाषणाने माझ्या मनाला थोडासा धक्का दिला. श्रीगोविंदप्रभूंचा राजमठ होता खरा, पण तो निवासापुरता. त्या 'वेड्यापिशाने' जमीनजुमला मिळवूं म्हटलें असतें तरी त्याला तो व्यवहार जमला नसता. म्हाइंभट होता. हवी तेव्हा हवी ती वस्तु तो त्यांच्यासाठी आणून देत होता, आल्यागेल्याचें आगतस्वागत करीत होता, म्हणून त्यांचें चाललें होतें. त्यांनी स्वतः कांही केलें नसतें. श्रीचक्रधर व्यवहार अधिक जाणणारे होते. पण ते तर अगदी वाच्यार्थाने परिव्राजक होते. सतत हिंडत असत. त्यांनी कधी कुठे आपला असा मठ केला नाही. त्यांच्या मागीलांनी हे मठ कां करावे, घरें कां बांधावीं, जमिनी कां घ्याव्या, असें मनांत आलें. पण लगेच पुन्हा वाटलें, हे मठ जर न बांधले जाते, त्यांना जर सुस्थिरता, सुरक्षितता न लाभती, तर चक्रधरांच्या संचाराची, निवासाच्या स्थानांची आज आठवण कशी राहिली असती ? इतिहासाला आधार कुठे मिळाला असता ? महानुभाव ग्रंथांचें काय झालें असतें ? आणि मराठी साहित्याची केवढी हानि झाली असती !

गावाचें पूर्वीचें वैभव आता राहिलें नाही. त्या वेळचे " हाट चोहाटे तीथरी " नाहीसे होऊन बारीकसारीक दुकानें तेवढीं राहिलीं आहेत. एखाद्या घराच्या ओट्यावर शिवण्याचें यंत्र चालतांना ऐकूं येईल, तर एखाद्या रस्त्यासरशा उघड्या पडवींत एखादा तांबट एका हाताने भाता चालवून दुसऱ्या हाताने, एखादी फुटकी तपेली पुन्हा सांधण्यासाठी म्हणून भट्टींत तापवतांना दिसेल.

हिरण्यकशिपूच्या वधामुळे घडलेल्या ब्रह्महत्येच्या पातकाचें क्षालन करण्यासाठी जिथे नृसिंहाला हात धुण्याला यावें लागलें होतें, जिथलीं परिपूर्ण ओसंडणारीं

निर्मल-निष्पाप जलें पक्षियांच्या कलरवाने सर्वांगें वाचाळ झालीं होतीं, तें गावा-शेजारचें विस्तीर्ण सरोवर आता बुजून केवळ नामशेष झालें आहे. आणि ज्या नृसिंहाने तिथे हात धुतले होते त्याच्या मंदिराची मसजिद झाली आहे.

तरीहि अजून ऋद्धिपूरला वर्षांतून दोनदा मोठी यात्रा जमते. लाखो नाही तरी हजारो महानुभाव भक्त लांबलांबून येतात. आणि यात्रा संपवून परत जातांना "सासुरवासें शिणली। तिये भेटे जेवि माऊली। असो हे तैसी परी जाली। ऋद्धिपुर देखिलेयां॥" असें समाधान घेऊन घरोघर जातात. मी यात्रेला गेलों नव्हतों. मला त्यांचें समाधान लाभलें नव्हतें. पण मला स्वतःचें असें वेगळेंच समाधान मिळालें होतें. मात्र त्या स्थानाच्या उदासपणाने त्याला एक काळसर कड दिली होती.

महंतांचा निरोप घेऊन मी टांग्यांत बसलों.

वर आलेल्या खडीवरून कष्टाने पावलें टाकीत चाललेल्या घोड्याला चाबूक मारतां मारतां टांगेवाला मला म्हणाला, "आपून त आमच्यांतले नाही, मंग कायले आले होते रितपुराले? पोथ्याय् त नाही पाह्यल्या जयक्या हवेलींतल्या."

मीं म्हटलें, "आलों होतों आपल्या खुशीसाठी. रितपूर पाहायला."

तो जरासा थांबून पुन्हा बोलूं लागला, "गूयू चांगला भेट्टे चांदूर बाजारांत. घ्यऊन जाजो एखांदी भेली. मुंबईत नसन् भेटत असा गूय."

माझें त्याच्या बोलण्याकडे लक्ष्य नव्हतें. तें हळूहळू लांब जात चाललेल्या गांवाकडे होतें. बाहाळिये नारायण व्यासाला दिसलेलीं "उंचपणें कलसीं। स्पर्श कीजेत आकाशीं।" ऐसीं "चातुर्दक्ष सुरालयें" किंवा "गोक्षीर धामधवलारें" तिथे दिसत नव्हतीं. एक भगतराजबुवाचा आणि दुसरा राजमठाचा असे दोनच आणि तेहि पुष्कळ अलिकडल्या काळांतले कळस काय ते लांबून दिसत होते. त्यांच्याकडेच पाहत मीं "तें ऋद्धिपुर देखिलें" अशी आपल्या मनाची समजूत घातली.

# अळजपुर निकें नगर

स्टेशनापासून शहराकडे जाणारा रस्ता रेल्वेचे रूळ ओलांडण्यासाठी जिथे नागमोडी वळण घेतो, तिथेच त्याला थोडा चढ आला आहे. त्या ठिकाणीं तांगा आल्याबरोबर समोर दूला रहमानशाहाच्या दर्ग्याच्या चुन्याने रंगवलेल्या भिंती आणि गुंबज दिसूं लागले. जवळजवळ चाळीस वर्षांनी मी आज पुन्हा त्यांच्याकडे पाहत होतों. त्यावेळीं मला दिवसांतून दोनदा त्याचें दर्शन होत असे. कारण माळवेसपुऱ्यांतल्या आमच्या घरून परतवाड्याच्या म्युनिसिपल हायस्कूलमध्ये मला ह्याच रस्त्याने जावें लागे. माळवेसपुऱ्यांतून निघून श्रीसंस्थान बावनएक्का थिएटरवरून (हें रस्त्यापासून थोडेंसें आंत असे.) एका वेशींतून तहसील कचेरीच्या मागल्या रस्त्याने इथे यायचें. मग इथून रेल्वे रस्ता ओलांडून देशमुखांचें जिन, खापड्यांचा बंगला असें परतवाड्याला जाऊन शाळेकडे वळायचें. किंवा दूला रहमानशहाजवळ बिचन नदी ओलांडून शेतांतून उमरावती रस्त्याला लागायचें आणि परतवाड्याला जायचें. एका रस्त्याने चारआठ दिवस गेले की, दुसरा रस्ता अधिक जवळचा आहे असें वाटायचें. मग त्या रस्त्याने जायचें. पण कोणत्याहि रस्त्याने गेलें तरी दूला रहमानशाहाचा दर्गा दिसायचाच.

दूला रहमानशाहाचा दर्गा दृष्टीस पडल्याबरोबर मला त्या दिवसांची आठवण झाली आणि मनांत आलें, माझ्या पावलांच्या खुणा आता ह्या मातींत दिसणार

नाहीत, पण ज्या मातींत त्या उमटल्या ती माती तर हीच असेल ना ? एकदा वाटलें, तांग्यांतून उतरावें, वाहणा काढून हातांत घ्याव्या आणि पुन्हा त्या वाटेने पांचपन्नास पावलें अनवाणी चालावें. त्या वेळीं तावडतोब कांही मीं तसें केलें नाही. पण एलिचपूरच्या त्या मुक्कामांत तिथे पायीं आल्यावाचून मला राहवलें नाही.

दूला रहमानशाहाचा दर्गा ही एका अर्थाने एलिचपुरांतली सगळ्यांत जुनी आठवण. सध्याचा मकबरा जरी अलाउद्दिन खिलजीने बांधलेला असला, आणि भोवतालचा कोट वगैरे भोसल्यांनी आणि एलिचपूरच्या नबाबांनी बांधलेले असले, तरी दूला रहमानशाह एलिचपूरला आला तो गझनीच्या महमुदाकडून एलिचपूरच्या ईल राजावर, त्याने केलेल्या इस्लामच्या अपमानाचा सूड घेण्यासाठी. त्या निमित्ताने झालेल्या लढाईत दोघेहि प्राणाला मुकले, आणि दोघांचेहि देह तिथेच पुरले गेले.

दूला रहमानशाह मुसलमानांचा गाझी झाला, आणि हिंदूंच्याहि नवसाला पावूं लागला. त्याच्या आवारांत केव्हाहि जा, नवस फेडायला, नाही तर बोलायला किंवा नुसतें दर्शनाला आलेल्या एखाददुसऱ्या तरी शेतकरी कुटुंबाची गाडी तिथे एखाद्या झाडाखाली सोडलेली दिसेल. उरुसाच्या वेळीं तर सगळ्यांचीच तिथे गर्दी असते. रमझानचे दिवस असले तर संध्याकाळीं नमाज झाल्यावर गरीब आणि यतीम मुसलमान मुलांना द्रोणांतून खिचडीची नाही तर भाजीभाकरीची इफ्तारी मिळते. आणि केव्हाहि कुणी जर कबरीजवळ ठेवण्यासाठी मिठाई घेऊन गेलें तर त्याला त्यांतली थोडी तबर्रुक म्हणून परत मिळते.

दूला रहमानशाहच्या आवतीभोवती किती तरी उभ्या, अर्धवट पडलेल्या आणि सफा जमीनदोस्त झालेल्या लहानमोठ्या, गरिबांच्या, तवंगर–मालदारांच्या कबरी आहेत. त्यांतच जंगल वाढलेलें आहे तें तहसील कचेरीपर्यंत आणि पलीकडे शहराच्या तटापर्यंत पसरलें आहे. एलिचपूरच्या मुक्कामांत कर्नल मेडोज टेलरची छावणी इथेच—ह्याच जंगलांत—होती. इथेच त्याने आजारांत वेळ घालवण्यासाठी म्हणून 'ठगाची जबानी' लिहायला सुरुवात केली आणि त्याच्यासमोर जबानी देणाऱ्या अमीर अलीची आणि एलिचपूरच्या नवाबाचा नातेवाईक नबाब सब्जीखां ह्यांची पहिल्यांदा गांठ पडली तीदेखील ह्याच जंगलांत.

चाळीस वर्षांपूर्वी मी पहिल्यांदा एलिचपूरला आलों तो मात्र ह्या रस्त्याने नाही. त्या वेळीं आम्ही नौबागलाच उतरलों होतों. रात्र स्टेशनांतच एका

वाघिर्णीत निजून काढली होती. आणि सकाळीं उठून बैलगाडीने गावांत आलों होतों ते सर्पण नदी ओलांडून सध्या जिथे गांधी पूल आहे त्या वाटेने नदींतून.

त्या वेळीं सर्पण नदीच्या पात्रांत एक चमत्कार घडत असे. दुमडलेल्या गुडव्यासारखा दिसणारा एक लाकडाचा ओंडका म्हणा की दगड म्हणा, आज एका ठिकाणीं तर चार दिवसांनी दुसऱ्या ठिकाणीं असा दृष्टीस पडायचा. हलवून पाहिला तर हलत नसे. उपटून काढावा तर उपटला जात नसे. तरी इकडून तिकडे सारखा जात-येत असे. त्याच्यावर घाव घातला तर आंतून रक्तासारखें रक्त यायचें आणि चार दिवसांनी घाव बरा व्हायचा. एलिचपूरला राहत होतों तेव्हा कधी तो अद्भुत प्रकार मला प्रत्यक्ष पाहायला मिळाला नाही. तरी आमच्याकडे कोणी बाहेरगावचे पाहुणे आले म्हणजे आमच्या एलिचपुरांतला एक अलौकिक चमत्कार म्हणून मी त्यांना त्यासंबंधी प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणे छाती ठोकून सांगत असें. एलिचपूरच्या ह्या भेटीतहि मला तो पाहायला मिळाला नाही. पण आताहि मी त्यासंबंधी सांगतोंच आहें.

सर्पण नदीसंबंधी जर कांही सांगण्यासारखें असलें तर बिच्चन नदीसंबंधी देखील कांही तरी असायलाच पाहिजे. आणि आहेहि. कारण ह्या दोन नद्या ऋद्धि-सिद्धीसारख्या एलिचपूरची डावीउजवी बाजू सांभाळून आहेत. माळवेशींतून निघून उमरावती रस्त्याला मिळणारा रस्ता जिथे बिच्चन नदी ओलांडतो त्या ठिकाणाशेजारीं नदींत एक डोह आहे. नदीवर घाट आणि देवळें आहेत. त्या डोहांत त्या वेळीं राम आणि सीता ह्या नांवाचे दोन मोठे मासे राहत असत. त्यांतल्या सीतेच्या नाकांत नथ घातलेली होती. राम-सीतेचें दर्शन घ्यायचें तर रिक्तहस्ताने जाऊन चालत नसे. कांही तरी न्यावें लागे. या डोहाच्या घाटावर बसून पाण्यांत डाळें-कुरमरे वगैरे टाकलें की, राम-सीता दर्शन द्यायला वर यायचीं. मग सीतेच्या नाकांतली नथ दिसायची आणि ती दिसली की धन्य वाटायचें. चार-आठ दिवसांनी तिथे जावें आणि राम-सीतेचें दर्शन घ्यावें हा त्या वेळचा एक करमणुकीचा उद्योगच होता.

देवडी हें एलिचपुराचें भूषण. मध्यवर्ती ठिकाण. एलिचपुरांतली सगळ्यांत मोठी आणि सगळ्यांत महत्त्वाची इमारत. मोठें प्रवेशद्वार होतें. मोठी मोकळी जागा होती. उजव्या हाताच्या फाटकांतून आंत शिरलें की मोठें चुनेगची

पटांगण होतें. मधोमध मोठा चौकोनी हौद होता. आणि एका अंगाला सुंदर लाकडी कामाचा सज्जे वगैरे असलेला प्रशस्त दिवाणखाना होता. त्या वेळीं त्या दिवाणखान्यांत शाळा भरत असे.

ह्या वेळींहि साहजिकच पुन्हा देवडी पाहावीशी वाटली. चाळीस वर्षांपूर्वी-देखील देवडीचा पुढा जुनाट आणि निस्तेज दिसत होताच. आता तो अगदीच मोडकळला होता. प्रशस्त पटांगणांतल्या मोठ्या हौदांत जिथे केव्हा तरी कारंज्यांतून पाणी पडत असेल तिथे कडब्याच्या पेंढ्या आणि फॉस्फेटच्या खताचीं पोतीं पडलेलीं होतीं. तशाच पेंढ्या आणि तशींच पोतीं पटांगणांतहि जिकडेतिकडे पडलेलीं होतीं आणि त्यांचा धुरळा सगळीकडे उधळला होता. त्यांतच पडलेला पालापाचोळा लवलवत्या ओठांनी तोंडांत कोंबीत बकऱ्या इकडेतिकडे हिंडत होत्या. दिवाणखान्यांत आता शाळा भरत नाही. कारण दिवाणखान्याचें छप्पर मोडून आंत आलें आहे, आणि आता सूर्य-चंद्रांना, ग्रहनक्षत्रांना आंत डोकावून पाहतां येतें आहे. दैवदुर्विलास असा की, जेव्हा तिथे पाहण्यासारखें कांही घडत असेल त्या वेळीं त्यांना आंत डोकावतां येत नव्हतें, आणि आता डोकावतां येतें आहे तर आंत पाकोळ्यांच्या फडफडी-खेरीज कांहीदेखील घडत नाही. उन्हा-पावसाने खरबरीत झालेलीं तुटकीं लाकडें, फळ्या जागोजाग पडलीं आहेत. भव्य दिवाणखान्याच्या सुरूच्या खांबांच्या, आणि मोरांच्या ऐटबाज माना असलेल्या, कमानी उदास आणि रूक्ष झाल्या आहेत. फुलें, वेलबुट्टे रंगवलेले डेरेदार सज्जे खचत चालले आहेत आणि आज कोसळतो की उद्या अशा अवस्थेंत आहेत. त्या अडगळींतच एका ठिकाणीं भिंतीला टेकून अवघडून बसलेली एक संगमरमरी पाटी नवाब नामदारखाँने हिजरी १२३८मध्ये ऐनेमहल बांधल्याचें सांगते आहे.

पाटी इथे भिंतीला टेकून बसली आहे. पण ती ज्या महालाची आहे तो दुसरीकडेच होता. तो केव्हाच जमीनदोस्त झाला आहे. त्याच्यासारखेच आणखीहि किती तरी महाल जमीनदोस्त झालेले किंवा झाल्यासारखे देवडीच्या आसपास आहेत. अशाच एका आवारांत, एका चारदीवारीच्या आंत, मोठ्या देवडींतल्यासारखाच एक मोठा भव्य दिवाणखाना आहे. त्यालाहि जनान्यासाठी तीन बाजूंनी सज्जे आहेत. त्यांतलेंहि लाकूडकाम सुंदर आहे. पण त्याचींहि बहालें-पटया, खांब-तुळया, खांबांचे उथाळे-घोडे, लाकडी कमानी-मेहरपी दिवाणखान्याच्या आंतबाहेर कुणीहि वाली नसल्याप्रमाणे अस्ताव्यस्त पडल्या

आहेत. आमच्यापैकी कांहींना कुणीं ना कुणीं तरी उचलून नेलें, आम्हालाहि कुणी नेईल का, म्हणून कदाचित् वाट पाहताहेत. किंवा पुराण-वास्तु-संरक्षण-खात्याचें लक्ष वेधण्यासाठीं किती वर्षं अनाथ राहावें लागतें, असाहि प्रश्न त्या विचारीत असाव्यात.

देवडीच्या जवळच भडकल आहे. इमादशाहाच्या वेळचा किल्ला. देवडी आज ज्या वाटेने चालली आहे त्या वाटेने भडकल आधीपासूनच गेला आहे. इमारत असें जिला म्हणतां येईल असें भडकलच्या आंत कांहीहि उभें नाही. त्याच्या तटांचा आणि बुरुजांचा पृष्ठभाग नष्ट झाला आहे, आणि त्यांना करवती-सारखा दंतुरपणा आला आहे. त्याच्या बोगद्यासारख्या दारांतून जातां-येतांना मनांत येतें, ह्याच दारांतून एका काळीं इमादशाही सुलतानांची स्वारी गेली-आली असेल. ह्याच दारांतून मोहिमेवर जाणारे आणि मोहिमेवरून परतणारे सरदार-सेनापती गेले-आले असतील. पालख्या-मेण्यांतून शाहजादे-शाहजाद्या ह्याच वाटेने गेल्या असतील. आणि चोर-दरोडेखोरांना साखळदंडांनी बांधून ह्याच वाटेने नेलें-आणलें असेल. त्या बोगद्यासारख्या अंधाऱ्या वाटेने आणि त्या दमट-कुबट मातीवरून जातां-येतांना आज अंगावर शहारे येतात. आणि जायचें-यायचें झालेंच तर इकडेतिकडे न पाहतां, त्या पडक्या भिंताडांचा अंगाला स्पर्श न होऊं देतां गुपचुप जावें-यावें असें वाटतें.

जी स्थिति देवडीची-भडकलची, तीच कमीअधिक मानाने गावाची. देवडी-कडून माळवेसपुऱ्यांतल्या आमच्या घराकडे जाणारा रस्ता चाळीस वर्षांपूर्वी जसा होता तसाच आज आहे. सुधारला नाही. कदाचित् अधिकच वाईट झाला असेल. ज्या घरांत आम्ही राहत होतों, त्याच्या भोवताली त्या वेळीं ज्या जागा उघड्या-ओसाड होत्या त्यांचा ओसाडपणा वाढला आहे. आणि आणखी जागांची त्यांत भर पडली आहे. समोरच्या वाड्याच्या आवाराची भिंत त्या वेळीं उभी होती ती आज नाहीशी झाली आहे. आणि आंतल्या वाड्याचे भाग जे त्या वेळीं दिसत नव्हते ते दिसूं लागले आहेत. त्या वेळीं आवाराच्या आंत बगीचा असेल तिथे आता जंगल वाढलें आहे आणि आवाराच्या मानाने राहता भाग फारच लहान दिसतो आहे. त्या वाड्याच्या आजूबाजूचीं किती तरी घरें जीं त्या वेळीं उभीं होतीं तीं पडलीं आहेत. चारदोन घरें उभीं-नांदतीं दिसावीं तर त्यांच्या शेजारचीं पांचदहा उदास, रिकामीं, तोंडें मिटलेलीं किंवा भकासपणे उघडलेलीं अशीं. एखाद्या गावांत राहत्या घरांशेजारी जमीन नांगरली

जाऊं लागली आणि रान माजूं लागलें म्हणजे तें पांढरीने केलेलें काळीचें स्वागत म्हणायचें की पांढरीची पीछेहाट म्हणायची ?

गावाचा मोहरा बादलून टाकावा, त्याला उजळ झगझगीत करावें, अशी इच्छा एलिचपूरच्या लोकांना नाही असें मात्र नाही. पन्नास-साठ वर्षांपूर्वीपासून त्यांचे तसे प्रयत्न चालले आहेत. जंगल जवळ म्हणून तिथल्या लोकांनी आगपेट्यांचा कारखाना काढला. त्याचें काळाने नाकारलेलें खोकें अजूनहि तिथे उभें असेल. कापडाची गिरणी काढली. जिन आणि प्रेस आहेतच. पंक्तींत दक्षिणा वांटली तर ती तशीच गोळा करून 'पैसा फंडा'कडे पाठवायची, इतकी इथल्या लोकांची उद्यमभक्ति. पण इतकें सगळें होऊनसुद्धा गावाने भूतकाळांत जो ठिय्या मारला आहे तिथून तें उठूं इच्छीत नाहीसें दिसतें.

पण एखाद्या करड्या-तपकिरी पार्श्वभूमीचा मातट-मंदपणा एखाददुसऱ्या तांबड्या-पिवळ्या ठिपक्याने नाहीसा करून टाकावा, तशा, ह्या सगळ्या उदास-वाण्या पार्श्वभूमीचा भकासपणा विसरायला लावणाऱ्या कांही गोष्टी एलिचपुरांत आहेत. शहरांतच कार्तिकस्वामीच्या देवळांत कार्तिकस्वामीची काळ्या पाषाणाची एक फार सुंदर मूर्ति आहे. पण त्याहिपेक्षा सुंदर अशी दुसरीहि एक मूर्ति आहे. ती भोलारामाच्या मठाशेजारच्या वेशीबाहेर, तटाच्या पलीकडे, एका देवळांत आहे. दीड-दोन हात उंचीची कुणा तरी देवीची मूर्ति आहे. चारी हात तुटलेले असल्यामुळे हातांतलीं आयुधें किंवा वस्तू दिसत नाहीत. त्यामुळे तिची ओळख पटत नाही. तिच्या पादपीठावर "श्री नल्लदेवविजयो देवी ॥" अशीं स्पष्ट अक्षरें कोरलेलीं आहेत. पण त्यावरूनहि ती कोण तें ओळखूं येत नाही. पण म्हणूनच की काय, सगळें लक्ष उरलेल्या मूर्तीच्या स्थानमानावर, रेखीव, पुष्ट, सुश्लिष्ट अवयवांवर, सुंदर प्रमाणबद्ध मुखावर, आणि त्यामागच्या प्रभावळीवर रोखलें जातें; घोटीव काळ्या पाषाणांतून परावर्तित होणाऱ्या प्रकाशावर, रेषांच्या वळणांवर, अवयवांच्या गोलाईवर केंद्रित होतें आणि तिथेच घोटाळत राहतें.

वाटतें, ज्या एलिचपूर शहरांत इतिहासाच्या धुमश्चक्रींतून अशा सुंदर मूर्ती शिल्लक राहिल्या आहेत त्या एलिचपुरांत एका काळीं त्याहूनहि सुंदर मूर्ती आणि त्यासाठी बांधलेलीं सुंदर देवळें असतील. तीं कुठे असतील कुणी सांगावें. पण असलींच पाहिजेत. तसें मग आणखी पाहण्यासारखें आजहि एलिचपुरांत पुष्कळ आहे. हिरापुरा दरवाज्याच्या बाहेर ईदगाह आहे. सरमस्त-पुऱ्यांत, हेळसांडल्या जात असलेल्या पण अजूनहि पाहण्यासारख्या, बेवहा-

बागेंतल्या नवाबांच्या कबरी आहेत. नौबागजवळ हौज कटोऱ्याची तळ्यांतली इमारत आहे. तळ्याचें बुजून शेत झालें आहे. जिथे विहारनौका फिरत असत तिथे नांगर फिरताहेत. जिथे पांढरीं-तांबडीं कमळें फुलत असत तिथे ज्वारीच्यीं कणसें पोसताहेत. पण इमारत अजून उभी आहे. परतवाड्याच्या पुढे पांचसहा मैलांवर मुक्तागिरीमधल्या धबधब्यांच्या आगे-मागे, डोंगराच्या कुशींत-कडेवर, जैनांचीं मंदिरें आहेत. दूला रहमानशाह ज्याच्याशीं लढण्यासाठी गझनीहून आला तो एलिचपुराचा ईल राजा जैन होता. त्या वेळचें मंदिर आज तिथे नसलें तरी तेव्हाहि तें स्थान महत्त्वाचें आणि पवित्र असलें पाहिजे. त्याखेरीज जैनांचे 'साडेतीन कोटि मुनिराय' तिथे वसतीला गेले नसते.

रामदेव दरण्याने "जी जी : अळजपूर निकें नगर असे :" असें वर्णन करून जिथे श्रीचक्रधरांना आग्रहाने आणलें तें नगर खरेंच निकें असेल. "एथ पूर्वदृष्ट असे" असें म्हणून श्रीचक्रधरांनीहि त्याला एक प्रकारें पुष्टीच दिली. अळजपूर एके काळीं निकें नगर असलें पाहिजे हें त्याच्या आजच्या उदास अवस्थेंतहि जाणवल्यावाचून राहत नाही...

■ ■

# वऱ्हाडांत तीन पावलें

त्या दिवशीं पुसद सोडायचें होतें. जिच्या वाळवंटांत उभें राहून लोकमान्य टिळकांनी आपल्या होमरूल लीगच्या तुफानी प्रचार-प्रवासांत पुसद्ला 'स्वराज्याची पंढरी' अशी पदवी दिली होती, त्या पूस नदीचें दर्शन पुसद्ला येऊन न घेतां जाणें हें पंढरपुराला जाऊन चंद्रभागेचें दर्शन न घेण्यासारखें अश्लाघ्य झालें असतें. म्हणून त्या दिवशीचें स्नान प्रतिनिधींच्या सोयीसाठी मुद्दाम उभ्या केलेल्या स्नानगृहांत न करतां पूस नदीवरच करावें असें ठरवलें, आणि निवासांतून बाहेर पडून शेतांतून नदीच्या रोखाने चालूं लागलों. शे-दीडशे पावलें चालून गेलों असूं-नसूं तोंच कसला तरी तीव्र उग्र दर्प नाकांत घुसूं लागला. काटेकुटे, धोंडे वगैरे टाळण्यासाठी जमिनीवर रोखलेली नजर वर उचलून पाहिलें तो लांबवर टरटरीत फुगलेल्या मोठमोठ्या चामड्याच्या पिशव्या आणि पांढरीं-भुरकीं चामडीं टांगलेलीं दिलीं. ती ढोर लोकांची वस्ती होती. त्यांचे कातडीं कमावण्याचे कारखानेहि तिथेंच होते. आणि त्यांचाच तो उग्र दर्प होता. नदी जवळ येत चालली तसे त्यांत इतरहि दर्प मिसळत चालले. आम्ही नदीच्या भलत्या भागाकडे, आमच्या पांढरपेशा नाकाडोळ्यांना अपरिचित भागाकडे, चाललों होतों हें उघड होतें. पण पाऊल मागे घ्यावेंसें वाटेना. वाटलें, आपल्या सोकावलेल्या नाकाडोळ्यांना हेंहि हुंगायला-पाहायला लावलें पाहिजे. नाही तरी आदल्या रात्रीं, सामाजिक एकीकरणाचा एक कार्य-

क्रम म्हणून, गांवच्या अस्पृश्य जमातींनी दिलेलें जेवणाचें आमंत्रण स्वीकारलें होतें, आणि अस्पृश्यांनी रांधली-वाढलेली भाजी-भाकरी इतरांच्या पंक्तीला बसून खाल्ली होती. मग आता माघार कां घ्यावी ?

गंधमादन पर्वताकडे जातांना भीमाला जसें वाटलें असेल तसें त्या ढोरवाड्या-कडे जातांना वाटत होतें, आणि तेंहि भीमासारखी कोणतीहि आगळीक केली नसतांना. तरी पण पुढेंच चाललों आणि नदीपाशीं पोचलों. स्वागताध्यक्षांनी आपल्या भाषणांत नदीचें 'दृषद्वती' असें वर्णन केलें होतें. खरेंच ती 'दृषद्वती' होती. लहानमोठे खडक पाण्यांत शिरून पाण्याला आपल्या अंगा-खांद्यावरून खेळूं देत होते. आणि कांही त्यांची गंमत पाहत प्रवाहाच्या आजूबाजूला विसावले होते. मोकळ्या जागेंत आणि खडकांच्या खबदडींतून हिरवळ वर आली होती. आणि कांही ठिकाणीं ती बालकवींच्या कवितेसारखी प्रसन्न, मऊमऊ आणि नाजुक होती. खडकांच्या आसऱ्याने नदी-काठाशीं ठिकठिकाणीं लवचिक लव्हाळ्यांनी आपलीं माथीं उंचावलीं होतीं, आणि आपल्या जागेवरून पलीकडल्या तीरावरल्या लव्हाळ्यांना तीं खुणावीत होतीं. त्यांच्या अनुमतीने एक सोयिस्कर ठिकाण पाहून आम्ही आपले कपडे ठेवले आणि प्रवाहांत उतरून एका दगडावर स्नानाला बसलों. गार पाणी अंगावर हबकून शेजारी ठेवलेल्या डबींतल्या सुवासिक साबणाला हात घालतों तों पाण्याच्या प्रवाहांतून एक पांढुरकी धार रेंगाळत-वळत गिरक्या घेत येतांना दिसली. ती कुठून येते आहे म्हणून पाहतां तो वरच्या बाजूला नजर गेली—

तिथे एक बाई आपल्या अंगावरचें अर्धें लुगडें पांढरी माती लावून चुबकून-चोळून धूत होती. अर्धें अंगावर नेसलेलेंच होतें. जटा झालेल्या तिच्या ओल्या केसांतून पाणी ओघळत होतें. काळें उघडें ओलें अंग उन्हांत साटणीसारखें तकाकत होतें. तिच्या जागीं एखादी पांढरपेशा जातीची बाई असती तर आमचें येणें आपल्याला कळलेलें आहे ह्याची कांही तरी जाणीव तिने आम्हांला करून दिली असती, आणि आम्हांला ओशाळवलें असतें. पण ह्या बाईला आमच्या अस्तित्वाची जाणीवदेखील दिसली नाही. तिने आपलें काम तसेंच चालू ठेवलें आणि अंग झाकण्याचा मुळींच प्रयत्न केला नाही.

आम्ही जिथे स्नानासाठी गेलों होतों तो बहुधा गावाचा खालचा भाग असावा आणि खालच्या जातीच्या लोकांसाठीच राखून ठेवलेला असावा. आम्ही भलत्याच ठिकाणीं चाललों आहों ही आमची पहिल्याने झालेली समजूत खरीच

होती एकूण. बाकी एका अर्थी झालें तें बरेंच झालें. आदल्या रात्रीं त्यांच्या हातचें जेवण जेवल्यानंतर आज त्यांच्या पाणवठ्यावर स्नानाला येणें योग्यच होतें. आणखी मला वाटलें, अनेक तीर्थांच्या ठिकाणीं गेलों असतांनासुद्धा तिथल्या नदींत किंवा कुंडांत स्नान करीत 'आपः सर्वा देवता। आपो भूर्भुवः सुवराप ओम्'' म्हटलें नव्हतें, किंवा त्यांचें पाणी ओंजळींत घेऊन 'इदमर्घ्यं' म्हणून सूर्याला अर्पण केलें नव्हतें. पण ह्या पूस नदींत स्नान करण्यासाठी मात्र स्वतःला ढकलीत घेऊन गेलों होतों. कदाचित् त्या 'पवित्र' जलाशयांनी मला हें त्यांच्या अनादराबद्दल प्रायश्चित्त घ्यायला लावलें असेल. मात्र पुष्कळ प्रख्यात तीर्थांच्यापेक्षा इथलें पाणी अधिक घाणेरडें होतें असें म्हणतां आलें नसतें.

पुसदला गेलों त्या वेळीं माझ्या खातीं पुसद हें दारव्हा, दिग्रस, वणी, पांढरकवडा ह्यांसारखेंच केवळ एक लहानपणीं ऐकलेलें गाव होतें. पण तिथून निघतांना मात्र तें तसें राहिलें नाही. गावांत आणि गावाबाहेर पाहिलेल्या वंजारी बायकांचे रंगीबेरंगी चित्रविचित्र पोषाख आणि त्यांची ताठ लयबद्ध चाल, पुसद गावांतलीं पिवळ्यातांबड्या चौकोनांनीं रंगवलेलीं कोमट्यांचीं घरें, ह्यांनी पुसदची आठवण अधिक कसदार आणि रंगदार केली होती. कोमट्यांनी आपल्याबरोबर तिथे नेलेले 'बट्टु', 'अडकुलु', 'चमकोरा' हे शब्द मला हैदराबादची आठवण करून देऊं लागले आणि त्यामुळे पुसदबद्दल एकदम आपलेपणा वाटूं लागला.

स्वराज्याची पंढरी ही पदवी देऊन लो. टिळकांनी पुसदला राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली; लो. अण्यांनी १९३०च्या जंगल सत्याग्रहाचें तिथूनच प्रस्थान ठेवून आणि स्वा. सावरकरांनी हैदराबाद सत्याग्रहाचें एक शिबिर तिथे उघडून ती प्रतिष्ठा दृढ केली; विदर्भ साहित्य संघाने आपलें एक संमेलन तिथे भरवून पुसदला महाराष्ट्राच्या साहित्यिक नकाशावर स्थान दिलें; सज्जनगडावर जाऊन रामदासाचा अनुग्रह घेणारे त्यांचे शिष्य बालकराम गोसावी पुसदचे झाले होते; तसेंच एके काळीं विद्यावैभवाने नटलेलें, आणि अनेक संतकवींचें माहेरघर, आणि मेडोज टेलरपुढे जबानी देणाऱ्या अमीर अलीच्या ठगींतल्या प्रेम-पराक्रमाच्या कर्तबगारीचें एक ठिकाण, असलेलें उमरखेड हें गावहि पुसद तालुक्यांतच आहे—इत्यादि जें जें मीं तिथल्या मुक्कामांत ऐकलें आणि पाहिलें त्यांच्या रेषांनी आणि रंगच्छटांनी पुसदची एक स्मरणीय चित्राकृति माझ्या मनावर रेखली ती अजून तशीच आहे.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३०९५८ दि:
क्रमांक ... नों. दि: २३।५।६१


चिंचेचीं आणि कडुलिंबांचीं खूप मोठालीं झाडें, ओसाडीची अवकळा आलेल्या मोठमोठ्या विस्तीर्ण बागा, त्यांतल्या उपसा नसलेल्या विहिरी, चार कोपऱ्यांवरच्या बुरुजांना आपली कामगिरी बजावीत उभें ठेवून स्वतः जमीनदोस्त झालेल्या त्या बागांच्या चहू बाजूंच्या भिंती, पडून गेलेल्या घरांचीं झिजत-झडत गेलेलीं जोतीं, अशीं दृश्यें दिसूं लागलीं म्हणजे एखादें जुनें गाव जवळ येत चाललें असें समजायला हरकत नाही. पुसदपासून वाशीमपर्यंत डोंगरांतला जंगलरस्ता चढत-उतरत, वळणावळणाने, कधी उघड्या माळावरून तर कधी गर्द झाडींतून पार करून जशी गाडी वाशीमच्या जवळ येत चालली तसा वाशीम गावाचा हा जुनेपणा नजरेला पडूं लागला.

पण वाशीमचा सध्याचा जुनेपणा हा केवळ दीड-दोनशे वर्षांचा आहे. त्याचा खरा जुनेपणा वाकाटकांच्या काळापर्यंत आणि त्याच्याहि मागे अनादि काळापर्यंत जातो. कारण ब्रह्महत्येच्या पातकापासून मुक्त होण्याकरता शंकराला इथे यावें लागलें होतें. (मला वाटतें, सर्व देवांमध्ये अगदी सहजपणें पातक करणारा आणि तितक्याच सहजपणें प्रायश्चित्त घेऊन मोकळा होणारा देव शंकराखेरीज दुसरा नसावा.) ज्याच्या प्राकृत काव्याचा दण्डी, आनंदवर्धन आणि हेमचंद्र ह्यांनी कालिदासाच्या बरोबरीने उल्लेख केला, आणि ज्याच्या कांही गाथा गाथासप्तशतींत आहेत त्या वाकाटक नृपति सर्वसेनाची ही राजधानी. काव्यपुरुष आणि साहित्यविद्यावधू ह्यांचा मंगलविवाह राजशेखराने घडवून आणला तो ह्या वत्सगुल्म नगरींत. जिच्या नांवावरून गीर्वाण भाषेंतल्या वैदर्भी रीतीप्रमाणे प्राकृतांतल्या एका रीतीला 'वच्छोमी' (वत्सगुल्मी) हें नांव प्राप्त झालें ती ही नगरी. 'वत्सगुल्म'चें 'वच्छोम' आणि त्याचें पुढे 'वाशीम' झालें, तसें एके काळचें तें वैभवशाली, साहित्य-संगीत-कलांच्या प्रभावलयाने तळपणारें, नगर आज अगदी कळाहीन झालें आहे.

'वच्छोमी' मार्गाने प्राकृत साहित्यनगरींत संचार करणें किती सुखाचें होत असेल तें मला ठाऊक नाही. होतहि असेल. पण आजच्या वाशिमांतल्या 'वच्छोमी' मार्गांचा समविषमपणा आणि वेड्यावाकड्या वळणांनी एकमेकांना मिळणाऱ्या फरसबंद गल्ल्याबोळांचें समास-भूयस्त्व सरल आणि सुभग पदविन्यास अशक्य—निदान दुष्कर—करतात एवढें खरें. बाणाच्या कादंबरींतल्या पांच-पांच

पृष्ठांच्या वाक्यांतून आणि दशकुमाराच्या एकींतून एक निघणाऱ्या कथांतून वाट काढणें त्यापेक्षा अधिक सोपें.

वत्स नांवाच्या ऋषीला दर्शन देण्यासाठी महादेव इथे प्रकट झाला, आणि इतर ऋषी गुल्मरूपाने राहिले, म्हणून हें 'वत्सगुल्म' क्षेत्र झालें. पण एक पद्मतीर्थ सोडलें तर वत्सगुल्मतीर्थाच्या प्राचीनत्वाचे किंवा वच्छोमाच्या वैभवाचे कांहीहि अवशेष आता—निदान जमिनीच्या पृष्ठाच्या वर तरी—राहिलेले दिसत नाहीत. आता वाशिमांत जर कांही नजरेंत भरत असेल तर तें बालाजीचें भव्य मंदिर आणि त्याच्या पुढलें प्रचंड कुंड. हें मंदिर भवानी काळूने बांधलें असलें तरी त्यांतल्या मूर्ति इशमतजंग ह्या मुसलमान अंमलदाराला जमिनींत पुरलेल्या सापडल्यामुळेच की काय, मुसलमानांना बालाजीच्या आसमंताबद्दल विशेष प्रेम वाटत असावेंसें दिसतें. कारण देवळाच्या आणि कुंडाच्या आसपास मुसलमानांची नेहमी वर्दळ असते.

एके काळीं वैभवशाली राज्याची राजधानी आणि साहित्यसंस्कृतीचें माहेर आणि आता केवळ एका सबडिव्हिजनचें मुख्य ठाणें असलेल्या वाशीम गावांत आज जर कांही काव्यशास्त्रविनोद चालत असेल तर तो तिथले वकील, प्रोफेसर किंवा कोणी रसिक-साहित्यिक सरकारी अंमलदार मिळून करीत असतील तेवढाच. आणि अशा एखाद्या वकील-प्रोफेसराच्या गावांतल्या घरीं किंवा सरकारी अंमलदाराच्या गावाबाहेरच्या बंगल्यांत जेव्हा केव्हा कविगोष्ठी चालत असतील तेव्हा वत्सगुल्माभोवती घोटाळणाऱ्या त्या वाकाटक राजांच्या आत्म्यांना आपल्या वेळचें वैभव आठवून काय वाटत असेल ? त्यांना असें वाटत असेल का की, आमचें नगर हें असें जगलें आहे त्यापेक्षा खरोखरच आमच्या तेवढ्या स्मृती ठेऊन स्मृतिशेष झालें असतें तर अधिक बरें झालें असतें. की असें वाटत असेल की, आज जरी हें असें कळाहीन दिसत असलें तरी उद्या रेल्वे मार्गावरचें एक स्टेशन झाल्यावर त्याच्या कळा पुन्हा खुलतील आणि जुन्या नाही तरी एका नव्या परीने तें पुन्हा उजळून निघेल.

दहिहांड्याकडे जाणारा रस्ता उजवीकडे सुटला आणि आमची बस पुढे अकोटकडे चालली. अकोटला मीं गेलेंच पाहिजे होतें असें नाही. पण गाव पाहण्याची उत्सुकता होती.

जानोजी भोसल्याची बायको दर्याबाई, त्याने दत्तक घेतलेला मुधोजी भोंसल्याचा मुलगा रघोजी, आणि जानोजीचा भाऊ साबाजी अशीं माणसें जानोजीच्या मृत्यू-नंतर कांही दिवस अकोट येथे राहत होतीं, असें वऱ्हाडच्या इतिहासांत वाचलें होतें. अकोटला पेरू आणि सतरंज्या चांगल्या मिळतात असें वऱ्हाडच्या भूगोलाने मला सांगितलें होतें. आणि आता तर पेरूचे दिवस होते. शेगावला जसें अवलिया महाराजांचें आणि दहिहांड्याला रूपनाथमहाराजांचें, तसें अकोटला नरसिंग-बोवांचें स्थान आहे, तें पाहिल्यावाचून मीं राहूं नये असें भाविक वडील मंडळींनी मला सांगितलें होतें. इतकीं कारणें कोणत्याहि गावाला जायला पुरेशीं ठरतील. पण माझें आणखी एक अगदी खाजगी कारण होतें! पुष्कळ वर्षांपूर्वी 'चित्रमयजगतां'त येत असलेली 'बदरीकेदार यात्रावर्णन' ही लेखमाला मीं वाचली होती, आणि तिच्यांतलीं 'झंपान', 'चट्टी', 'दण्डी', 'काली कमलीवाले बाबा' हीं विचित्र नांवें माझ्या मनांत ठसलीं होतीं. ती लेखमाला लिहिणारे रामेकर हे अकोटचे वकील होते. हेंहि अकोटला माझ्या मनांत ठाण मांडण्याला एक कारण मिळालें होतें.

झाडें आणि शेतें झपाट्याने मागे टाकीत बस जाऊं लागली. कांही वेळाने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना, मधूनमधून, झिजत आणि ढासळत चाललेल्या मकबऱ्यांचे घुमट दिसूं लागले. गाव जवळ येत चाललें होतें. गावाचें जुनेपण आणि गावावर एके काळीं असलेला मुसलमानी अंमल या दोन्ही गोष्टी हे मकबरे सांगत होते.

बसच्या अड्ड्यावर उतरल्यावर, मला ज्यांच्याकडे जायचें होतें त्यांच्या घराची चौकशी केली, तेव्हा ते केशवराजाच्या विटाळ्यांत राहतात असें कळलें. 'केशवराजाचा विटाळा' ह्याचा मला आधी अर्थच कळेना. पण मग लक्षांत आलें की 'विटाळा' म्हणजे मोहल्ला. मराठी शब्दाचा अर्थ मला उर्दूवरून समजून घ्यावा लागला!

केशवराज हें विष्णूचें नांव आहे. केशवराजाच्या विटाळ्यांत, केशवराजाच्या मंदिरांत, केशवराजाची काळ्या घोटीव पाषाणाची दीड-दोन हात उंचीची समचरण अशी सुंदर मूर्ति आहे. चेहरा लांबटगोल, नाक सरळ, डोळे सुंदर रेखीव, आणि मुद्रा प्रसन्न आहे. आपल्या देवळांतून क्वचितच इतक्या सुंदर मूर्ति आढळतात. साहजिकच आहे. आपण मूर्ति वापरतों ती पूजेसाठी, दर्शनासाठी नाही. म्हणूनच मूर्ति सुंदर असण्याची आपल्याला आवश्यकता

वाटत नाही. आणि सुंदर असली तरी त्याचें महत्त्व वाटत नाही. केशवराजाची ही मूर्ति पूजेच्या उपचारासाठीच असल्यामुळे त्याच्या देहाचें पाथरवटाने मोठ्या कौशल्याने घडवलेलें सगळें सौष्ठव पेशवाई पद्धतीच्या पायघोळ पोषाखाने झाकलें गेलें आहे. तें आपल्या कल्पनेनेच मनांत उभें करावें लागतें.

केशवराजाच्या मंदिरांतली केशवराजाची प्रेक्षणीय मूर्ति जशी अकोटांत मला पाहायला मिळाली, तशींच बाजारपेठेंतल्या सत्यनारायणाच्या मंदिराच्या प्रवेश-द्वारावरच्या कमानींच्या आंतल्या बाजूचीं आणि दाराच्या दोन्ही अंगांकडचीं, जुन्या पद्धतीचीं, तेलांतल्या रंगाचीं सुंदर चित्रेंहि पाहायला मिळालीं. देवळाला पुन्हा पुन्हा रंग लावला गेला असला तरी तीं चित्रें तशींच धक्का न लावतां ठेवलेलीं होतीं. त्यांत त्या देवळाचे जे कोणी वहिवाटदार असतील त्यांची रसिकता म्हणा, आपल्या मर्यादेची जाणीव म्हणा किंवा पूर्वजांविषयी आदर म्हणा, दिसून आला. पुष्कळ ठिकाणीं नव्याने रंग देतांना, डोळ्यांसमोर ठळकपणें दिसत असलेल्या चित्रांवरूनसुद्धा पोतेरें फिरवलें जातें तसें इथे गेलें नव्हतें. चित्रें किंचित् विटल्यासारखीं झालीं होतीं. पण त्यांतूनहि रेषांचें जोमदारपण आणि रंगाची योजना दिसत होती.

अकोटला गेल्यानंतर तांड्याचा मारुती आणि नंदीपेठचा नंदी ह्यांचें दर्शन घेण्याच्या बाबतींत जर आपण औदासीन्य दाखवलें तर अकोट गावच्या लोकांना साहजिकच थोडें खट्टू झाल्यासारखें वाटतें. तें जाणवल्यावाचून राहत नाही. तांड्याचा मारुती हा मारुती म्हणून कांही विशेष प्रेक्षणीय नाही. पण गावाबाहेर पडून खाई नदी ओलांडल्यानंतर लागणारी, दोन्ही बाजूंच्या शेतांमधून आणि गार-गर्द पानमळ्यांमधून पाणंदीसारखी तांड्याच्या मारुतीकडे जाणारी, वाट मात्र सुखावह आहे.

माझा दोन दिवसांचा मुक्काम संपला. निघायचा दिवस आला. अगदी अपरिचित पाहुणा होतों मी. तरी माझें अतिशय आपलेपणाने आणि घरगुती मोकळेपणाने तिथे आतिथ्य झालें होतें. निघायच्या दिवशीं गोडाधोडाचें म्हणून शिरा केला होता. घरचे गहूं, घरचा गूळ आणि घरचंच तूप. अशा त्रिवेणी संगमांतून निर्माण झालेल्या त्या शिऱ्याची गोडी आणि स्वाद कांही वेगळींच होतीं. मी घरांतून बाहेर पडतांनासुद्धा त्याचा दरवळ रेंगाळतच होता. निरोप द्यायला दाराशीं आलेली यजमानांची वयोवृद्ध आई म्हणाली, "राह्यलाच त नाही रे तूं. आता पुन्हा येजो. आन् येशीन त यकटा नोको येऊं. सूनबाईले न्

लेकीले घेऊन येजो.” तिच्या मागे थोड्याशा अंधारांत उभ्या असलेल्या तिच्या सुनेचे प्रसन्न, टपोरे, चमकदार डोळे न बोलतां पण तेंच म्हणत असलेले मला दिसत होते. म्हातारीने आपल्या हातांनी करून वाढलेल्या शिऱ्यापेक्षाहि तिच्या त्या शब्दांतला स्नेह आणि गोडी अधिक ओढ लावणारी होती. वाङ्मयांतली वैदर्भी रीति मला चांगलीच माहीत होती. ही वागण्यांतली वैदर्भी रीति.

# आम्ही असतों याचि ग्रामीं

**ब**सच्या दारांत उभा असलेला कंडक्टर आंतल्या कोणाला तरी उद्देशून म्हणाला,

"शरणाप्पाण्णा, स्वल्प ज्यागा माडरी वळगे." आणि आपल्यापुढे दाराच्या पायरीवर उभ्या असलेल्या एका उतारूला त्यानें फर्मावलें,

"नीवु मुंद होगरी, बागल हींगे इड बेक येनु?"

हीं त्याचीं वाक्यें ऐकल्यावर गाणगापूर कर्नाटकांत आहे आणि औदुंबर आणि कृष्णा-पंचगंगा संगमावरची वाडी महाराष्ट्रांत आहेत ह्याची धक्का बसल्यासारखी झालेली जाणीव मनांत स्थिरावते आहे तोंच तो उतारू म्हणाला,

"अरे पण, 'मुंद' कुठं 'होगरी'? पाय ठेवायला तरी जागा आहे का आंत?"

"थोडकं इकडे सरका कि हो. तिकडे सरका कि थोडकं."

घाईघाईने बांधाबांध करतांना आपण शेवटची वस्तु कशी तरी अळेंबळें दडपतों तसें त्या उतारूला बसमध्ये दडपण्याचा कंडक्टरचा प्रयत्न चालला होता. उतारूहि दडपला जायला तयार होता.

पण शरणाप्पाण्णानें—तो जो कोणी असेल त्यानें—हूं की चूं केलें नाही. इतर उतारूहि कुणीं इकडे सरकले नाहीत की तिकडे सरकले नाहीत. सरकण्याचा कुणी प्रयत्नहि केला नाही. कारण तसा प्रयत्न करण्याला वावच नव्हता.

मध्ये कसें तरी उभे राहिलेल्या उतारूंचे जड वस्तूंनी भरलेले खिसे, त्यांच्या खांद्यावर टांगलेल्या पिशव्या, कडेवर घेतलेल्या मुलांचे पाय, आणखी इतर उतारूंचें कांही कांही, बाकावर ठेचून बसलेल्या उतारूंच्या नाकांवर आपटत होतें. आपलीं नाकें नकटीं असतीं, किंबहुना आपल्याला नाकें मुळीच नसतीं, तर बरें झालें असतें असें त्या वेळीं नाकेल्या उतारूंना वाटत असलें पाहिजे. उभ्या असलेल्या उतारूंच्या पायांच्या अधेमधे जागा होती तिथे लेकुरवाळ्या बायका बसल्या होत्या. त्यांचीं मुलें गुदमरत होतीं, रडत होतीं, किंचाळत होतीं, अंगें झाडीत होतीं, आणि तशाहि अडचणींत त्यांना त्या पदराखाली घालीत होत्या.

अखेर त्या शेवटच्या उतारूला कंडक्टरने कसें तरी आंत दडपलें, त्याच्या मागोमाग आंत शिरून बसचें दार खाडकन् लावून घेतलें, आणि "राइट" असा ड्रायव्हरला इशारा दिला. त्याबरोबर "अवधूतचिंतन श्रीगुरुदेव दत्त" असा तमाम उतारूंच्या मुखांतून एकच मोठा गजर झाला आणि 'फर्रर्र' करून बस चालू लागली...

म्लेंच्छाचा स्फोट बरा झाला, आणि त्याला भक्ति उपजून तो भेटीला आला. आता नाना यातींचे लोक येतील म्हणून श्रीशैल्याच्या यात्रेचें निमित्त करून श्रीगुरु गाणगापुराहून निघून गेले. पण तें केवळ "लौकिक मतें अविद्याधर्मी." गुप्तरूपाने "आम्ही असतों याचि ग्रामीं ॥" असें त्यांनी भक्तांना अभिवचन दिलें. तसे ते अजून तिथे आहेतच. त्यांनी जर आमच्या बसमधली ती गर्दी पाहिली असती तर आपण प्रकटपणे गेलों आहों ह्यापेक्षा गुप्तपणे राहिलों आहों ह्यावरच भक्तजनांचा अधिक विश्वास आहे हें त्यांना कळून आलें असतें. आलें असतें कशाला? आज वर्षानुवर्षांच्या अनुभवाने आलें असेलच. यात्रेचे दिवस नसूनसुद्धा सोनार-सुतार, कुणबी-माळी, प्रभु-शेणवी, ब्राह्मण-मराठे, कानडी-तेलंगी, गोंदियाकडचे आणि गोव्याकडचे असे नाना यातींचे, नाना भाषांचे, नाना गावींचे, नाना प्रांतांचे लोक गर्दी करून श्रीगुरूच्या दर्शनाला आणि गाणगापूरच्या यात्रेला आले होते, आणि येत असतात. साहजिकच आहे, कारण प्रयाग, काशी आणि गया ह्या तिन्ही क्षेत्रांचें पावित्र्य एकट्या गाणगापुरांत आहे...

बस निघाली ती वळणें घेत, चढउतारावर खाली-वर करीत, अर्ध्यापाऊण तासाने गाणगापूरच्या मंदिरापाशीं येऊन उभी राहिली. उतारू उतरताहेत तोंच तुकतुकीत तट्ट काळ्या देहावर तांबुस-पांढरीं उपरणीं टाकलेले उपाध्याय त्यांच्या-भोवती गोळा झाले.

"चलावं महाराज, घर आपलंच आहे."

त्यांतलाच एक पुढे होऊन माझ्याकडे येत म्हणाला, "काय महाराज, काय करणार ?"

"काय करायचं असतं ?"

"काय, पांच रुपयांपासून पाऊणशे रुपयांपर्यंत आपण म्हणाल त्याप्रमाणं पूजा-नैवेद्य करूं. हुग्गीपासून पंचपक्वान्नापर्यंत. पांच ब्राह्मण जेवायला घालायचे, पांच घरीं भिक्षा मागायची, असा इथला रिवाज आहे. मग आपली काय इच्छा असेल तसं होईल."

"मला फक्त स्नान आणि जेवण करायचं आहे. आणि श्रीगुरूंशीं संबंध आलेलीं स्थळं पाह्यचीं आहेत."

माझ्यापासून देवाला—म्हणजे पर्यायाने त्याला स्वतःला— कांहीच प्राप्ति होणार नाही हें कळल्याबरोबर त्याचा रोख पालटला.

"ठीक आहे. आता आरती-नैवद्याची वेळ झालीच आहे. आपण स्नान करून या." तो रूक्ष स्वरांत म्हणाला. माझ्याबरोबर चालत येत त्याने मला एका घरांतली एक खोली दाखवली, आणि हाताच्या इशाऱ्याने नदीकडे जाणारी वाट दाखवली. त्याच्या दृष्टीने मी 'बेकार' प्रवासी ठरलों होतों. त्यामुळे माझ्याबद्दल अधिक आस्था दाखवायची त्याला गरज नव्हती.

माझ्याबरोबर स्वतः येण्यांत फारसा 'अर्थ' नाही हें पाहून भटजींनी माझें सामान आणणारा मुसलमान गडी जहांगीर हाच मला वाटाड्या म्हणून दिला. खरी पद्धत म्हणजे संगमावर स्नान करून, तिथल्या अश्वत्थाची पूजा करून मग पादुकांच्या दर्शनाला यायचें. पण त्याला वेळ नव्हता. म्हणून जिथे स्नान केल्याने कोटिजन्माचीं पापें जातात त्या रुद्रपदावरच स्नान करण्याला मी निघालों.

रुद्रपदावरचें पुण्य संपादन करण्यासाठी माझ्या आधीच पुष्कळसे लोक तिथे गोळा झाले होते. आणि तिथे जागा नव्हती. पण शेजारींच मोठमोठे मोकळे खडक होते. तिकडे मी गेलों. तिथल्या स्थानाचें पुण्य कदाचित् थोडें कमी असेल. पण स्नान स्वस्थपणे होण्यासारखें होतें. स्वच्छ वाहता प्रवाह, प्रशस्त पात्र, आणि मोकळें

वातावरण ह्यांच्या दर्शनानेच प्रवासाचा अर्धाअधिक शीण गेला. थंडगार पाण्यांत बुडी मारल्यावर सगळाच नाहीसा झाला. आणि मन अगदी प्रसन्न झालें. किती तरी वेळ तिथे तसाच राहिलों असतों. पण आरतीची वेळ होत आली होती.

मठाच्या आवारांत लोक घोळक्या-घोळक्याने बसले होते. सगळे आरतीची आणि नैवेद्याची वाट पाहत होते. बहुतेकांजवळ लाकडाचीं परळें, कथलाचे वाडगे, पितळेच्या थाळ्या असें कांही ना कांही भांडें होतें. ओवऱ्यांतून कुणी पोथी वाचीत होते, कुणी जप करीत होते, तर कुणी स्वस्थ बसले होते. महाद्वाराच्या आंतच एका खांबावर टांगलेल्या चित्रांतून श्रीदत्तात्रेयाचे चौथे अवतार, श्रीमाणिकप्रभु, तिसऱ्या अवताराच्या आरतीची प्रतीक्षा करीत बसलेल्या ह्या भक्त मंडळीवर कृपाकटाक्ष टाकीत होते.

पंधरा मिनिटें गेलीं, वीस गेलीं, पंचवीस गेलीं, अर्धा तास गेला. दुपार टळली. लोकांना मनांत किंवा पोटांत काय अस्वस्थता वाटत असेल कोण जाणे, पण बाहेरून तीं होतीं तशींच शांत होतीं. आणि मग एकदम "महानैवेद्या वन्तु, महानैवेद्या वन्तु" अशी सर्व लोकांत गडबड उडाली, निश्चलता जाऊन चलबिचल सुरू झाली, आणि उदास तोंडें उत्सुक झालीं. सोवळीं नेसलेलीं माणसें एक, दोन, तीन, चार अशीं एकामागून एक, झाकलेलीं ताटें खांद्यांवर घेऊन, महाद्वारांतून आंत आलीं आणि पायऱ्या चढून गाभाऱ्याकडे गेलीं.

तिथे श्रीगुरूची वसती आहे. तिथेच त्यांच्या निर्गुण पादुका आहेत. त्या निर्गुण असल्यामुळे कशाच्या आहेत हें नक्की कुणाला माहीत नाही. पण दोन्ही पादुकांवर एकेक लांबोळकेंसें चांदीचें टोपण आहे. त्यांचेंच भक्तांना एका झरोक्यांतून दर्शन मिळतें.

आरती आणि नैवेद्य उरकतांच प्रसाद घेण्यासाठी म्हणून भक्तांची गर्दी देवळाच्या मागच्या अंगणांत गेली. ज्यांनी ज्यांनी त्या दिवशीं देवाला नैवेद्य केला होता, ते भक्तांना प्रसाद वाटीत होते. जास्तींत जास्त लोकांना तो मिळावा म्हणून अगदी घासघास, अर्धा-अर्धा घास प्रत्येकाच्या भांड्यांत घालीत होते. भक्तांचें साहजिकच तेवढ्याने समाधान होत नव्हतें. आणि तिथे "वाढा, वाढा." "चला, चला."

अशी एकच झुंबड चालली होती, आणि लोक पुटपुटत, कुरकुरत बाहेर पडत होते.

कृष्णा-पंचगंगा संगमाहून गुप्त होऊन श्रीगुरु गाणगापुराला आले ते भीमा-अमरजा संगमावर राहिले. श्रीगुरूंशीं संबद्ध अशीं गाणगापुरांत आणि जवळपास पुष्कळच ठिकाणें आहेत. आणि तीं सगळींच खरें म्हणजे पाहायला हवींत. पण मुख्य संगम : तो पाहिला नाही म्हणजे कांहीच पाहिलें नाही. मला तिथे नेण्याचें कामहि भटजींनी जहांगीरवरच सोपवलें होतें.

डोक्यावर भर दुपारचें ऊन, पायाखाली शेतांच्या मधून जाणारा काळ्या मातींतला कच्चा रस्ता. लांब कुठे कुठे आंब्या-लिंबाचीं डेरेदार झाडें उभीं होतीं. पण संगमाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सावली देण्याच्या कामावर त्यांपैकी कोणाचीहि योजना झाली नव्हती. पोटरीला आलेलीं भरदार कणसें माथ्यावर मिरवणारीं, गर्द हिरव्या रुंद चमकदार पात्यांचीं, जोंधळ्याचीं उंच ताटें दाटीने शेतांत उभीं होतीं. त्यांच्या हिरव्या दाटीला करडईच्या लाल-पिवळ्या झळकदार फुलांचा, आणि तरोट्याच्या सौम्य सोनेरी-पिवळ्या झुबक्यांचा रंगपालट होता, आणि बरोबर गप्पा मारायला जहांगीर होता, म्हणून वाट सुसह्य झाली. नाही तर वाट चालतोंच आहें आणि माळ तर संपत नाही असें पावलोपावलीं वाटलें असतें. जहांगीरला यायला थोडासा उशीरच झाला होता. वाटेला लागल्यावर मीं त्याला सहज त्याबद्दल विचारलें तेव्हा तो म्हणाला,

"माधुकरी मागायला गेलों होतों, वेळ लागला."

"अरे, तूं मुसलमान ना? तूंहि माधुकरी मागतोस!"

"त्याला काय साहेब? प्रभूची आमच्यावर कृपा आहे. आम्ही नगारची आहों मंदिरांत. आता आरतीच्या वेळेला मीच नगाऱ्यावर होतों. आम्हांला जहागीर आहे. तिचं उत्पन्न बांध्यांत पडलं होतं चार वर्षं. तें परवाच मिळालं. आणिक काय म्हणजे, झाले तीन-चार महिने बघा, माझ्या पहिल्या बायकोला म्यां घालवून दिलं बापाच्या घरीं."

"कां रे?"

"येगळं व्हाया सांगत होती. आता आईबाप म्हातारे झाले. मी येगळा झाल्यावर त्यांनी कुठं जावं सांगा. म्हटलं, 'मी येगळा होणार नाही.' मग ती गेली बापाकडं. तिला बापाची फूसच होती. म्यां म्हटलं, 'जा'. पर प्रभूच्या कृपेने दोन महिने झाले—माझं दुसरं लग्न झालं. ही बायको लहानच आहे—पर लई चांगली आहे बघा. चला, जहागिरीचे पैसे मिळाले, चांगली बायको

मिळाली. श्रीगुरूची कृपा असली म्हणजे सगळं चांगलंच होतंय बघा. आमचा नेमच आहे माधुकरी मागायचा."

तीं ज्वारीचीं कणसांनी भरलेलीं समृद्ध शेतें पाहून मला आठवण झाली. मीं जहांगीरला विचारलें,

"गुरूच्या सांगण्यावरून एकानं आपलें शेत कापून टाकलं आणि मग त्याला शंभरपट पीक मिळालं तें शेत कुठे आहे?"

आम्ही साधारण अर्ध्या वाटेवर आलों होतों. तिथून लांबवर हात करून त्याने एक शेत दाखवलें. शेतासारखेंच शेत होतें. पण एका अर्थी नव्हतेंहि. कारण त्याच्यावर श्रीगुरूची कृपा झाली होती.

चालतां चालतां वाट संपत आली. समोर कांही अंतरावर झाडांच्या रांगा आणि त्यांतून घरांच्या भिंती दिसूं लागल्या. आम्ही संगमाजवळ येत चाललों होतों. आणखी थोडें अंतर राहिलें होतें, तेवढ्यांत जहांगीर उजवीकडे हात करून म्हणाला, "परत जातांना इथून भस्म घ्यायचं बरं का. भस्म घेतलं नाही तर यात्रा पुरी होत नाही."

"बरं झालं सांगितलंस तें. मी विसरलोंच होतों. गाणगापुराला यायचं आणि जातांना भस्म घ्यायचं नाही, म्हणजे गाणगापुराला आलं न आलं सारखंच."

हें आमचें बोलणें होतें आहे तो आम्ही संगमापाशीं पोंचलों.

नृसिंहसरस्वतींनी आपल्या निवासासाठी जीं जीं स्थानें निवडलीं होतीं तीं सगळीं रमणीय होतीं. भिलवडीजवळचें औदुंबर आटोपशीरच आहे, पण रमणीय आहे. कृष्णा-पंचगंगा संगमावरचें स्थानहि आता दगडी रस्त्यांनी, धर्मशाळांनी, ओवऱ्यांनी, माणसाळून भरगचून टाकलें असलें तरी अजून बऱ्याच अंशीं रमणीय आहे. समोर औरवाडकडे आणि बाजूला कुरुंदवाडकडे दृष्टि टाकून घाट-ओवऱ्या विसरतां येतात. पण भीमा-अमरजा संगम त्या दोन्ही ठिकाणांपेक्षा रमणीय आहे. गाणगापूर गावांतल्या एका गरीब ब्राह्मणाच्या घरच्या साठ वर्षांच्या वांझोट्या म्हशीला जर त्यांच्या कृपेने पान्हा फुटला नसता, तर त्यांना संगम सोडून गावांत वसतीला जावें लागलें नसतें. पण एका अर्थी झालें तेंच बरें झालें. ते संगमावरच राहिले असते तर वसती इथे झाली असती. आणि घरें, देवळें, धर्मशाळा, दुकानें ह्यांनी संगमाचा कोंडमारा केला असता.

पलिकडल्या उंचवट्यावरच्या अमरशाच्या—वेदरच्या बादशहाच्या—दर्ग्याजवळच्या थोडयाशा इमारती आणि अलिकडल्या काठावरचीं थोडींशीं मंदिरें, घरें सोडलीं तर या भागांत झाडीशिवाय कांही नव्हतें. घरांनी झाडें दिसेनाशीं केलीं नव्हतीं. चार-दोन साधक सोडले तर इतर वस्तीहि फारशी नव्हती. सगळें शांत, निवांत होतें. स्वच्छ वाळवंट, प्रसन्न प्रवाह, आणि दोन्ही तीरांवरची हिरवी-पोपटी झाडी आणि गर्द शेती, ह्यांमुळे संगमाला आणि त्याच्या परिसराला एक सुभग स्वागतशीलता आली होती. ती कधी इथे तर कधी तिथे दृष्टि ओढून घेत होती.

माणसांची वर्दळ जवळजवळ मुळींच नसल्यामुळे इथल्या रानपाखरांना राज्य आपलेंच आहे असेंच वाटत असावें. आणि तसें असल्यासारखेंच तीं वागत होतीं. माणूसवस्तींत न दिसणारी स्वच्छंदता, निर्भयता त्यांत दिसत होती. वाटेल तेव्हा यावें, वाटेल तिथे वाटेल तितका वेळ बसावें. वाटेल तेव्हा पंख पसरून अंतराळांत झेंप घ्यावी. ओल्या काळसर-तांबुस वाळूची जीभ संगमामध्ये लांबवर घुसली होती. तिच्या टोकाशीं, अगदी पाण्याच्या कडेजवळ, काळ्या-पांढऱ्या रंगाचे, रेखीव आटपशीर अंगाचे दोन पक्षी येऊन बसले, आणि आपल्या लांब शेपट्या खालीवर करीत आपल्या सौंदर्यावर खूष असल्यासारखे इकडेतिकडे पाहूं लागले. थोड्या वेळाने दोन-तीन बगळेहि आले आणि त्यांच्या मागून एक खंड्या आला. त्या पहिल्या नखरेबाज पक्ष्यांचा रेखीव काळा-पांढरा रंग, शंखाकृति बगळ्यांचा शुभ्र पांढरा रंग, आणि खंड्याचा तपकिरी-निळा रंग ह्यामुळे तेवढा तो कोपरा एखाद्या चित्रासारखा दिसूं लागला. तेवढ्यांत, अमरशाच्या दर्ग्याजवळच्या झाडींतून दोन पोपट 'किर्र-किर्र' करीत बाहेर पडले आणि त्या पक्षिचित्राच्या डोक्यावरून सरळ पलिकडल्या तीरावरच्या शेतांत घुसून दिसेनासे झाले.

आपण आता पुरेसे विसावलों असें संगमावरच्या त्या पक्ष्यांना वाटलें की काय कुणाला ठाऊक, पण ती कीरवाणी आणि ती हिरवी झेप विरते न विरते तोंच तेहि उडाले, आणि चारी दिशांना निघून गेले. त्यांचें पांच मिनिटांचें संमेलन संपलें. 'तुम्हीहि पुरेसे विसावलांत, चला आता,' अशी जणू ही त्यांची मला सूचनाच होती. संगमाचा निरोप घेतला आणि तिथून मी परत निघालों.

संगमाचा निरोप घेतला म्हणजे गाणगापुराचाहि घेतलाच.

■ ■

# प्रभूचा कट्टा

मी माणिकनगरला आलों होतों. दुसऱ्यांदा. सोलापुराहून दक्षिण हैदराबादकडे जाणाऱ्या रस्त्यावर सोलापुरापासून ऐशी-पंचाऐशी मैलांवर हुमणाबाद आहे आणि तिथून एका बाजूला सुमारें मैलभरावर माणिकनगर. पण मी सोलापुराहून आलों नव्हतों. मी आदल्या रात्रीं कल्याणीहून—चालुक्यांच्या कल्याणीहून—हुमणाबादला आलों होतों. आणि रात्र हुमणाबादेंत काढून आता सकाळीं माणिकनगरला आलों होतों.

आलों तसा फरशीच्या पुलावरून नदीच्या पलिकडे मंदिरांत गेलों. आणि त्या मोठ्या दारांतून आत शिरून रिकाम्या सभामंडपाकडे पाहत अंगणांत उभा राहिलों.

ह्याच्या आधी चाळीस वर्षांपूर्वी मी इथे आलों होतों. त्या वेळीं माणिकनगरची जत्रा चालू होती. हजारो लोक जमले होते. चहू बाजूंना तंबू, राहुट्या, पालें लागलीं होतीं. ठिकठिकाणीं गाड्या सुटलेल्या होत्या. घोडीं ठाणबंद केलेलीं होतीं. हलवायांचीं, कुंकूबुकावाल्यांचीं, फुलमाळ्यांचीं, तांबोळ्यांचीं, वाण्यांचीं, मणेऱ्यांचीं, कापडवाल्यांचीं, कासारांचीं, खेळणीवाल्यांचीं दुकानें मांडलेलीं होतीं. त्यांतून सारखी खरेदीविक्री चाललेली होती. घासाघीस होती.

आरडाओरड होती. खकाणा-धुरळा उडत होता. नाका-तोंडांत जात होता. दुकानांच्या मागे शेतांत आणि मोकळ्या जागेंत रहाट-पाळणे होते, चक्रें होतीं. दरवेशांचे तळ पडले होते. नाटकां-तमाशांचे, गाणारणी-नाचणारणींचे तंबू होते. त्यांत मराठी नाटकें होतीं, कानडी होतीं, उर्दू होतीं. सगळ्यांची एकच गर्दी होती. आणि सगळ्यांना गिऱ्हाइक होतें.

आम्ही कलबुर्ग्याहून एका सकाळीं बैलगाडीने आलों होतों, आणि मंदिराच्या मागे तालुकदार विठ्ठलरावांचें बिऱ्हाड होतें तिथे मुक्कामाला गेलों होतों.

रोज रात्रीं सर्व ब्राह्मणांना मुक्तद्वार जेवण असे. मीं हैदराबादला लक्ष्मणेश्वर बागेंत भटजी बापूंच्या सप्ताहांतल्या समाराधनेचीं जेवणें पाहिलीं होतीं. वैष्णवांचे स्वामी यायचे त्यांच्याहि समाराधना पाहिल्या होत्या. बांबूचे मोठमोठे तट्टथे पसरून त्यांवर भाताचे डोंगर टाकलेले, पाण्याच्या चुनेगची हौदांत आंब्रट वरण साठवलेलें, उसाच्या गुऱ्हाळांतल्या काहिलींसारख्या प्रचंड कढयांत भाज्या रिचवलेल्या, दहा-दहा हात लांबीच्या लोखंडी पत्र्यावर ओळीने पोळ्या भाजलेल्या, हें सर्व मीं पाहिलें होतें. त्यामुळे असल्या जेवणावळी मला परिचित होत्या. तरी पण माणिकनगरच्या पंक्तीचा प्रचंडपणा कांही वेगळाच होता. जेवण रात्रीं एकदाच असे. त्यामुळे पुष्कळ लोक जेवायला येतांना बरोबर मोटासा रिकामा तांब्या किंवा कांही तरी आणीत आणि लाडू-पुरणपोळ्या जें काय मुख्य पक्वान्न वाढायला येई तें मागमागून त्यांत भरून घेत. त्यांत त्यांची दुसऱ्या दिवसाच्या दुपारची तरतूद होत असे.

त्या वेळीं मला आमच्या वडलांनी ह्या सभामंडपांत आणलें होतें. मंडपाच्या त्या इकडच्या कोपऱ्यांत एका प्रशस्त गादीवर त्या वेळचे महाराज जरीचे कपडे घालून बसले होते. माझे लहानपणचे पायांतले वाळे वडलांनी महाराजांच्या पायांपाशीं ठेवले, आणि मला पुढे होऊन त्यांच्या पाया पडायला सांगितलें. त्यासाठीच आम्ही माणिकनगरला आलों होतों. तें सगळें आता माझ्या डोळ्यांपुढे उभें राहिलें.

पण आता जत्रेचे दिवस नव्हते. आता तिथे कोणी नव्हतें. एक मी, हुमणाबादेहून मीं आपल्याबरोबर आणलेला एक माणूस, तो काळ्या दगडाचा, भक्कम खांबांचा, रिकामा—अगदी रिकामा—सभामंडप, आणि तें अंगण. आता

मीच चाळीस वर्षांपूर्वीच्या माझ्याकडे तिथे पाहत होतों. आणि मीच तो आहें का, असें नवल करीत होतों. आम्ही जी मंडळीं माणिकनगरला त्या वेळीं गेलों होतों, आणि जीं माझ्याबरोबर तिथे त्या वेळीं सभामंडपांत होतीं, त्यांपैकी आता माझ्याखेरीज कोणीहि हयात नाही हेंहि त्या माझ्याकडे पाहतांना माझ्या मनांत आलें. रिकामेपणा अधिकच जाणवला, आणि त्या माझ्याकडे पाहत पाहतच मी मंदिरांतून बाहेर पडलों.

मंदिरांतून बाहेर पडलों. पुन्हा फरशीवरून नदीच्या अलीकडे येऊन इथे ह्या दगडावर बसलों आणि विचार करूं लागलों.

वर्षांचें चाक चाळीस वेळां फिरलें. त्या चाळीस फेऱ्यांत किती स्थित्यंतरें झालीं! मी कुठे कुठे गेलों! किती हिंडलों! आणि आता मी पुन्हा इथे कशासाठी आलों होतों?

कल्याणीजवळ लाडवंती गावीं अवतार ग्रहण केलेले माणिकप्रभु वयाचीं पहिलीं पंचवीस वर्षें फकिरी बाण्याने एका गावाहून दुसऱ्या गावीं, एका जंगला-डोंगरांतून दुसऱ्या जंगला-डोंगरांत फिरत राहिले. वर्ष-वर्षांची त्यांनी समाधि घेतली. महिनेच्या महिने इतरांशीं संबंध तोडून अरण्यांत गुप्त साधकांच्या सहवासांत घालवले. आणि अखेर इथे गडवंतीजवळ, एका भक्ताचें लुटारू रोहिल्यांपासून रक्षण करण्यासाठी, प्रकट झाले ते त्याचें रक्षण करून आणि रोहिल्यांना वश करून घेऊन इथेच राहिले. पहिल्याने दत्ताच्या गादीची स्थापना झाली. पुढे तिच्यावर गवती छप्पर झालें. पुढे छपरावर पक्की इमारत झाली. प्रभूंची फकिरी राहणी संपली. तिच्यांत राजाचें ऐश्वर्य आलें. प्रभूंचा पंथ 'सकलमतस्थापित' होता. ते मुसलमानांचे 'पीरान्‌पीर दस्तगीर' होते. शिखांचे 'जो गुरु नानक सोहि गुरु मानक' होते. हिंदूंचे तर 'निर्गुण निरालंब परब्रह्म भक्तकार्यकल्पद्रुम' होते. हिंदु-मुसलमान, ब्राह्मण-लिंगायत सगळ्या जातींत त्यांचे भक्त होते. 'प्रभूचा कट्टा' यात्रेचें क्षेत्र झालें. माणिकनगर झालें. हिंदु-मुसलमानांचे मेळे जमूं लागले. हजारो रुपयांची खैरात होऊं लागली. पात्रीं रुपया दक्षिणेने ब्राह्मणांचीं सहस्रभोजनें होऊं लागलीं. मुल्ला-मौलवी, शास्त्री-पंडित, वेश्या-नाचणारणी-गाणारणी ह्यांची हाजरी लागूं लागली. त्यांची संभावना होऊं लागली. आर्त, मुमुक्षु, अर्थार्थी, नाना प्रकारचे भक्त नाना हेतु मनांत धरून प्रभूंच्या दर्शनाला येऊं लागले. त्यांच्या हातून लोकांना पांच रुपयांपासून पन्नास हजारांपर्यंत इनामें मिळूं लागलीं. कनिष्ठ नोकरांना बढत्या

मिळाल्या. शेखदाराचे तालुकदार झाले. विटाळ गेलेल्या स्त्रियांना अपत्यलाभ झाला. समुद्रांत बुडत असलेलीं मालाचीं जहाजें तरलीं.

शृंगेरीचे शंकराचार्य प्रभूंना भेटण्याकरिता आले, त्यांच्यासाठी प्रभूंनी सव्वा लक्ष रोख रुपये रचून सव्वा गज लांबीरुंदीचें सिंहासन सिद्ध केलें. स्वामींच्या स्वागताचा प्रभूंना पांच लक्ष रुपये खर्च आला. लक्ष्मी जणू विष्णूचे चरण सोडून प्रभूंच्या सेवेसाठी त्यांच्याकडे आली होती. पण स्वामींना भेटण्यासाठी प्रभू सामोरे गेले ते साधा पांढरा पोषाख करून, रुमालाने दोन्ही हात बांधून, पायीं चालत. त्या दोघांची राम-भरतांच्या भेटीसारखी, हरि-हरांच्या भेटीसारखी, प्रेमभेट झाली ती मी बसलों होतों त्या जागेच्या जवळपासच, हुमणाबादकडे जाणाऱ्या रस्त्यावर. त्या वेळचीं झाडें ह्या जंगलांत कुठे असतील तर तीं अजूनहि प्रभूंच्या लीलांच्या त्या वेळच्या आठवणी एकमेकांना सांगत असतील आणि एकमेकांची करमणूक करीत असतील.

पण मी चाळीस वर्षांनी पुन्हा माणिकनगरला आलों तो प्रभूंची लीलाभूमि पुन्हा पाहावी म्हणून नाही. त्यासाठी आलों असतों तर पलीकडे संगमावर प्रभूंच्या मोठ्या बंधूंची—दादासाहेबांची—समाधि आहे तिचें दर्शन घेतलें असतें. कारण दादासाहेबहि महान् योगी होते. प्रभूंच्या आईसाहेबांची, व्यंकम्माची, टेहेळदासांच्या आईची, अशा अनेक समाध्या जवळपास आहेत त्यांचेंहि दर्शन मीं घेतलें असतें. पण मला ती ओढ नव्हती. ‘न कळतां पद अग्निवरी’ पडल्याने जसा व्हायचा तो परिणाम होतो तसा मी पुन्हा इथे आल्यामुळे आपोआप काय पुण्यलाभ व्हायचा तो झाला असेल. किंवा पुण्याची अभिलाषा न बाळगतां आल्यामुळे कदाचित् अधिकहि झाला असेल. पण मी मात्र पुण्य मिळवण्यासाठी आलों नव्हतों.

मी आलों होतों लहानपणीं पाहिलेलें एक ठिकाण पुन्हा पाहण्यासाठी. तिथल्या ओढ्याने, झाडीने, परिसराने माझ्या मनावर ठसा उठवला होता म्हणून. आणि दुसरें म्हणजे माझ्या एका गोष्टीने तें ठिकाण निवडलें होतें, तें पुन्हा पाहावें म्हणून.

मी मागे आलों होतों तेव्हाच्या सारखेच हिवाळ्याचे दिवस आहेत. वेळहि तशीच सकाळची आहे. ऊन पडलें आहे, पण नदीच्या प्रवाहावर वाफेचे

आळशी अजगर तशींच नागमोडी वळणें घेत सरपटताहेत. नदीचें पाणीहि तसेंच 'स्स-श्श' करीत पडतें आहे आणि तसेंच वाहतें आहे. भोवतालची झाडीहि तशीच दिसते आहे. आणि त्या गोष्टींतला पद्मनाभ कथेच्या शेवटीं ज्या खडकावर बसला होता तो खडकहि तिथे तसाच आहे. त्या वेळीं त्याला लांबून जत्रेला कोलाहल ऐकूं येत होता. तो मात्र आता नाही. आता सगळीकडे शुक्क आहे.

माझ्या दृष्टीने तेंच बरें आहे. चांगलें निवांत आहे. पद्मनाभला मीं चिंचोळीचा केला आहे, पण तो खरा होता चिटगोप्याचा. त्याचें कुटुंब मात्र हैदराबादचें होतें. बकुळेलाहि मीं चिंचोळीचीच केली आहे. आणि तिच्या तंबूतला सगळा प्रसंग माणिकनगरच्या जत्रेंतला दाखवला आहे. पण बकुळा, तिचा तंबू, आणि तिचें गाणें, वऱ्हाडांतल्या उमरावती जिल्ह्यांतल्या ऋण-मोचनच्या जत्रेंतलें आहे. प्रसंग कुठलाच नाही. माझ्या मनांतलाच आहे. माणिकराव हैदराबादचाच आहे. त्याचें घर, चंदूलालच्या बेल्यांतून हरीबावडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर होतें. अजूनहि कदाचित् असेल. पद्मनाभचे विद्वान् वडील त्याच रस्त्यावर राहत होते. पण पद्मनाभ त्यांचा मुलगा नव्हता. जयराम कुठलाच नव्हता. की मीच गोष्टीपुरता जयराम झालों होतों? पण मी जयराम असतों तर मला गोष्ट सांगतां आली नसती. की मी जयरामहि होतों आणि गोष्ट सांगणाराहि होतों? जें गाणें नाशकाच्या बसच्या अड्डयावर ऐकून बकुळेच्या ओढीने पद्मनाभ पुन्हा माणिकनगरला आला होता तें माझ्या मनांतलें होतें. आणि गाणें ऐकण्याचा प्रसंग वाईच्या बसच्या अड्डयावर घडलेला होता.

अशा ह्या वेगवेगळ्या व्यक्तींनी, प्रसंगांनी आणि स्थळांनी वेगवेगळ्या वेळीं, वेगवेगळ्या निमित्तांनी, माझ्या मनांत प्रवेश केला होता. तिथे अनेक वर्षें तीं एकत्र राहिलीं होतीं. त्यांचे एकमेकांशीं लागेबांधे निर्माण झाले होते. आणि कां तें मला ठाऊक नाही, पण त्यांनी माणिकनगर पसंत केलें आणि त्यांची गोष्ट माणिकनगरची झाली. कदाचित् त्यांचा सगळ्यांचा मिळून जो रांधा तयार होत होता त्याला माणिकनगरच योग्य स्थान असेल.

मी सांडव्याअलीकडल्या ह्या दगडावर बसलों आहें आणि माझें मन पुन्हा मागे चाळीस वर्षांपलीकडे गेलें आहे. तीं सगळीं जणें पुन्हा तिथे आलीं आहेत, आणि आमचें सगळ्यांचें तिथे अनेक वर्षांनी पुनर्मीलन झालें आहे. पद्मनाभ तिथे त्या खडकावर बसला आहे. त्याच्या शेजारीं बकुळा आहे. पलीकडे

तुळशी आहे. ती कशी दिसते तें तेव्हा मीं पाहिलें नव्हतें. आताहि ती डोक्यावरून पदर घेऊन खाली मान घालून बसली आहे. त्यामुळे तिचें रूप मला दिसत नाही. जयरामहि आहे.

तीं तशींच स्वस्थ बसलीं आहेत. मधूनमधून माझ्याकडे पाहताहेत. मीं त्यांच्यावर अन्याय केला असें त्यांच्यापैकी कुणाला वाटतें आहे की काय तें मीं निरखून पाहतों. पण मला कांहीं समजत नाहीं. मला पाहून त्यांना आनंद झाला की नाही तेंहि कळत नाही. पण मला मात्र इतक्या वर्षांनी त्यांना पाहून आनंद झाला आहे.

बराच वेळ झाला. मला आता त्यांचा निरोप घेतला पाहिजे. माणिक-नगरचा घेतला पाहिजे. त्या ओढ्याचा, त्या खडकाचा, त्या सांडव्याचा. सगळ्यांचा. मी त्यांचा निरोप घेतों. घेतला आणि तिथून निघालों. पण तीं तिथे आहेत, तशीं पुस्तकांतल्या गोष्टींत आहेत, तशीं माझ्या मनांतहि आहेतच. मीं त्यांचा निरोप घेतला ना ? की नाही घेतला ! मला त्यांचा निरोप घेतां येणारच नाही का !

# विठो पालवीत आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १२१८७
स्थळ प्रत

पहाटेच्या पांचाचा सुमार आहे. सगळें गाव अजून निजलेलें आहे. पण इथे काकडआरतीसाठी शे-दीडशे लोक जमले आहेत. चौखांबी मंडपांत भक्तमंडळी दाटी करून बसली आहेत. त्यांत बहुतेक पोक्त अशा सधवा-विधवा बाया आहेत. महाराष्ट्रीय आहेत, गुजराती आहेत, मारवाडी आहेत, सिंधी आहेत, कानडी आहेत. आणखीहि कोणी असतील. त्यांच्या मागे सोळखांबी मंडपांतदेखील तशीच गर्दी आहे. चौखांबी मंडपांतल्या बायकांच्या पुढे आणि गाभाऱ्याच्या दारापर्यंत जी जागा आहे, तिच्यांत बरीच रेटारेट करून पुरुष मंडळी बसली आहे. त्यांतच आम्ही आहों.

आत मूर्तीच्या अंगावर पागोटें, अंगरखा, रेशिमकाठीं उपरणें, धोतर असा पोषाख आहे. गळयांतल्या तुळशीच्या आणि फुलांच्या माळा आदल्या दिवशीं-च्याच आहेत. त्या थोड्याशा दबलेल्या दिसतात. त्याचें कारण रात्रीं रुक्मिणीने कदाचित् तिथे वक्षःस्थलावर डोकें टेकलें असावें. मूर्तीची चर्या शांत-स्थिर आहे. दृष्टि भक्तमंडळीवर आहे.

काकडआरतीची वेळ होत आली आहे. पण अजून थोडा अवकाश आहे. पुजारी मंडळी कोणी धाबळी नेसलेला, कोणी कद नेसलेला, कोणी पीतांबर नेसलेला, हत्तीदरवाजांतून गाभाऱ्याकडे आणि गाभाऱ्याकडून हत्तीदरवाजाकडे जा-ये करतो आहे. मागे बायकांमध्ये अस्वस्थ अशी चुळबूळ चालली

आहे. "ए बया, खालते बैस. आम्हांलाय् दर्शन घ्यायचंय्." असे कठोर शब्द कानांवर आदळतात. 'बया' कांही तरी उत्तर देते आहे. त्यांतच एकदम "पर्वता जाऊं। गडे हो मल्लिकार्जुन पाहूं। श्रीशैलीं...वाट अवघड ऽ ऽ..." असे पांचसात बायकांचे मध्यम आवाजांतले सुश्राव्य एकमेळ स्वर कानांवर पडले. हें गाणें चालू असतांनाच मागल्या सोळखांबी मंडपांतून कोणी तरी "उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकलां..." म्हणूं लागलें. आमच्या अगदी पाठीशीं बसलेली एक बाई खणखणीत आवाजांत स्पष्ट वाणीने "करारविंदेन पदारविंदं..." म्हणूं लागली. आणखी मागून कोणाचे तरी "उठा हो वेगेसीं काकड आरती पाहोनी—" वगैरे शब्द कानावर आले. भिंतीशीं उभा राहून एक माणूस एकतारीवर एकाग्रतेने कांही तरी आपल्याशींच गुणगुणत होता. आणि त्याच्याच शेजारीं मंदपणें टाळ वाजवीत दुसरा एक माणूस कानडी किंवा मल्याळीं भाषेंत कांही तरी म्हणत होता.

मंदिरांत सगळ्यांनी एका सुरांत एकच गाणें म्हणावें असें नाही. इतकेंच नव्हे, तर सगळयांनीच एकाच देवाचीं गाणीं म्हणावीं असेंहि नाही. ज्याने त्याने आपल्याला इष्ट वाटेल त्या देवाला इष्ट वाटेल त्या पदाने इष्ट त्या भाषेंत आळवावें असें होतें. त्या एका मूर्तीच्या ठिकाणीं प्रत्येक जण आपलें इष्ट दैवत पाहत होता आणि त्याला स्वतंत्रपणें आळवीत होता.

आंत देवाला काकडआरती सुरू झाली, तेव्हा मात्र दोन्ही मंडपांतल्या सगळ्या मंडळींतून एकदम "काकडा झाला—विठूचा काकडा झाला..." असा गजर उठला आणि सगळें मंदिर त्या गजराने दुमदुमलें.

आरती आटपल्यावर देवाशेजारचा एक मनुष्य काकडा हातांत घेऊन भक्तमंडळींत आला. उजवा हात पुढे करायचा, कोणी पै-पैसा देईल तो घ्यायचा, आणि काकड्याच्या जळक्या कापडाचा डाळीच्या फोलपटाएवढा तुकडा तोडून भक्ताच्या हातावर ठेवायचा. तो त्याने अंगारा म्हणून कपाळाला लावायचा. आमच्या शेजारचा एक मनुष्य, त्याच्यासमोर बराच वेळ हात पसरलेला होता तरी त्यांत कांही टाकीना. तेव्हा काकडेवाला म्हणाला, "अहो द्या की कांही तरी. इतके लांबून वैकुंठाला आलांत देवाच्या दर्शनाला. तरी गाठचा पैसा सुटेना काय? रेल्वेसाठी, बससाठी, चहापाण्यासाठी पैसे खर्चलेच्च असतील की." तरी तो इसम हूं की चूं करीना. तेव्हा शेजारचा एक मनुष्य म्हणाला, "अहो, तो बाह्मन व्हय." तेव्हा काकडेवाला पुढे सरकला. तो पुढे

सरकल्यावर त्या 'ब्राह्मणा'ने आमच्याकडे वळून डोळे मिचकावले आणि हास्य केलें. कां तें कळलें नाही. मात्र तो 'ब्राह्मण' दिसत होता कुणब्यापेक्षा कळकट आणि करपट. ब्राह्मणाजवळ मागायचें, पण त्याने दिलें नाही तर त्याच्याकडून आग्रहाने घ्यायचें नाही असें दिसलें. काकडेवाला आमच्यामागे जातो न जातो तो त्याच्या तोंडून, "बाई, देवाच्या देवळांत बसून असले धंदे करतां काय? त्या बाईच्या हातांतला पैसा घेतला तो. तुम्हांला कांही नसलं द्यायचं तर नका देऊं; पण हें असलं काय?" असे शब्द बाहेर पडले.

मंडपांत ही वसुली चालली असतांना गाभाऱ्यांत देवाचा पोषाख उतरत होता. माळा, पागोटें, उपरणें, अंगरखा आणि शेवटीं धोतर असें सगळें उतरलें, आणि एक जानवें सोडलें तर मूळरूपांत, जशी पाथरवटाने घडविली होती तशी मूर्ति समोर दिसूं लागली. "आवडी धरोनी आलेती आकारा।" असें जिच्याबद्दल तुकोबांनी म्हटलें, ज्ञानेश्वरापासून पुढल्या अनेक संतांनी जिच्यांत परब्रह्म पाहिलें, हिंदु-मुसलमान, ब्राह्मण-महार, स्त्रिया-शूद्र, पतिव्रता-वेश्या, श्रीमंत-गरीब, विद्वान्-अविद्वान, धट्टे-कट्टे, लंगडे-थोटे—असे लक्षावधि लोक ज्याच्यासाठी वर्षानुवर्षें वाऱ्या करीत आले, त्यांनी ज्याला आळवलें आणि ज्याचा धावा केला तो हा. दामाजीची अब्रू वाचवण्यासाठी महार होऊन बेदरला बादशहाच्या दरबारांत रसद पोंचती केली ती ह्याने. सखूसाठी कऱ्हाडला तिच्या सासरीं जाऊन केरवारा आणि शेणपोतेरेंच नाही तर तिच्या नवऱ्याची शेजसोबत केली ती ह्याने. अविंधाच्या हातून होणाऱ्या अप्रतिष्ठेपासून वाचवण्या-साठी कान्हूला आपल्या डाव्या मांडींत गुप्त करून घेतलें तेंहि ह्यानेच आणि इथेच. आणि महीपतीने ज्यांची नोंद केली नाही अशा अनेक भक्तांच्या धाव्यासरशीं धावून गेला असेल तोहि हाच. द्वारकेहून रुसून निघून आलेल्या रुक्मिणीच्या शोधासाठी दिंडीरवनांत, लोहदंड क्षेत्रांत आलेला, आणि तिची आळवणी करून झाल्यावर पुंडलिकाच्या मातृ-पितृ-भक्तीने मुग्ध होऊन रुक्मिणीकडे पाठमोरा आणि त्याच्याकडे सामोरा होऊन कंबरेवर हात देऊन उभा राहिलेला तो हा. तो अजून तसाच उभा आहे.

तो तसा सुंदर नाही. डोक्यावर तुर्की टोपीसारखी उंच टोपी आहे, त्यामुळे कंबरेवरचा आधीच प्रमाणाबाहेर उंच दिसणारा भाग अधिकच उंच वाटतो. चेहराहि मोठा, लांबट, आणि गाल फुगीर आहेत. कानांतलीं मकरकुंडलें जड होऊन खांद्यावर येऊन आडवीं पसरलीं आहेत. पायहि थोडेसे बोजडच आणि

घोट्यांशीं जाड आहेत. उजवा पाय मागे कुणा गोसाव्याने घाव घालून तोडला होता, तो सांधून घेतला आहे. मूर्तीचें ठाण-माण प्रमाणबद्ध वाटत नाही. पण त्याची जे भक्ति करतात ते त्याची मूर्ति सुंदर आहे म्हणून थोडीच? ते त्याची भक्ति करतात म्हणून त्यांना तें विटेवरचें ध्यान सुंदर वाटतें. अनेक संतांच्या भक्तीने ती मूर्ति भारलेली आहे. हेंच तिचें खरें आकर्षण आहे. तिच्याकडे पाहत असतांना मनांत आलें, "अंगरखा-पागोटें घालून हरदासासारखी सजवण्यापेक्षा ही मूर्ति अशीच राहूं दिली तर?"

वस्त्रें उतरल्यावर देवाला पंचामृतस्नान झालें. आधी पांच-सहा शेर दुधाचा आणि दह्याचा अभिषेक झाला. नंतर एक अर्ध्या शेराचा लोण्याचा गोळा देवाच्या गळ्याखाली मिनिट-अर्ध मिनिट थापून ठेवून काढण्यांत आला. मग चार-पांच वाट्या मधाने स्नान झालें. शेवटीं सर्वांगाला साखर लावून उष्णोदकाने स्नान घालण्यांत आलें. अंग पुसून झाल्यावर नवें जानवें घालून जुनें काढण्यांत आलें.

नंतर धोतरापासून पुन्हा सगळा नवा पोषाख घालण्यांत आला. शेवटीं पागोटें बांधण्यांत आलें. पागोट्यापासून नाकाच्या शेंड्यापर्यंत गंध लावण्यांत आलें. माणसासारखे सर्व सोपस्कार झाल्यावर देवाला आरसा दाखवण्यांत आला. पागोटें-पोषाख पाहून देवाचें समाधान झाल्यावर तोच आरसा भक्त-मंडळींत फिरवण्यांत आला. त्याबरोबरहि अर्थात् पैशाची मागणी होतीच.

पूजेचे सगळे उपचार संपल्यानंतर गाभाऱ्याच्या दारावरचा चोपदार आपलें मागणें मागण्यासाठी हात पसरून मंडपांत हिंडूं लागला. त्याचें मागणें चाललें असतांनाच कठडे सरकले आणि दर्शनासाठी रांग लागली.

वेरूळच्या घृष्णेश्वराच्या सभामंडपाची आठवण करून देणारे सोळखांबींतले खांब पाहून लाकडी मंडपांत आलों तो फटफटीत उजाडलें होतें. खाली फरशींतल्या प्रत्येक दगडावर ओळीने लांबोळकीं अक्षरें कोरलेलीं दिसलीं. तीं भक्तांचीं नांवें होतीं. दक्षिणेकडे गोकर्ण-महाबळेश्वराच्या प्रवेशद्वारांत भक्तांनी आपल्या देहांच्या रेखाकृति कोरवल्या होत्या. आपल्या पाठीवर पाय देऊन भक्तांनी जावें म्हणून. इथे नांवें. त्यांच्यावर पाय न देतां जाणें अशक्य होतें. प्रल्हादबुवा बडव्यांच्या समाधीचें दर्शन घेऊन महाद्वारांतून बाहेर येऊन पायऱ्या उतरून रस्त्यावर येतांना शेवटच्या नामदेवाच्या पायरीवर पाय पडत होता. पण वेळेवर लक्षांत आलें आणि पायरी टाळून उतरलों. नामदेवाची इच्छा, भक्तांनी आपल्या

मस्तकावर पाय देऊन जावें. म्हणून तर त्यांनी तिथे मुद्दाम समाधि घेतली. पण अजून कोणीहि भक्ताने त्यांची ही इच्छा पुरी करण्याचें औद्धत्य दाखवलें नसेल.

पायऱ्यांखाली समोर डाव्या अंगाला चोखोबांची समाधि आहे. मंदिराच्या आवारांत आणि आसपास अशा साधुसंतांच्या बऱ्याच समाधी आहेत. त्याच-प्रमाणे मंदिराशेजारच्याच एका वाड्यांत एक माणूस द्रव्यलोभाने बायका-पुरुषांना बुचाडून भिंतींत चिणीत असे म्हणतात. तेव्हा तिथेहि एक प्रकारच्या समाधीच आहेत. आणि सत्पुरुषांच्या समाधींना जसा तो विटेवरचा विठ्ठल साक्षी आहे तसा ह्याहि समाधींना आहे.

विटेवरचा विठ्ठल हा जरी पंढरपुरांतला मुख्य देव असला तरी रुक्मिणीला शोधीत द्वारकेहून दिंडीरवनांत आलेल्या गोपाळकृष्णाने भीमानदीच्या तटावर पहिल्याने पाऊल ठेवलें तें ह्या ठिकाणीं नाही, तर ह्या ठिकाणाहून सुमारें कोसअर्धकोस खाली 'गोपाळपर्वता'शेजारीं. तिथे त्याचीं पावलें उमटलीं तीं अजून आहेत. आणि गोपाळपुऱ्यांतच उंचावर त्याची मुरलीधर मूर्ति आहे. तिचा डोक्यापासून खांद्यापर्यंतचा भाग तंतोतंत विठ्ठलासारखा आहे. त्यावरून हा आणि तो देव एकच ह्याविषयी शंकाच राहत नाही.

इथेच गोपाळकृष्णाने जनाबाईला दर्शन दिलें. तीं दोघें एकमेकांशीं काटकोन करून एकमेकांशेजारीं एका गुंफेंत बसलेलीं आहेत. गोपालकृष्णाला पाहून जनाबाईच्या चित्ताला वाटलेली प्रसन्नता तिच्या मुखावर दिसते आहे.

पंढरपुराला चंद्राकार वळसा घालणारी भीमा इथे पूर्वेकडे वळते. पंढरपुराच्या कमरेभोवतालचा तिचा विळखा प्रेमाचा आहे. त्यामुळेच ती चंद्रभागा झाली आहे आणि तिच्या त्या प्रेमाच्या विळख्यामुळे पंढरपुराची शोभा वाढली आहे. ती आपली मर्यादा सहसा सोडीत नाही. पण जेव्हां ती आपली मर्यादा सोडते. तेव्हां पंढरपुरांतलीं घरेंदारें, गुरेंमाणसें, एखाद्या मातावलेल्या अजगराच्या बेगुमानपणाने गिळते. लक्षावधि रुपयांचें नुकसान करते. हजारों लोकांना अक्षरशः नागवते. आईबापांना निपुत्रिक आणि मुलांना पोरकीं करते.

पण त्यांतूनही कांहीं भाग वाचतात. आणि त्या भागांतल्या लोकांना देवाची आपल्यावर विशेष कृपा आहे असें वाटतें. आमचे क्षेत्रोपाध्ये मला सांगत होते, "परवां एवढा पूर आला ना? ह्या शेजारच्या घरापर्यंत पाणी आलं होतं. पण विठ्ठलवाडीला धक्का नाहीं पोंचला."

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 30,९८९ दि:

असा हा देव आपल्या भक्तांचें रक्षण करतो. तो आपल्या भक्तांची माउली, गाउली आणि साउली आहे. पण परचक्रामुळें किंवा आपसांतल्या भांडणांमुळें देवाचेंच संरक्षण करण्याची पाळीहि इतिहासांत अनेकदा आली आहे. देव दिल्या-घेतल्याच्या पावत्या झाल्या आहेत. देवाजवळ ठेवलेलें कोणाचें किती ह्याचे निवाडे झाले आहेत. आणि देव बडव्यांचा कीं समस्त पंढरपूरकरांचा ह्याबद्दल निर्णय आहेत.

पण ह्या झाल्या हक्काच्या गोष्टी. महाराष्ट्रभर देवांचे जे लक्षावधि भक्त पसरलेले आहेत. त्यांचा ह्या गोष्टींशीं कांहीं संबंध नाहीं. ते दर आषाढी–कार्तिकीला लाखांच्या संख्येनें पंढरपुराला जातयेत असतात. ह्याशिवाय सबंध वर्षभर पंढरपुरांत जाणारा-येणाऱ्यांची वर्दळ चालूंच असते. त्यांत सर्व जातींचे लोक असतात. पुरुष असतात, स्त्रिया असतात. सभ्य-साव असतात. चोर-खिसेकापू असतात. सरळमार्गी पतिव्रता बायका असतात. तशा आडमार्गानें नेलेल्या किंवा गेलेल्या असतात. ह्या आडमार्गी बायकांनीच 'पंढरपूरला जाणें' ह्या शब्दांना मराठींत एक वेगळा अर्थ मिळवून दिला आहे.

पंढरपुराला येऊन जाणारे जसे भक्त आहेत तसे पंढरपुरांत कायमचें वास्तव्य करून राहिलेले संत आहेत. संतिणी आहेत. त्यांचे रस्तोरस्तीं मठ आहेत. आणि तिथे सतत भजनें–प्रवचनें चाललेलीं आहेत. 'विठो' सगळ्यांना 'पालवीत आहे।' म्हणून लोक इथे येताहेत. म्हणून क्षेत्रोपाध्यांची आणि व्यापाऱ्यांची चलती आहे. म्हणून द्रव्याचा लोभ आहे आणि लाभहि आहे.

॥ ७ ॥

# वैराजक्षेत्रं उत्तमम् !

"..Wai—one of the most beautiful towns in the Deccan"

—*Traveller's Hand-book*

वाईकर भटजी हे मूळचे विलायतेंतल्या वेकफील्ड गावचे उपाध्ये हें मला माहीत होतें. तरी पण आपल्याकडे येऊन वाईचे रहिवाशी झाल्यावर (किंवा होतांनाच) त्यांनी मराठी भाषा, व्यवहार, चालरीत, आवडीनिवडी हीं इतकीं आपलींशीं करून टाकलीं कीं, त्यांच्यांत परकेपणाचा लेशसुद्धा राहिला नाही. इतकेंच नव्हे, तर मराठीपणाच्या बाबतींत त्यांच्याकडून इतरांनी धडे घ्यावेत इतके ते मराठी झाले. त्यांच्याशीं परिचय झाला तेव्हापासूनच मला आपण केव्हा तरी वाईला गेलें पाहिजे असें वाटूं लागलें. शिवाय वाई हें ब्राह्मणांनी वसवलेलें, वाढवलेलें, वैभवाला चढवलेलें गाव; साहजिकच महाराष्ट्रांतल्या इतर गावांपेक्षा कांहीतरी वेगळेंपण असलेलें गाव; स्वतःच्या पदराला खार लावून सनातनधर्मरक्षणासाठी 'धर्म' मासिक चालविणाऱ्या, परंपरागत पद्धतीने शास्त्राध्ययन झालें असतांना वैद्यकीचा व्यवसाय करणाऱ्या, आपल्या जोरकस वाणीने आणि लेखणीने सर्व सुधारणांना कडवा विरोध करणाऱ्या कै. भाऊशास्त्री लेल्यांसारख्या विक्षिप्त विद्वानाचें तें गाव; संस्कृत विद्येचें नव्या काळाला अनुरूप पद्धतशीर शिक्षण देऊन 'देशकालज्ञ आणि भविष्यकालोपयुक्त' पंडित तयार करूं पाहणाऱ्या प्राज्ञ पाठशाळेचें गाव;

जिथली नदी, घाट, देवळें आणि भोवतालचा भूभाग यांच्या सौंदर्याची वाखाणणी अनेकांकडून अनेकदा ऐकली होती तें गाव पाहण्याची साहजिकच उत्कट इच्छा होती.

पण तें गाव पाहण्यासाठी एकदा गेलेला मी, अर्धा पूल चालून जाऊन परतलों होतों.

गावांत जाण्यासाठी म्हणून मोटार स्टँडवरून निघालों. उत्सुकतेने इकडेतिकडे पाहत पुलावर चढून गेलों. आणि अर्ध्या पुलावर जाऊन खाली पाहिलें तो काय? नदीचें पात्र शुष्क होतें, तळचे खाचखळगे, दगडगोटे उघडे पडले होते आणि एखाद्या अग्निहोत्र्याच्या अग्नि-शाळेंत गार्हपत्य, आहवनीय, दक्षिण इत्यादि अग्नींच्या आधानासाठी जशीं वेगवेगळ्या आकारांचीं लहानमोटीं कुंडें असतात, तशीं कृष्णेच्या त्या पात्रांत तिकोनी, चौकोनी, अर्धचंद्राकृति कुंडें दिसत होतीं आणि त्यांत डबक्यांत साचतें तसें पाणी साचलेलें होतें. कृष्णा-माईने आपलें स्तन्य आवरलें होतें आणि तें आवरलें जात असतां जेवढें हातीं लागलें तेवढें तिच्या बाळांनी वेड्यावाकड्या पात्रांत धरून ठेवलें होतें. समोर प्रशस्त रेखीव घाट पसरलेले होते, पण ज्या नदीसाठी ते बांधलेले होते ती नदीच आता तिथे नसल्याने ते एखाद्या जीवनहेतु नष्ट झालेल्या भाग्यहीनाप्रमाणे उदास आणि भकास दिसत होते. मला तें दैन्य बघवलें नाही आणि ह्या असल्या गावांत पाहण्यासारखें काय असणार म्हणून पुढे न जातां मी तसाच परतलों.

नदीच्या त्या शुष्क दृश्याप्रमाणेच अनेक घरांवरच्या पत्र्यांच्या छपरांनीहि माझी उत्सुकता छिन्नभिन्न करून टाकली असेल. पत्र्यांचीं छपरें मला मुळीच आवडत नाहीत. (अशींच छपरें मीं साताऱ्यांतहि खूप पाहिलीं.) धाबीं बांधण्याचा खर्च आणि कौलें शाकारणीचा त्रास चुकवण्यासाठी पत्रे घालायचे. तेहि अशा बेताचा उतार ठेवून की वेळ पडल्यास त्यावर निजतां यावें, पापड-सांडगे वाळत घालतां यावे आणि पावसाळ्यांत पाणीहि ओसरून जावें. अशी ही 'एक पंथ दो काज' साधणारी मराठी काटकसर म्हणजे निसर्गाला हुलकावणी देणें, त्याच्याकडे पाहून नाक खाजवण्यासारखें वाटतें मला. शिवाय मला त्यांचा तो करडा-पांढरा रंग, त्यांचा तो यंत्राने दिलेला काटकोनी आकार, आणि त्यांवरच्या त्या यंत्रांनीच साधलेल्या सरळ समांतर पन्हळी कठोर वाटतात. याच्या उलट कौलारू छपरें कोरीं करकरीत असलीं तर त्यांचा तो ताजा तांबूस रंग लक्ष वेधून घेतो. चार उन्हाळेपावसाळे अंगावर घेतल्यामुळे काळवंडलेलीं असलीं तर

त्यांना एक प्रौढत्वाची प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते आणि त्यांच्याबद्दल आदर वाटतो. सोय साधण्यासाठी सौंदर्याकडे दुर्लक्ष करणारीं पत्र्याचीं छपरें म्हणूनच मला आवडत नाहीत. फॅक्टरी, कारखाने, गुदामें यांच्यावर पत्रे घालणें एक वेळ चालेल, पण घरांवर आणि विशेषतः देवळांवर पत्रे घातलेले पाहिले की, मला त्यांच्याबद्दल मुळींच आदर वाटत नाही.

म्हणूनच म्हटलें की वाईंत पाहिलेल्या घरांवरच्या पत्र्यांमुळेहि मी कदाचित् माघार घेतली असेल.

पण पुन्हा एकदा जेव्हा मी गेलों—

तेव्हा कृष्णा नदी तट्ट फुगली नव्हती, पण अंगाने भरूं लागली होती. कारण महाबळेश्वरला पाऊस पडायला आरंभ होऊन गेला होता. जुन्या महाबळेश्वरांत पांच नद्यांसाठी पांच दगडी प्रणालिका बांधलेल्या आहेत. त्यांतली कृष्णेची म्हणून एक प्रणालिका होती—पण तिथे मला ती दिसली नव्हती. म्हणूनच वाईंतलें तिचें उपारूढयौवन रूप पाहून आनंद आणि आश्चर्य वाटलें. खरोखरच मग मला वाटूं लागलें की नदीचें मूळ पाहूं नये. त्यांतून तें दगडांनी बांधून काढलेलें, पत्र्यांनी शाकारलेलें असेल, तर मुळीच पाहूं नये.

आता मी कृष्णेच्या पात्राकडे पाहतों तो पाणी जपून साठवून ठेवणारीं कुंडें लपून गेलीं होतीं. 'प्रथमे वयसि' प्रवेश करीत असलेली कृष्णा बाळपणांतून बाहेर पडली होती, पण तिचा खेळकरपणा अजिबात नष्ट झाला नव्हता. म्हणूनच लहान मुलें रस्त्याने जातांना जशीं उगीचच्च बाजूच्या भिंतीला, खांबाला, कठड्याला हात लावीत जातात, तशी कृष्णा घाटाच्या पायऱ्यांना आणि काठच्या झाडांना आपल्या नाजूक बोटांनी हळूच खेळकर स्पर्श करीत चालली होती. तिचें पाणी थोडेंसें कलुषित होतें. पण यौवनाच्या प्रारंभाबरोबर चित्तांत विकार उत्पन्न व्हावा हें स्वाभाविकच्च नाही का? ह्या वेळीं ती शंकराचार्यांनी आपल्या अष्टकांत वर्णन केल्याप्रमाणे खरोखरच स्मेरमुखी होती.

पुढे तिचें अंतरंग अधिक कलुषित होईल, ती मदोद्धत होऊन सर्वांना धक्के देत, वाटेंत येणाऱ्याला पुढे लोटीत आणि त्यांची केविलवाणी असहायता पाहून निर्घृण अट्टहास करीत बेफामपणें जाईल...पण पुढे ती कांही तरी करील आणि तें आवडण्यासारखें नसेल म्हणून मी ह्या वेळीं आपलें मन कां कलुषित करून घेऊं?

मी पुलावरून खाली कृष्णेकडे, तिच्या काठच्या घाटांकडे, त्यावरच्या मंदिरांकडे, त्यापलीकडच्या घरांकडे, आणि त्यांच्याहि पलीकडच्या डोंगरांकडे पाहिलें आणि माझे पूर्वीचे दुर्ग्रह पार नाहीसे होऊन गेले. माझ्या मनांत आलें, ह्या वेळीं जर हें ठिकाण इतकें रमणीय दिसूं शकतें तर आश्विन-कार्तिकांत जेव्हा कृष्णेचा प्रवाह अनाविल झालेला असतो आणि सृष्टि आपल्या समृद्धीने संपूर्ण नटलेली असते, तेव्हा किती सुंदर दिसत असेल!

आणि मग अगदी प्रसन्न मनाने पूल ओलांडून, डावीकडे वळून बरेंच पुढे जाऊन आम्ही प्राज्ञ पाठशाळेची चौकशी केली. कारण आम्हांला तिथेंच उतरायचें होतें. "असेच पुढे जा", "फार पुढे आलांत", "असे ह्या रस्त्याने जाऊन पिठाच्या गिरणीजवळ विचारा" इत्यादि मार्गनिर्देशानुसार प्रयत्न करीत, थोडेसे टक्के खाऊन आम्ही एका अरुंदशा रस्त्यांत शिरलों आणि थेट चालूं लागलों तो गंगापुरीच्या वेशीपाशीं आल्यावर, डाव्या अंगाच्या एका घराच्या दाराच्या गणेशपट्टीच्या वरच्या बाजूला 'प्राज्ञ पाठशाळा, वाई' अशीं, सौंदर्यपदवीवर कसलाहि अधिकार सांगण्याचा प्रयत्न न करणारीं, गेरूने काढलेलीं अक्षरें दिसलीं. तीं पाहतांच "प्राप्तं प्राप्तव्यम्" अशा समाधानाने आम्ही पायऱ्या चढून आत शिरलों. उन्हाळ्याची सुटी असल्यामुळे शाळा रिकामी होती. एक गृहस्थ एका कोपऱ्यांत गायीपुढे चारा घालीत (किंवा तिथून काढीत) असतांना दिसले. त्यांनीहि आमच्याकडे पाहिलें आणि आम्ही कोण, कुठले, ह्याची चौकशी करून आम्हांला शेजारच्या बोळांत, प्राज्ञ मुद्रणालयाच्या आणि धर्म-कोश-कार्यालयाच्या इमारतीच्या अगदी वरच्या मजल्यावरच्या सोप्यांत नेऊन आमची सामान वगैरे ठेवण्याची सोय केली.

प्रवासांतले कपडे काढून टाकून, उघड्या अंगावर गार मोकळी हवा घ्यावी म्हणून मी बैठ्या खिडकीचे आडवे गज ओलांडून बाहेरच्या पत्र्यांच्या छपरावर जाऊन उभा राहिलों आणि चौफेर नजर टाकली, तों डोळे अगदी धाले. खाली मागच्या अंगणांत चाफा फुलला होता, त्याचे दाट गुच्छ डाहळ्यांच्या टोकांवर उभे होते. आणि खालीहि त्यांचा सडा पडला होता. त्यांचा मंद आणि जड गंध हवेंत दाटला होता. पलीकडे कृष्णा वाहत होती. त्याच्याहि पलीकडे पसरणीचा घाट आणि त्याच्यामागे डोंगर पसरले होते. नदीच्या तीरावरचे ते प्रचंड वृक्ष, डोंगरावरची गर्द झाडी आणि हिरवळ, नदीचा तो विस्तार! त्या सगळ्या दृश्याने आणि वातावरणाने शरीर आणि मन अंतर्बाह्य

प्रसन्न झालें. इतकें की ज्या पत्र्याच्या छपरावर माझा राग होता तशाच एका पत्र्याच्या छपरावर मी उभा होतों, इकडेहि माझें लक्ष गेलें नाही.

एका घराच्या अंगणांत शिरल्याबरोबर वरच्या बाजूला माडीच्या भिंतीवर गेरूने रंगलेल्या भुईवर पांढऱ्या रेषांनी काढलेलीं चित्रें होतीं त्यांनी नजर ओढून घेतली. वळणदार ठसठशीत रेषांनी काढलेल्या त्या चित्रांत एक मराठीपणा होता आणि चित्रामधली आकृतिरचनाहि लक्ष्य वेधून घेणारी होती. तीं चित्रें पाहिल्याबरोबर मला वऱ्हाडांत अकोटला सत्यनारायणाच्या मंदिराच्या प्रवेशद्वारावर, पुण्याला नानावाड्याच्या दिवाणखान्याच्या बाहेरच्या भिंतीवर आणि इतरहि अनेक ठिकाणीं पाहिलेल्या तशाच चित्रांची आठवण झाली. महाराष्ट्रीय रूपसौंदर्यांत जसा नाजुकपणापेक्षा रेखीव ठसठशीतपणाच अधिक प्रमाणांत दिसतो, तसेच या चित्रांतले स्त्री-पुरुष—विशेषतः स्त्रिया—रेखीव, ठसठशीत आणि भरदार होतीं. राजपूत किंवा मोंगल चित्रांतली तनुता त्यांत नव्हती. सबंध महाराष्ट्रांतल्या कितीतरी वाड्यांच्या भिंतीवर अशीं एकरंगी, अनेकरंगी चित्रें आहेत, त्यांचा अभ्यास करून महाराष्ट्राची स्वतःची अशी चित्रकलेची पद्धति-परंपरा होती कीं काय ह्याचा विचार कां होऊं नये?—असा तीं चित्रें पाहतांना माझ्या मनांत प्रश्न उभा राहिला.

वाईला त्या वेळीं एक सोमयाग चालला होता. आणि त्या सपशु अग्निष्टोमांत पांच बोकड मारले जायचे होते. त्यांपैकी एक मारला गेला होता. वाईसारख्या निव्वळ ब्राह्मणी गावांत जिथे मांस खाणाऱ्या जातींनाहि मांस मिळण्याची मारामार पडत असेल, तिथे खुद्द ब्राह्मणांनी यज्ञांत बोकड मारायचें ठरवलें, तें त्याची वपा मऊ, दुलदुलीत आणि रुचकर लागते म्हणून खास नव्हे. पुण्याच्या कोणा बाईने कांही द्रव्य यज्ञाप्रीत्यर्थ वाईच्या कांही ब्राह्मणांच्या स्वाधीन केलें होतें. तिला त्याचें पुण्य लाभावें आणि आपला सनातन वैदिकधर्म अद्यापि जिवंत आहे हें सिद्ध करून दाखवावें, म्हणूनच त्यांनी हें यज्ञकर्म आरंभलें असलें पाहिजे, ह्यांत शंका नाही.

ह्या पशूला तोंड दाबून बुक्यांचा मार कसा देतात; माणसाच्या ऐहिक आणि पारलौकिक इष्टसिद्धीसाठी देवांना तृप्त करण्याकरता आपली खास योजना झाली आहे हें न कळल्याने तो कदाचित् रडूं ओरडूं लागलाच तर त्याचें आक्रंदन

कानांवर पडूं नये म्हणून वाद्यांचा गजर कसा केला जातो; "नवा उ एता म्रियसे न रिष्यसि, देवां इदेषि पथिभिः सुगेमिः ।" इत्यादि शब्दांनी त्याचें सांत्वन कसें केलें जातें; नंतर त्याचीं वेगवेगळीं अंगें उचित अशा मंत्रोच्चारासहित कशीं कापलीं जातात; यांचें प्रात्यक्षिक खरोखर पाहण्यासारखें झालें असतें. आणि त्यासाठी आम्ही यज्ञस्थळीं गेलोंहि आणि पुष्कळ वेळ त्या पशुमारणाची प्रतीक्षाहि केली. पण आमची अश्रद्ध जिज्ञासा तृप्त व्हायची नव्हती.

वाई हें गाव ब्राह्मणांचें, म्हणून वाटलें की इथे विशेष स्वच्छता, टापटीप असेल. ती पाहावी म्हणून वस्तीच्या भागांत, बाजारपेठेंत वगैरे हिंडलों. पण मला रस्त्यांचा रेखीवपणा आणि काटकोनांत एकमेकांना ओलांडण्याचा गुण सोडला तर विशेष कांहींच दिसलें नाही. आणि हाहि गुण इतर कोणत्याच गावांत नाही असें नाही. खरूज-गजकर्णासारख्या शरिराच्या पृष्ठभागावर दिसणाऱ्या आणि इतर न दिसणाऱ्या रोगांच्या औषधांच्या जाहिराती भिंतीवर रंगवणें, रस्त्यावरच घाण करणें, पडक्या भिंतीचा आडोशासाठी उपयोग करणें, ह्या गोष्टी इतर गावांतल्यासारख्या वाईंतहि पाहिल्या. आणि थोडासा खट्टूच होऊन घाटांकडे निघालों. तिथे फरशीवरचा विष्णु आणि फरशीवरची लक्ष्मी ह्यांचीं मंदिरें पाहिलीं आणि मग मात्र वेगळेपणा जाणवला. दक्षिणेंतल्या किंवा उत्तरेकडल्या कांहीं मंदिरांतल्यासारखी कांही कलाकुसर किंवा भव्य प्रभावी शिल्पसौंदर्य यांत नाही. पण तिथलें काळ्या दगडाचें साधें पण रेखीव बांधकाम पाहून मन प्रसन्न झालें.

विष्णूचें आणि लक्ष्मीचें मंदिर पाहिल्यानंतर घाटावर आलों. कृष्णेच्या घाटालगतचें गणपतीचें देऊळ ही एक गंमत आहे. गाभारा आणि सभामंडप ह्यांना जोडणारा दरवाजा बंद होता. सबंध सभामंडपांत कातोड्यांनी आपल्या गाढवांसकट बिऱ्हाडें थाटलीं होतीं. त्यामुळे बाजूच्या दाराने गाभाऱ्यांत जावें लागलें. पूर्वी एकदा गणपतीला गोकर्णक्षेत्रीं गुराख्याचें (ब्राह्मण गुराख्याचें, कां कोण जाणे) सोंग घ्यावें लागलें होतें. त्या वेळीं त्याचा गाईशीं संबंध आला होता, पण गाढवांशीं आल्याचें ऐकिवांत नव्हतें. पण गायी काय आणि आपण काय, दोघेंहि एकाच (पशु) जातीचे! एवढ्या संबंधावर गाढवांनी गणपतीच्या घरांत निवारा मिळवला होता. त्याचप्रमाणे गणपतीच्या 'व्रातपति' ह्या पदवीच्या जोरावर त्याच्याशीं आपलें नातें जोडून कातोड्यांनी तिथे मुक्काम ठोकला

असावा! त्यामुळे बिचाऱ्या गणपतीला आपला कारभार आवरून गाभाऱ्यांत सामवावा लागला होता.

आणि अशा संकोचाने आतल्या आत राहणारा गणपति तरी लहान होता काय? मुळीच नाही. तो चांगला सात हात उंच आणि सहा हात रुंद असा अजस्त्र होता. ती मूर्ति पाहून माझी छातीच दडपली. गजाननाच्या कानाच्या वरच्या बाजूला दोन मोर आणि किरीटाच्या वरच्या बाजूला दोन पोपट कोरले आहेत. पण त्यांचें अस्तित्व त्याला जाणवतहि नसावें, इतकी त्यांचा नाजुकपणा आणि त्याचा भव्य विशालपणा ह्यांत विसंगति आहे. पण त्याहूनहि गमतीची विसंगति आहे ती त्याच्या वाहनाच्या बाबतींत. बसलें असतांना ज्या मूर्तीची उंची सात हात होते, तिचें वाहन निदान हत्तीएवढें तरी हवें. पण तें आहे सशाएवढें! बाकी एरव्हीहि गणपति आणि उंदीर यांचें परस्पर प्रमाण असेंच असतें. मात्र इथे सगळेंच मोठ्या प्रमाणांत असल्यामुळे ही विसंगति लक्षांत येते. किंवा कदाचित् असेंहि असेल की तो महागणपति आणि तो अल्पमूषक यांच्या रूपाने महिमा आणि अणिमा ह्या सिद्धी एकत्र नांदतांना दाखवल्या जाव्या.

गणपतीचें दर्शन घेतल्यानंतर वरती काशीविश्वेश्वराच्या मंदिरांत गेलों, तिथे साहजिकच पहिल्या प्रथम नंदीचें दर्शन झालें. काळ्या पाषाणाचा इतका रेखीव, प्रमाणबद्ध, घोटीव नंदी मी इतर कुठेंहि पाहिल्याचें आठवत नाही. दरबारी ऐटींत बसलेल्या ह्या नंदीची उंची तीन-चार फूट असेल. पाठीवर गोंडेदार झूल, गळ्यांत घंटा आणि घुंगरू, पायांत साखळ्या वगैरे साज घालून तो असा कांही सज्ज होऊन बसला आहे की, आंतून सूचना यायचा अवकाश की, "आज स्वारी अमुक ठिकाणीं जायची आहे" म्हणजे नुसतें उठून उभें राहण्याला काय वेळ लागेल तेवढाच. बाकी वाहनाकडून कांही खोटी नाही. पण ह्या भव्य नंदीवर ज्याने आरूढ व्हायचें त्या शंकराची पिंडी आहे जेमतेम वीत-दीड वीत उंचीची. एवढी ही लहान मूर्ति त्या नंदिकेश्वराच्या पाठीवर बसून जायची म्हणजे डाव्या-उजव्या बाजूंनी शृंगी-भृंगींनी त्याला सावरून धरायला हवें. गणपति आणि शंकर आणि त्यांचीं वाहनें ह्यांच्या आकाराच्या बाबतींतलें हें व्यस्त प्रमाण पाहून वाटतें, कोणी विनोदी माणसाने तर हीं प्रमाणें मुद्दाम ठेवलीं नसतील?

मंदिरांतून आम्ही बाहेर पडत होतों. एवढ्यांत एका गृहस्थाने विचारलें,

"तुम्ही गाभाऱ्याच्या भिंतींतली ती नागाची जाळी पाहिलीत का?"

“नाही!” आम्हीं म्हटलें.

“वा! म्हणजे जें मुख्य पाहायचें तेंच पाह्यलं नाहीत!”

म्हणून आम्ही पुन्हा आत जाऊन ती प्रसिद्ध जाळी पाहून घेतली. “वाईंत काय पाहिलेंत?” म्हणून कोणीं विचारलें तर “ती जाळी पाह्यची राहिली बुवा.” असें म्हणण्याची पाळी येऊं नये. गाभाऱ्याच्या दक्षिणेकडच्या भिंतींत एक नागयुग्म एकमेकांत अडकवून एक जाळी कोरलेली आहे. ह्या नागबंधाची रचना थोडी भूलभुलैयासारखी आहे, म्हणून ती कौतुकाचा विषय झाली आहे. अहमदाबादच्या सिद्दी सय्यद मशिदींतल्या खिडक्यांची नाजूक, जिवंत, प्रवाही रेषांनी साधलेली सुंदर जाळी ज्यांनी पाहिली असेल, त्यांना ही ताठर रेषांची लहानशीशी निर्जीव जाळी मुळीच कौतुकाची वाटणार नाही.

वाईंतलीं सगळीं देवळें इतकीं एकसांची दिसलीं की, अधिक पाहण्याची ऊर्मिहि वाटली नाही. गेल्या शे-दोनशे वर्षांतलीं महाराष्ट्रांतलीं कुठलींहि देवळें पाहिलीं तरी त्यांचा सांचा एकच दिसतो. भोप्यांच्या टोपीसारखीं सरळ निमुळतीं होत जाणारीं शिखरें, दिवाणखान्यासारखा सुरूंच्या खांबांचा मेहरपीदार कमानींचा सभामंडप. भक्कमपणा आणि रेखीवपणा हे दोनच गुण काय ते त्यांत दृष्टीस पडायचे! देवळाच्या बाह्यांगाला सौंदर्य देतां येतें हें महाराष्ट्रांतलीं दहाव्या, अकराव्या, बाराव्या शतकांतलीं किंवा दक्षिणेंतलीं देवळें पाहूनहि महाराष्ट्रियांना सुचलें नाही, की त्या काळांत वैभवाला चढलेल्या महाराष्ट्रियांना सौंदर्यदृष्टीच नव्हती?

ह्या देवळांच्या आंतला काळा दगडी भाग घोटून काढला असता तरी कंगोरे, कमानी आणि कोपरे ह्यांतून परावर्तित झालेल्या प्रकाशाने त्यांना एक वेगळें सौंदर्य दिलें असतें. ह्याची थोडीशी चुणुक सांगलींतल्या गणपतिमंदिराच्या ओटीवरच्या घोटीव काळ्या दगडाच्या कामावरून किंवा वाईंतल्याच काशी-विश्वेश्वराच्या नंदीवरून आणि पिंडीवरून येऊं शकते. नुसत्या करड्या खरबरीत पृष्ठभागावरून प्रकाश परावर्तित होणार कसा?

गुडघ्यापर्यंत वर ओचे खोचून, खांद्यावर धुण्याचे पिळे, कंबरेवर भरलेली घागर आणि हातांत कळशी घेतलेल्या स्त्रिया नदीकडून घाट चढत होत्या, तर कांही धुण्याची मोट आणि रिकाम्या घागरी-कळशा घेऊन घाट

उतरत होत्या. त्यांची रंगीबेरंगी चढउतर घाटांना जिवंतपणा देत होती. तरी पण एखाद्या विस्तृत दृश्याचा भाग म्हणून लांबून पाहतांना, उत्तर हिंदुस्थानांतल्या खेडवळ स्त्रियांच्या वस्त्रप्रावरणांतले काळे, तांबडे आणि पिवळे रंग जसे नजरेंत भरतात, तसे आपल्या महाराष्ट्रीय स्त्रियांचे भरत नाहीत. ह्या स्त्रियांप्रमाणेच कांही पुरुषहि घाट चढतांउतरतांना दिसत होते. त्यांच्याकडे पाहून मला आठवण झाली, भाऊशास्त्री लेले नदीवरून स्नान करून घरीं परत चालले म्हणजे चार पावलांवर दृष्टि रोखून चालत आणि चालतांना हातांतल्या पंचपात्रींतून रस्त्यावर पाणी शिंपडीत. तसे कुणी ब्राह्मण रस्त्यावर पाणी उडवीत चालले आहेत की काय म्हणून मी पाहूं लागलों. पण तसें कुणीच माझ्या दृष्टीस पडलें नाही. कदाचित् गेल्या तीस-पसतीस वर्षांत वाईतल्यासुद्धा लोकांच्या धर्मनिष्ठेंत शैथिल्य आलें असावें. किंवा सोमयाजी भाऊशास्त्र्यांनी आपल्या हयातींत जें प्रोक्षण करून ठेवलें, त्यामुळे वाईचे रस्ते कायमचे पुनीत झाले असावेत.

वाई हें ब्राह्मणांचें गाव आहे ही गोष्ट माझ्या मनांत इतकी भरून गेली होती की, रास्त्यांनी जरी धर्मपुरीपासून पश्चिमेकडे वाई वसवली-वाढवली असली तरी वाई हें रास्त्यांपेक्षा जुनें गाव आहे, तिथे एक वेळ मुसलमानांची सत्ता होती आणि वाईला एक मुसलमान नवाब आहेत हें मी विसरत होतों. शिवाजीची काळभेट घ्यायला चाललेल्या अफझुलखानाचा शेवटचा मुक्काम वाईत झाला ह्याचें मला विस्मरण झालें होतें. आणि त्याच्याहि आधी दोनशें वर्षें वाईला बेदरच्या बादशहाची शिबंदी असे आणि गोव्याच्या मोहिमेवर गेलेल्या महमूद गावानच्या कुमकेला वाईची ब्रहामनी बादशहाची फौज गेली होती, हें माझ्या ध्यानांतून निसटलें होतें. वाटेवरच्या एका ईदग्याने मला त्यांची आठवण करून दिली.

"मम त्वं गंगासि त्वमसि यमुना गौतमनदी।" असें जरी श्रीशंकराचार्यांनी कृष्णेचें गौरवून वर्णन केलें असलें आणि वाईला 'वैराजक्षेत्र' म्हणत असले, तरी कृष्णेला गोदावरीचें किंवा वाईला नाशिक-त्र्यंबकेश्वराचें माहात्म्य नाही. म्हणूनच बहुधा तिथे तुमच्या पितरांचा स्वर्गाचा प्रवास आणि निवास सुखाचा व्हावा म्हणून तुमच्याकडून दलाली घेऊन तुमचें काम करून देणाऱ्या क्षेत्रोपाध्यांचें बंड नाही. तसेंच तुमच्या अंतःकरणांतल्या किल्मिषाचें क्षालन व्हावें म्हणून तुमच्या डोक्याचें मुंडन करणाऱ्या नापितांचे तांडे नाहीत. म्हणूनच देवळाचे पुजारी व बुभुक्षित पंडे दिसत नाहीत आणि देवळांत

स्वच्छता, शांतताहि अधिक आहे. वाईचें मूळ नांव 'विराट नगर' म्हणतात. पण मला वाटतें, वाईचें मूळ नांव वापी असावें. वाई वेदविद्येची वापी आहे. वाई विद्वान् ब्राह्मणांचें गाव आहे. आज ती वापी तुडुंब भरलेली नसेल, पण सगळेच झरे अगदीच मेलेले नाहीत. कांही घरांतून तरी पूर्वीच्याच प्रणालिकें-तून वाहणारे प्राचीन विद्येचे झरे असतील. ह्या वापीचें जल निर्जीव होऊं नये, तातकूप म्हणून तिच्या संबंधी अंध अभिमान उत्पन्न होऊं नये, जागच्या जागीं फिरत राहणाऱ्या भोवऱ्याला प्रवाह समजण्याचा प्रमाद घडूं नये, याचीहि जाणीव वाईतच दिसून येते. म्हणूनच तर प्राज्ञपाठशाळेची स्थापना झाली.

वाईचा निरोप घेऊन कृष्णेंतल्या बांधावरून पैलतीराला आलों आणि परत वळून वाईकडे पाहिलें. नदीचा प्रवाह, विस्तीर्ण घाट, देवळें, घरें, झाडें, डोंगर ह्यांची दृष्टींत दाटी झाली होती. त्यांतच गणपतीच्या देवळाचें उंच शिखर ठळकपणे दिसत होतें. वाईचे लोक त्याला 'ढोल्या गणपति' म्हणतात. तें अर्थात् अनादराने नाही, तर आपलेपणाच्या हक्काने, प्रेमानें. मला त्याच्यावर आपलेपणाचा हक्क सांगतां येत नाही. पण ढोल्या गणपति जरी वाईकरांचा असला तरी गणपति हा देव सगळ्यांचाच आहे, आणि तो लहान-मोठा केवढ्याहि आकाराचा असला तरी उदाराशयच आहे. तरी पण 'अपरिचयात् अवज्ञा' ह्या न्यायाने मी त्याच्यासंबधी कांही अधिकआगळा विचार मनांत आणला असेल तर आपला म्हणून ठेवतों, "तन्मामवतु। अवतु माम्।"

# श्रीमूळपीठ आणि हेन्री मूर

आम्हीं 'कंपार्ट'चीं तिकिटें काढलीं होतीं. थोडेंसें ऐसपैस बसायला मिळावें अशी इच्छा होती. आणि शिवाय मागे 'हौद्यांत' बसणाऱ्या उतारूंपेक्षा आम्ही अधिक प्रतिष्ठित होतों. पण 'कंपार्ट'त बसल्यानंतर मात्र असें दिसून आलें की, आमच्या खिशांतून थोडेसे अधिक पैसे जाण्यापलीकडे आमच्या प्रतिष्ठितपणाचा आम्हांला कांही उपयोग झाला नाही. दीड वीत रुंदीच्या त्या बाकांवर फार तर चार-चार माणसें थोडींबहुत सोईने बसू शकलीं असतीं त्यांवर सहा-सहा दाबून बसवलीं होतीं. समोरासमोरच्या बाकांतलें अंतर इतकें कमी होतें की उतारूंचे गुडघे झिपच्या दात्यांसारखे एकमेकांत चपखल बसले होते, आणि त्यांवर दहा वर्षांपासून दोन वर्षांपर्यंतचीं मुलें हिंदकळत जा-ये करीत होतीं. आमची जागा आम्हांला दाखवून मोटरवाला जो निघून गेला तो पुन्हा दिसला नाही. दुपारचे साडेतीन-चार वाजले होते. ऊन रखरखलें होतें. पत्र्याची बॉडी तापली होती. आणि गुडघ्यांचा आणि कमरेचा असा कांही विलक्षण कोन झाला होता की सगळ्या अंगाला कळा लागल्या होत्या.

पण आमच्या आसपासच्या उतारूंना ह्या कष्टांची दादहि नव्हती. माझ्या उजव्या बाजूला एक पृथुपृथुल प्रौढा बसली होती. तिचें समोरच्या बाकावर बसलेल्या तिच्या प्रतिबिंबाशीं घरगुती बोलणें चाललें होतें. माझ्या समोर डाव्या बाजूला एक गोऱ्यापान रंगाचे पण खारकेसारखे वाळलेले वयस्कर गृहस्थ

आणि त्यांच्या शेजारी त्यांच्याच वयाचे पण टमाट्यासारखे रसरशीत त्यांचे स्नेही बसले होते. त्यांच्या डोक्यावरच्या रुमालांचे मूळचे शोभिवंत रंग आता एखाद्या दारिद्य आलेल्या घरंदाजासारखे चुण्यांच्या आत दडले होते. आणि तिथून चोरट्यासारखे आपल्या अस्तित्वाची लाचार साक्ष देत होते. अंगातल्या सदऱ्यांचा मूळचा पांढरा रंग रुमालांच्या मळकेपणाची साथ करीत होता. ते दोघेहि औंध दरबारांत चाकरीला असावेत असें त्यांच्या बोलण्यावरून दिसत होतें, आणि ते सरकारी चाकरींत असल्यामुळे राजेसाहेबांच्या शासनाधिकारांतला अल्पांश कां होईना, आपल्यांत उतरला असें त्यांना वाटत होतें. पूर्वी आपण एकदा एका इसमाला कसें 'पाणी' दाखवलें होतें याचें ते एकमेकांजवळ अहमहमिकेने वर्णन करीत होते. पण त्याबरोबरच विलीनीकरणानंतर राजेसाहेबांच्या अधिकाराबरोबर आपलेहि अधिकार गेल्यावर काय करायचें याची त्यांना पंचाईत पडल्याची चाहूलहि लागत होती. त्यांच्याकडे पाहून आणि त्यांची ती खास दरबारी चाकरीची भाषा ऐकून मला वाटलें, ह्यांच्या अंगांत ह्या मशीनवर शिवलेल्या सदऱ्यांऐवजी अंगरखे असते तर ते पंतप्रतिनिधींच्या फडावरून उठून पंतप्रधान पेशव्यांच्या फडावर, नाना फडणविसाच्या कचेरींत सहज जाऊन बसूं शकले असते. कुणी सांगावें, पंतप्रतिनिधींचें घराणें जसें शाहू महाराजांच्या कारकीर्दीच्या पूर्वीपासून—मधून मधून दत्तक घेत—चालत आलें, तशीं त्या कारकुनांचीं घराणींहि त्या वेळेपासून प्रतिनिधींची कारकुनी करीत आलीं असतील!

डाव्या हाताच्या तळव्यावर चुना-तंबाकू चोळीत चोळीत चाललेल्या त्यांच्या औंध दरबार-कचेरीच्या गप्पा रंगांत येत होत्या. तेवढ्यांत "चला, औंध वडूज जाणारे गाडींत बसा." अशी ललकारी आली. खट्-फट् करीत गाडीचीं दारें लागलीं, आणि खर्रर् खर्रर करून गाडी चालूं लागली. जरा अंतर गेल्यावर वळण घेऊन रहिमतपूर मागे टाकून औंधच्या रोखाने निघाली. रहिमतपूर कवि 'गिरीशां'चें गाव. तें जवळ येऊन मागे पडत चाललें तसें त्यांची 'शांतिस्थान' ही कविता आणि तींतल्या "समोर पूर्वेला अंभेरी। दक्षिण बाजू अफाट सारी" ह्या ओळी मला आठवल्या. पण बाहेर डोकें काढून पूर्व कोणती आणि दक्षिण कुठे आहे हें पाहणें लांबच राहिलें, त्यासाठी जागच्या जागेवर वळणेंहि शक्य नव्हतें. गाडी खरखरत खडखडत झपाट्याने चालली होती. उजव्या बाजूच्या पृथुपृथुल प्रौढेची दुलदुलीत मांडी डुळडुळल्यासारखी हालत होती. डावीकडे,

व्यंकटेश माडगूळकरांच्या गोष्टींतून बाहेर पडलेल्या पेहेलवानाची माणदेशी मांडी पोलादी धक्के देत होती. त्या दोघांच्या पकडींत आवळलेला मी तात्कालिक दुःख विसरण्यासाठी आणि शक्य तर आसपासच्या प्रदेशाचें चित्र मनांत साठवण्यासाठी माझी अवघडलेली मान एकदा इकडे आणि एकदा तिकडे फिरवीत रस्त्याचीं वळणें, दोहों बाजूंच्या डोंगरटेकड्या, त्यांतली खालाटी-वलाटी पाहत होतों. मनांत आलें, आज उन्हाळ्यामुळे जरी हें दृश्य करपट-काळसर झालें असलें तरी पाऊस पडून गेल्यावर मात्र "समोवार रानें हिरवळलीं, गंधानें शेतें दरवळलीं, जलें ओहळांतुनि खळखळलीं" अशी किमया झाल्यामुळे, नित्य परिचयाच्या तिथल्या रहिवाशाला जरी नाही, तरी परक्या पांथस्थाला रमणीय दिसत असेल.

खरखर खडखड करीत गाडी झपाट्याने चालली होती. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी, साने गुरुजींचा 'श्याम' त्याच वाटेने, बैलगाडींत बसून, शिकण्यासाठी म्हणून औंधाला गेला होता. वाटेंत त्याने गाडीवाल्याकडली चटणी-भाकरी खाल्ली होती. ब्राह्मणाच्या मुलाने गाडीवाल्याकडली चटणी-भाकरी खाल्ली, आणि हें 'अकर्म्य' तो करीत असतांना पृथ्वीच्या पोटांतून आगीचा लोळ उफाळून येऊन त्यांत तो भस्मसात् होऊं नये, ह्याचें औंधांतल्या त्याच्या नव्या शाळा-सोबत्यांना नवल वाटलें होतें. आज 'श्याम' एखाद्या महारा-मांगाच्या हातची चटणी-भाकरी खाऊन गेला तरी औंधांतल्या आजच्या मुलांनाच काय पण त्यांचे माझ्या समोरच्या सीटवर बसलेले जे अज्ञान-पालक प्रौढ पुरुष त्यांनाहि धक्का बसणार नाही कदाचित्. त्याच प्रवासांत 'श्याम'ची टोपी हरवली होती. त्यामुळे त्याला अपशकुन झाल्यासारखें, चुकल्यासारखें वाटत होतें. त्यांत पुन्हा औंधांत गेल्यावर 'श्याम'ला कळलें की, औंधाबाहेरच्या मुलांना मोफत बोर्डिंग बंद झालें होतें. ह्या आणि अशा अनेक गोष्टींमुळे 'श्याम'चें अंतःकरण मणाचें ओझें लादल्यासारखें जड होऊन गेलें. वाटेंतल्या कोणत्या विहिरीवर बसून 'श्याम'ने गाडीवाल्याकडली चटणी-भाकरी खाल्ली असेल? त्याची टोपी कुठे सांडली असेल? त्याला औंधांत मोर दिसले तसे आपल्याला दिसतील काय? पोहायला येत नसतांना तो ज्या तळ्यांत उतरला तें औंधांतलें तळें किती मोठें असेल?—असें कांही तरी मी आपल्याशींच विचारीत होतों. गाडीची खडखड खरखर झपाट्याने चालली होती.

तेवढ्यांत माझ्या शेजारची पृथुपृथुल प्रौढा उद्गारली, "मूळपीठ दिसू

लागलं." आणि आपल्या मांडीवरच्या दोन वर्षांच्या मुलाला तिने सांगितलें, "आता घर येईल हं." आणि मांड्या घुसळल्यासारख्या हलवून पुन्हां नीट बसवल्या. माडगुळकरांच्या गोष्टींतल्या त्या पेहेलवानाची माणदेशी मांडीहि हलली. आणि समोरचे औंध दरबारचे कारकून आपलीं रुमालाचीं टोकें नीट खोचूं लागले. 'मूळपीठ दिसूं लागलं,' ह्या एका साध्या वाक्याचे हे विविध व्यंग्यार्थ माझ्या लक्षांत यायला थोडासा वेळ लागला. "आजपासून तुम्ही रोज औंधास येण्याचें कारण नाही. आम्हीच तुमचे गावास येतों." असें आश्वासन देऊन जिने त्रिंबकपंत कुळकर्ण्यांचा रोज किन्हईहून औंधास सोळा-सतरा मैल केवळ दर्शनासाठी येण्याचा त्रास वाचवला त्याच मूळपीठ देवीचें, औंधकरांच्या कुलदैवताचें, तें शिखर होतें. औंध जवळ येत चाललें होतें.

"तुम्हांला कुणाकडे जायचं?" दरबार कारकुनांपैकी एकाने आम्हांला विचारलें. अनोळखी माणसाशीं एकदम बोलणें हें पाश्चात्यांकडून आपण घेतलेल्या शिष्टाचाराला अशिष्ट वाटतें. पण आपल्याकडल्या सर्वसामान्य प्रवाश्यांची 'चांभारचौकशी' करण्याची ही पद्धति खरोखर प्रवासांत पुष्कळदा उपकारक ठरते. कुठे जायचें तें आम्हीं सांगितल्यावर ते म्हणाले, "स्टँडच्या जवळच आहे तुमचं ठिकाण. नात्यांतले आहेत वाटतं? मूळपीठीला आलां असाल दर्शनाला?"

कशासाठी चाललों होतों औंधाला? मूळपीठीच्या दर्शनासाठी कांही खास नव्हे. औंधाला जाण्याचा बेतहि नव्हता. औंधासंबंधी एक सूक्ष्म-मंद कुतूहल नव्हतें असें मात्र नाही. उत्तरेकडे बडोदें आणि दक्षिणेकडे म्हैसूर ह्यांच्या धर्तीवर, प्रजेसंबंधी आपलीं कांही कर्तव्यें आहेत याची जाणीव ठेवून वागणारे औंधचे राजेसाहेब हे ह्या भागांत एकटेच एक म्हणायला हरकत नाही. रेसकोर्सवर घोडे आणि दिवाणखान्यांत गालिच्यांवर कंचन्या नाचवण्याचा शौक करण्याऐवजी, विद्या-कलांना उत्तेजन देणें हा त्यांनी आपला शौक केला होता. संस्थानच्या सामर्थ्याप्रमाणे त्यांनी आपण होऊन प्रजाहिताचीं कामें केलीं होतीं. संस्थानांत सर्वत्र सक्तीचें मोफत शिक्षण जारी केलें होतें. प्रजेला राज्याचे अधिकार दिले होते. कारखाने काढण्याला सवलती दिल्या होत्या. त्यांचें कीर्तन-गायन सानेगुरुजींच्या 'श्याम'ला आवडलें नाही; त्यांचीं रामायण-महाभारताचीं चित्रें तुम्हाआम्हांला निर्जीव ठोकळेवजा वाटतात. तरी पण त्यामागलें, सूर्याकडे सूर्यफूल वळावें तसें सुसंस्कारांकडे वळणारें मन डोकावल्यावाचून राहत नाही. राजेसाहेबांच्या ह्या उद्योग-प्रवृत्तींमुळे त्यांच्या संस्थानाने मनामध्ये एक कोपरा

राजेसाहेबांचें घराणें, त्यांच्या भावांचें आणि पुतण्यांचें चरित्र आणि चारित्र्य, वाड्यांतच त्यांचें वेगळें बिऱ्हाड करून राहणें, तें वाडा सोडून रातोरात निघणें, तें राममंदिर, तें नांदोशी गाव, हीं सगळीं मनाच्या पडद्यावर कमीअधिक ठळकपणें येरझारा करीत होतीं. पण त्यासाठीहि औंधला जायचें मनांत आलें नसतें. औंधच्या राजेसाहेबांनी संग्रहालय तयार केलें आहे तें न पाहतां जाणें म्हणजे ह्या भागांतल्या प्रवासांत उणीव ठेवण्यासारखें होईल, अनेक वर्षें हजारो रुपये खर्चून त्यांनी हा संग्रह जमवला आहे; आणि त्यांतहि कलाकृतींचे नमुने विशेष बघण्यासारखे आहेत, असें कळल्यामुळे तिथें जायचें ठरवलें होतें.

•

आठशे फूट उंचीच्या त्या मूळपीठाच्या डोंगराच्या साडेचारशे पायऱ्या चढतांना पायांत गोळे आले. चढण सोपी व्हावी म्हणून राजेसाहेबांनी पायऱ्या फार सोयिस्कर बांधवल्या आहेत. आणि चढण कंटाळवाणी होऊं नये, चढणीचा मार्ग सुशोभित व्हावा, म्हणून वाटेवर मधूनमधून दुतर्फा वाघ, सिंह, हत्ती, नारद–तुंबरु ह्यांचे आरसपानी पुतळे उभारले आहेत. प्रत्येक वेळीं ते पाहण्यासाठी थबकल्यामुळे आमच्यासारख्या नवख्यांचा तरी शीण बराच कमी होत असेल यांत शंका नाही.

देवळाच्या तटावर चढून चौफेर नजर टाकली तेव्हा मात्र चढण्याच्या श्रमाचें सार्थक झाल्यासारखें वाटलें. भोवतालच्या पांचपंचवीस मैलांतल्या डोंगर-दऱ्या-सपाटी ह्यामुळे उंचसखल झालेल्या भूप्रदेशाला रमणीयता आली आहे, ती पावसाळ्यांत आणि शरदृतूंत खरोखर नजर वेधून घेत असेल. महाराष्ट्र कसा खडकाळ आणि सुपीक, कठोर आणि मृदु, सुशोभित आणि उघडाबोडका आहे तें अशा एखाद्या गिरिशिखरावर उभें राहिलें म्हणजे एका दृष्टिक्षेपांत मनावर ठसतें.

संग्रहालयाच्या आंत गेल्याबरोबर काचेच्या कौलांचें छप्पर घातलेला चौक लागतो, त्यांत प्राचीन ग्रीक आणि परंपरागत यूरोपियन पद्धतीने तयार केलेले पंचरसाचे आणि इतर धातूंचे आणि पाषाणाचे अनेक लहानमोठे पुतळे आहेत. त्यांत ग्रीक देव-देवतांच्या शेजारींच यूरोपियन मुत्सद्दी आणि योद्धे आहेत; मत्स्यकन्या आणि नागकन्या आहेत; पशु-प्राणी आहेत; तसेंच, केवळ शोभेच्या मूर्ति आहेत. इथून वेगवेगळ्या दालनांत जुन्या-नव्या शस्त्रांचे, हस्तिदंत, चंदन, पितळ, चांदी इत्यादि वस्तूंच्या केलेल्या कलाकौशल्यकृतींचे, देशीविदेशी नमुने

आहेत. एका भिंतीवर रशियन अस्वलाचें—ध्वन्यर्थानें नव्हे—दहाबारा फूट लांबीचें धाबळीसारखें पांढरेंशुभ्र कातडें टांगलें आहे. रशियन अस्वल किती अजस्र असतें ह्याची नुसत्या चित्रावरून कल्पना येत नाही, ती हें कातडें प्रत्यक्ष पाहिल्यावर येते.

तथापि ह्या संग्रहालयांतला महत्त्वाचा भाग म्हणजे चित्रें. नावाजलेल्या यूरोपियन चित्रांच्या नकला, आणि कांही मूळ चित्रें तिथे पाहायला मिळतात. आपल्याकडल्या चित्रकारांपैकी त्रिनदाद, मूलर, हळदणकर, बाबूराव पेंटर, धुरंधर, केतकर ह्यांसारख्या जुन्या चित्रकारांच्या चार-चार पांच-पांच कृति आणि खुद्द चित्रकाराचें एक चित्र, अशीं व्यवस्थित लावलेलीं आहेत. प्रत्येकाचीं चित्रें एकत्र लावलेलीं असल्यामुळे प्रत्येकाचें वैशिष्ट्य, कौशल्य—अणि अकौशल्यहि—चटकन् पाहायला मिळतें. आणि ह्या सर्वांच्या कृति एकमेका-शेजारीं असल्यामुळे त्यांची तुलनाहि सहजच होते.

पाश्चात्य पद्धतीच्या ह्या चित्रांप्रमाणेच चिनी, जपानी, प्राचीन भारतीय आणि आधुनिक भारतीय पद्धतींचींहि चित्रें आहेत. औंधच्या राजेसाहेबांच्या सर्व-संग्राहक वृत्तींतहि चित्रांना प्राधान्य आहे ही गोष्ट या संग्रहांत ठळकपणें दिसते. प्राचीन आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या संग्रहांत प्रतिनिधि घराण्यांतील व्यक्तींचीं चित्रें, कांही कागदपत्र, सनदा वगैरे आहेत.

संग्रहालय पाहत असतांना एक नवीन ठिकाण, आणि एका व्यक्तीची हौस पाहिल्याचें समाधान मनाला वाटत होतें, पण संग्रहालय मनांत ठसेलसें करणारी वस्तु कुठे दिसली नाही. संग्रहालय पाहायचें जवळजवळ संपत आलें होतें. मला वाटतें, आम्ही शेवटच्या दालनांत असूं. त्यांतला प्रचंड लामणदिवा, चित्रविचित्र आकाराच्या जुन्या देवादिकांच्या मूर्ति, वगैरे वगैरे वस्तू कांही पाहत आणि कांही पाहिल्याशा करीत एक-एक पाऊल टाकीत, अशा ठिकाणीं साधारणपणें चालतात त्या चालीने चाललों होतों. इतक्यांत कुणीं तरी मागून बाही धरून ओढावें तसें मला वाटलें आणि मी मागे वळलों. एका उंच लाकडी ठेवणीवर एक पांढरट रंगाची पाषाणाची मूर्ति होती आणि तिच्याखाली, 'Mother and Child'—Henry Moore अशी टाइप केलेल्या अक्षरांची चिठी होती.

आठ-दहा इंचांची मूर्ति असेल. लौकिक अर्थानें ज्याला आपण सौंदर्य म्हणतों तें, अवयवांच्या यथाप्रमाण आणि यथास्थान रचनेचें सौंदर्य तींत नव्हतें. डोकें, हात, पाय यांची ठेवण आणि बैठक सोडली तर वास्तवाची नक्कल तींत कुठेहि

नव्हती. अंगावरलीं प्रावरणें आणि अवयवांची भिन्नता दाखवण्यासाठी कांही रेषा कोरलेल्या, उंची-सखलता आणलेली, डोळे नाक दाखवण्यासाठी दगडांत नुसतीं भोकें पाडलेलीं; पण दगडाचा दगडपणा न जाऊं देतां त्यांत माणुसकी ओतली होती. तीं 'मदर अँड चाइल्ड' मेरी आणि बाळ येशू असेल, यशोदा आणि कृष्ण असेल, कौसल्या आणि राम असेल, जगाची जननी आदिशक्ति आणि तिचें बाळ हें जग असेल, किंवा तुमची आमची सर्वांची आई आणि तिचें बाळ असेल! मातृत्वाचा गौरव आणि ओझें, त्याचा आनंद आणि त्याची व्यथा, त्याची असहायता आणि त्याचा अभिमान हीं सगळीं तींत दिसत होतीं. ती आई कोणत्याहि बाईसारखी किंवा मूल कोणत्याहि मुलासारखें दिसत नाही. पण ज्या तऱ्हेने तें मूल तिने घेतलें आहे त्यांतच तिचें आणि त्याचें नातें व्यक्त झालें आहे.

एप्स्टाइन, ब्रांकुसी, एरिक गिल ह्यांसारख्या, परंपरा मोडणाऱ्या, स्वतंत्र प्रवृत्तीच्या, इंग्लंडमधल्या आजच्या अग्रगण्य शिल्पकाराची ही कृति तिच्याशीं विसंगत अशा परिवारांत ठेवल्यामुळे तिकडे बहुधा लक्ष जात नाही. आणि माझेंहि जात नव्हतें. पण माझ्या मनानेच माझ्या मनाची बाही ओढली म्हणून गेलें आणि औंधाचा संग्रह पाहिल्याचें सार्थक झालेसें वाटलें.

संग्रहालयाच्या इमारतीच्या बाहेरच्या आवारांत सुंदर रेखलेली बाग आहे आणि तींत राजेसाहेबांनी स्थानिक कारागिरांकडून करून घेतलेले आरसपानी पुतळे आहेत. त्यांत बालगंधर्वांचा ऐन उत्कर्षाच्या काळांतला स्त्री-वेषांतला एक पुतळा आहे, आणि वर्षाच्या सहा ऋतूंच्या निदर्शक अशा सहा पुतळ्या आहेत. त्या राजेसाहेबांच्या मुली-नातींवरून केलेल्या आहेत असें कळलें. अस्सल जुन्या पद्धतीची खानदानी मराठी स्त्रियांची वेषभूषा आता शहरांतच काय पण लहान-सान गावांत, आणि घरंदाज घराण्यांतहि दुर्लभदर्शन होत चालली आहे. ती ह्या पुतळ्यांच्या रूपाने टिकवून ठेवल्याबद्दल मनांतल्या मनांत राजेसाहेबांना धन्यवाद दिल्यावाचून राहवलें नाही.

औंध गाव इतकें लहान आणि रस्त्यांवर वर्दळ इतकी कमी आहे की वाटेंत दहपंधरा माणसेंहि भेटलीं नाहींत. प्रचंड वृक्षांखालचा मोटरतळ, आणि त्यापुढचीं रस्त्यावर बसलेलीं दोनतीन दुकानें मागे टाकून गावांत शिरत असतांनाच डावीकडे 'स्वाध्याय मण्डला'चें आवार लागलें. 'स्वाध्याय मण्डल,

औंध, जिल्हा सातारा' हा पत्ता अनेक वर्षें मनांत इतका पक्का ठसला होता की त्यांत कांही बदल कधी होईल अशी कल्पनाहि कोणीं केली नसती. पण तीस जानेवारी १९४८ नंतर दक्षिग महाराष्ट्रांत ज्या अनर्थावह उलथापालथी झाल्या त्यानंतर स्वाध्याय मण्डल औंधाहून हालून पार्डी, जिल्हा सुरत ह्या ठिकाणीं गेलें! आणि आता औंधाची स्वाध्याय मंडळाची जागा, गर काढून घेऊन फेकून दिलेल्या टरफलासारखी, पोकळ आणि निस्सत्त्व दिसते आहे.

वाटेंतच गावांतलें मोठें तळें लागलें. पोहायला येत नसतांना साने गुरुजींचा 'श्याम' ह्याच तळयांत उतरला होता आणि आपल्याला पोहतां येत नाही ह्याची त्याला लाज वाटली होती. आठवड्यांतून एकदाच, बाजाराच्या दिवशीं चालणारी पिठाची गिरणी पाहिली. ह्याच गिरणींत काम करणारा तुकाराम 'श्याम'ला खाली पडलेलें पीठ सावडून भाकरी करण्यासाठी आणून देत असे. पण सांडलेलें पीठ झालें तरी दुसऱ्याचेंच, तें घेणें त्याला आवडलें नाही आणि त्याने उपास काढण्याचे आणि उकडलेल्या शेंगा खाऊन पोट भरण्याचे प्रयोग केले. वाड्या-शेजारी आल्यांवर हायस्कूल पाहिलें. राहायला जागा नाही म्हणून ह्याच हाय-स्कूलच्या एका वर्गात 'श्याम' रात्रीच्या वेळीं निजत असे. तो पुढे मसजिदीजवळ ज्या खोलींत राहायला गेला ती खोली, त्याला भाकरी करून देणारी त्याची शेजारीण धुरपदीची आई, मसजिदींतला मुसलमान मुलगा मुजावर, ज्या झऱ्यावर तो आंघोळीला जाई तो झरा, आणि तिथे गेल्यावर खरकटीं भांडीं झऱ्यांत बुडवून तें पाणी घाणेरडें कसें करूं म्हणून बादलींत भांडीं घालून कष्टी होऊन तो ज्या जागीं बसत असेल ती जागा,—ह्यांची कोणी माहिती देईल काय असें मनांत आलें. औंधच्या राजेसाहेबांच्या आत्मचरित्राने औंधबद्दलचें जितकें कुतूहल माझ्या मनांत जागें केलें होतें तितकेंच साने गुरुजींच्या कादंबरीने केलें होतें. औंधांतील हीं स्थळें आणि माणसें जणू ओळखीचीं झालीं होतीं. पण तशी माहिती मला कोण देणार? म्हणून आपल्या मनाशींच प्रश्न विचारीत वाड्याच्या पटांगणांत शिरलों.

राजेसाहेबांच्या आत्मचरित्रांत पानापानावर डोकें वर काढणारा राजवाडा तो हाच. राजकुटुंबांतल्या माणसांनाहि सामान्य माणसांचीं, किंबहुना त्यांहूनहि वाईट दुःखें भोगावीं लागतात हें त्यांना ह्याच वाड्याने दाखविलें. गैरहजर माणसांच्या खोलीचीं कुलपें तोडणें, नात्यांतल्या माणसांचें दूध तोडणें, त्यांना स्नानाला पाणी मिळूं न देणें, गुपचूपपणें सामानाचे पेटारे भरून पहाटेच्या अंधारांत गाव सोडून जावें लागणें हें सर्व त्यांना ह्या वाड्याने दाखवलें. तिथेंच ते पुढे राजे

होऊन आले. वाडा समोर दिसतांच मनांत गर्दी करून आलेल्या ह्या आठवणी बाजूला सारीत मी यमाईच्या देवळांत गेलों.

वरच्या मजल्यावर ग्रंथालय आहे. खूप मोठें आहे. त्यांत अनेक जुने दुर्मिळ ग्रंथ आहेत. कलाविषयक ग्रंथांचा तर विशेष आस्थेने केलेला संग्रह आहे. आणि तें साहजिक आहे. पण मनांत आलें, गरज पडेल आणि फुरसत सापडेल त्याप्रमाणे राजेसाहेब किंवा कांही सुशिक्षित अधिकारीच ह्या ग्रंथांचा अल्पस्वल्प परामर्श घेऊं शकत असतील, एरव्ही बहुतेक ग्रंथ बहुतेक वेळ, बोलकें करणाऱ्याची प्रतीक्षा करीत तोंडें मिटून आपल्या जागीं पडून असतील,—आहेतच.

देवळाच्या आवारांत एक सुंदर दीपमाळ आहे. धर्मांध आणि कलाद्वेष्टा समजला गेलेल्या औरंगजेबाने देऊळ उध्वस्त करण्याचें फर्मान सोडलें, पण साठ फूट उंचीच्या आणि पावणेदोनशे दीपासनें असलेल्या त्या दीपमाळेला हात न लावण्याची ताकीद दिली. ही आख्यायिका खरी असो वा नसो, दीपमाळ उभी आहे खरी.

औंधाचा मुक्काम संपला. बस रहिमतपूरकडे चालली. मूळपीठाच्या मंदिराचें शिखर आणि संग्रहालय पाहतां पाहतां मागे पडत चाललीं. आता विलीनीकरणा-नंतर मुंबईसरकार संग्रहालयाचें काय करणार आहे? औंध नमुनेदार करण्याच्या हौशीने, वर्षानुवर्षें द्रव्य वेचून, राजेसाहेबांनी केलेला हा वस्तुसंग्रह मुंबईच्या आणि इतर ठिकाणच्या संग्रहालयांतून विखरून टाकला तर समुद्रांत ओतलेल्या चार घागरी पाण्यासारख्या त्या वस्तु विरून अदृश्य होऊन जातील. तें तिथेंच ठेवलें, वाढवलें, भोवतालच्या शेपन्नास मैलांतले विद्यार्थी मधूनमधून तिथे येतीलसें केलें, तर तें त्या भागाचें आतासारखेंच भूषण आणि आकर्षण होऊन राहील.

औंध मागे पडत चाललें, पडलें. पण मूळपीठाचें शिखर आणि हेन्री मूरचें 'मदर अँड चाइल्ड' ह्यांच्या आठवणी मात्र मनांत रेंगाळत राहिल्या. त्या अजून रेंगाळताहेत.

■ ■

# कऱ्हाडनगरी कृष्णातीरीं

“ किति विशाल तट हे अहा!” असें ज्यांचें कवि माधवानुजांनी कौतुकाने वर्णन केलें आहे ते तट पाहत उभा होतों. तटाची विशालता विशेष जाणवली नाही. भेडाघाटला नर्मदेच्या तटाची जी भव्यता आणि भीषणता आहे, ती तर नाहीच जाणवली. पण खाली नरसोबाच्या वाडीला कृष्णापंचगंगा-संगमाजवळ जी विशालता आहे तीहि इथे नाही. पलीकडच्या तटावर तर नुसतीं शेतेंच आहेत. संगमाशेजारच्या किल्ल्याकडल्या तटाला मात्र ‘विशाल’ हें विशेषण कदाचित् लावतां येईल. आणि किल्ल्याच्या माण दरवाज्याकडून वाळवंटाकडे संगमेश्वराच्या देवळाशेजारीं उतरूं लागलें म्हणजे ही विशालता थोडीशी जाणवते, आणि वेळ तिन्हीसांजेची असली तर त्या जाणिवेंत थोडीशी भीतिहि मिसळते.

आधी दोन नद्यांचा संगम हीच कौतुकाची गोष्ट. त्यांत त्या एकमेकींच्या अगदी समोरून येऊन एकमेकींना भेटल्या आणि त्यांचा प्रीतिसंगम झाला म्हणजे तर त्याला विशेष अपूर्वाई येते. म्हणूनच कऱ्हाडच्या कृष्णा–कोयनांच्या संगमाचें महत्त्व. पावसाळ्यांत जेव्हा त्या दोघी फोफावत येऊन एकमेकींवर आदळून एकमेकींत घुसत असतील तेव्हाचें संगमाचें दृश्य खरोखरच विलोभनीय असेल. एरव्ही त्या आपल्या दोहोंकडल्या शेतांच्या मधून गाजावाजा न करतां येतात. आणि एकमेकींत मिसळून पुढली वाट चालूं लागतात.

तांबूस काळसर खड्यांनी आणि जाड वाळूने भरलेलें वाळवंटहि विस्तीर्ण असलें तरी विशेष आकर्षक नाही. आणि हरिद्वारला जसें गंगामाईचें मंदिर गंगेच्या प्रवाहांत आहे तसें हिच्या पात्रांत कृष्णामाईचें मंदिरहि नाही. जें आहे तें छोटेंसें, एखाद्या घरासारखें दिसणारें, घाटाच्या वरच्या बाजूला, रस्त्याच्या शेजारीं आहे. पावसाळ्यांत कृष्णाबाई वरपर्यंत अगदी जवळ येते, आणि उन्हाळ्यांत आपल्याला तिच्यापर्यंत जातां येतें. अशी ती सदैव साक्षात् प्राप्य असतांना पुन्हा तिचें मंदिर कशाला?

कऱ्हाड कांही वाईसारखें आखीव-रेखीव गाव दिसलें नाही. वाईसारखे कृष्णेला तिथे प्रशस्त आणि प्रचंड घाट नाहीत किंवा वाईसारखीं तिथे सुंदर भव्य मंदिरें नाहीत. मोठमोठे वाडे मात्र आहेत. सरदार मुतालिकांच्या वाड्या-सारख्या एखाद्या वाड्याचा, किल्ल्याच्या दरवाज्यासारखा प्रचंड दरवाजा मध्येच लक्ष वेधून घेतो. त्यांच्याकडे पाहत पाहत, त्यांच्यामधून वेडींवाकडीं वळणें घेत जाणाऱ्या आणि वाड्यांच्या सोयीप्रमाणे कुठे तरी एकमेकांना ओलांडणाऱ्या रस्त्यांनी गावांतून एक फेरी मारली की "बस्स झालं!" असें वाटतें.

थोडेसें आश्चर्य आहे. कारण कऱ्हाड हें तसें सामान्य गाव नव्हे. पांच-सात ठिकाणचे पांच-सात रस्ते ज्या गावाला येऊन मिळतात त्याचें महत्त्व पंचगंगासंगमासारखेंच समजायला पाहिजे. जवळजवळ दोन हजार वर्षांपूर्वी कऱ्हाडचे व्यापारी लांबलांब जातात, जबलपूरकडच्या एका शिलालेखांत आपलें दान नोंदतात, बौद्ध लोक त्याच्या आसपास पांच-पंचवीस लेणीं खोदतात, शेलारांचें घराणें तें आपलें राजधानीचें गाव करतात, तें उगीच नव्हे. अलीकडच्या मुसलमानांच्या आणि मराठ्यांच्या इतिहासांतदेखील तें महत्त्वाचें ठाणें होतें आणि आजदेखील तिथली बाजारपेठ खूप गजबजलेली आहे. तरी पण दोन नद्यांच्या प्रीतिसंगमावरच्या या गावाला कांही रंग-रूप, विस्तार-शोभा, दिसत नाही.

आणि मग मला वाटलें, 'खोडशीचें धरण', 'अगाशिवाचीं लेणीं', 'जखीणवाडी', 'नकट्या रवळ्याची विहीर' अशीं हेंगाडीं नांवें ज्या गावांतल्या किंवा त्याच्या आसपासच्या ठिकाणांना दिलीं जातात, जिथल्या रुचकर वांग्यांनासुद्धा 'गोट्याचीं वांगीं' म्हणतात, जिथलें पाहण्यासारखें नावाजलेलें एकमेव ठिकाण म्हणजे मशीद आणि त्या 'प्रसिद्ध' मशिदीचे 'प्रेक्षणीय' मनोरे जिथे इतर मशिदींतल्या मनोऱ्यांसारखे योग्य जागीं उभे न राहतां एका बाजूला तोंड आणि दुसऱ्या बाजूला शिंगें असे वेड्यासारखे उभे राहतात, त्या गावाला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक ३०९८९ दि. ...

रेखीवपणा, रंगरूप, नसेल तर नवल नाही. अर्थात् ते मनोरे, त्यांच्या शेजारचं मुसाफरखाना, हमामखाना हींच पाहून कऱ्हाड पाहिल्याचें समाधान मानायचें असलें तर गोष्ट वेगळी.

पण मी तेवढ्यासाठी कऱ्हाडला गेलों नव्हतों. त्यांचें मला आकर्षण नव्हतें असें नाही. पण कऱ्हाडसंबंधी मला आकर्षण होतें तें आगरकरांचें लहानपण जिथे गेलें तें गांव म्हणून. जिथे त्यांचें लहानपण गेलें, जिथे त्यांचें प्रारंभीचें शिक्षण झालें, जिथून पुढल्या शिक्षणासाठी ते दीडशें मैलांवरच्या रत्नागिरीला पायीं गेले आणि तिथे निराश होऊन जिथे ते पुन्हा परत आले, जिथे त्यांनी मुन्सफ कोर्टांत नकलनवीसाचें काम केलें आणि जिथल्या दवाखान्यांत औषधें घोटलीं तें गाव पाहावें, तिथे त्यांच्या आठवणी जाग्या ठेवण्यासाठी कांही केलें असेल तर बघावें म्हणून मी तिथे गेलों होतों. कऱ्हाडांत त्यांच्या आठवणी जाग्या ठेवणारें कांही तरी असलेंच पाहिजे ही माझी समजूत. पण माझी निराशाच झाली. जिथे आपल्या मामांकडे त्यांचें लहानपण गेलें, तें घर अजून कऱ्हाडांत आहे. पण तें त्यांच्या मामांच्या घराण्याकडे नाही. (त्यांच्या मामांच्या घराण्याचें आता कऱ्हाडांत कांहीच नाही.) आणि त्या वेळचें म्हणून तें आता कदाचित् ओळखूंहि येणार नाही. आणखी कांही वर्षांनंतर खुद्द कऱ्हाडच्या लोकांना आगरकरांचा आणि कऱ्हाडचा कांही संबंध होता ह्या गोष्टीचा (त्यांचे किंवा त्यांच्यासंबंधीचे लेख शालेय क्रमिक पुस्तकांत आले नाहीत तर) विसर पडेल कीं काय असें मला वाटतें. आजच स्थिति अशी आहे की, आगरकर लहानपणीं कुठे राहत होते हें नक्की सांगूं शकणारीं माणसें भेटलीं तर चारदोनच भेटतील.

महाराष्ट्रांत आज जर कांही विचारजागृति असेल, कांही बुद्धिप्रामाण्य असेल, कांही बाणेदारपणा, स्वतंत्रपणा असेल, तर त्यांचें बरेंचसें श्रेय आगरकरांना आहे असें जरी पुष्कळांना वाटत असलें, तरी स्मारक वगैरेंच्या दृष्टीने पाहतां आगरकर एकंदरींत विक्षितच. मोठ्या पगाराची चालून आलेली नोकरी लाथाडणारा आणि लोकप्रियता मिळवून देणारें पुढारीपण न करतां लोकांचा रोष आणि क्षोभ ओढवून घेणारीं मतें बोलणारा मनुष्य स्मारकाला कसा पात्र होईल ?

आणि ज्या लोकांवर त्यांनी निर्घृणपणे कोरडे ओढले, त्यांच्या अंधश्रद्धेचे, बावळटपणाचे, बुरसटपणाचे वाभाडे काढले, त्यांनी त्यांची आठवण काय म्हणून आदराने काढावी ? आणि त्यांचा सगळा संताप, सगळा आवेश आणि सगळा प्रचार समाजासंबंधीच्या प्रेमांतून, लोकांनी आपली उन्नति आणि सुधारणा

करून घ्यावी ह्या पोडतिडिकेंतून, एक प्रकारच्या प्रखर ध्येयनिष्ठेंतून निर्माण झाला होता ह्याची तरी जाणीव त्यांनी काय म्हणून ठेवावी ?

वास्तविक कऱ्हाडांत आगरकरांचें एखादें चांगलें स्मारक व्हायला पाहिजे. स्मारक म्हणजे एखादी शाळा किंवा वाचनालय नव्हे. त्यांच्या ग्रंथांच्या प्रथमावृत्त्या, 'सुधारका'चे अंक, त्यांचीं हस्तलिखितें, त्यांच्या वापरांतल्या इतर वस्तु, जें मिळणें शक्य असेल तें शोधून मिळवून त्यांच्या चरित्राचीं साधनें एकत्र करून एखाद्या ठिकाणीं ठेवलीं गेलीं, त्यालाच जोडून एखादें चांगलें ग्रंथालय, अभ्यासमंडळ काढलें, तर त्यांची स्मृति चांगल्या प्रकारें जागृत राहील आणि ही गोष्ट करणें महाराष्ट्रांतल्या त्यांच्या चाहत्यांना कठीण जाऊं नये.

कऱ्हाडसंबंधी दुसरें कुतूहल मला संत सखूबद्दलचें होतें.

सखूचें सासर म्हणजे सासुरवासाचें मूर्तिमंत उदाहरण. ती जर विठ्ठलाची भक्त नसती आणि तिला पंढरपुरला जाण्याची तळमळ नसती, तर केवळ तिला सासुरवासांतून सोडवण्याकरता म्हणून विठ्ठलाने कांही केलें असतें की नाही ह्याची शंकाच आहे. आणि त्याने तो अद्‌भुत चमत्कार केला नसता तर तिचा सासुरवास टळला नसता आणि ती अघोचर सासू, बुळ्या नवरा आणि बाईलबुद्धया सासरा अशीं तीं 'निर्दय खल' वृत्ति पालटून भक्तहि झालीं नसतीं. कृष्णेच्या काठाशेजारचें सखूचें देऊळ, घराचा चौथरा, वगैरे मातींत-वाळूंत पुरला गेलेला होता तो आता बाहेर काढला आहे. आणि "हा घाट, हें पुंडलिकाचें देऊळ, इथून अशी सखू गेली," असें लोक दाखवतात. तेव्हा "यात्रेकरांचा धरोनी हात। पंढरीस चालली मज देखत ॥" अशी शेजारणीने सखूच्या सासूला घाईघाईने येऊन बातमी दिली, आणि मग सासूच्या तळपायाची आग मस्तकाला गेली त्याची आठवण होते.

ही वास्तु जर जमिनींतून बाहेर निघाली नसती तर कदाचित् सखूची आठवण महिपतीच्या संतलीलामृतांत, हरिभाऊ आपट्यांच्या नाटकांत आणि बायकांच्या गाण्यांतच शिल्लक राहिली असती. बाकी त्यांत ती 'वाङ्मय' आठवण शिल्लक राहिली होती म्हणूनच ती वास्तु बाहेर आली असें कां म्हणूं नये ? एवढ्या जुन्या शहरांतल्या आणखी किती वास्तु, आणि किती महत्त्वाच्या वस्तु, जमिनीच्या पोटांत गडप झाल्या असतील हें तरी कुणी सांगावें ?

पण कऱ्हाडहून येतांना एवढेच ठसे मनावर उमटवून घेऊन आलों असें मात्र नाही.

देवळें, घरें, किल्ला, संगम, मशीद-मनोरे, बाजारपेठ पाहतां पाहतां अंधार पडला. रात्रीचे आठ-साडेआठ वाजायला आले. रात्रीच्या मुक्कामाला ओगलेवाडीला जायचें होतें म्हणून तांगा पाहूं लागलों. पण गाडीची वेळ नाही म्हणजे कऱ्हाडांत तांगा नाही. शेवटीं एकाने आम्हाला तांगा युनियनच्या अड्ड्यावर जायचा सल्ला दिला. अड्ड्याच्या जागेचें बाहेरचें अंगण, देवडी, आंतलें वगैरे अंगण पाहिल्यावर कऱ्हाड हें आदिलशाहींत महत्त्वाचें ठाणें होतें आणि तिथे मुसलमानांना चांगलें महत्त्व होतें याची आठवण झाली. कारण वाडा एखाद्या संपन्न मुसलमानाच्या वाड्यासारखा दिसत होता.

आम्ही त्या वाड्याच्या देवडींत बसलों होतों. बाहेरच्या अंगणांत पांच-पंचवीस तांगे सोडलेले होते. कुणाचीं घोडीं होतीं, कुणाचीं नव्हतीं. जीं होतीं त्यांच्या टापा आपटल्याचा, खोकण्या-खिंकाळण्याचा मधून मधून आवाज येत होता. देवडींत समोरच्या बाजूला आणि इतर ठिकाणीं घोड्याचे लगाम, ढापणें, तोंडांतून घालायच्या काटेरी कड्या, तंग, जेरबंद वगैरे सामानांच्या लहानमोठ्या राशी पडलेल्या होत्या. भिंतीवर लावलेल्या एका कंदिलाच्या मंद पिवळसर प्रकाशांत त्या कशा तरी दिसत होत्या. आंतल्या अंगणांतून बाहेरच्या अंगणांत आणि बाहेरच्यांतून आंतल्या अधूनमधून कोणी तरी जात-येत होतें. सगळ्या हालचाली सैल आणि संथ होत्या.

आम्ही नुसतीं बसून होतों. आम्हांला तांगा कां मिळत नाही आणि कोणाचा मिळूं शकेल ह्याबद्दल तांगेवाल्यांत आम्ही आल्यावर थोडा वेळ आपसांत चर्चा झाली आणि कांहीच निष्पन्न न होतां विझली. आणि पुढे तर काम इतकें थंडावलें की आम्ही तिथे असल्याचें ते सगळे जणू विसरूनच गेले.

वाट पाहून पाहून दमलों म्हणजे आम्ही—जर सुदैवाने आमच्या जवळपास कोणी फिरकला तर—आम्ही तांग्यासाठी थांबलों आहों ह्याची आठवण करून देत असूं. आमचें बोलणें ऐकण्याचें जर एखाद्याने मनावर घेतलें तर तो म्हणे,

"येतोच्च आहे तुमच्यासाठी तांगा. तांगेवाला जेवायला गेला आहे." किंवा "आलाच. घोड्याला दाणा दिलेला आहे. आता होईल." किंवा दुसरें कांही तरी चालढकलीचें.

शेवटीं खास आमच्यासाठी म्हणून एक तांगा द्यायचें त्यांनी ठरवलें. कांही तरी हालचाल सुरू झाली.

"अबे, बट जूप ना बे." एकाने कोणाला तरी फर्मावलें.

"बटीच तो जूप ऱ्हया ऊं." असें दुसऱ्या एकाने त्याला उत्तर दिलें. आणि

भीमथडीचें एक तट्टू एका खिळखिळ्या तांग्याला जुंपलें गेलें.

तांगा खास आमच्यासाठी जोडला असला तरी वेळ मात्र अशी साधली होती की, आम्हाला पोचवून परत येतांना त्याला गाडीची सवारी मिळावी. म्हणजे दहा-साडेदहा वाजले होते.

गाव सोडून कृष्णेच्या पुलावर तांगा आला. आमच्या मागेपुढे लांबवर दुसरें कुणीहि नव्हतें. बाजूला दुतर्फा शेतें पसरलीं होतीं. रात्र अंधारी होती. वातावरण काळें धूसर होतें आणि गंभीरहि होतें. पुलवरचा खडखडाट संपल्यावर तांगेवाला सैदू सांगूं लागला,

"साहेब, आम्ही रात्रीच्या वेळीं एकट्याने इकडे तांगा आणीत नाही."

"कां रे बुवा?"

"हें इथं ह्या बाजूला भूत आहे."

"भूत! कुठे?"

"हें इथंच. जरा पुढं. एकदा काय झालं, असाच तुमच्यासारखा एक भला माणूस तांग्यांत बसला होता. इथौर तांगा आला, तशी त्या लिंबाखाली एक बाई, डोक्यावर पदर घेतलेला, खाकोटीला एक गाठोडं घेऊन उभी होती. तिनं हात करून तांगा थांबवला. मी म्हटलं, असल कोणी तरी इकडल्याच गावांतली. चालली असल. म्हणाली, 'स्वारी घेतोस का?' म्हणलं, बाई माणूस आहे, घ्यावं. बुवाला माझ्याजवळ म्होरं बसाया सांगितलं अन् बाईला मागं बशिवलं. तिचं गाठोडं लहान पण इतकं जड होतं, इतकं जड की दोघांनाबी उचलंना. बाई बसली अन् तांगा जो उलाल झाला तो घोड्याची मान अवटाळली. म्हटलं, 'बाइ उतरा.' बाई कसची? कांही उतरंबी ना अन् बोलबी ना. मला भ्या वाटाया लागलं. बुवा बी भ्येला. आम्ही तसंच उतरलों. तांगा तसाच सोडला. अन् पळत गेलों तें ठेसनावर. ती बाई अजून कधी कधी अशी इथं दिसते. खाकेंत गाठोडं अन् डोक्यावर पदर.—आपूनच काय, कोनीच रात्रींचा एकट्यानं तांगा आनीत नाय्."

सुदैवाने त्या रात्रीं ती बाई तिथे नव्हती. तरी पण त्याच्या गोष्टीचा आमच्या मनावर त्याने अपेक्षिलेला परिणाम झाला, आणि आम्हांला ठिकाणीं पोचवल्यावर त्याच्या हातावर ठरलेल्या भाड्याखेरीज आणखीहि कांही द्रव्य पडलें.

कृष्णेच्या पाण्यामुळे धान्याला सकसपणा, भाजीपाल्याला गोडी, आणि शरिराला कणखरपणा येतो एवढेंच नव्हे, तर बुद्धीला चातुर्यहि लाभतें, असें तांगेवाल्याने सांगितलेल्या त्या गोष्टीवरून दिसतें.

■ ■

# मजल
# दरमजल

आम्ही तिघे होतों. बापू आणि मी होळकर कॉलेजचे विद्यार्थी होतों. अण्णासाहेब हे एक तिशीच्या सुमाराचे सद्‌गृहस्थ होते. आदल्या दिवशीं सकाळीं बापू माझ्याकडे आला होता आणि म्हणाला होता,

"जोशी, ट्रिपला चलायचं का?"

बापू अट्टल ट्रिपबाज होता. मी त्याच्याइतका ट्रिपबाज नसलों तरी आम्हीं (आणि इतर कांही मित्रांनी) एकत्र मिळून इंदूरच्या आसपास बऱ्याच ट्रिप्स केल्या होत्या. तेव्हा मीं चटकन् म्हटलें,

"चला, कुठं जायचं?"

"मुंबईला. सायकलीवरून."

"मुंबईला? सायकलीवरून?" मीं आश्चर्यानें विचारलें. आणि क्षणभर थांबून म्हटलें, "ठीक आहे. चला."

आणि आम्ही तिघे सायकलीवरून मुंबईला निघालों होतों.

सकाळीं नऊ-दहाच्या सुमाराला कॉलेज सोडलें, ते मह्-मानपूरवरून तिसऱ्या प्रहराच्या सुमाराला गुजरीला पोंचलों. तिथे एका लोखंडी सामानाच्या दुकानांत तळ देऊन जवळचा स्टोव्ह वगैरे काढून चहा केला. चहाचा प्रचार करणाऱ्या एका गृहस्थाने आम्हांला सांगितलें होतें की, नुसतें थोडेंसें मीठ घालूनसुद्धा चहा चांगला लागतो, दूध-साखरेची कांही आवश्यकता नाही. तो प्रयोग आम्हीं

गुजरीला केला, आणि तो कडवट-तुरट-खारट चहा नामक द्रवपदार्थ निग्रहाने घशाखाली लोटला. त्या वेळीं जर तो प्रचारक तिथे आम्हांला भेटता तर आम्हीं तो उकळता काढा त्याच्या घशांत ओतून वर त्याला आणखी बदडला असता ह्यांत शंका नाही.

आम्ही खळघाटला पोचेतो दिवेलागणी होऊन गेली होती. त्या दिवशीं आम्हीं जेमतेम पन्नास-बावन मैलांचा प्रवास केला होता. आमचा हिशोब असा होता कीं, दिवसाला साधारणपणे साठ-पासष्ट मैल करायचे. म्हणजे इंदूर ते मुंबई-पर्यंतचें तीनशे सत्तर मैलांचें अंतर सहा दिवसांत कापलें जाईल. उरलेले दहा-पंधरा मैल करावे का? आणि करायचे म्हटलें, तर मुक्कामाला पुढला गाव कुठला गाठावा?—ह्याचा विचार करायला हवा होता.

नर्मदेवर पूल सुरू होतो तिथे आम्ही सायकली टेकून थोडेसे विसाव्यासाठी आणि थोडेसे विचारविनिमयासाठी दगडांवर बसलों. चांदणें पडलें होतें त्यामुळे प्रसन्न वाटत होतें. आम्ही आपापसांत बोलत होतों तेवढ्यांत एक गृहस्थ आमच्याजवळ आले, आणि म्हणाले,

"आपण कोण? कुठं निघालां आहां? मराठी दिसतां."

हे प्रश्न त्यांनी मराठींत विचारले. त्या ठिकाणीं अनपेक्षितपणे मराठी शब्द कानांवर पडल्याने आम्ही विस्मित झालों आणि त्याबरोबरच आम्हांला आनंदहि वाटला. एखाद्या परीकथेंतल्या भांबावलेल्या वाटसरूला एखाद्या देवदूताने अकल्पितपणे प्रकट होऊन प्रश्न विचारावा तसेंच वाटलें आम्हांला. आम्ही मुंबईला चाललों होतों, आणि रात्रीचा मुक्काम कुठे करावा हा आमच्यापुढचा प्रश्न होता, हें ऐकतांच त्या गृहस्थांनी असा कांही चेहरा केला की, नक्की त्यांना आम्ही वेडे वाटलों असूं. ते म्हणाले,

"हें असं काय करतां तुम्ही, इतकी चांगली गाडी आहे तिने जायचं सोडून? आणि चांगले शिकले-सवरलेले आहां."

आम्ही कांही त्यांची आमच्यासंबंधीची समजूत दूर करूं शकलों नाही. पण त्यांचें सौजन्य त्यांच्या विस्मयापेक्षा आणि आमच्या संबंधीच्या किंवेपेक्षा अधिक बलवत्तर ठरलेंसें दिसलें. कारण ते म्हणाले,

"तें तुमचं कांही असो, पण आता तुम्ही पुढे जाऊं नका. रात्रींचे आठ वाजायला आले आहेत. पुढे जवळपास मोठं गाव नाही. तुम्ही आता आज रात्रीं इथेच रहा. सकाळीं उठून पुढे जा."

आम्हांला थोडासा विचार पडला. रोजच असें होत गेलें—आणि पुढे थकवा-कंटाळा आल्यावर असें होण्याचा संभव अधिकच—तर आमचें वेळापत्रक विस्कळित होईल अशी आम्हांला भीति वाटली. आम्हीं थोडेसे आढेवेढे घेतले, पण शेवटीं त्यांचें म्हणणें आम्हांला मान्य करावें लागलें.

ते गृहस्थ खळघाटला पोस्टमास्तर होते. त्यांनी आम्हांला पोस्ट ऑफिसाच्या व्हरांड्यांत रात्रीच्या मुक्कामासाठी जागा दिली. तिथे फरशीवरच धोतरें पसरून आम्ही आडवे झालों. ओझें नको म्हणून आम्हीं प्रत्येकीं एक ब्लँकेट आणि एक-दोन धोतरें ह्यांखेरीज अधिक कांही अंथरूण-पांघरूण घेतलें नव्हतें. त्यामुळे त्या डिसेंबरांतल्या रात्रीं बरेंच कुडकुडावें लागलें.

सकाळीं पोस्टमास्तरांकडे चहा घेऊन खळघाट सोडलें, आणि आम्ही सेंधव्याकडे निघालों. रात्रीच्या विसाव्याने ताठलेले पाय सकाळीं सायकलवर बसतांना नको म्हणत होते. पण सायकल चालवूं लागल्यावर त्यांना जमिनीवरून चालण्यापेक्षा सायकल चालवणेंच अधिक मानवूं लागलें.

खळघाटहून सेंधवा जवळजवळ चाळीस-पंचेचाळीस मैल. खळघाट सोडल्या-नंतरचा भोवतालचा देखावा अगदी वेगळा वाटला. जणू एखाद्या मोठ्या थोरल्या पेढेघाटी डब्याच्या तळांतून तीन मुंग्यांनी तुरूतुरू चालावें तसे आम्ही तिथे चाललों होतों. त्या पेढेघाटी डब्याची कड म्हणजे क्षितिज आणि त्याचें झाकण म्हणजे वरचें आभाळ. आदल्या दिवशीं आम्ही विंध्याच्या वरच्या बाजूला उंचावर होतों. आता विंध्य आणि सातपुडा ह्यांच्यामधल्या खालाटींत—नेमाडांत—होतों. त्या अफाट खालाटींत आमचा एकाकीपणा आणि लहान-पणा आम्हांला विशेषच जाणवत होता. तासचे तास गेले तरी आम्हां तिघांखेरीज कोणीहि आमच्या दृष्टीस पडत नसे. क्वचित् एखाद्या वेळेला आमच्याच दिशेने जाणारी एखादी गाडी आम्ही मागे टाकीत असूं—किंवा समोरून येणारी. अफाट सागरावर एकट्याच जाणाऱ्या जहाजाला समोरून जाणारें-येणारें दुसरें एखादें जहाज दिसलें म्हणजे जसें वाटत असेल (कदाचित्), तसें आम्हांला त्या वेळीं वाटायचें. पण जहाजावरचीं माणसें आपलेंच एक जग करून त्यांत रमतात तसेंहि आमचें तिघांचें पुष्कळदा होत असे. आम्ही आमच्याच गप्पांत इतके रंगत असूं की किती तरी वेळ भोवती लक्षहि जात नसे.

सेंधव्याला आम्ही दुपारीं पोचलों. सेंधवा हें होळकर संस्थानांतलें शेवटलें महत्त्वाचें गाव. तें सातपुड्याच्या माथ्यावर जंगलभागांत आहे. तिथून सातपुड्याचा घाट सुरू होतो. आसपास जंगलवस्ती सगळी भिल्ल, रामोशी, कोळी ह्यांची आहे.

आम्ही गेलों तो सेंधव्याचा बाजाराचा दिवस होता. अनायासेंच मोठा भिल्लसमाज पाहायला मिळण्यासारखा होता. म्हणून आम्ही चहा वगैरे घेऊन जेवणाची वेळ होई तो बाजार पाहण्यासाठी गेलों. गावांत एक गढीवजा किल्ला आहे, त्याच्या शेजारींच बाजार भरला होता. कमरेला एक फडकें गुंडाळलेलें आणि तसेंच डोक्याला, असे लहान-मोठे सर्व वयांचे भिल्ल तिथे होते. नाना प्रकारचे रुप्या-कथलाचे दागिने कानांत-गळ्यांत, हाता-पायांत घातलेल्या सर्व वयांच्या भिल्लिणीहि तिथे आम्हांला पाहायला मिळाल्या. रंग काळा, चेहरा पसरट, आणि डोळे लब्बाड, गूढ की रिकामे ह्यांचा पत्ता लागणें कठिण. पार्वतीने जर अशाच एखाद्या भिल्लिणीचें रूप घेतलें असेल आणि शंकर तिच्यावर आसक्त झाला असेल तर त्याची सौंदर्यदृष्टि यथातथाच असली पाहिजे असें वाटलें. आणि हा विचार मनांत आल्यावर, सर्व कलांचा प्रवर्तक तो शंकर आमच्या मनांतून एकदोन पायऱ्या तरी खाली उतरला. पण त्याचें असें स्थानभ्रष्ट होणें आम्हांला बरें वाटलें नाही. म्हणून आम्हीं फेरविचार करून म्हटलें, तो सर्व कलांचा प्रवर्तक म्हणूनच त्याला ह्या अशा भिल्लिणींतदेखील सौंदर्य दिसलें. ह्या मीमांसेमुळे शंकराला आमच्या मनांत पुन्हा पूर्वीची जागा मिळाली.

शंकराला आमच्या मनांत पुन्हा त्याचें स्थान मिळालें, पण भिल्लिणींना आमच्या मनांत कौतुकाचें स्थान देणें आम्हांला शक्य झालें नाही. तसें व्हायला एक तर आपण शंकरच असायला पाहिजे किंवा निदान भिल्ल तरी—असेंच शेवटीं आम्हीं ठरवलें.

आम्ही तिथल्या पोलिस इन्स्पेक्टरचे पाहुणे होतों. त्यांनी आमचा उत्तम पाहुणचार केला. जेवण-विश्रांति होई तो संध्याकाळचे चार-साडेचार वाजायला आले. आमचें कौतुक पाहायला आणखीहि चार माणसें आलीं होतीं. सगळे आम्हांला म्हणूं लागले, "तुम्ही घाटांत जाल तो संध्याकाळ होईल. रात्रींचा घाट उतराय-चढायची परवानगी नाही. इथे भिल्लांची वस्ती. तुम्हांला माहितीच आहे भिल्ल म्हणजे कसली जात ती. प्रतिराक्षस. बापलेकांचं भांडण झालं तर

डोक्यांत कुऱ्हाड घालायला कमी करायचे नाहीत. हातापायाला जिवाणू चावलं तर आपल्या हाताने हातपाय तोडून टाकतील. सगळं जंगल त्यांचं आहे. तुमच्या-जवळ हत्यार ना पात्यार. उगीच कशाला सोन्यासारखा जीव धोक्यांत घालतां? रात्रभर आराम करा. सकाळीं उठून जा. इथून पुढला मुक्काम तुमचा शिरपूरला होईल. तें आहे चोवीस-पंचवीस मैल. तीनचार तास तरी लागतील. राहा आता इथेच."

ह्या बोलण्याचा आमच्यावर फारसा परिणाम झाला नाही असें पाहून एकदोघांनी आवाज खाली करून गंभीरपणे इशारा दिला, "आणखी एक आहे. जंगलांत भुतांचा उपद्रव आहे. पूर्वी भिल्लांनी, ठगांनी मारलेल्या लोकांच्या. पुष्कळांना अनुभव आलेला आहे. तुम्हांला जंगलांतच अंधार होईल. भलत्या भरीला पडूं नका उगीच."

ते आमच्या हितासाठीच सांगत होते. पण आम्हांला शक्य तितक्या लवकर निघून रात्र पडायच्या आत घाट उतरायचा होता. शिवाय रात्रीचा मुक्काम शिरपूरला करायचा होता. नाही तर रोजचें मैलांचें माप पुरें झालें नसतें. आमच्या जाण्याचा नेट आणि त्यांचा राहवून घेण्याचा आग्रह ह्यांच्या रस्सीखेचीत वेळ मात्र जाऊं लागला. शेवटीं आम्हीं सांगितलें, "आमच्याजवळ लुटण्यासारखं कांही नाही, त्यामुळे भिल्लांचं कांही आम्हांला विशेष वाटत नाही. आता भुतांचं तुम्ही म्हणतां, तेंहि आम्ही कसं तरी पाहून घेऊं. रामरक्षा, हनुमान-कीलक वगैरे आम्हांला येतंय."

असें सांगून थोड्याशा ओढाताणीनंतर आम्हीं सुटका करून घेतली आणि वाटेला लागलों. त्या दिवशीं बाजार होता त्यामुळे गावांत नेहमीपेक्षा अधिक गर्दी होती. लवकरच गाव सुटलें आणि जंगल सुरू झालें. साग, अंजन, शिसव वगैरेंचीं प्रचंड झाडें दुतर्फा होतीं आणि गाव लांब जात चाललें तशी त्यांची दाटी वाढत चालली. सूर्यास्ताला अवकाश होता, पण दिवस हिवाळ्याचे असल्यामुळे ऊन थोडेंसें क्षीणच होतें. त्यांतून तें झाडांतून तिरपें येत असल्यामुळे सावल्या लांबल्या होत्या आणि एकंदर सगळीकडे सांजकळा आल्यासारखी दिसत होती.

गाव सुटलें तशी रस्त्यावरची वर्दळ कमी झाली. आणि शेवटीं त्या जंगल-रस्त्यांतून जाणारे आम्ही तिघेच राहिलों. आम्ही मोठ्या धिटाईने निघालों

असलों तरी सैंधव्याला लोक जें बोलले होते तें नाही म्हटलें तरी मनांत येत होतें. आमच्याजवळ लुटण्यासारखें कांही नव्हतें हें खरें असलें तरी भिल्ल काय आमच्यापुढे येऊन उभा राहून "महाराज, आपल्याजवळ कांही लुटण्यासारखं असेल तर तें मला लुटूं द्या. नाही तर तुमचे प्राण तरी द्या." अशी हात जोडून विनंति करणार होता ? मधूनच एखादे वेळीं लांबून एखादा भिल्ल येतांना दिसे. त्याच्या खांद्याला कमठा अडकवलेला असायचा आणि हातांत दोन-चार तीर. तो येतांना आमच्याकडे रोखून पाहत यायचा. आम्हांला वाटायचें, 'समजा, याने आपल्यावर बाण रोखला तर ?' हातांत कांही घेऊन प्रतिकार करायचा म्हटलें तर आमच्यापाशी सायकलीचा पंप आणि कॅमेऱ्याचा स्टँड तिघां मिळून एकेक होता. ते आम्ही हातांत घेऊन उभे राहिलों तरी बाण लांबून येऊन छातींत घुसणार. आम्ही आमचे प्राण सावरून धरीत सायकली चालवीत होतों. पण भिल्ल आपल्या चालीने जवळ जवळ येई आणि आमच्याकडे पाहत पाहत निघून जाई. मग आम्ही मागे वळून तो दृष्टीआड होईपर्यंत पाहत असूं. मधूनच एखादें हरीण, रानमांजर, नाही तर कोल्हा एका बाजूने यायचा, वाटेंत मध्ये उभा राहून आमच्याकडे मिनिटभर रोखून पाहायचा आणि दुसऱ्या बाजूला झाडींत दिसेनासा व्हायचा. समजा, ह्याच क्रिया एखाद्या चित्त्याने केल्या तर !

जीव मुठींत धरून जाणें म्हणजे काय ह्याचा अशा रीतीने प्रत्यक्ष अनुभव घेत घेत आम्ही चाललों. तेवढ्यांत एकदम रस्ता वळला आणि घाट सुरू झाला. सूर्य अगदी क्षितिजाला टेकायला आला होता. उतारावरून काळजीपूर्वक सायकल चालवतांना सहज नजर वर गेली. सगळी पश्चिम अर्ध्याअधिक उंचीपर्यंत अगदी लाल-सोनेरी झाली होती. सूर्य गाडीच्या चाकाएवढा मोठा झाला होता. त्याची तळपणारी सोनेरी कड नजर ठरूं देत नव्हती. दरी एखाद्या प्रचंड वासलेल्या जबड्यासारखी दिसत होती. सागाचीं झाडें त्यांतल्या दाढा आणि सुळे होतीं आणि सूर्यप्रकाशाने उजळलेली लालभडक पश्चिम त्या वासलेल्या जबड्याचा आंतला भाग होती. जणू विश्वरूपदर्शनांतलें 'दंष्ट्राकराल' मुख होतें तें आणि त्या मुखांत आम्ही शिरत होतों. खाली खाली खोल खोल जात होतों.

आमचें लक्ष आहे-नाही एवढ्यांत सूर्य मावळला. पश्चिम दिशा रंग पालटीत काळवंडून शिशासारखी झाली. काळोख पसरूं लागला. तो जगड्व्याळ जबडा जणू आमच्या भोवती मिटूं लागला. खाली पोचेतो अंधार पडला. रात्रीच्या वेळीं घाटांत प्रवास करायचा नसल्यामुळे पायथ्याशीं शे-पन्नास गाड्यांचा तळ

पडला होता. बैलांचा मधूनच होणारा भात्यासारखा जोराचा श्वासोच्छ्वास, त्यांच्या गळ्यांतल्या घंटांचा घणघणाट, गाडीवाल्यांचें ओरडणें आणि हाका मारणें ह्यांचे विविध आवाज एकमेकांवर आदळत होते. त्यांचे पडसाद निघत होते. विहिरीवर माणसांची आणि गुरांची पाण्यासाठी झुंबड लागली होती. घाटांतल्या आणि जंगलांतल्या त्या थोड्याशा भीतिदायक आणि दडपणाऱ्या निःशब्दतेच्या आठवणीने हा आवाज विशेषच जाणवत होता.

रात्र वाढत चालली तशी संध्याकाळची धूसरता कमी होत गेली आणि चांदणें स्पष्ट झालें. आम्हांला कांही झालें तरी शिरपूरला पोचायचें होतें. त्यामुळे घाटाखाली थोडा वेळ विसावून आम्ही पुन्हा सायकलीवर स्वार झालों.

असेच बोलत बोलत आम्ही चाललों होतों. पण हळूहळू आम्हां तिघांत दोन तट पडल्यासारखे दिसून येऊं लागले. बापू आणि मी कॉलेजचे विद्यार्थी होतों. संस्कृत साहित्याचा आमचा अभ्यास चालू होता. कालिदास-भवभूतीची ओळख होत होती. मराठी वाङ्मयाचीहि आम्हांला आवड होती. आम्हांला बोलायला पुष्कळ विषय होते. त्यांत पुन्हा विठ्ठलराव घाटे नुकतेच इंदूरला येऊन गेले होते. आमच्या कॉलेजचे ते माजी विद्यार्थी. 'रविकिरण मंडळ' ह्या नांवाचें एक कविमंडळ पुण्यांत स्थापन झालें आहे, तें कवितांचीं पुस्तकें प्रसिद्ध करतें वगैरे त्यांच्याकडून आम्हांला कळलें होतें. गिरीश, यशवंत, माधव ज्युलियन् आणि ते स्वतः अशांच्या कवितांचें त्यांनी इंदुरांत गायन केलें होतें तें आम्हीं ऐकलें होतें. आम्हां विद्यार्थ्यांचें एक शारदोपासक मंडळ होतें. त्या मंडळांतहि विठ्ठलरावांनी काव्यगायन केलें होतें. त्या कविता आमच्या डोक्यांत शिरल्या होत्या. पेडल् मारतांना दुसरें कांही सुचलें नाही तर आम्ही रविकिरण मंडळाच्या कवींच्या कविता म्हणत असूं. विठ्ठलरावांच्या 'आलांत ते कशाला', 'उमल गडे', 'मज ओलावा हवा', 'नवलाख दिवे', 'आळंदीची पालखी', माधव ज्यूलियनांच्या 'कंचनी', 'तेथें चल राणी', 'तुझा मी तूंहि हो माझी' ह्या कवितांचीं त्या प्रवासांत आम्हीं दोघांनी जीं पारायणें केलीं त्याला सुमार नाही. गिरीशांच्या 'एकच शांतिस्थान' ह्या कवितेची चाल म्हणायला धोपट आणि रचायला जात्यावरच्या ओवीसारखी सोपी. त्या चालीवर आम्ही वाटेल तें म्हणत असूं आणि चालींत फिट्ट बसवीत असूं.

अण्णासाहेबांना ह्यांपैकी कशांतच गोडी नव्हती. आमचें हें सगळें त्यांना पोरकटहि वाटत असावें. त्यांची आवडनिवड काय ह्याची आम्हां दोघांना कल्पना नव्हती. त्यामुळे हळूहळू त्यांच्या-आमच्यांत अंतर वाढूं लागलें आणि त्याचा परिणाम म्हणजे ते मैल-अर्धा मैल आमच्या मागे तरी राहूं लागले किंवा पुढे तरी जाऊं लागले. खरें म्हणजे आमची दोघांचीहि काळजी घेऊं शकतील इतके ते वयाने आमच्यापेक्षा मोठे होते. पण आता आम्हांला त्यांची काळजी घ्यावी लागण्याची वेळ आली. दिवसा इतकें वाटलें नाही, पण रात्रीच्या वेळीं हा दूरपणा विशेष जाणवे. त्यामुळे ते मागे राहिले म्हणजे त्यांची वाट पाहत थांबून राहायचें आणि पुढे गेले की धडपड करून जाऊन त्यांना गाठायचें हा आमच्या प्रवासाचा मुख्य भाग झाला. कदाचित् त्यांना एकांत हवा असेल. क्षितिजापर्यंत शेतें आणि रानें पसरलेलीं दिसताहेत, आणि वर स्वच्छ धुवट निळें आकाश आहे, सगळीकडे शांत निःशब्द आहे, त्याचा निरपवाद उपभोग घ्यावा, असें त्यांना वाटत असेल, आणि त्यामुळे आमचें काव्यगायन आणि बडबडणें त्यांना असह्य होत असेल, हें शक्य आहे. पण रात्रीच्या वेळीं त्यांनी आमच्यापासून मैल-दोन मैल लांब एकटें राहणें हें आम्हांला अस्वस्थ करीत होतें. अशा ओढाताणींतच रात्रीं आठ-साडेआठाच्या सुमाराला आम्ही शिरपुरांत शिरलों.

शिरपूरला माझे एक दूरचे नातेवाईक राहत असत. त्यांची-माझी कधी ओळखदेख झालेली नव्हती. पण नातें सांगण्याइतपत होतें. आणि शिवाय एव्हांना आम्ही अपरिचितांकडून निःसंकोचपणे पाहुणचार घेण्याइतके 'तयार' झालों होतों. गावांत शिरतांच सायकलीवरून उतरून आम्ही माझ्या नातेवाइकां-संबंधी चौकशी करूं लागलों. तेव्हा कळलें की, मुख्य पुरुष दिवंगत झाले असून त्यावेळीं त्यांच्यापैकी तिथे कोणीच नव्हतें. या माहितीमुळे आम्ही साहजिकच थोडेसे गोंधळलों. आपल्याला मुक्कामाला हमखास जागा मिळेल ह्या भरवशावर आम्ही होतों. तो आधार गेला. आता पुढे काय करावें अशा विचारांत आम्ही पडलों. वेळ रात्रीची होती. कांही सुचेनासें झालें. एव्हांना आमच्या-भोवती पंधरा-वीस लोकांचें कोंडाळें झालें होतें. इतकेंच नाही तर आमची अडचणहि त्यांना कळली होती. आणि तिच्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्नहि

त्यांच्यांतल्या कांही सज्जनांनी चालवला होता. त्यांच्यापैकीच एक मारवाडी गृहस्थ म्हणाले,

"नाही तुमचे नातेवाईक तर नाही. तुम्हांला एक रात्रच काढायची आहे ना ? चला माझ्याबरोबर."

असें म्हणून त्यांनी एका शेजारच्याच कंपाउंडांत आम्हांला नेलें. ती एक जिनिंग फॅक्टरी होती. तिथल्या ऑफिसच्या खोलींत त्यांनी आम्हांला जागा दिली. आणि अशा रीतीने शिरपूरच्या रात्रीच्या मुक्कामाची सोय झाली. आज दुसऱ्या दिवशीं आमचें प्रवासाचें माप हिशोबाप्रमाणे भरलें होतें. आम्ही खळघाटहून शिरपूरला आलों होतों. नेमाडांतून निघून सातपुडा ओलांडून महाराष्ट्रांत खानदेशांत शिरलों होतों.

सकाळीं शेटजींनी आम्हांला दूध-जिलबीची भरपूर न्याहारी दिली. 'चमडी देगा, लेकिन दमडी नही देगा.' असा मारवाड्यांचा लौकिक ऐकलेला असल्या-मुळें राहण्याची वगैरे सोय करून दिल्याबद्दल शेटजींना कांही तरी द्यावें असा आम्हीं विचार केला. पण त्यांनी पैसेबैसे तर घेतले नाहीतच, पण आम्ही आभार मानीत होतों तेसुद्धा मानूं दिले नाहीत. म्हणाले, "ह्यांत काय ? पै-पाहुणा आला तर एवढं कोणीहि करतं. तुम्ही नाही करणार ?" तरीदेखील त्यांचे आभार मानून त्यांचा निरोप घेऊन आम्ही पुढल्या प्रवासाला लागलों.

शिरपूर सोडल्यानंतर कांही वेळाने थाल्नेरजवळ तापी नदी लागली. तिचें पात्र खूपच रुंद होतें. त्यांतला मधला तिसरा भाग प्रवाहाचा होता आणि बाजूचे दोन वाळवंटाचे. वाळवंटांतच सायकली उभ्या करून नदींत हातपाय धुवून तिथे थोडासा वेळ काढला. नर्मदेइतकी ही नदी मोठी नाही, भव्य नाही, हें आम्हांला माहीत होतें. पण कां कोण जाणे, त्या प्रवासांत तरी तापीचें स्वच्छ, पिंगट वाळवंट आणि हिरवा-निळा प्रवाह फार प्रसन्न आणि मनोवेधक वाटला.

धुळ्याला पोचेतो दुपारचे बारा-साडेबारा वाजले. तिथे एका वकिलांकडे ओळख मिळाली होती. गावाच्या जवळजवळ मधून पांजरा नदी वाहते. तिच्या-मुळे साहजिकच गावाचे दोन भाग झाले आहेत, आणि त्याला एक प्रकारचा मोकळेपणा—ऐसपैसपणा—आला आहे. आम्हांला धुळें शहरासंबंधी, तें

पश्चिम खानदेश जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे आणि तिथे सत्कार्योत्तेजक सभा आहे, एवढीच माहिती होती. कदाचित् तिथे धूळ फार असल्यामुळे त्याला 'धुळें' नाव पडलें असेल असा आणखी एक तर्क त्याच्यासंबंधी आम्हीं केला. पण तसें म्हटलें तर आपल्या देशांतल्या कोणत्याहि गावाला 'धुळें' हें नांव देतां येईल. धुळ्यांतल्या आमच्या यजमानांनी धुळ्यासंबंधी आम्हांला अगदी नवी माहिती दिली. ती म्हणजे, धुळें हें ऑस्ट्रेलियांतल्या कोणत्याशा शहरासारखें आहे. ऑस्ट्रेलियांतल्या त्या शहराच्या लोकांना जर ही माहिती कळली तर त्यांचा आपल्या शहरासंबंधीचा अभिमान कांही औंसांनी तरी वाढेल ह्यांत शंका नाहीं.

गेले दोन दिवस आम्हीं अंघोळ केली नव्हती की अंगांतले कपडे काढले नव्हते. त्या घाणेरडेपणाची खरें म्हणजे लाज वाटायला हवी होती, पण वाटली नव्हती खरी. धुळ्याला गरम पाण्याने यथेच्छ स्नान करायला मिळालें. कपडे धुण्याचीहि सोय झाली. त्यामुळे स्वच्छ, ताजें आणि मोकळें-मोकळें वाटलें. अगदी क्षीण अशा ओळखीचा आणि यजमानांच्या आतिथ्यशीलतेचा, अगदीच तेलंगीपणा न करतां, जितका फायदा घेतां येईल तितका आम्हीं घेतला. खळघाटच्या पोस्टमास्तरांना, सेंधव्याच्या पोलिस इन्स्पेक्टरना आणि शिरपूरच्या शेटजींना आमच्या ह्या सायकल-प्रवासाचें आश्चर्यमिश्रित कौतुक वाटलेंच होतें. धुळ्याचे वकीलसाहेब त्या मंडळीपेक्षा अधिक सुशिक्षित होते. त्यांनी केलेल्या कौतुकांत, विद्यार्थ्यांनी असे प्रवास करणें त्यांच्या शिक्षणाला आणि संस्कारांना व्यापकपणा येण्याच्या दृष्टीने कसें आवश्यक आहे हेंहि बिंबवण्याचा प्रयत्न गोवला गेला होता. आम्ही केवळ हौशीने—किंबहुना एक प्रकारच्या 'हुच्च'पणाने—करीत असलेला प्रवास शिक्षणदृष्ट्याहि हितावह आहे हें ऐकून आम्हांला साहजिकच आनंद झाला आणि स्वतःचा अभिमान वाटला. वकीलसाहेबांनी आमचें स्वागत मनापासून आणि उदारपणें केलें. जेवतांना जवळ बसून आग्रह केला. आणि जेवणाचा बेतहि असा होता की पोट वाजवीपेक्षा अधिक ताणलें जायला तयार झालें. आणि दुपारची विश्रांतीहि त्यामुळे लांबली.

साहजिकच तिथून निघायला उशीर झाला. रात्रीचा मुक्काम मालेगावला करायचा होता. आता पायांना सायकलीची अशी सवय झाली होती की चालणें अति कष्टाचें वाटूं लागलें होतें. पांच-पन्नास पावलें जरी सायकल ढकलण्याची वेळ आली तरी तरी पाय नको म्हणत. पण सायकलवर चढून पेडलिंग करूं लागलें म्हणजे त्यांची तक्रार नसे.

वाटेंतच रात्र पडली. दुपारच्या जेवणामुळे आम्हांला वरचेवर तहान लागत होती. जवळ पाणी होतें तें थोडें थोडें करून पुरविलें. पण शेवटीं अशी वेळ आली की, तहान लागली आहे, जवळचें पाणी संपलें आहे, आणि वाटेवर गाव तर कुठे लागत नाही. आम्ही बेचैन होऊं लागलों. तोंड कोरडें पडलें, घसा सुकला, काव्यगायन, काव्यरचना, साहित्यचर्चा, थट्टामस्करी, गप्पा, सगळें थंडावलें. "पिपासितैः काव्यरसो न पीयते।" ह्या वचनाची अभिधाशक्ति प्रत्ययाला आली. तहानेने व्याकुळ होणें म्हणजे काय हें त्या थंडीच्या दिवसांत रात्रीच्या वेळींहि जाणवलें.

अखेर एकदा एका ठिकाणीं रस्त्याशेजारीं कांही घरें दिसलीं. आम्ही उतरलों आणि त्या बाजूने जाऊं लागलों. खोपटेंच होतीं तीं पंधरावीस. त्यांतच एक विहीर होती. पण विहिरीवर दोर-पोहरा नव्हता आणि आमच्याहि जवळ पाणी काढायला कांही नव्हतें. (ह्यावरून आम्हीं प्रवासासाठी तयारी कितपत केली होती तें आणखी कळेल.) आम्ही एका खोपटापाशीं गेलों. आंतून एक बाई बाहेर आली. तिच्याजवळ आम्हीं प्यायला पाणी मागितलें. तिने आमच्याकडे एकदा नीट पाहिलें. आणि ती म्हणाली,

"बाबांनो, तुमी बामनं दिसतां. तुम्हांला आम्ही कसं पानी द्यावं? मी महार आहें."

आमच्यापैकी ब्राह्मण मी एकटाच होतों. पण आमच्या जाती-पोटजातींचे बारकावे तिला समजावून सांगण्याचा कांही उपयोग नव्हता. म्हणून आम्हीं म्हटलें,

"बाई, आम्ही ब्राह्मण असलों तरी आम्हांला तुझ्या हातचं पाणी चालेल. आम्ही जातबीत मानीत नाही."

ती म्हणाली,

"तुम्ही मानीत नसाल जात बाबा. पर माला माझा धरम पाळला पाहिजे. मी कशी तुम्हांला बाटवूं?"

जातिभेद कसा वाईट आहे, त्यामुळे आपल्या हिंदु समाजाची कशी हानि झाली आहे, समाजाचीं कशीं शकलें शकलें पडलीं आहेत, तो तातडतोब नष्ट करणें किती आवश्यक आहे, तिने आम्हांला प्यायला पाणी देण्याने परोपकार आणि जातिभेद-नाश हीं दोन्ही कशीं साधणार होतीं वगैरे वगैरे तत्त्वज्ञान तिला पटवून द्यायला ही फार चांगली संधि होती. पण तें तत्त्वज्ञान पटवून घ्यायची

तिची तयारी नव्हती, आणि आम्ही तर पाण्यासाठी घाईला आलों होतों. अखेर मोठ्या मुश्किलीने ती आपल्या जवळचा दोर-पोहरा आम्हांला द्यायला तयार झाली. तरीहि म्हणालीच की, "हीर महार लोकांची आहे बाबा. आपला इचार बघा."

तिच्या दृष्टीने आम्ही आमचा धर्म बाटवीत होतों. आणि त्याचें तिला फार वाईट वाटत होतें. तरी आम्ही तिच्या दोर-पोहऱ्याने त्या विहिरीचें पाणी काढून तहान भागवली आणि बरोबरहि पाणी घेतलें. आणि तिला तशाच स्तिमित-संभ्रांत स्थितींत सोडून पुढे चालूं लागलों.

मालेगावला पोचलों तेव्हा पुन्हा शिरपूरसारखी रात्रीं साडेआठ-नऊची वेळ झाली. मालेगावांत आमची कोणाचीहि ओळख नव्हती. खुद्द राजेबहाद्दरांकडे ओळख आणतां आली असती. पण इंदूर सोडतांना तितकी सवड नव्हती म्हणा किंवा सुचलें नव्हतें म्हणा, पण आम्हीं ओळखपत्र घेतलें नव्हतें, आणि आता अशा रात्रीं ओळख काढणें बरें वाटेना. खळघाटच्या अनुभवावरून आम्हीं मनाने ठरवलें होतें की पोस्टमास्तरांकडे आश्रय मागावा. ते आतिथ्यशील असतात. एका पोस्टमास्तरावरून सगळ्या पोस्टमास्तरांबद्दल असें व्यापक अनुमान काढण्यांत आम्ही तर्कशास्त्राची अजिबात उपेक्षा करीत होतों, असें कोणीहि सुशिक्षित शहाणा मनुष्य म्हणेल. पण खरें म्हणजे आपण एका शेळी-वरून सर्व शेळ्यांबद्दल किंवा एका वाघावरून सर्व वाघांबद्दल सर्वसामान्य सिद्धांत बसवतोंच की नाही ? की "नाही बोवा, बऱ्याच शेळ्यांशीं किंवा वाघांशीं चांगली जानपछान झाल्याशिवाय असें अनुमान काढणें न्यायसंगत नाही." असें आपण म्हणतों ? आमचा तर्क असा होता की, मनुष्य साधारणपणे गरीब स्वभावाचा असल्याखेरीज पोस्टमास्तराची नोकरी पत्करणार नाही. दुसरें म्हणजे बहुधा पोस्टाजवळच त्याची राहायची जागा असते. आणि पोस्ट ऑफिसाला लहानसा कां होईना, व्हरांडा असतो. आणि तिथे जागा देण्यांत त्याची कांही गैरसोय नसते.

असे सर्व आम्हांला अनुकूल विचार करीत करीत आम्ही जे गावांत शिरलों ते बरेच पुढे आलों, आणि एका ठिकाणीं उतरून चौकशी करूं लागलों, तो कळलें की, आम्हीं पोस्ट ऑफिस बरेंच मागे टाकलें होतें. पुन्हा सायकली घेऊन तितकें मागे जायला मन तयार होईना. शिवाय एव्हाना, आम्ही कोण

आणि आम्हांला काय हवें आहे हें जाणून घेण्याच्या कुतूहलाने आमच्या भोवताली तेवढ्या रात्रीं देखील आसपासच्या पांच-चार घरांतले लोक गोळा झाले होतेच. आमचा वृत्तांत ऐकून त्यांनीहि पूर्वी भेटलेल्या लोकांप्रमाणे आश्चर्याने तोंडांत बोट घातलें होतें. (हें अर्थात् लक्षणेने घ्यायचें.) थोडा विचारविनिमय करून त्यांतल्या दोघां-तिघांनी आम्हांला रात्रीपुरती जागा द्यायची तयारी, किंबहुना उत्सुकता, दाखवली. जवळच एका भटजींचें घर होतें. चांगलें मोठें होतें. पण त्याचें जोतें पुरुषभर उंच होतें. ओझ्यांनी लादलेल्या आमच्या सायकली जोत्यावर उचलून न्यायला आम्ही नाखुष होतों. त्या दृष्टीने आम्हांला शेजारचेंच एका शाळामास्तराचें घर अधिक सोयीचें वाटलें आणि त्यांचा पाहुणचार स्वीकारायचें आम्हीं ठरवलें. त्यांनाहि साहजिकच आम्ही विद्यार्थी असल्यामुळे आमच्याबद्दल विशेष आपुलकी वाटत असलेली आम्हांला दिसली.

आम्ही त्यांच्या घरीं गेलों तेव्हा त्यांनी आपल्या तीन खोल्यांच्या बिऱ्हाडांतली सगळी पुढची खोली आमच्यासाठी रिकामी केली. इतकेंच नाही तर तेवढ्या रात्रीं आपल्या बायकोला आमच्यासाठी पिठलें-भात करायला लावलें.

आज प्रवासाचा तिसरा दिवस होता. तिन्ही दिवस अगदी अपरिचित माणसांनी आमचें इतकें मोकळेपणाने स्वागत केलें होतें, आणि आमची इतकी सोय केली होती की आम्ही त्याने अगदी भारावून गेलों होतों. आज त्याची पराकाष्ठा झाली होती. त्यांत पुन्हा मास्तरांनी आणि त्यांच्या बायकोने हें सगळें इतक्या सहजपणें केलें होतें की त्यासंबंधी आभाराचें म्हणून कांही बोललों असतों तर तेंच कृत्रिम झालें असतें. थंडीच्या दिवसांत, रात्रीच्या वेळीं तें ताजें आणि गरम जेवण जेवतांना कृतज्ञतेने आम्हांला अगदी भरून आल्यासारखें झालें.

बाहेरच्या खोलींत एका बाजूला आम्हीं खुंट्यांना घोडीं बांधून ठेवावींत तशा सायकली उभ्या करून ठेवल्या, दुसऱ्या बाजूला आमचीं अंथरुणें पसरलीं, आणि त्यावर आडवे झालों ते सकाळीं चांगलें फटफटीत उजाडल्यावरच जागे झालों. सकाळीं चहा देऊन मगच मास्तरांनी आम्हांला निरोप दिला.

मालेगाव टाकून आम्ही चांदवडकडे निघालों. शिरपूरपासून मालेगावपर्यंत रस्त्यांत चढाव कुठे फारसा लागला नव्हता. पण मालेगावहून चांदवडकडे जातांना लवकरच चढाव सुरू झाला आणि चांदवड जवळ आलें तसें घाटच

चढावा लागला. तिथपासून गावापर्यंतचा रस्ता, एकीकडे शेतें आणि एकीकडे डोंगर आणि ओहळ असा होता. विविध प्रकारच्या झाडांमुळे त्या हिवाळ्याच्या दिवसांतसुद्धा देखावा फार सुंदर दिसत होता.

चांदवड हें होळकरांचें पाटिलकीचें गाव. तिथे त्यांचा एक प्रचंड वाडा आहे. त्यांत होळकर सरकारचे एक मुखत्यार राहत असत. त्यांच्याचकडे आम्ही मुक्काम करणार होतों. होळकर कॉलेजचे विद्यार्थी म्हणजे एक प्रकारें हक्कदार वर्ग असे त्या वेळीं. त्यांच्याकडून कधी कायद्याच्या बाबतींत किरकोळ आगळीक झाली तर "आम्ही होळकर कॉलेजचे विद्यार्थी आहों." असें त्यांनी सांगितलें की इंदूरचे पोलिस अधिकारी गुन्हा माफ करीत असत. विद्यापीठाच्या परीक्षेचें केंद्र त्या वेळीं इंदूरच्या ख्रिश्चन कॉलेजांत असे. होळकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना ख्रिश्चन कॉलेजांत नेण्यासाठी त्या वेळीं पहाडासारखे चारचार घोडे जोडलेल्या लष्करी गाड्या येत असत. आणि पुन्हा दिवसाच्या शेवटीं परत आणायला. अशी त्यांची शान होती.

त्यामुळे चांदवडच्या होळकरवाड्यांत आम्ही जात होतों ते आगंतुक म्हणून नव्हे तर यजमान म्हणून, अशीच आमची भावना होती. पण त्या वेळचे तिथले होळकर सरकारचे प्रतिनिधि स्वभावाने इतके चांगले होते आणि आम्हांला पाहून त्यांना इतका आनंद झालेला दिसला की, आम्हांला आम्ही कोणी विशेष आहों असा आव आणावाच लागला नाही. आम्ही विशेष कोणी असल्याप्रमाणे त्यांनी आपण होऊनच आम्हांला वागविलें.

वाड्याच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना पहारेकऱ्यांसाठी प्रशस्त देवड्या आहेत. आणि आंत वाडा इतका मोठा आहे की त्यांत त्यांचा संसार कुठे मांडला आहे, तें लक्षांतच येत नव्हतें. वाड्यांत प्रचंड दिवाणखाने, ओसऱ्या आणि दालनें होतीं. एखाद्या लहानशा खोलीएवढ्या मोठाल्या आणि पुरुष-दीड-पुरुष उंचीच्या कणग्या धान्य साठवण्यासाठी केलेल्या होत्या. मोठमोठीं कित्येक भांडीं होतीं. वाडा नुसता वरवर पाहायला आम्हांला तास दोन तास तरी लागले असतील. वाड्याच्या शेजारींच बाहेरच्या बाजूला भव्य आणि खोल अशी एक चिरेबंदी विहीर आहे. तिच्यांत भिंत घालून एक भाग राणीवशासाठी वेगळा केला आहे. आणि आंत पोहण्या-स्नानासाठीं विविध प्रकारची रचना केली आहे. अशी विहीर त्यापूर्वी दुसऱ्या कुठे पाहण्यांत आली नव्हती, आणि त्यानंतरहि आली नाही. जातां-येतांना मुक्कामासाठी म्हणा, किंवा मुद्दाम कांही दिवस

राहण्यासाठी म्हणा, होळकर सरकार केव्हा तरी जनान्यासहित इथे येत असतील, म्हणूनच हा वाडा आणि ही विहीर बांधली असेल. नाही तर मुखत्यारासाठी एवढा वाडा आणि त्याच्या बायकोसाठी एवढी विहीर त्यांनी थोडीच बांधली असती! तिला बिचारीला त्या भव्य आणि खोल विहिरींत उतरायचीसुद्धा भीतीच वाटत असेल—कुणाहि एकट्यादुकट्याला वाटेल असें तिचें रंगरूप आहे.

हजार-बारासें वर्षांपूर्वी चांदवड ही एका यादववंशाची राजधानी होती आणि त्याचें नांव 'चंद्रादित्यपूर' होतें; तिथे एक जुना किल्ला आहे, आणि एक मोठी टाकसाळ होती, त्यावरूनच एका रुपयाला 'चांदवडी' रुपया असें नांव पडलें होतें; चांदवडजवळच्या डोंगराला साडेतीन रोडग्यांचा डोंगर म्हणतात, कारण त्याचे साडेतीन भाग झाल्यासारखे दिसतात; तिथे एक रेणुकाई नांवाची देवी आहे, पण तिची मूर्ति खिस्ती (सेंट ॲनाची, मांडीवर व्हर्जिन मेरीला घेतलेली) आहे; वगैरे पुष्कळ माहिती आम्हांला आबासाहेबांनी दिली. त्यामुळे चांदवड हें नुसतें प्रवासांतलें एक मुक्कामाचें ठिकाण न राहतां आठवणींत जपण्यासारखा ठेवा झालें. आम्ही अगदी अकल्पितपणे आणि अनाहूतपणे गेलों होतों, तरी आबासाहेबांनी आमचें स्वागत फार उत्साहाने आणि अगत्याने केलें. आणि तेवढ्या घाईंत पुरणपोळीचें जेवण दिलें. खरोखरच आम्ही जणू त्यांचे यजमान होतों असें त्यांनी आम्हांला वागवलें. ते होळकरांचे प्रतिनिधि आणि आम्ही होळकर कॉलेजचे विद्यार्थी. "अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरुः।" अशाच प्रकारचा संबंध. पण तो त्यांनी केवळ तसा मानला नाही.

दुपारीं जेवण झाल्यावर नाशिककडे जायला निघालों. चांदवड सोडल्यावर दाट झाडींतूनच प्रवास चालला होता. अगदी प्रसन्न वाटत होतें. थोड्या वेळाने घाट लागला. तो उतरून पुढे चालूं लागलों. पिंपळगांव बसंतला येई तो दिवे-लागणी झाली. आणि नाशकाला पोचे तो रात्रच पडली. नाशकाला बालाजी मंदिरवाल्यांकडे ओळखपत्र होतें. त्याप्रमाणे त्यांच्याकडे मुक्कामाला गेलों. त्यापूर्वीं मी अगदी लहान असतांना नाशकाला आलों होतों. आणि स्टेशनापासून गावापर्यंत घोड्याच्या ट्रॅममधून आलों होतों. तें मला आठवलें.

सकाळीं उठून गावांत हिंडून आलों. देवळें, घाट वगैरे पाहिलीं. दुपारच्या जेवणाचा इतका आग्रह झाला की चार वाजेपर्यंत हलणेंसुद्धा अशक्य झालें.

अखेर चार वाजण्याच्या सुमाराला नाशिक सोडलें आणि रात्रीं सात-साडेसातच्या सुमाराला इगतपुरीला पोचलों. आणि उतरण्यासाठी म्हणून पोस्टमास्तर, शाळा-मास्तर ह्यांची चौकशी करूं लागलों. त्यांतच रेल्वेंत काम करणारे एक गृहस्थ भेटले. त्यांनी एक देऊळ उतरण्यासारखें आहे असें सांगितलें. एका खाणावळीचा पत्ता दिला. पण हें सांगतां सांगतांच त्यांना काय वाटलें कुणाला ठाऊक, ते एकदम म्हणाले,

"असं कशाला करतां ? आमच्याचकडे चला ना ? तुम्हांला काय, सायकली सुरक्षित ठेवायला मिळाल्या म्हणजे झालं ना ? तितकी जागा आहे माझ्याकडे."

आणि मग आम्ही वळणावळणाने, इकडून-तिकडून त्यांच्या घरीं गेलों. त्यांच्या पडवींत नुसत्या आमच्या सायकली ठेवण्याइतकीच जागा होती. आम्हांला निजायला जागा त्यांच्या अंगणांत होती. हिवाळ्यांतले डिसेंबरअखेरचे दिवस, इगतपुरीसारखें उंचावरचें गाव, आणि निजायला उघडें अंगण. एकंदरींत सोयींचा त्रिवेणी संगम होता. पण आता दुसरीकडे जागा शोधीत जाणें शक्य नव्हतें. शिवाय तसें करण्यांत ज्यांनी अगत्याने बोलावलें त्यांचा अपमान झाला असता. बरें, त्यांनी जेव्हा विचारलें, "काय, जमेल ना इथं ?" तेव्हा आम्हीं जोरांत "ओ यस्" म्हटलें होतें. तेंहि खोटें पाडतां येत नव्हतें.

बरोबरच्या तुटपुंज्या अंथरुणा-पांघरुणांपैकी ब्लँकेट अंथरून धोतर पांघरायला घेतलें तर थंडी कमी लागेल, की धोतर अंथरून ब्लँकेट अंगावर घेतलें तर—ह्यावर थोडा वेळ आम्हीं ऊहापोह केला, आणि ठरवलें की धोतर अंथरावें, आणि ब्लँकेट पांघरायला घ्यावें हेंच बरें. अंगाच्या उबेने खालची जमीन थोडीबहुत गरम होईल आणि वरची थंडी ब्लँकेट अडवील. खाली खडबडीत जमिनीवर धोतराचें अंथरूण, खरबरीत हॅवरसॅकची टेंगळा-टेंगळांची उशी आणि वर पांघरायला ब्लँकेट असे आम्ही झोपेच्या अधीन होण्याच्या उद्देशाने आडवे झालों. 'शय्या भूमितलं दिशोऽपि वसनं' अशीच जवळजवळ स्थिति होती.

आमचा अंदाज अर्थातच चुकला. अंगाची ऊब जमिनींत शिरण्याऐवजी जमिनीचा गारठा हाडांपर्यंत पोचला आणि त्यामुळे अखेर पांघरूण, जमीन आणि आमचें शरीर ह्यांच्यांत त्यांतल्या त्यांत शरिराला ऊब कशी मिळवतां येईल ह्यासाठीं तडजोडीची झटापट चालू झाली. ती चालू असतांनाच रात्र संपली आणि दुसरा दिवस उजाडला.

आज मध्ये कुठेहि मुक्काम न करतां मुंबईला पोचायचें असें आम्हीं ठरवलें होतें. जवळजवळ पंचाऐशी-सत्त्याऐशी मैल कापायचे होते. सकाळीं आम्ही चहा घेऊन निघालों. आणि घाट संपत आला तसे एका ठिकाणीं, सडकेच्या बाजूला झाडाखाली, थोडा वेळ थांबून खाणेंपिणें उरकायचें ठरवलें.

आज प्रवासाचा सहावा दिवस होता. मुंबईला पोचल्यावर अण्णासाहेबांची आणि आमची फारकत होणार होती. ते आपल्या मुक्कामावर जाणार होते. आणि बापू आणि मी एक दिवस मुंबईत मुक्काम करून पुढे पुण्याला जाणार होतों. तेव्हा एका परीने सगळ्यांची आमची एकत्र 'पंगत' अशी ती शेवटचीच होती. खरें म्हणजे आमची आतापर्यंत आमचीच अशी स्वतंत्र पंगत झालीच नव्हती. आम्ही दुसऱ्या कुणाच्या तरी घरीं असूं.

इगतपुरीला आम्हीं पाव-लोणी आणि थोडींशीं अंडीं विकत घेतलीं होतीं. स्टोव्ह पेटवून तीं उकडायला ठेवलीं. पहिल्या दिवशीं गुजरीच्या बाजारपेठेंत आम्हीं चहासाठी स्टोव्ह पेटवला होता, त्यानंतर आजपर्यंत मध्ये पुन्हा केव्हाहि तो पेटवायची वेळ आली नव्हती. फराळाचें जें इंदूरहून—मी नाहीच, बापूने आणि अण्णासाहेबांनी—घेतलें होतें तें उघडून पाहण्याची तर एकदाहि वेळ आली नव्हती. लसणीची कोरडी चटणी होती, ती सारखी बंद राहिल्यामुळे तिचा वास अधिक उग्र झाला होता. पुऱ्या वासेळूं लागल्या होत्या. त्यांतल्या अधिक वास येऊं लागलेल्या वनदेवता-स्थलदेवतांना, आणि एव्हांना भोवती गोळा झालेल्या गृहबलीच्या हक्कदारांना, अर्पण केल्या. कमी वासाच्या पुसूनबिसून पसरून वाऱ्यावर ठेवल्या. बिनदुधाच्या (पण—मीठ न घातलेल्या—त्या वाटेला पुन्हा यावज्जन्म जायचें नाही हें गुजरीलाच ठरलें होतें.) अगदी फिक्या चहाबरोबर त्या सगळ्या खाद्यपदार्थांचा आम्हीं समाचार घेतला. ठिकठिकाणीं अगदी अपरिचित लोकांनी आम्हांला सुग्रास आणि ताजें जेवण दिलें होतें. (कांहींनी तर पक्वान्नेंहि दिलीं होतीं.) तें आम्हांला गोड लागलें ह्यांत नवल नाही. पण त्या वेळीं तें आमचें शिळें आणि कांहीसें रूक्ष अन्नहि आम्हांला गोडच लागलें. किंबहुना अधिकच. कारण प्रवासांतलें तें परान्न होतें आणि हें, रुखें-सुकें कां होईना, आमचें होतें.

जेवण झाल्यावर अधिक वेळ न घालवतां आम्ही पुढे निघालों. तिसऱ्या प्रहरच्या सुमाराला कसारा, खरडी, शहापूर हीं गावें पार पाडून पडघें नांवाच्या एका गावांत आलों. सबंध गाव सुक्या माशांच्या दर्पाने कोंदून गेलेलें होतें.

एका हॉटेलांत चहा घेण्यासाठी शिरलों, तर तिथल्या चहाला, कपबशांना, सगळ्यांनाच माशांचा वास येत होता. इतका की, अधिक वेळ तिथे बसलों तर घशाखाली लोटलेला चहाच नव्हे, तर मघाचें जेवणसुद्धा बाहेर येईल अशी भीति वाटूं लागली. म्हणून झपाट्याने गावाबाहेर पडलों. संध्याकाळच्या सुमाराला भिवंडीवरून ठाण्याजवळच्या खाडीवर येऊन पोचलों तो जवळजवळ दिवेलागणीची वेळ झाली होती. त्या वेळीं कशेळीचा पूल झालेला नव्हता. एका मचव्यावर सायकलींसह चढून खाडी पार केली आणि ठाण्याजवळ साष्टी बेटावर उतरलों तों वस्तींत दिवे लागले होते.

ठाणें शहरांतून बाहेर पडून मुंबईच्या वाटेला लागलों. मधूनमधून समोरून कांही बैलगाड्या येतांना दिसत. त्यावर बसलेले गाडी हाकणारे लोक कागदाची सुरळी करून मध्ये पेटलेली मेणबत्ती धरून ठेवीत असें मला दिसलें. बैलगाडीवर दिवा असा मी पहिल्यानेच पाहत होतों. त्याचें मला फार नवल वाटलें.

आम्ही घाटकोपरच्या बाजारपेठेंत आलों तेव्हा तिथल्या लोकांनी सांगितलें की, "तुम्हांला पोलिसांचा त्रास होईल. कारण मुंबईत सायकलीला मागे, पुढे असे दोन दिवे लागतात." आमच्याकडे प्रत्येक सायकलीला दोन दिवे तर नव्हतेच, पण एकेक दिवाहि नव्हता. आमच्याजवळ तीन सायकली मिळून फक्त एक दिवा होता. आम्ही त्यांचें सांगणें ऐकून थोडेसे अस्वस्थ झालों. पण म्हटलें, "बघूं काय होईल तें." आणि तसेच पुढे निघालों. अखेर आम्ही कुर्ले मागे टाकून शींवमध्ये शिरलों, म्हणजे साष्टी सोडून मुंबई बेटावर आलों, आणि माटुंग्याच्या किंग्जवे पोलिस ठाण्यावर आपण होऊन गेलों. तिथल्या इन्स्पेक्टरना भेटलों, आणि आमची सायकलीच्या दिव्यांची अडचण त्यांच्यापुढे मांडली. आपल्या सायकलीला दिवा नाही हें आपण होऊन त्यांना सांगायला जाणारे आम्ही पहिलेच सायकलस्वार असूं. आमच्याकडे क्षणभर ते पाहतच राहिले. मग त्यांनी आमची चौकशी केली. आम्ही कॉलेज-विद्यार्थी होतों आणि इंदूरहून सायकलीवर सतत प्रवास करीत सहा दिवसांनी मुंबईला पोचलों होतों हें ऐकल्यावर त्यांनी आम्हांला बसायला सांगितलें, आणि ते म्हणाले,

"कांही हरकत नाही दिवे नसले तर. तुम्ही जा तसेच तुमच्या मुक्कामावर. कुणीं विचारलं तर सांगा, किंग्जवे पोलीस स्टेशनने परवानगी दिली म्हणून."

हें त्यांचें आश्वासन कायद्याला धरून होतें की नुसता आपला मोठेपणा दाखवण्यासाठी केलेला पोकळ देखावा होता ह्याचा आम्हीं विचार केला नाही!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत. ९९
अनुक्रम २०१५१ दि: २२-५-७१

त्यांनी आम्हांला पुढे जाऊं दिलें ह्याचाच आम्हांला आनंद होता. आम्हीं त्यांचे आभार मानले आणि सायकलीवर चढून पुढे निघालों. आणि त्या रात्रींचा मुक्काम दादरला डोंगरे बागेजवळच्या एका चाळींत ओळखीच्या बिऱ्हाडीं—म्हणजे बिऱ्हाडाच्या बाहेर जिन्याशेजारच्या मोकळ्या जागेंत—केला.

दुसऱ्या दिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत मुंबई जितकी पाहतां आली तितकी पाहिली. मुंबईहून निघणाऱ्या रस्त्यांचे मैल जिथून मोजतात तें सेण्ट टॉमसचें कोटांतलें कथीड्रल, त्याच्या शेजारचा तो रुंद पायऱ्यांचा भव्य टाऊन हॉल, फाउंटन, प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम, अपोलो बंदर, राजाबाई टॉवर, हायकोर्ट वगैरे इमारती पाहिल्या. गिरगावांतून हिंडलों. भायखळा, राणीचा बाग, लाल बाग, परळ वगैरे भागांतून गेलों. मुंबईंत सायकलीवरून कसें हिंडतां येईल ह्याची आरंभीं थोडीशी धास्ती वाटत होती. पण मग लक्ष्यांत आलें की, आपली बाजू सांभाळली आणि थोडेंसें सावध राहिलें तर तें फारसें कठीण नाही.

रात्र पुन्हा आदल्या दिवसाप्रमाणेच दादरला काढली आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून (म्हणजे मुंबईला आल्याच्या तिसऱ्या दिवशीं) चहा वगैरे उरकून आठ वाजण्याच्या सुमाराला बापू आणि मी पूर्वी ठरल्याप्रमाणे पुण्याकडे रवाना झालों. अण्णासाहेब मुंबईलाच राहणार होते त्याप्रमाणे राहिले. माटुंग्याहून शींवकडे जातांना किंग्ज्वे पोलीस ठाण्याकडे नजर गेली. मनांतल्या मनांत त्याचा कृतज्ञतेने निरोप घेतला. ह्याच रस्त्याने दोन दिवसांपूर्वी मुंबईंत आलों होतों तेव्हा रात्रीची वेळ होती. त्यामुळे आसपासचें फारसें दिसलें नव्हतें. आताहि फारसें दिसत नव्हतें. कारण पाहण्यासारखें कांही नव्हतेंच. इमारती फारशा झालेल्या नव्हत्या. रस्त्याच्या कडेच्या दोन्ही बाजू मोकळ्याच होत्या. थोड्याच वेळांत आम्ही शींव स्टेशनाजवळ रेल्वेचा पूल ओलांडून कुर्ल्याच्या वाटेला लागलों. म्हणजे मुंबई सुटली. इंदूरहून सुरू झालेल्या आमच्या प्रवासाचा एक मोठा टप्पा संपून दुसऱ्या टप्प्याला आरंभ झाला होता.

आम्ही कुर्ल्याच्या वाटेला लागलों तेवढ्यांत रेल्वे रस्त्याकडून एक कर्कश, भसाडा आणि पसरट भोंगा ऐकूं आला. वळून पाहतों तो एक बिनइंजिनाची गाडी कुर्ल्याहून मुंबईकडे चालली होती. ती विजेची गाडी. विजेच्या लोकल गाड्या नुकत्याच मुंबईपासून कुर्ल्यापर्यंत चालू झाल्याचें आम्हीं ऐकलें होतें. पण

पाहिली आता पहिल्यांदाच. ती बिनइंजिनाची गाडी म्हणजे एखाद्या बिन-तोंडाच्या सावजासारखी दिसत होती. आणि तसें तें राक्षसी सावज धाडधाड करीत चालतांना मोठें विचित्र, भयानक वाटत होतें.

ग्रंथालय १२९८०

कुर्ल्याहून घाटकोपरच्या बाजारपेठेच्या गर्दींतून, विक्रोळी, भांडूप मागे टाकीत दोन दिवसांपूर्वीच्याच रस्त्याने आम्ही ठाण्यांत पोचलों. इथे आग्र्याकडे जाणारा रस्ता सोडून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलों.

प्राचीन काळांतलें श्रीस्थानक, मार्को पोलोच्या वेळचें मोठें बंदर, पोर्तुगीज राजवटींतलें आणि त्या राजवटींतल्या खिस्ती धर्माच्या प्रसाराचें, तें महत्त्वाचें केंद्र ह्या वेळीं अगदी गचाळ आणि घाणेरडें दिसत होतें. घरें जवळ जवळ आणि लहान, रस्ते अरुंद आणि खडबडीत, त्यांच्या दोन्ही बाजूंचीं गटारें उघडीं आणि चोंदलेलीं. पण किल्ल्यापाशीं आलों तसें मोकळें मैदान लागलें आणि बरें वाटलें. ह्याच किल्ल्यांतून, खाडीच्या बाजूला उडी टाकून, त्रिंबकजी डेंगळे ब्रिटिशांच्या कैदेंतून पळाला होता. "झुडपांच्या मागे तीरंदाज लपले आहेत. झाडाखाली घोडा उभा आहे. तिथे पंचावन्न घोडे आहेत आणि चौपन्न घोडे-स्वार आहेत. पंचावन्नावा स्वार घोड्यावर चढला की दख्खनचें भाग्य पुन्हा उजळेल." असें गाणें गात गात, इंग्रज अंमलदाराच्या एका मराठा मोतद्दाराने त्याला इशारा दिला, आणि तो इशारा ओळखून त्रिंबकजी पळाला. पुढे इतिहास बदलला असता तर, कुणी सांगावें, त्या त्याच्या धाडसाची, शिवाजीने मिठाईच्या पेटाऱ्यांत बसून आग्ऱ्याच्या किल्ल्यांतून आपली सुटका करून घेतली तिच्याशीं तुलना झाली असती.

त्या किल्ल्याकडे आणि त्याच्या मागच्या खाडीच्या भागाकडे पाहत पाहत कळव्याच्या पुलावरून आम्ही पुढे चाललों. त्रिंबकजीवरून दुसरा बाजीराव पेशवा, त्याच्यावरून त्याच्या वेळचें पुणें, त्याच्यावरून मराठी राज्याची अखेर, असें आमचें बोलणें चाललें होतें, आणि चाकांखालचा रस्ता मागे पडत होता.

खोपोलीला पोचेतों संध्याकाळ झाली. गावांत बापूचे एक नातेवाईक होते. त्यांच्याकडे रात्रींचा मुक्काम व्हायचा होता. मुक्कामावर पोचल्यावर सायकली ठेवून हातपाय धुतले आणि चहा घेऊन बाहेर पडलों. कारण गावांत नाना फडणिसांनी बांधलेलें एक मोठें तळें आहे, तें बापूच्या मनांतून मला दाखवायचें

होतें. तळें चांगलें मोठें, विस्तीर्ण, अष्टकोणी आहे. शेजारीं एक छोटेंसें देऊळ आहे. शांत चांदण्यांत देखावा चांगला दिसत होता. शेजारच्या डोंगराचें, देवळाचें, चंद्राचें आणि आभाळाचें प्रतिबिंब तळ्यांत पडलें होतें त्याच्याकडे पाहत आम्ही तिथे थोडा वेळ बसलों. पण आमच्या मनांतून शक्य तर टाटाचा विजेचा कारखाना पाहायचा होता. एवढ्या रात्रीं पाहायला मिळेल की नाही ह्याबद्दल शंका वाटत होती. पण तसेच गेलों, आणि कारखान्याच्या दारांत उभे राहिलों. सुदैवाने तिथले इंजिनियर महाराष्ट्रीयच होते. आम्ही विद्यार्थी होतों आणि खूप लांबून प्रवास करीत आलों होतों ही आमची मोठी आणि मुख्य शिफारस ! त्यानी आम्हांला कारखाना दाखवायचें कबूल केलें, आणि सरासरी पुरुष-सव्वापुरुष उंचीच्या एका चाकाजवळ आमच्या शेजारीं उभे राहून "टाटाचीं तीन तळीं आहेत..." ह्या शब्दांनी बोलायला आरंभ केला. ते अस्खलितपणे किती तरी वेळ बोलत होते.

"...ड्यूक्स नोजजवळ आमचं फोअर-बे आहे. तिथे मोठ्या नळांत पाणी शिरतं, आणि एकदम सतराशे चाळीस फूट खाली कोसळतं..." आम्ही ज्या चाकापाशीं उभे होतों त्याला, हत्तीच्या कानांचे द्रोण केले तर ते जेवढे होतील तेवढ्या आकाराच्या दुहेरी ओंजळी रहाटगाडग्याच्या माळेसारख्या लावल्या होत्या... "आणि ह्या टर्बाइन्स तीस हजार अश्वशक्ति निर्माण करतात..." आमच्या कानांवर इंजिनियरसाहेबांचे शब्द पडत होते..."पायलन्सवरून ही वीज—एक लक्ष व्हॉल्ट्सची—परळच्या रिसीव्हिंग स्टेशनमध्ये नेली आहे..." डोंगरावरून नळांतून येणारें पाणी त्या रहाटगाडग्यांतल्या ओंजळींत पडून चाकें प्रचंड वेगाने मिनिटाला सोळाशें फेरे किंवा अशाच कांही तरी गतीने फिरतात, आणि त्यांचा विजेच्या निर्मितीशीं कांही तरी संबंध आहे, एवढेंच आम्हांला समजलें. आणि केव्हाहि कोणीहि सांगितलें असतें तरी तेवढेंच समजलें असतें. आम्हांला अवेळीं कारखाना पाहायला मिळाला ह्याचाच आनंद (आणि अभिमानहि) वाटत होता. एकंदरींत दिवस चांगला गेला ह्या आनंदांत घरीं परतलों, आणि जेवण उरकून झोपेच्या स्वाधीन झालों.

सकाळीं उठून पाहतों तों सह्यपर्वत एखाद्या प्रचंड भिंतीसारखा गावाला अगदी खेटून उभा असलेला दिसला. इतक्या जवळ इतका मोठा डोंगर पाहून थोडेंसें दबल्यासारखें वाटूं लागलें. गावालाहि दबल्यासारखें वाटत नसेल का? गावाच्या सगळ्या हालचालींवर ह्या डोंगराची नजरच नव्हे तर नियंत्रणहि असेल.

पावसाळ्यांत सगळा डोंगर वेगवेगळ्या हिरव्या-पिवळ्या रंगांच्या छटांनी सर्वंध रंगून जात असेल आणि त्यांतच, त्याच्या आकाशाला भिडणाऱ्या अजस्र देहावरून, लहान-मोठे ओहळ-धबधबे रेंगाळत-वाहत-कोसळत असतील आणि सगळें गाव त्यांत न्हाऊन निघत असेल. पावसाळा संपत आला की नाना प्रकारचीं, नाना रंगांचीं रानफुलें ह्या डोंगरांत फुलत असतील आणि त्यांच्या वासाने सारें खोरें कोंदाटून जात असेल. आणि उन्हाळ्यांत झाडांचे खराटे होऊन डोंगराचें उघडें पडलेलें अंग तापत असेल तेव्हा सारा गाव तगमगत असेल. ह्या वेळीं डिसेंबरांत डोंगराची हिरवी विस्तार-शोभा अजून पूर्ण नाहीशी झाली नव्हती. पण हळूहळू हें कमी होणार आहे हें दिसत होतें.

नेहमीप्रमाणे चहा-न्याहारी उरकून आम्ही आठ-साडेआठाच्या सुमाराला पुन्हा वाटेला लागलों. पण दोन-तीन फर्लांग गेलों नाही तोच घाटाचा चढ सुरू झाला आणि खाली उतरून सायकली हातांनी रेटीत नेणें भाग पडलें. इंदूरहून मुंबईला येईपर्यंत आम्हांला अधूनमधून लहान-मोठे चढ लागले तरी एकंदरींत वाट उताराचीच होती. पण आता भोरघाटाचा पांचसहा मैलांचा उरावर आलेला चढ रेटायचा होता. आमच्याजवळ सामान जवळजवळ मुळींच नव्हतें, तरी सायकली ढकलीत तो चढ चढणें फार जड वाटत होतें. त्यांत पुन्हा पायांची चालायची सवय अगदी गेली होती. पांच मैल चढून जायला आम्हांला अडीच-तीन तास लागले.

लोणावळ्याजवळचें तळें, कार्ल्यांच्या लेण्यांकडे जाणारा रस्ता, हीं मागे टाकीत चाललों. जिथे इंग्रजांचा आणि मराठ्यांचा तह झाला (आणि जो इंग्रजांनीच पुढे धुडकावून लावला) तें वडगाव, दाभाड्यांचें तळेगाव, शेलारवाडी वगैरेवरून खडकींतून पुण्याला पोचे तो संध्याकाळचे चार-साडेचार व्हायला आले.

आम्ही पुण्यांत शिरलों ते नव्या पुलावरून थेट शनवारवाड्याच्या दिल्ली दरवाज्याकडे तोंड करून. ज्या गावाला रेल्वे स्टेशन असतें त्या गावांत दुसऱ्या एखाद्या रस्त्याने शिरणें, हें गावाचे व्यवहार चालू असतांना त्याला नकळत मागल्या दाराने अनौपचारिकपणें अचानक शिरल्यासारखें वाटतें, तसेंच हें

आमचें पुण्यांत शिरणें होतें. निदान माझें. कारण बापू पुण्याचाच होता. मी मात्र जाणतेपणीं असा पहिल्यांदाच पुण्याला येत होतों.

"मी पहिल्यांदाच पुण्याला येत होतों." हें एवढें वाक्य मी काय करीत होतों तें संपूर्णपणें सांगूं शकणार नाही. पुणें म्हणजे नुसतें एक पुणें नव्हतें. पुणें म्हणजे शिवाजी लहानपणीं जिथे राहिला-खेळला-वाढला, जिथे त्याने खिडकींतून पळून जाणाऱ्या शाइस्ताखानाच्या हाताचीं बोटें कापलीं, तें पुणें; थोरल्या बाजीरावाचें पुणें; पेशव्यांचें पुणें; नाना फडणिसाचें पुणें; नारायणराव पेशव्याचा जिथे वध झाला, जिथे सवाई माधवराव दिवाणखान्यांतल्या गादीवर पडायच्या ऐवजी 'चुकून' खालच्या हौदांतल्या कारंजावर पडला आणि प्राणाला मुकला, तें पुणें; जिथे अंगांतली चोळी काढून भर दिवसा, भर रस्त्याने, श्रीमंतांच्या वाड्यांत कोण जातें ह्याबद्दल घरंदाज स्त्रियांत पैज लागायची आणि एखादी घरंदाज स्त्री ती पैज जिंकायचीहि (असें म्हणतात), तें पुणें; चिपळूणकरांचें पुणें; टिळक-आगरकरांचें पुणें; सुधारकांचें पुणें; सनातन्यांचें पुणें; शाळा-कॉलेजांचें पुणें; विद्यार्थ्यांचें पुणें; वेगवेगळ्या संस्थांचें पुणें; पुढाऱ्यांचें पुणें;—अशीं अनेक पुणीं होतीं आणि तीं सगळीं पुन्हा एकाच पुण्यांत होतीं. अशा 'एकं सद् बहुधा' पुण्यांत मी शिरत होतों. त्यामुळे पुण्यांत शिरतांना माझें मन दाटलें होतें, तसें तें मुंबईत शिरतांना दाटलें नव्हतें.

खडकी मागे पडली, आणि पुणें जवळ आलें, असें बापूने सांगितलें तेव्हाच विचारां-कल्पनांची माझ्या मनांत कालवाकालव चालू झाली होती. नवा पूल उतरून शनवारवाड्याच्या जवळ आलों, शनवारवाडा उजवीकडे टाकून कसब्यांतून जिजाबाईचा लाल महाल (म्हणजे त्या महालाची जागा) आणि शनवारवाडा ह्यांच्यामधून बुधवारकडे जाऊं लागलों, आणि जातां जातां एकएक ठिकाण बापू दाखवूं लागला, तसा इतिहास माझ्यावर चालून आल्यासारखा वाटला मला.

दोन दिवसांच्या मुक्कामांत जेवढें पुणें दाखवतां येईल तेवढें बापूने दाखविलें. तो नूतन मराठीचा विद्यार्थी. साहजिकच त्याने आपली शाळा आधी दाखवली. समोरची हुजूरपागा दाखवली. शेजारचा हरिभाऊ आपट्यांचा आनंदाश्रम दाखवला. गायकवाडवाडा दाखवला. ब्राह्मणांचें तसेंच ब्राह्मणेतरांचें अशीं दोन्ही ओंकारेश्वरें दाखविलीं. पर्वती दाखवली. फर्ग्युसन (की फर्गसन्?) कॉलेज दाखवलें.

फर्गसन कॉलेजकडून परत येतांना लकडी पुलाशीं आल्यावर समोर आणि आजूबाजूला पाहिल्याबरोबर क्षणभर मी थबकलों. गावाशीं अगदी सलगी करीत जाणारी मुठा नदी (तिचें नांव इतकें रूक्ष कां ?), पलिकडली चढत जाणारी जमीन, मागची पर्वतीची टेकडी, आणखी पलिकडचा सिंहगड, नदीच्या दोन्ही बाजूंचे लांबवर गेलेले आणि निळ्या धूसरतेंत विलीन झालेले डोंगर! ह्या संबंध देखाव्याने लक्ष वेधून घेतलें. ह्या हिवाळ्यांतहि हा सगळा देखावा इतका रमणीय दिसत होता, मग पावसाळ्यांत आणि त्यानंतर किती सुंदर दिसत असेल! 'पुण्याला नुसता मन गुंतवून ठेवणारा इतिहासच नाही तर डोळे गुंतवून ठेवणारा आसमंतहि लाभला आहे,' मीं मनाशींच म्हटलें.

पुण्यांत सायकल चालवणें हें मुंबईत सायकल चालवण्यापेक्षा कठीण आहे असें मला दिसून आलें. मुख्य रस्त्यांपासून (तेहि अरुंदच) फुटणारे किंवा त्यांना येऊन मिळणारे लहानमोठे रस्ते-बोळ दर दहापांच पावलांनी आडवे येत, आणि वळणापलीकडून येणाऱ्यांशीं टक्कर होईल की काय अशी सारखी भीति वाटे. माझी आपली समजूत अशी की, सायकलवाल्याने घंटा वाजवली की, पायीं चालणाऱ्याने त्याला वाट करून द्यायची. पण पुण्यांत तसें नाही. (निदान त्या वेळीं नव्हतें.) पायीं जाणारे जसे जात असतील तसे त्यांना जाऊं देत, किंवा वाटेंत मध्येच उभे असतील तर त्यांना धक्का न लावतां, आपण त्यांच्यामधून शिताफीने सायकल काढायची अशी तिथली रीत आहे. रस्त्याने जाणाऱ्या गाईम्हशी आणि माणसें तिथे सायकलवाल्याच्या दृष्टीने सारखींच. पुण्यांतून सायकल चालवतांना मला सारखी भीति वाटे की, मी तरी कोणावर आपटेन किंवा माझ्यावर तरी कोणी येऊन आपटेल आणि मला पुण्याचें अस्सल मराठी ऐकावें लागेल. म्हणूनच मी अतीच सावधगिरीने सायकल चालवीं. त्यामुळे बापू पुढे निघून जाई आणि मी जत्रेंत वाट चुकलेल्या मुलासारखा भांबावून जाई. पुण्यांतल्या ह्या सायकलस्वारींत मला कांहीहि अपघात झाला नाही ह्याचें श्रेय माझ्या कौशल्याला नसून पुण्यांतल्या धीम्या प्रकृतीच्या समंजस वाटसरूंना आणि तरबेज सायकलस्वारांना आहे आणि त्याबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी राहीन.

पुण्याला आम्ही पोंचलों तेव्हाच इंदूरहून सुरू केलेला आमचा सायकलचा प्रवास संपला होता. सातआठ दिवस मजल दरमजल चाललेल्या प्रवासांतला पुणें हा शेवटचा टप्पा होता. दोन दिवसांनी पुण्याचाहि मुक्काम

संपला. आता आमचा प्रवास पुन्हा सुरू होणार होता. पण तो परतीचा होता.

इंदूरपासून पुण्यापर्यंत एकंदर सुमारे पांचशे मैलांचा प्रवास झाला. ह्या सगळ्या प्रवासांत सायकलींनी कांहीहि त्रास दिला नाही. एकदासुद्धा पंक्चर काढावें लागलें नाही. आणि एकदाच किरकोळ दुरुस्ती करावी लागली, ती थालनेरजवळ तापीच्या काठीं. पाणवठ्यावर खेडवळ (आणि खट्याळ ?) तरुणी धुणीं धुताहेत, तिथून पाण्याचे हंडे डोक्यावर घेऊन डोळे मोडीत लयबद्ध चालीने गावाकडे जाताहेत, आणि त्यांच्या पावलांच्या तालावर त्याचे नतोन्नत अवयव हेलकावताहेत, अशीं अंगें पुलकित करणारीं दृश्यें आम्हांला कुठे दिसलीं नव्हतीं. एकदा एका गावांतून जात असतांना रस्त्यांतल्या चार-दोन मुलांनी आमच्या सायकली पाहून, 'घोडा घोडा म्हणतात तो हाच,' अशा आविर्भावांत "टांग-गाडी, टांग-गाडी" अशा आरोळ्या मारल्या, तेवढेंच 'जनते'चें आमच्याबद्दलचें कुतूहल. ह्या सबंध प्रवासांत पोलिसांनी आम्हांला कुठेहि अडवलें किंवा हटकलें नाही. मुंबईतसुद्धा आम्ही आपण होऊन पोलिस ठाण्यांत गेलों नसतों तर तिथेहि त्यांनी कदाचित् आमच्याकडे लक्ष दिलें नसतें. आम्ही मध्यरात्रीं कांही प्रवास केला नाही; पण रात्रीच्या नऊ-दहा वाजेपर्यंत केला. पण आमची कुठे चोर-दरवडेखोरांशी गाठ पडली नाही. म्हणजे तसा आमचा प्रवास विशेष कांही न घडतांच झाला. पण प्रवास घडला हेंच विशेष झालें.

■ ■

# दिल्ली अजून दिल्लीच आहे

दर्यागंजमधल्या खैराती दरवाज्याजवळच्या जीनतुल्मसजिदचे उंच मनोरे दिसूं लागले तसें मीं मनाशीं म्हटलें, दिल्ली जवळ येत चालली. गाडी उंच बांधावरून चालली होती. खालच्या बाजूला डबकीं साचलीं होतीं, त्यांच्या काठाशीं माणसें अंघोळी करीत होतीं, भांडीं घाशीत होतीं, धुणीं धूत होतीं. हीं सगळीं माणसें निर्वासितांपैकी होतीं हें त्यांच्या राहणीवरूनच दिसत होतें.

यमुनेच्या पुलावरून गाडी दिल्लींत शिरली, आणि डाव्या बाजूला किल्ला आणि उजव्या बाजूला १८५७चे अवशेष मागे टाकून पाहतां पाहतां स्टेशनांत पोचली.

मी स्टेशनाच्या बाहेर येऊन तांग्यासाठी आवारांत नजर टाकतों तो तांग्यांची जागा ऑटोरिक्षांनी घेतलेली दिसली.

"दिल्ली आता पूर्वीची राहिली नाही. खूप बदलली आहे." असें मला मी दिल्लीला जायला निघालों तेव्हा कोणीं तरी म्हटलें होतें त्याचा हा पहिला प्रत्यय आला. पूर्वी दिल्लींत मीटरच्या टॅक्सी नव्हत्या, त्याहि आता पुष्कळच दिसत होत्या. आणि त्याखेरीज मोठ्या जीपसारखीं, लष्करांतल्या खेचरांच्या गाड्यांसारखीं, बेळगावांतल्या शिग्रामांसारखीं, पुणेरी तांग्यासारखीं पण मोटारीवर चालणारीं आणखीहि नाना प्रकारचीं वाहनें तिथे स्टेशनाच्या आवारांत होतीं.

हींहि स्वातंत्र्याबरोबर ह्या देशांत आलेलीं असावीं. स्वातंत्र्यापूर्वीच्या दिल्लींत इतकीं बेढब वाहनें खपलीं नसतीं. दिल्लीवाल्याला सगळें नफीस---नाजुक आणि सफाईदार—लागत असे. हें सगळें 'भद्दें' होतें. त्या वेळचे दिल्लींतले तांगे कोरे चकचकीत दिसत. आणि "चल मेरे बेटे" असें मंत्र म्हटल्याप्रमाणे तोंडांतल्या तोंडांत पुटपुटलें तरी चट्चट् धावूं लागणारे घोडे त्यांना जुंपलेले असत. ह्या तांग्यांवर आणि घोड्यांवर तांगेवाल्यांचें जिवाभावाचें प्रेम असे. सध्यांचीं हीं वाहनें कार्यक्षम असतील, तिमारपूरपासून विनयनगरपर्यंत माणसें आणि सामान लादून न्यायला सोयीचीं असतील, पण प्रेम करण्यासारखीं मुळीच नव्हतीं.

क्वीन्स रोडने डावीकडे येऊन लोधियन रोडने टॅक्सी दिल्ली दरवाजाकडे जाऊं लागली. किल्ल्याजवळ येतांच रस्त्याच्या कडेने गावोगाव दिसणाऱ्या निर्वासितांच्या पत्र्या-फळ्यांच्या दुकानांच्या रांगा लागल्या. गावचे रस्ते, बागा, मैदानें आणि इमारती ह्यांचें सौंदर्य घालवणारी ह्या एकखणी दुकानांसारखी दुसरी वस्तु नसेल! दिल्लींत पूर्वी कुरूप बांधकामें नव्हतीं असें नाही, पण ह्या सर्रास कुरूपतेला तोड नाही. उपयुक्ततावादाबद्दल कोणाच्या मनांत घृणा उत्पन्न करायची असेल तर त्याला नुसतें असल्या दुकानांच्या रांगांतून एकदा फिरवून आणलें तरी पुरेल. दिल्लींत घरांची टंचाई फार असल्यामुळे मोकळी जागा दिसेल तिथे छप्पर म्हणा, घर म्हणा, उभारणें आलेंच. त्याप्रमाणे किल्ल्यासमोरच्या मैदानांत जामे मसजिदीचें दृश्य झाकून टाकणारीं घरें उभीं राहिलीं आहेत आणि राहताहेत. हें सगळें पाहून मला माझ्या जुन्या ओळखीची दिल्ली ओळखूं येईनाशी झाली.

नवी दिल्लीच्या जो जो जवळ जाऊं लागलों तो तो गेल्या आठदहा वर्षांत उभीं राहिलेलीं बांधकामें जिकडून तिकडून डोळ्यांवर आदळूं लागलीं. दिल्ली-दरवाजाबाहेर आता मरहूम बॅ. असफअलींचा पुतळा उभा आहे आणि दिल्ली दरवाज्यापासून अजमेरी दरवाजापर्यंत तटाच्या बाहेरच्या अंगाने चारचार पांचपांच मजली मुंबईवजा इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्यांच्यामागे तट आहे हें आता दिसतहि नाही.

कोटला फिरोजशहा मागे टाकून रेल्वेच्या पुलाखालून कॉनॉट प्लेसकडे जाऊं लागलों तसा जिथे पूर्वी मोकळीं मैदानें होतीं तिथे मोठमोठीं भवनें, मंजिल, आणि सभागृहें दिसूं लागलीं. त्यामुळे पूर्वीच्या ओळखीच्या खुणा अनोळखी

झाल्या आणि पूर्वी ज्या ठावठिकाणाबद्दल खात्री वाटत होती त्याबद्दल संशय वाटूं लागला.

खुद्द कॉनॉट प्लेसमध्ये किती फरक पडला आहे हें पूर्वीचें कॉनॉट प्लेस ज्याला माहीत असेल त्यालाच कळेल. नवी दिल्लीच्या इतिहासांत एक वेळ अशी होती की, एप्रिलच्या पंधरा तारखेपासून ऑक्टोबरच्या पंधरा तारखेपर्यंत भर दिवसादेखील कॉनॉट प्लेसमध्ये माणूसच काय, चिटपाखरूहि दिसत नसे. तें मधलें वर्तुळाकार मैदान, त्याच्या भोवतालच्या त्या इमारती आणि त्यांच्यापुढून जाणारे उंच उंच खांबांचे ओसरीवजा फूटपाथ हें सगळें इतकें अफाट, उदास आणि भकास दिसत असे की, एकस्यादुकस्याला एखाद्या शाबूत पण ओसाड शहरांत आल्यासारखें वाटे. उन्हाळ्याच्या दिवसांतल्या दुपारच्या भगभगीत उन्हांत तर हा रितेपणा अधिकच जाणवे. आणि तिन्हीसांजानंतर अंधार गोळा होऊं लागला म्हणजे उदासपणा दडपणासारखा मनावर येई, आणि भीति वाटे.

पंधरा ऑक्टोबरनंतर सिमल्याला गेलेलीं ऑफिसें परत येऊं लागलीं कीं, दुकानांची झाड-झटक होऊन नवीन मालाची भरती आणि मांडामांड होऊं लागे. आणि मग नोव्हेंबर-डिसेंबर आला की, मऊ लोकरीचे ऊबदार कपडे घालून सकाळच्या पिवळ्या चुरचुरीत उन्हांत किंवा संध्याकाळीं विजेच्या दिव्यांच्या लखलखाटांत बाजारहाट करणाऱ्यांची किंवा उगीचच हवाखोरीला आलेल्यांची गर्दी कॉनॉट प्लेसमध्ये दिसूं लागे. नाताळांत आणि त्याच्या आगे-मागे देशी-परदेशी पाहुण्यांची ह्या गर्दींत भर पडून त्याला एक प्रकारची विविधरंगी शोभा येई. मधल्या मैदानांत निरनिराळ्या तांबड्या-पिवळ्या भडक रंगांच्या कर्दळींचीं वेटेंहि त्या वेळेला फुललेलीं असत आणि त्यांच्याभोवती मुद्दाम वाढवून कापलेली वेगवेगळ्या आकारांची हिरवळ असे. त्यामुळे कॉनॉट प्लेसच्या रंगदार प्रसन्नपणांत आणखी भर पडे.

पूर्वी ऋतुमानाप्रमाणें गर्दीची भरती-ओहोटी असे. आता दिल्लीची वस्ती पूर्वीच्या अनेकपट झाली आहे. आणि आता दिल्लीचीं ऑफिसें उन्हाळ्यांत सिमल्याला जात नाहीत. त्यामुळे कॉनॉट प्लेस भर उन्हाळ्यांत सुद्धां गर्दीनें गजबजलेलें असतें. आणि इतरहि दृष्टींनी आतां कॉनॉट प्लेस पूर्वीचें राहिलेलें नाही. पूर्वी दिल्लींत देशाच्या सर्व प्रांतांतली आणि कांही परदेशांतली माणसें दिसत असलीं तरी आता जितक्या देशांतलीं माणसें दिसतात तितकीं पूर्वी दिसत नसत. आणि तेव्हा दिल्लीला जो दिल्लीपणा होता तसा तो आता

राहिल्यासारखा वाटत नाही. देशविभाजनाच्या वेळीं दिल्लींतले हजारो लोक, पिढ्यान पिढ्यांचे दिल्लीकर दिल्ली सोडून पाकिस्तानांत गेले आणि पाकिस्तानांतून लाखों लोक दिल्लींत आले. सरकारी कचेऱ्या आणि खातीं, नाना देशांच्या वकिलाती, माहिती-प्रसिद्धि-संस्था, लहानमोठ्या देशी-परदेशी व्यापारी कंपन्या ह्यांत नोकऱ्या करण्यासाठी आणखी हजारों लोक इथे आलेले आहेत. सरकारी खात्यांतून आपलीं कामें करून घेण्यासाठी, तसेंच शहाजोगपणानें किंवा लबाडीने नाना प्रकारच्या उलाढाली करण्यासाठी अनेक धाडशी लोक इथे ठाण मांडून किंवा जाऊनयेऊन असतात ते वेगळेच. त्यामुळे आता दिल्लींत मूळचे दिल्लीकर नसलेल्यांची इतकी गर्दी झाली आहे, की पंडित जवाहरलाल नेहरूंना हवा त्यापेक्षाहि अधिक कॉस्मॉपॉलिटनिझम तिथे दिसूं लागला आहे. दिल्ली आमची आहे आणि आम्ही दिल्लीचे आहों, असें म्हणूं शकणारे तिथे जर कोणी राहिले असतील तर त्यांनी सगळ्यांनी मिळून तसा आक्रोश केला तरी तो ह्या इतरांच्या कॉस्मॉपॉलिटन कोलाहलांत कोणाला ऐकूं जाणार नाही.

ह्या वैश्विकतेचें दर्शन स्त्रियांच्या वेशभूषेंत जसें घडतें तसें इतर कशांतहि घडत नाही. पूर्वीहि दिल्लींत वेषाढ्य स्त्रिया होत्या आणि त्याहि शृंगारसाधना करीत. पण त्या कोणत्या प्रांताच्या आहेत हें ओळखूं येण्याइतका त्यांत वेगळेपणा असे. केशभूषेचे आणि केशरचनेचे प्रकारहि त्या वेळीं परिमित असत. केशाग्रांना त्या वेळीं अश्व(पुच्छ)घाटी वृत्त प्राप्त झालेलें नव्हतें. चोळ्या कंबरेकडच्या बाजूने आटूं लागल्या नव्हत्या आणि त्यांच्या बाह्या कोंपरांकडच्या बाजूने खाली सरकूं लागल्या नव्हत्या. आणि अलंकारांसाठी भारतीय संस्कृतीचें उत्खनन करण्याची आवश्यकता भासूं लागली नव्हती. भुवनेश्वर आणि खजुराहो, अजंठा आणि हळेबीड, सांची आणि मथुरा ह्या ठिकाणच्या कलाकृतींचीं मासिकांतून येणारीं आर्ट पेपरवरचीं रंगीत आणि बिनरंगी चित्रें पाहिल्यावर, फार प्राचीन काळींसुद्धा आपल्या स्त्रिया अगदी अद्यतन पद्धतीने मेक-अप् करीत होत्या ह्याचा आधुनिक स्त्रियांना जो एकदम साक्षात्कार झाला त्यामुळे त्यांच्या मेक-अपूमध्ये दहाव्या आणि विसाव्या शतकांचा समन्वय दिसूं लागला. ह्या समन्वयाच्या चालत्याबोलत्या पुतळ्या हव्या तेव्हा आणि नको तेव्हाहि आतां कॉनॉट प्लेसमध्ये दिसतात.

ह्या समन्वयाच्या सोयीसाठीच की काय, कॉनॉट प्लेसमध्येच आता एक मोठा कॉटेज इंडस्ट्रीज डेपो उभा राहिला आहे. तिथे भारतीय संस्कृतीचे विविध

आणि विपुल पुनरुजीवित नमुने मिळूं शकतात. आणि त्यांच्याच शेजारीं पायवाटेच्या बाजूला भारतीय संस्कृतीचीं दुकानें पसरलीं आहेत. तिथे नेपाळ-तिबेटपासूनचें कल्चर मिळूं शकतें. सध्या 'कल्चर'ला किती मागणी आहे हें त्या दुकानदारांना चांगलें माहीत झालें आहे. आणि ह्या भारतीय 'कल्चर'चें खरें गिऱ्हाईक आपले भारतांतले लोक नसून रबीच्या हंगामांत पिकासारखे येणारे परदेशी प्रवासी पाहुणे आहेत हेंहि त्या दुकानदारांनी ओळखलें आहे. आणि त्यांनी आपल्या वस्तूंच्या किंमती ह्या पाहुण्यांच्या पैशांच्या पिशवीकडे पाहून ठेवल्या आहेत.

कॉनॉट प्लेसमधल्यादेखील डोळ्यांना विसावा देणाऱ्या मोकळ्या जागा आता दुकानांनी आणि गिऱ्हाइकांनी इतक्या व्यापून टाकल्या आहेत की, कॉनॉट प्लेसला पसरलेला चांदनी चौक म्हणायला हरकत नाही.

मुंबईत कोटांत हिंडत असतांना एखाद्या पाश्चात्य शहरांत हिंडत असल्यासारखें वाटतें (खरें म्हणजे तिथले महारोगी, भिकारी आणि गृहहीन फुटपाथवासी पाहिल्यावर वाटूं नये), असें तिकडले आणि तिकडे जाऊन आलेले कांही लोक सांगतात. नवी दिल्लींत तसें वाटतें की नाही कुणाला ठाऊक, पण ब्रह्मी, मलायी, थायी, इंडोनेशियन, फिलिपीनो, चिनी, जपानी, अमेरिकन आणि इतर देशांच्या स्त्रीपुरुषांच्या गर्दींतून हिंडतांना आपण आपल्या एखाद्या शहरांत आहों की नाही ह्याची शंका मात्र पुष्कळदा आल्यावाचून राहत नाही.

दिल्लींत पडलेला फरक कॉनॉट प्लेसमध्ये हिंडतांना तर जाणवतोच पण इतरत्रहि जाणवतो. पूर्वी व्हाइसरीगल लॉज तुम्हांआम्हांला 'आउट ऑफ बाउंड' होता. आता तिथल्या दर्शनी इमारतींत राष्ट्रीय पुरावस्तुसंग्रह ठेवलेला आहे. तिथे जाऊन आता कोणालाहि भारतांतल्या मूर्तिशिल्पाचें विहंगदर्शन घेतां येतें. सारनाथचा वृषभ, नागार्जुनकोंडाचा शिलापट्ट, मथुरेचा बुद्ध, ऐहोळेपासून हळेबीडपर्यंतचें चालुक्य शिल्प, मोहेन जो दडोच्या उत्खननांत सापडलेल्या कृति आणि त्यांच्या प्रतिकृति आणि आणखी किती तरी वस्तु तिथे तुमचा दृष्टिकोन कलाभिमुख करण्यासाठी आणि प्राचीन भारताच्या संस्कृतिवैभवाचें तुम्हांला दर्शन घडविण्यासाठी सज्ज आहेत.

तसेंच पूर्वीच्या राजेरजवाड्यांच्या हवेल्या आणि महाल आता त्यांचीं निवासस्थानें राहिलीं नाहीत. त्यांची आता वेगळ्या कार्यांकडे योजना झाली आहे. एखाद्या राजप्रासादांत आधुनिक भारतीय चित्रांचा राष्ट्रीयसंग्रह आहे तर दुसऱ्याचा दुसऱ्या कशासाठी उपयोग केला आहे.

नवी दिल्लीच्या बाहेर सफदरजंगच्या पलीकडेपर्यंत तसेंच पंचकुई रोडवरून पहाडीवरून हिंदुरावच्या वाड्यापर्यंत आणि सबंध करोल बागभर मोकळ्या जागांत घरें उभीं राहिलीं आहेत.

हा बाहेरचा भाग सोडून शहरांत गेलें म्हणजे देखील कांही फरक पडलेला सहज दिसतो. नेहमीच गर्दी असलेल्या चांदनी चौकांत अधिकच गर्दी जाणवते. चांदनी चौकांच्या ऐन मध्यावरचें घंटाघर कोसळलें आहे आणि त्याच्या जागीं आता ट्रॅफिक आयलंड आलें आहे. त्यामुळे तो भाग ओका वाटूं लागला आहे. मिठाईवाल्याच्या दुकानांतल्या वस्तु पूर्वी नुसत्याच रचलेल्या असत. त्यावर आता काचेच्या झाकणी-पेट्या ठेवल्या आहेत. कांही जुनीं ओळखीचीं दुकानें नाहीशीं झालीं आहेत, आणि त्यांच्या जागीं नवीं अनोळखी आलीं आहेत. गर्दी होतीच; तिच्यांतली दाटी आणि बकालीपणा मात्र आणखी वाढला आहे.

पण दिल्लींत हे सगळे फरक पडले असले तरी ते वरवरचे आहेत. दिल्लीचा गाभा अजून होता तसाच आहे. आणि दिल्लींत जोपर्यंत थोडेबहुत तरी खरे दिल्लीकर आहेत तोपर्यंत तो तसाच राहील. पुष्कळांना नवी दिल्ली म्हणजेच दिल्ली असें वाटतें. ज्यांनी जुनी दिल्ली अंतर्बाह्य पाहिली नाही आणि जे तिच्याशीं समरस झाले नाहीत त्यांनी दिल्ली पाहिली असें म्हणतां येत नाही, जाणली असें तर नाहीच नाही. कारण खरी दिल्ली तीच आहे. आणि ती अजून बरीचशी पूर्वीचीच आहे. 'गली बताशां'च्या, 'बाजार सीताराम'च्या, किंवा 'गंधी गली'च्या आत शिरून फेरफटका मारून या. तिथले कांही जुने लोक गेले असतील. कांही नवे आले असतील. पण नूर पूर्वी होता तोच आहे. चांदनी चौकांत अजूनहि ट्रामगाड्या बेफाम धावताहेत. आणि अजूनहि पॅसेंजरच ड्रायव्हर्सना 'अरे भाई, बांधके.' असे इषारे देताहेत. चांदनी चौकांत अजूनहि गुरेंढोरें बिनदिक्कत शतपावली करताहेत. दरीब्यांत अजूनहि कुरानमजीद विकणारे आणि रोशनाई-फरोश आहेत. फत्तेपुरीजवळ अजूनहि भाजीवाले रंगसंगति साधून भाज्या रचताहेत. खिरण्या, बोरें, शहतूत आणि लुकाट विकणारे अजूनहि त्यांवर जरीच्या तारांची आणि गुलाबाच्या पाकळ्यांची पखरण करताहेत. खारी बावलीकडून नॉव्हेल्टी सिनेमाकडे जाण्यासाठी तुम्ही त्या तिथल्या गल्लींत शिरलांत तर अजूनहि तुम्हांला तिथे चांदीसोन्याचे

वर्ख तयार करणाऱ्यांच्या हातोड्यांची लयबद्ध ठक्-ठक् ठक्-ठक् ऐकूं येईल. अजूनहि तिथल्या गल्लयांतून बकऱ्यांचीं मुंडकीं रचलेल्या टोपल्या डोक्यांवर घेऊन जाणारे लोक दिसतील. अजूनहि कांही ठिकाणीं भिंतीवर तुम्हांला "कुरबानी की खालें यतीम खानेको खैरात कीजिये" अशी जाहीर विनंती रंगविलेली दिसेल.

नया बाजारांतून जातांना तिथल्या अवजड बैलगाड्या आणि प्रचंड मोटार-ट्रक्स ह्यांच्या वेड्यावाकड्या गर्दीमुळे अजूनहि अडखळल्यासारखें होतें, आणि 'बाझारे हुस्न'मध्ये कांही ठिकाणीं इतर लोकांनी घुसून बिऱ्हाडें केलेलीं असलीं, तरी अजूनहि 'हुस्न' तिथे आहे हें त्या गच्च्यांकडे आणि माड्यांकडे पाहिलें म्हणजे दिसून येतें.

दिल्लीच्या गल्लोगल्लींतल्या मशिदींतून अजूनहि पूर्वीसारखी अज़ान होत असेल, आणि हिवाळ्याच्या दिवसांत पहाटेच्या वेळीं अजूनहि "नमाज़ तैयार है नमाज़ को." अशी ललकारी देणारा माणूस गल्लीगल्लींतून हिंडत असेल.

दिल्ली बदलली आहे खरी. पण जो पाहूं शकेल त्याला न ओळखूं येण्याइतकी नाही. दिल्ली अजून दिल्लीच आहे.

■ ■

# फिर्दौस बर्‌रुए ज़मीं

वाटाड्या घेऊन, वाटाड्यावाचून, आणि स्वतः वाटाड्या होऊन मी दिल्लीच्या लाल किल्ल्यांत इतके वेळां गेलों आहें की, एव्हाना मला वाटाड्याचें बोलणें आणि किल्ला जवळजवळ पाठ झाला आहे. तरी पण मला मधूनच कधी तरी पुन्हा तिथे जावेसें वाटतें. आणि संधि मिळाली तर मी जातों. आणि बहुधा वाटाड्याला बरोबर घेऊन जातों. त्याचें तें पाठ म्हटल्यासारखें बोलणें ऐकायला मला आवडतें. मीहि आता अर्धामुर्धा वाटाड्या झालों आहें. त्यामुळे किल्ला पाहतांना बरोबर कोणी मित्र असला तर त्या वाटाड्याबरोबर मधूनमधून मीहि बोलूं लागतों.

लाहोरी दरवाज्यांतून आत शिरून छत्ताबाजारांतून बाहेर पडून नगारखान्याच्या दरवाजांत शिरलें की माझ्यांतला वाटाड्या जागा होतो आणि बोलूं लागतो,

"ह्या तांबड्या दगडावर कोरलेलीं हीं लिलीचीं फुलं पाहा. अशीं आंतहि पुष्कळ ठिकाणीं दिसतील. पानं आणि पाकळ्या वळल्या आहेत, त्यांचीं वळणंसुद्धा ह्यांत दाखवलीं आहेत. आपण आपल्या कलेंत वास्तव चित्रण नाही असं म्हणतों, पण ह्या कोरीव कामांत वास्तवाचं हुबेहूब चित्रण आहे आणि कलेला आवश्यक तेवढा त्यांत फरकहि करून घेतला आहे." आग्रा न पाहतांच जर माझा मित्र दिल्लीला आला असला—आणि असें पुष्कळदा होतें—तर नगार-

खान्यांतलें तें काम पाहून तो कौतुक करूं लागतो. त्यांतूनहि अधिक कौतुक करण्यासारखी कारागिरी पुढे आहे हें त्याला माहीत नसतें.

"नगारखान्याच्या दरवाज्यांतून फक्त खाशा शाहजाद्यांनाच घोड्यावर स्वार होऊन आत जाण्याची परवानगी होती. इतरांना पाय-उतारा होऊन जावं लागे."—आमच्या वाटाड्याचें बोलणें कानावर पडतें.

नगारखान्याच्या दालनांत भिंतीवर आणि कोनाड्यांत चुन्याच्या सफेदीचे थरावर थर दिलेले आहेत. त्यांचे चार-चार, पांच-पांच, सहा-सहा पापुद्रे वेगवेगळे दिसतीलसे हलक्या हातांनी मोकळे केलेले आहेत. त्यांतून एकाखाली एक रंगवलेलीं, कुठे तींच तर कुठे वेगळीं, चित्रें दिसतात. तीं चित्रें, त्यांचे रंग, त्यांची कारागिरी पाहत असतांनाच, 'सगळ्यांत खालच्या पापुद्र्यापासून सगळ्यांत वरच्या पापुद्र्यापर्यंत किती वर्षें गेलीं असतील! शाहजहानानंतर पुन्हा कुणाकुणाच्या कारकीर्दींत हीं चित्रें रंगवलीं गेलीं असतील?' असा आपल्या मनाशीं प्रश्न करीतच आम्ही पुढे सरकतों.

नगरखान्याच्या अगदी पायथ्याशीं येऊन समोर नजर टाकीपर्यंत 'दीवाने आम'च्या भव्यतेची कल्पना येत नाही.

"ह्या पटांगणांत बाजूला जीं झाडं दिसताहेत, तिथे पूर्वी मंडपासारखं बांधकाम होतं, आणि मध्ये मोकळ्या जागेंत शामियाने घालीत असत. त्या जागेंत सरदार-दरखदार लोक दरबारच्या वेळीं उभे राहत."

'दीवाने-आम'चा रेखीव भव्यपणा, आणि डौलदारपणा मनांत उतरतो आहे न उतरतो आहे तोच वाटाड्या पुढे सांगतो, "यह हाल सौ फूट लंबा, और साठ फूट चौड़ा है. इतना बड़ा हाल आपको और कहीं नहीं मिलेगा."

खरें म्हणजे आग्र्याचा दीवाने-आम ह्याच्यापेक्षा पुष्कळच मोठा आहे आणि दक्षिणेकडल्या मंदिरांत तर ह्याच्यापेक्षा मोठाले सहस्रमंडप किती तरी असतील. पण त्या सहस्रमंडपांत पहिल्या एकदोन रांगांतले खांब काय ते मनांत भरण्याजोग्या सुबक किंवा भव्य कोरीव कामाने नटलेले असतात. त्यांच्यामागे नुसते चौकोनी चिरे वरच्या छताला आधार म्हणून उभे केलेले असतात आणि खांबांमधलें अंतर तर इतकें कमी असतें की, मंडपांच्या भव्यपणापेक्षा खांबांच्या गर्दीचेंच मनावर अधिक दडपण पडतें. आणि कित्येक मंडपांच्या आवतीभोवती पुरेशी मोकळी जागाहि ठेवलेली नसते. त्यामुळे 'दीवाने-आम'चा प्रमाणशीरपणा, भव्यपणा, आणि डौलदारपणा जसा मनावर ठसून राहतो तसा त्यांचा राहत नाही.

पूर्वी सर्व खांबांना आणि छताला सफदरजंगच्या मकबऱ्यांतल्यासारखा चुन्याचा चकचकीत गिलावा केलेला होता, तेव्हा तो अधिक भव्य दिसत असेल की आता अधिक भव्य दिसतो ? गिलाव्याच्या फिक्ट हस्तिदंती रंगामुळे प्रकाश फाकून त्या वेळीं तो कदाचित् अधिक प्रशस्त दिसत असेल. पण आताच्या त्याच्या तांबुस-गुलाबी रंगामुळे त्याचा भव्यपणा कमी झाल्यासारखा मात्र मुळींच वाटत नाही.

"जहां आप खडे हैं वह दूसरी 'आदाब-गाह' कहलाती थी. यहां आतेहि अंदर आनेवाले कोर्निश करते थे. पहली आदाब-गाह नक्कारखानेके दरवाजेमें थी, और तिसरी 'दीवाने-खास'के दरवाजेमे है, जो आप आगे चलके देखेंगे. वहाँ एक लाल बानातका पर्दा लगा रहता था."

नगारखाना आणि 'दीवाने-आम' ह्यांच्या मधल्या पटांगणांत सरदार-दरखदार आपापल्या इतमामाप्रमाणे उभे राहत. तसेंच खुद्द 'दीवाने आम'मध्येसुद्धा सरदारांना, अमीर-उमरावांना उभें राहण्यासाठी त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे जागा आखून दिल्या होत्या, आणि मध्ये कठडे घालून त्यांचें वेगळेंपण दाखवून देण्यांत आलें होतें. आता तिथे कठडे नाहीत, पण त्यांचे खुंटे जिथे रोवलेले होते तीं भोकें अजून तिथे आहेत आणि आडवे दांडे घालण्यासाठी खांबांत केलेल्या खोबण्याहि आहेत.

"मुख्य वजिराला उभें राहण्यासाठी इथे हा आरसपानी चौरंग आहे. त्यावर उभें राहून त्याने वर सज्ज्यांत मसनदीवर बसलेल्या बादशहाच्या हातांत कागदपत्र द्यायचे."

सज्ज्यांतलें दगडाच्या पच्चीकारीचें काम पाहतांना कौतुकाने इतर सर्व गोष्टींचा विसर पडतो. किती रंगांचे, आणि प्रत्येक रंगांतल्या किती वेगवेगळ्या छटांचे दगड त्यांत वापरले आहेत ! फुलांची पाकळी टोकाशीं थोडीशी मुरडली असली, तर ती मुरड आणि तिच्या मागच्या-पुढच्या अंगच्या रंगांतला फरक तिथे दाखवला आहे. फुलांच्या बाहेरच्या आणि आंतल्या पाकळ्यांच्या रंगच्छटांतला फरक तिथे दाखवला आहे. आणि प्रत्येक पाकळी वेगळी दिसावी ह्यासाठी त्यांच्यांत मध्ये विभाजक रेषाहि ठेवल्या आहेत. पक्ष्यांच्या एका पिसांत मुळापासून टोकापर्यंत रंग बदलत गेलेला दाखवला आहे आणि पंखांत तर पिसांचे वेगवेगळे रंग दाखवलेच आहेत. आणि हें सगळें त्या त्या रंगांचे वेगवेगळे दगड बसवून केलें आहे. त्यांत पक्ष्यांचे आणि फुलांचे प्रकारहि किती आहेत ! भूमितीने सिद्ध होणाऱ्या आकृति आहेत. आणि वास्तवदर्शी चित्रेंहि आहेत.

"नाखुन जितनी जगहमें पचीस पत्थर लगे हैं. देखिये." असें म्हणून वाटाड्या दाखवूं लागतो. पण ह्या वेळीं मात्र त्याची सराइत लुडबुड नकोशी वाटते. हा सगळा रंग-रस निर्वेधपणें, निःशब्दपणें आंतल्या आंत उतरूं द्यावा असें वाटत असतें. दिवाणखान्याच्या बाकीच्या भागाच्या निरलंकार भव्यतेमुळे ह्या छोट्या सज्ज्याच्या दृष्टिसुभग अलंकृतीला विशेष उठाव मिळाला आहे.

"यह शाह बुर्ज है. यहांसे पानी तमाम महलोंमेंसे बहता हुआ जाता है. वही 'नहरे बहिश्त' कहलाता है."

"'नहरे बहिश्त' म्हणजे स्वर्णदी." मी खुलासा करतों.

शाह बुर्जमधली पाण्याची व्यवस्था पाहून 'दीवाने-खास'कडे चाललें म्हणजे वाटेंत बादशाह बहादुरशहाने—शेवटल्या मोगल बादशहाने—बांधलेली 'हीरा महल' नांवाची बारादरी लागते. बहादुरशहाच्या वेळीं मोगल सल्तनतीचा आणि मोगल सत्तेचा जो संकोच झाला होता त्याचें प्रतीकच वाटावी इतकी ती लहान आणि ओकीबोकी आहे.

आटपशीर आकाराची, महालाला अगदी लगटलेली मोती मसजिद, आणि ज्यांत दररोज शंभर-सव्वाशे मण सर्पण जळत असे ते ऊन आणि गार पाण्याने स्नान करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असलेले शाही हमाम पाहून 'दीवाने-ख़ास'मध्ये आलें की लाल किल्ल्याच्या गाभाऱ्यांत आल्यासारखें वाटतें. आणि तें खरेंच आहे.

'दीवाने-ख़ास' हा शाहजहानच्या वैभवाचा, वास्तुप्रियतेचा आणि कलासक्तीचा कळस आहे. त्याच्या संगमरवरी खांबां-कमानींवरचें सोनेरी आणि काळ्या रंगांतलें रेखीव आणि वळणदार सजावट-काम संयत आणि डोळ्यांना सुखावह आहे. 'दीवाने-ख़ास'चा विस्तार 'दीवाने-आम'इतका नाही. कारण बोलून-चालून खाजगी दरबार भरवण्याचा दिवाणखाना तो. पण त्याचा साजशृंगार अधिक समृद्ध आणि अधिक शोभिवंत आहे.

ज्याच्या दोन्ही बाजूंना माणकें, मोतीं, पाचू, इंद्रनील इत्यादि विविध रत्नांचें यथोचित जडावकाम केलेले पसरलेल्या पिसाऱ्याचे मोर होते; ज्याच्या मध्यभागीं सबंधच्या सबंध पाचूंतून कोरलेला पोपट होता; ज्याचे पाय, खांब आणि सबंध अंग सोन्याचें केलेलें होतें आणि ज्याला चोहीकडे मोत्यांच्या झालरी होत्या तें सुप्रसिद्ध मयूरसिंहासन ह्या सभामंडपांतच होतें. आणि ह्याच मंडपांत शाहजहान आणि त्याच्यानंतरचे बादशाह रोज सकाळ-संध्याकाळचे खास दरबार भरवीत असत. पहिल्याने 'दीवाने-आम'मधला दरबार होत असे, नंतर इथला. दरबार

अदालतीचा असला म्हणजे मुख्य वजीर, मीर अदल, मीर मुन्शी, बक्षी वगैरे सर्व अधिकारी आपापल्या कामाचे कागदपत्र इथे बादशाह जहांपन्हाला सादर करीत आणि राज्यकारभाराचें काम संपलें की, इथेच नाच-गाणीं होत.

पण शाहजहाननंतर 'दीवाने-खास'ने तसें वैभव पुन्हा पाहिलें नाही. दिल्ली ही जरी औरंगजेबाची राजधानी असली, आणि त्याने जरी तिथून राज्य केलें असलें, तरी त्याच्या आयुष्याचीं बहुतेक वर्षें दक्षिणेंत गेलीं आणि तिकडेच त्याचा मृत्यु झाला. त्याचा मृत्यु झाला आणि मोगल सत्तेचा सूर्य मावळतीकडे ढळला.

ज्या 'दीवाने-खास'ने शाहजहानचे वैभवशाली दरबार पाहिले त्यानेच, औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अवघ्या तीस वर्षांनी, शाहजहानचें तें 'तख्ते ताऊसी' नादीरशाहाने लुटून नेलेलें पाहिलें, आणि त्यानंतर वीस-बावीस वर्षांनी आपलें चांदीचें छत मराठ्यांनी फोडलेलें पाहिलें. त्यांत बादशाहतीचा—मोंगल सत्तेचा—अपमान होता, पण प्रत्यक्ष बादशहाचा तरी नव्हता.

पण त्याच 'दीवाने-खास'ने तोहि पाहिला. गुलामकादर रोहिल्याने बादशाह शाह आलमला आपल्या हाताने 'दीवाने-खास'मध्यें ओढून आणून चाबकाने मारलें. बादशहाला आणि शहाजाद्यांना तीन दिवस अन्नपाण्यावांचून कैदेंत ठेवलें. बादशहाच्या तख्तावर आपण स्वतः हुक्का ओढीत बसून शाहजाद्यांना आपल्यापुढे उभें करून गायला आणि नाचायला लावलें. बादशहाजवळ पैशाचा तगादा लावून, त्याने पैका नाही म्हणतांच तख्तावरून उतरून आपल्या हातांतल्या खंजिराने स्वतः त्याचे डोळे फोडले आणि त्याला फरफटत ओढीत कैदेंत नेलें. बेगमांचा सगळा असबाब काढून घेऊन, त्यांची जामातलाशी करून, त्यांना 'दीवाने-खास'समोरच्या उघड्या गच्चीवर उन्हांत उभें करून मारवलें. बादशहाच्या बहिणीच्या उरावर रोहिल्यांना पैशासाठी पाय रोवून बसायला लावलें, आणि त्यांतच तिला जिवें मारलें.

हें सगळें ह्या 'दीवाने-खास'ने पाहिलें. त्याच्या त्या सोनेरी नकशीच्या संगमरवरी खांबांनी आणि कमानींनीच नाही तर उत्तरेकडल्या आणि दक्षिणे-कडल्या कमानींच्या वरती बसून

"अगर फिर्दौस बरूए ज़मीन् अस्त्
हमीन् अस्त् ओ हमीन् अस्त् ओ हमीन् अस्त्"

असें सांगणाऱ्या सुरेख वळणदार सोनेरी ओळींनीहि पाहिलें. हीं भयानक

आणि बीभत्स दृश्यें जेव्हा त्या ओळींनी पाहिलीं असतील तेव्हा त्यांना आपली स्वतःचीच लाज वाटली असेल. आपण ह्या सभामंडपाचें 'पृथ्वीतलावरचा स्वर्ग' म्हणून वर्णन करतों आहों आणि इथे तर हीं नरकालाहि खाली पाहायला लावणारीं कृत्यें चाललीं आहेत, हा विचार त्यांना येऊं शकला असता तर त्यांची सोनेरी झळाळी काळीठिक्कर पडली असती, आणि तिथून नाहीसें होणें त्यांच्या हातीं असतें तर त्या तिथून नाहीशा झाल्या असत्या.

त्यानंतर पुरीं शंभर वर्षेंहि झालीं नाहीत तो मोगल रियासतच खतम झाली. ज्या 'दीवाने-ख़ास'ने बादशहाचा शाही दरबार भरलेला पाहिला त्या 'दीवाने-खास'ने जनरल विल्सनने दिल्ली जिंकून किल्ल्यांत मुक्काम आणल्यावर तिथे खाना घेतलेला पाहिला. बादशाह बहादुरशहाला, ज्या सिंहासनावर तो कांही दिवसांकरिता कां होईना, बादशाह म्हणून बसला त्याच सिंहासनासमोर गुन्हेगार म्हणून दीनवाणें उभें राहावें लागलें, तें ह्या 'दीवाने-ख़ास'ने पाहिलें. आणि दिल्लीवर स्वारी करून दरारा बसवणाऱ्या तैमूरलंगच्या त्या वंशजाला दिल्ली सोडून देशाबाहेर जाण्याची शिक्षा पत्करावी लागली तेंहि त्याने पाहिलें.

आणि अजूनहि त्या ओळी तिथे बसून हा 'दीवाने-ख़ास' "फिर्दौस बरुए ज़मीं" आहे असें सांगताहेत.

लाल किल्ला हा मोगल बादशहांचा राजवाडा होता. त्यांचें राहण्याचें ठिकाण होतें. राजघराण्यांत जरी राज्य मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी राजकारणें आणि कारस्थानें चालत असलीं, तरी राजघराण्याचा सगळाच वेळ कारस्थानांत जात असे असें नाही. राजघराण्यांतलीं माणसें आपसांत खेळत आणि करमणूकहि करीत. बादशाह, बेगमा, शहाजादे वगैरेंनी खेळण्यासाठी जीं बुदबळें, सोंगट्या, गंजीफा वगैरे वापरल्या त्या रंगमहलशेजारच्या 'मुमताझ-महल'मधल्या वस्तुसंग्रहांत ठेवलेल्या आहेत. पानदानें, अत्तरदानें, उगालदानें, तबकें, पेट्या, डब्या वगैरे राजघराण्यांतल्या लोकांच्या नित्याच्या वापरांतल्या नाना प्रकारच्या इतर वस्तूहि त्या संग्रहांत आहेत. बादशाह आणि शाहजादे ह्यांनी शोभेसाठी, युद्धासाठी, किंवा शिकारीसाठी तरवारी, जंबिये वगैरे जीं शस्त्रें वापरलीं तींहि तिथे आहेत. तसेंच बादशाह बहादुरशाह आणि बेगम ज़ीनत-महल ह्यांचे—कदाचित् शेवटचेच—भरजरी पोषाखहि त्या संग्रहांत आहेत. ह्या वस्तूंवरून काळाचा प्रवाह गेल्यामुळे त्या सर्वांवर एक प्रकारचें कळकलेपण चढलें आहे. पण त्यांतूनहि त्यांची कलाकुसर आणि मूळची श्रीमंती दिसल्यावाचून राहत नाही.

राजकुटुंब मोठें होतें. एकेका वेळीं त्यांत किती तरी शाहजादे आणि शाहजाद्या असत. गुलामकादर रोहिल्याने आपल्याबरोबर एकोणीस शहाजाद्यांना कैद करून नेलें, आणि १८५७च्या उठावानंतर एकवीस शहाजाद्यांना फासावर लटकावण्यांत आलें. शिवाय दोन शाहजादे दिल्ली दरवाजाबाहेर गोळी घालून मारले गेले ते वेगळेच.

बादशाहत गेली आणि लाल किल्ला उजाड झाला. शाही खानदानांतले अनेक शाहजादे, शाहजाद्या, बेगमा ह्यांच्यासाठी आवारांत अनेक महल होते, घरें होतीं, त्यांची पडझड झाली. तिथे जंगल वाढलें. आज लाल किल्ल्यांत सगळीकडे मोकळ्या जागेंत ज्या रेखलेल्या—निगा राखलेल्या—बागा दिसताहेत, त्या जुन्या नष्ट झालेल्या महालांच्या जागांवर पसरलेल्या आहेत. ह्या सगळ्या उभ्या आणि जमीनदोस्त झालेल्या इमारतींत, महालांत आणि त्यांच्या आवतीभोवतीच्या आवारांत दोन-अडीचशे वर्षांच्या मोगल राजवटींत जें जें घडलें त्यासंबंधीच्या आठवणींचे परस्परांना टकरा देणारे प्रसन्न आणि गढूळ प्रवाह, किल्ल्यांतून बाहेर पडतांना मनांत कल्लोळ करूं लागतात आणि त्यांतूनच "फिर्दौस बर्‌रुए ज़मीं हमीनस्त" असें सांगणाऱ्या 'दीवाने-खास'मधल्या त्या ओळींचे सोनेरी मासे इकडून तिकडे सुरकांड्या मारीत जा ये करीत असतात.

■ ■

# मथुरा
# देवनिर्मिता

"**बा**बूजी, जूते उतारके जाइये."

चाणूर, मुष्टिक आणि शेवटी कंस ह्यांचा वध केल्यानंतर श्रीकृष्ण आणि बलराम सर्व श्रमांचा परिहार करण्यासाठी आणि विश्रांति घेण्यासाठी यमुनेच्या काठीं ज्या ठिकाणीं गेले तिथे, म्हणजे विश्रामघाटाकडे, मी चाललों होतों. मथुरेंतल्या यमुनेच्या काठचा हा सर्वांत पवित्र भाग आहे. घाटावर एक सुंदर सुबक संगमरवरी देऊळ—देऊळ म्हणजे एक मंडप—आहे. तिथलें कांही काम मुंबईतल्या एका गुजराती श्रेष्ठीच्या खर्चानें झालें आहे. त्याचा तिथला लेख वाचीत, मनांतल्या मनांत समाधान पावत, देवळाकडे पुन्हा वळून पाहत मी घाट उतरूं लागलों.

खरेंच. जोडे काढून ठेवून घाट उतरायला हवा होता. माझ्या लक्षांत आलें नव्हतें. मी मागे वळून पाहिलें. एक पंचवीसतीस वर्षांचा, भरलेल्या अंगाचा मनुष्य होता तो. धोतराचा काचा मारलेला, मलमलीचा मुंढेछाट कळीदार सदरा अंगांत, आणि डोक्याला मलमलीची घडीची टोपी घातलेली आणि कपाळावर चंदनाचें गंध लावलेलें. त्यानेंच मला हटकलें होतें. मी जोडा काढून ठेवला आणि पुन्हा उतरूं लागलों. माझ्या मागोमाग उतरत तो मला म्हणाला,

"बाबूजी, जमनाजीको कुछ फूलवूल नाहीं चढायेंगे?"

"जी नहीं." मीं म्हटलें.

"वाह, फिर इतनी दूर क्यौं आये ? आप बम्बईके मालूम होते हैं. रेलपर कितना पैसा खर्च किया होगा ? क्या जमनाजी के लिये कुछ नहीं करना चाहते ?"

मथुरेच्या पंड्यांच्या मस्तवाल तंटेखोरपणाबद्दल मीं ऐकलें होतें. आणि मथुरेच्या चौब्याशिवाय घाटावर इतर कुणालाहि उपाध्येपण करतां येणार नाही अशी पाटीहि वाचली होती. त्याच्याशीं हुज्जत घालण्याची मला इच्छा नव्हती. त्याच्याकडे लक्ष न देतां मी तसाच पायऱ्या उतरूं लागलों. मला पाहायचीं होतीं यमुनेंतलीं कासवें. मीं ऐकलें होतें की, मथुरेला यमुनेंतलीं कासवें हलवायाच्या कढईइतकीं मोठीं असतात. तीं काठावर बसलीं म्हणजे लोक त्यांच्या पाठींना खडक समजून त्यांच्या पाठीवर धुणीं धुतात, इतकेंच नाही तर शेगडी पेटवून स्वयंपाक करूं लागतात. आणि तीं हालचाल करूं लागलीं म्हणजे आपली चूक त्यांच्या लक्षांत येते. मला कांही कढईइतकीं मोठीं कासवें दिसलीं नाहीत. पण कढईच्या पिलांइतकीं मोठीं होतीं. निमूटपणे पाण्याच्या बाहेर येतात, काळसर चमकदार वाळूंतून पुढे सरकतात आणि आरामांत वाळूंत बसून राहतात. तोंड आणि पाय त्यांनी पोटाखाली घेतले म्हणजे त्यांचा तो काळा रंग खरोखर वाळूंत मिसळून जातो आणि तिथे लहानमोठे गोल दगडच पडले असावेत असें वाटतें. तीं माणसांना चांगलींच सरावलीं आहेत आणि घाटावर माणसें दिसलीं की पाण्यांतून पुढे येतात. संध्याकाळीं जेव्हा विश्रामघाटावर आरती होते तेव्हा माकडें, गायी आणि कासवें यांना लोक खायला घालतात. त्या वेळीं यमुनेच्या काठावर कासवांची खूपच गर्दी होते, आणि तीं एकमेकांना ढुशा देत पुढे येतात.

मथुरा ही राजधानी कंसाची असली तरी मथुरानिवासी लोकांचा ओढा तेव्हाहि कृष्णाकडेच होता. श्रीकृष्णाचा जन्म मथुरेंत झाला. त्याच्या बाललीला गोकुळांत आणि रासलीला वृंदावनांत झाल्या, आणि त्याचे सगळे शक्ति-पराक्रम मथुरेच्या परिसरांत आणि मथुरेंत झाले. बालपणांतल्या त्याच्या सगळ्या पराक्रमांचा परमोत्कर्ष म्हणजे कंसाचा वध. आपल्या नगरीच्या राजाचा वध केल्याबद्दल नागरिकांनी त्याच्यावर राग धरायचा तें उलट त्यांना त्याचा आनंदच वाटला. कारण कंसाच्या राज्याला सगळे कंटाळले होते. कंसवधामुळे संतापलेला त्याचा सासरा जरासंध सतरा वेळां मथुरेवर चालून आला. पण सतराहि वेळां त्याला निराश होऊन परतावें लागलें. अठराव्यांदा त्याने

कालयवनाचें साहाय्य घेतलें, तेव्हा मात्र कृष्णाला सर्व यादवांना घेऊन द्वारकेला जावें लागलें. पण त्यामुळे मथुरावासियांचें कृष्णावरचें प्रेम कमी झालें असें मात्र नाही. कारण पुढे त्याने जरासंधाचा वध नाही का करवला? आणि भारतीय युद्धांतलें त्याचें राजकारण आणि तत्त्वोपदेश हीं सगळीं कुरु-पांचाल, मत्स्य इत्यादि शूरसेन जनपदाच्या आसपासच्या प्रदेशाशींच नव्हतीं का संबंधित? शिवाय त्याचा मोठेपणा म्हणजे एक प्रकारें व्रजमंडलाचाच मोठेपणा. म्हणूनच सगळें व्रजमंडल कृष्णमय झालेलें आहे. कोणाला त्याच्या बाललीलांचें कौतुक वाटतें. कोणी त्याच्या रास-विलासांच्या स्मरणाने रागरंजित होतात. कोणाला त्याची शक्ति आणि त्याचे पराक्रम स्तिमित करतात. तर कोणी त्याच्या मुत्सद्देगिरीची स्तुति गातो. आणि त्याची गीता तर सर्वांना शिरसावंद्य झाली आहे. द्वैती-अद्वैती, योगी-सांख्यवादी, भक्तिवादी, ज्ञानवादी, कर्मवादी आणि अनासक्तिवादी—सगळ्यांना गीता आपली माउली वाटते. सगळ्यांना तिचा आधार वाटतो. त्यामुळे कृष्णभक्तीचा महिमा सतत वाढतच चालला आहे. सूरदास, मीराबाई, चैतन्य ह्यांच्यासारखे हिंदूच नव्हेत तर रसखान, रसलीन, शेख आणि अकबराचा सेनापति—बैरमखानाचा मुलगा—अब्दुर्रहीम खानेखानां ह्यांच्यासारख्या मुसलमानांनाहि त्याचा महिमा गावासा वाटला.

साहजिकच मथुरेंत आणि आसपास वेगवेगळ्या नांवांनी सगळीं देवळें श्रीकृष्णाचींच आहेत. कुठे मदनमोहन आहे तर कुठे राधाकृष्ण, कुठे केशवजी तर कुठे गोविंदजी, कुठे जुगलकिशोर तर कुठे द्वारकाधीश, कुठे मुरलीधर तर कुठे गोपालकृष्ण, कुठे ठाकुरजी तर कुठे रंगजी. सगळे कृष्णच. कृष्ण-बलराम ही लहानपणीं अभेद्य जोडी होती. साहजिकच दाऊजीचीं—बलरामाचींहि—कांही मंदिरें आहेत. आणि गाव म्हटलें म्हणजे शंकराचीं, गणपतीचीं, देवीचीं देवळें असायचीं तशीं तींहि आहेत. बहुतेक सगळीं देवळें घाटावर किंवा जवळच आहेत.

पण घाटावरल्या आणि गावांतल्या असल्या सर्व मंदिरांपेक्षाहि अधिक महत्त्वाचें, सगळ्यांत दीर्घ इतिहास असलेलें आणि इतिहासाला ज्ञात असें सातत्य असलेलें एक स्थान मथुरेंत आहे. परंतु भाविकांना त्याचें महत्त्व नाही. तें म्हणजे कटरा केशवदेवमधलें श्रीकृष्णाचें जन्मस्थान. भाविकांना त्याचें महत्त्व नाही, ह्याचें कारण त्या ठिकाणीं बादशहा औरंगजेबाने बांधलेली मसजिद आहे. अयोध्येंत रामाच्या जन्मस्थानीं बाबराने मसजिद बांधली आहे. कटऱ्यांतली मसजिद पाहतांना हें दोन्ही स्थळांतलें साम्य लक्षांत आल्यावाचून राहत नाही.

मथुरेंत देवळांची गर्दी आजच आहे असें नाही. दोनअडीच हजार वर्षांपूर्वीपासून तिथे हिंदु, जैन आणि बौद्ध ह्यांचीं असंख्य मंदिरें बांधलीं गेलीं, त्यांचे इसवी सनपूर्व चवथ्या शतकापासूनचे अवशेष सापडले आहेत आणि अजून सापडताहेत. टॉलेमीने मथुरेचें वर्णन 'देवतांचें नगर' असें केलें आहे. ह्यूएनत्सांगने इथे किती तरी बौद्धविहार पाहिले. बौद्ध लोकांच्या उत्सवांच्या वेळीं सगळ्या नगरभर रंगीबेरंगी छत्र्या दिसत असत आणि पावसासारखी पुष्पवृष्टि होत असे असें तो म्हणतो. ह्याशिवाय हिंदूंचींहि मंदिरें तिथे त्याने पाहिलीं. इतके वेळां आक्रमण, विध्वंस आणि फोडतोड झाली असूनसुद्धा पुन्हापुन्हा आपल्याच अवशेषांतून जिवंत होऊन उठून इतक्या प्राचीन कालापासून आजतागायत भरभराटत असलेलें दुसरें नगर हिंदुस्थानांत क्वचितच असेल. पंजाबांतून भरतखंडाच्या मैदानांत उतरल्यावर पहिलें महत्त्वाचें नगर लागतें तें मथुरा. त्यामुळे भारतावर स्वारी करणाऱ्या प्रत्येक टोळीने आणि हल्लेखोराने मथुरेवर स्वारी केली आहे. तसेंच अनेक राजवंशांनी मथुरा ही आपल्या राज्याची राजधानी किंवा उपराजधानी केली आहे. त्यामुळेच मथुरा हें विद्या, कला, व्यापार-उदीम आणि संपत्ति ह्यांचें एक मोठें केंद्र राहिलें आहे.

हिंदुस्थानावर सतरा वेळां स्वारी करणाऱ्या गझनीच्या महमुदाच्या झपाट्यांतून मथुरा सुटणें शक्यच नव्हतें. तिथल्या देवळांची आणि त्यांतल्या संपत्तीची कीर्ति त्याच्या कानावर गेलेलीच होती. तिथलें केशवदेवाचें मंदिर पाहून तो म्हणाला, "उत्तमोत्तम कारागीर जरी कामाला लावले तरी असें मंदिर बांधायला कमींत कमी दोनशें वर्षें लागतील आणि त्याला एक कोटि दिनार खर्च येईल." मथुरेंतल्या देवळांची लूट आणि मोडतोड त्याने वीस दिवस चालवली. तिथून जातांना त्याने आपल्याबरोबर जी लूट नेली तिच्यांत सोन्याच्या पांच मूर्ति होत्या. त्यांची किंमत पन्नास हजार दीनार होती. आणखी एका सोन्याच्या मूर्तीचें एकटीचें वजन चौदा मण होतें. चांदीच्या मूर्ति एका उंटावर एक अशा शंभर होत्या. आणि एकंदर संपत्ति जवळजवळ तीन कोटींची होती.

इतर सर्व प्राचीन शहरांप्रमाणे मथुरा शहराचीहि वस्ती सरकत गेली आहे. रामायणकालीं मधुपुरी म्हणून जी पुरी होती तिचें नांव सध्या महोली आहे. तें मथुरेच्या शेजारीं नैर्ऋत्येकडे दोन मैलांवर आहे. तिथपासून आजच्या मथुरेसकटच्या परिसरांत कंकाली टीला, कंस टीला, चामुंडा टीला, टोकरी टीला असे अनेक टीले किंवा टेकाडें आहेत. खुद्द कटरा केशवदेव हाहि उंचसरच

भाग आहे. ह्या टेकड्यांच्या पोटांत इतिहासांतली मथुरा लपलेली आहे.

ह्या लपलेल्या मथुरेचे पुष्कळ अवशेष मधूनमधून, प्रसंगाप्रसंगाने हस्तगत झाले ते मथुरेच्या पुराणवस्तुसंग्रहालयांत ठेवलेले आहेत. ते मथुरेचा इतिहास डोळ्यांपुढे उभा करतात. मौर्य किंवा त्यापूर्वीच्याहि काळापासून तो अगदी अलीकडच्या काळापर्यंतच्या लहानमोठ्या मूर्ति, स्तंभ, शिलापट्ट, भांडीं वगैरे तिथे कालानुक्रमाने ठेवलेलीं आहेत. त्यांत देव आहेत, देवी आहेत, यक्ष-गंधर्व-किन्नर आहेत, राजे आहेत, सामान्य स्त्रीपुरुष आहेत, मुलें आहेत, पशुपक्षी आहेत, नागनागिणी आहेत, सुंदर ठाणमाणाच्या मूर्ती आहेत. मिळाल्या त्या जागेंत बसलेल्या आहेत. क्रीडामग्न आहेत, मद्यपानाने धुंद झालेल्या आहेत. त्यांतून लोकांचे नित्याचे व्यवहार दिसतात, तशा त्यांच्या धार्मिक श्रद्धाहि दिसतात.

अगदी टीचभर उंचीच्या मातीच्या मूर्तीपासून तो भीमकाय पाषाणमूर्तीपर्यंत सर्व प्रकार आहेत! तसेंच आरंभापासूनच्या थोड्याबहुत बैठ्या मूर्तीपासून तो पांचव्या शतकांतल्या सुंदर, रेखीव, प्रमाणबद्ध बुद्धाच्या मूर्तीपर्यंत सर्व कलावस्था दर्शवणाऱ्या मूर्ति आहेत. पण प्रचंड मूर्ति हें मथुरेच्या संग्रहालयाचें वैशिष्ट्य आहे. विम कॅडफायसिसची सिंहासनाधिष्ठित मूर्ति, उज्जयिनीचा क्षत्रप चष्टन ह्याची भरजरी पोषाखांतली मूर्ति, आणि कुषाण सम्राट कनिष्क ह्याची भव्य प्रतिमा, ह्या तिन्हींचीं डोकीं उडवलीं गेलीं आहेत. पण प्रत्येकीवर त्याचें नांव आहे आणि त्यांच्या शिरोरहित मूर्तीदेखील इतक्या बोलक्या आहेत की, त्यांतून त्यांचें व्यक्तित्व स्पष्ट प्रतीत होतें. इतर वस्तुसंग्रहालयांतल्या अशा मूर्ति बहुधा लांबलांबून किंवा दुसऱ्या राज्यांतूनहि आणलेल्या असतात. पण मथुरेच्या संग्रहालयाचा विशेष असा की, इथल्या मूर्ति मथुरेंत आणि मथुरेच्या परिसरांतच सापडल्या आहेत. आणि त्यावरून मथुरेच्या वास्तुशिल्पाचा आणि मूर्तिशिल्पाचा इतिहास किती दीर्घ, विविध आणि समृद्ध आहे ह्याची कल्पना येते.

मथुरेला कृष्णाने व्यापून टाकलें असलें तरी त्याचा पुष्कळसा काळ खरा वृंदावनांत गेला. आणि कृष्णाच्या भक्तांना त्याचें जें रूप अत्यंत प्रिय आहे तें वृंदावनांतलें आहे. वृंदावनांतल्या बोळाबोळांतून कृष्ण धावला, पडला, खेळला. तो घरांघरांतून शिरला. अंगणाअंगणांतून हुंदडला. इथल्या कुंजवनांतून गोपीं-

बरोबर त्याने विलास केले, आणि रानांत तो गोपगोपींबरोबर रास खेळला. वृंदावनाचें सगळें वातावरण त्याच्या लीलांच्या आठवणींनी धुंद झालें आहे.

मथुरेपासून वृंदावन अडीचतीन कोस असेल. वाटेने अनेक आश्रम, मंदिरें, गोशाळा, धर्मशाळा लागतात. मधूनमधून यात्रेकरूंचे जाणारेयेणारे तांडे भेटतात. साधारण अर्ध्या वाटेवर बिर्लाशेटजींनी बांधलेलें 'गीतामंदिर' आहे. मंदिराकडे पाहतां पाहतां उगीचच मनांत एक विचार येऊन गेला. श्रीकृष्णाचें बालपण आणि तारुण्य बरेंचसें इथे गेलें. भगवद्गीता त्याने कुरुक्षेत्रांत सांगितली. त्याच्या बाललीलांनी आणि यौवनांतल्या विलासांनी जसें त्याच्या भक्तांना मोहित केलें आहे तसें त्याच्या गीतेने अनेक विचारवंतांना प्रभावित केलें आहे. पण सगळ्या जगाला जीवनाचें तत्त्वज्ञान शिकवणारी गीता ज्या कृष्णाने दिली, त्याला आपल्या मुलां-नातवंडांचे उच्छृंखल आचार आवरतां आले नाहीत. आदरणीयांसंबंधी आदर नाही, वागण्यांत संयम नाही, आपसांत सख्य नाही, असें त्यांचें वर्तन आणि त्यांनी केलेला यादवकुलाचा नाश त्याला आपल्या डोळ्यांनी पाहावा लागला. योगीश्वर कृष्णाला यादवांचा दुराचार आणि कुलक्षय थांबवतां आला नाही. आणि त्याच्या मृत्यूनंतर उग्रसेन, वसुदेव, देवकी आणि यादवकुलांतले इतर अनेक स्त्रीपुरुष ह्यांना आपल्याबरोबर घेऊन जात असलेल्या धनुर्धर अर्जुनाला अभीरांच्या हल्ल्यांपासून त्यांचें संरक्षण करतां आलें नाही.

असे कांहीसे खिन्न करणारे विचार मनांत घोळत असतांनाच मी वृंदावनांत प्रवेश केला. आज वृंदावनांत कृष्णाच्या वेळचें त्याच्या आठवणीखेरीज कांही नाही. अकबराच्या सौम्य आणि सहिष्णु राजवटींत व्रजमंडलाला स्वास्थ्य लाभलें. व्रजाचें सांस्कृतिक उत्थापन झालें. साहित्य, कला आणि स्थापत्य ह्यांना उत्तेजन मिळालें. त्याच्याच अनुमतीने कच्छवाह राजा मानसिंह ह्याने वृंदावनांतलें गोविंददेवाचें सुंदर आणि भव्य मंदिर बांधलें. हिंदु-मुस्लिम स्थापत्याचा संगम दाखवणाऱ्या मुस्लिम इमारती अकबराने फत्तेपूर सीकरी येथे बांधल्या आहेत. तशाच हिंदु-मुस्लिम स्थापत्यसंगमाचें निदर्शक असें ह्या मंदिराचें बांधकाम आहे. अशा तऱ्हेचीं आणखीहि कांही मंदिरें त्यानंतर वृंदावनांत बांधलीं गेलीं. वृंदावनांत कुंजवन नसून कसें चालेल? 'बिंद्राबनकी कुंजगलिन'वर भक्तांनी गाणीं नाहीत का रचलेलीं? कुंजवन आहे, पण कुंजवन म्हणजे एक फरसबंद ओटा आहे. आणि तिथे वनच काय पण दगडाच्या

मधल्या फटींतून एखादें झुडूपसुद्धा उगवलेलें दृष्टीस पडत नाही. वृंदावनाच्या कुंज-गल्ल्यांपैकी आज कुंज नाहीसे झाले आहेत आणि गल्ल्या तेवढ्या राहिल्या आहेत. त्या गल्ल्या आणि त्यांतले लाल फरशीचे आडवेतिडवे अरुंद रस्ते अयोध्येंतल्या तसल्याच रस्त्यांची आठवण करून देतात. आणि उत्सव-यात्रादिकांचे दिवस नसले म्हणजे तसेच उदास दिसतात. एकमेकांना खेटलेल्या घरांच्यामधून जाणाऱ्या त्या गल्ल्यांतून वळणें घेत चालत असतांना मीरेचीं आर्ततेने ओथंबलेलीं गीतें आणि "मेघैर्मेदुरमम्बरं" अशा शब्दांनी सुरू होणारें जयदेवाचें 'गीत-गोविंद' ह्यांची पुन्हा पुन्हा आठवण होत होती. आणि डोळ्यांना प्रत्यक्ष दिसणारें दृश्य आणि त्या काव्यांनी निर्माण केलेली कल्पनासृष्टि ह्यांच्यांतल्या विरोधाने मन अस्वस्थ होत होतें.

मथुरेंत जसें दाऊजीचें मंदिर आहे तसेंच यमुनेच्या काठीं इथेहि एक दाऊजीचें मंदिर आहे. त्याच्या भिंतीवर वेताचीं शेकडों वेटोळीं टांगलेलीं आहेत. तीं भक्तांनी जगन्नाथपुरीहून आणून इथे वाहिलेलीं आहेत. काशीहून गंगा नेऊन तिने सेतुबंध रामेश्वराला अभिषेक करायचा तसाच हा प्रकार आहे. देवळाच्या अंगणांत, पायऱ्यांत आणि भिंतींत वीत-दीडवीत चौरस आकाराच्या, लेख कोरलेल्या शेकडों संगमरवरी पाट्या बसवलेल्या आहेत. देशांतल्या सर्व भागांतल्या लोकांनी त्या बसवल्या आहेत. त्यांतच उमरावतीच्या 'सगदेव' नांवाच्या गृहस्थांनी बसवलेली एक महाराष्ट्रीय पाटी दृष्टीस पडली, तेव्हा मला घरचाच कुणी तरी माणूस भेटावा तसा आनंद झाला.

जी गोष्ट वृंदावनाची तीच व्रजमंडलांतल्या कृष्णचरित्राशीं निगडित असलेल्या इतर स्थानांची. गोकुळांत वसुदेवाने कृष्णाला पहिल्याने नेलें. बरसाना हें राधेचें गाव. गोवर्धनाखाली कृष्णाने गोकुळांतल्या स्त्री-पुरुषांना आणि गाईगोपाळांना आठवडाभर आश्रय दिला. मधुवनाशीं श्रीकृष्णाच्या किती तरी लीलांच्या आठवणी निगडित आहेत. कृष्णजन्माष्टमीला आणि इतर उत्सवांच्या दिवसांत ह्या ठिकाणीं लाखांनी यात्रा जमते. लोक कृष्णचरित्राशीं निगडित असलेल्या सर्व स्थानांचें दर्शन घेतात. हा नंदाचा वाडा, हा कृष्णाचा पाळणा, हा यशोदेचा घुसळखांब, इथे श्रीकृष्णाने पूतनेचा वध केला, इथे त्याने शकटासुराला मारलें, इथे धेनुकासुराला, हें राधेचें घर, हें असुक, इथे असुक झालें, असें पंड्यांनी किंवा कोणींहि सांगितलेलें भक्तिभावाने यात्रेकरू ऐकतात आणि धन्य होतात. हें शतकानुशतकें चालत आलें आहे. चालत राहणार आहे.

■ ■

# अयोध्यापुरी देखतां

अयोध्येला जायचें असा नुसता मनांतल्या मनांत संकल्प केला तरी पूर्वीच्या सगळ्या जन्मांचीं पातकें नष्ट होतात आणि वर पुन्हा "पुनर्जन्म न विद्यते". इक्ष्वाकूच्या वंशांतल्या राजांची ही राजधानी, प्रभु श्रीरामचंद्राची जन्मभूमि. त्याच्या निवासाने आणि त्याच्या अनेकानेक भक्तांच्या भेटीने इथल्या मातीचा प्रत्येक कण पवित्र झालेला. अशा भूमीवर पाय टाकायचा, म्हणजे "पादस्पर्शं क्षमस्व मे" असें म्हणूनच टाकला पाहिजे. तिथे मीं पाय टाकीत होतों.

वैवस्वत मनूने ही पुरी स्वतः निर्माण केली. सूर्यवंशांतल्या राजांनी तिचें वभव आणि प्रतिष्ठा वाढवली. आणि राजा दशरथाने तिला वैकुंठपुरीच्या तोडीची बनवली. मोठमोठ्या प्रासादांनी तिला शोभा आणली होती. तिच्या रस्त्यावर नेहमी सडा घातलेला असे आणि फुलें विखुरलेलीं असत. नाना देशांतून आलेले वाणी-उदमी तिथे व्यापारव्यवसाय करून संपन्न होत. दुकानांतून रत्नांच्या पर्वतप्राय राशी झळाळतांना दिसत असत. ठिकठिकाणचे नृत्य-गान-वादननिपुण स्त्री-पुरुष तिथे आश्रयाला येत. हजारों हत्ती, घोडे, उंट, बैल आणि गाढवें असें त्या नगरीचें पशुधन होतें. तिच्या भोवती दाट अशा शालवृक्षांची मेखला होती आणि खोल तशीच ओलांडण्याला कठीण अशी खाई होती. धनधान्यसंपन्न अशा कोशल नामक जनपदाची ती राजधानी

होती. तिच्याकडे पाहिल्यावर आपण इंद्रनगरी अमरावती तर पाहत नाही ना असा यक्ष-गंधर्व-किन्नरांना संभ्रम उत्पन्न होत असे.

अशा त्या सुखी समृद्ध राज्याच्या आणि त्या वैभवसंपन्न नगरीच्या राजाला म्हणजे दशरथाला एकच दुःख होतें. तें म्हणजे त्याला पुत्रसंतती नव्हती. एक मुलगी होती ती मूळ नक्षत्रावर जन्मलेली असल्यामुळे त्याने अंगदेशाच्या रोमपाद राजाला दत्तक दिली होती. शेवटीं रोमपादाच्या मध्यस्थीने शृंगऋषीला अयोध्येला बोलावून घेतलें. त्याच्या अधिपत्याखाली सरयू नदीच्या तीरावर पुत्रकामेष्टि यज्ञ केला. तेव्हा यज्ञदेवतेने प्रसन्न होऊन राजाला क्षीरपात्र दिलें आणि त्या क्षीरप्रसादाच्या भक्षणाने त्याच्या तीन राण्यांना मिळून चार पुत्र झाले. त्यांतला राम सर्वांत मोठा.

पुत्रजन्मामुळे राजाच्या आणि प्रजेच्या आनंदाला पारावार नाहीसा झाला. मुलें वयाने मोठीं होऊं लागली. तेवढ्यांत विश्वामित्र ऋषि आले आणि त्यांनी यज्ञरक्षणासाठी म्हणून राम-लक्ष्मणांना नेलें. दशरथाला फार वाईट वाटलें. पण राजगुरूंनी—वसिष्ठ ऋषींनी—संमति दिली तेव्हा त्याला अनुमति द्यावी लागली. मुलें गेलीं त्यांत त्यांचा लाभच झाला. विश्वामित्राने त्यांना अस्त्रविद्या दिली. रामाने त्राटिकेचा वध केला. यज्ञाचें संरक्षण केलें. अहल्येचा उद्धार केला. शिवधनुष्याचा भंग केला. आणि त्याला सीता पत्नी म्हणून लाभली. तो घरींच राहता तर ह्या गोष्टी झाल्या नसत्या.

अशा रामाला—त्या पुरुषोत्तमाला—अयोध्या नगरींत यौवराज्याभिषेक व्हायचा होता. सगळी सिद्धता झाली. गुढ्या-तोरणांनी, पुष्प-पताकांनी, सडासंमार्जनाने नगरी सुशोभित केली गेली. लोक हर्षोत्फुल्ल झाले. पण मंथरेच्या शब्दांच्या रूपाने कैकयीच्या अंतःकरणांत किल्मिष शिरलें. केव्हा तरी दशरथाने तिला वचन देऊन ठेवलें होतं त्याच्या जोरावर तिने रामाला चौदा वर्षांसाठी वनवासाला जायला लावलें. दशरथाला पुत्रवियोगाने मृत्यु आला. त्याच्या हातून श्रवणाला मृत्यु आला होता. श्रवणाच्या आईवडिलांनी दिलेला शाप खरा झाला.

राम वनवासाला गेला. अयोध्येच्या नागरिकांच्या उत्साहावर विरजण पडलें. त्यांना आपली नगरी चंद्रतारकाविरहित आकाशासारखी शून्य, तोयविरहित सागरासारखी भयाण वाटूं लागली.

चौदा वर्षें गेलीं. रावणाला मारून, त्याच्या बंदिवासांतून देवांना मुक्त करून, रावणाने पळवून नेऊन अशोकवनांत ठेवलेल्या, सीतेला आणि वानर मित्रांना

बरोबर घेऊन राम अयोध्येला परत आला. जिथे त्यांना यौवराज्याभिषेक होणार होता तिथे त्यांना राज्याभिषेक झाला. नगरी पुन्हा आनंदाने प्रफुल्लित झाली.

अनेक वर्षें रामाने राज्य केलें. राज्याचा विस्तार झाला. रामाने अश्वमेध केला; भावापुतण्यांची वेगवेगळ्या राज्यांवर स्थापना केली; सीतेला टाकलें. सीतेची त्यांची पुन्हा भेट झाली. पृथ्वीने तिला पुन्हा आपल्या पोटांत परत घेतलें. लक्ष्मणाने सरयूंत प्रवेश करून प्राणत्याग केला. लक्ष्मणाच्या मृत्यूनंतर रामाला कशांतहि गोडी वाटेनाशी झाली. त्यानेहि देहत्यागाची तयारी केली. प्रजेला हें कळलें तेव्हा सर्व प्रजा म्हणाली, "राम जिथे जाईल तिथे आम्ही सगळीं जाऊं. हा आमचा निश्चय आहे." इतकें तिचें रामावर प्रेम होतें.

रामाच्या महाप्रयाणाचा दिवस आला. समोर दीप्त अग्निहोत्र चाललें आहे; उजवीकडे श्रीदेवी आणि डावीकडे भूदेवी आहेत; मागेपुढे पुरुषरूप धारण केलेलीं अस्त्रें आणि आयुधें आहेत; पुरोहित आणि ब्राह्मण समवेत आहेत; असा राम सरयूकडे निघाला. अवघी स्त्रीपुरुष प्रजा, पशुपक्षी, अयोध्येंतलें सर्व प्राणिजात त्याच्यामागून निघालें. त्या प्रसंगाचा सोहळा पाहण्यासाठी अंतरिक्षांत देव-गंधर्व-अप्सरांच्या विमानांची दाटी झाली होती. सरयूच्या तीरावर पोचतांच नदीला वंदन करून रामाने तिच्या जलाचें आचमन केलें. देवादिकांनी रामाचा जयघोष करून त्याच्यावर पुष्पवृष्टि केली. आणि तो वैष्णव तेजांत विलीन झाला.

त्याच्या मागोमाग सर्व प्रजा आणि प्राणिजात गोप्रतार घाटावर गेलीं. तिथे त्यांनी नदींत प्रवेश केला आणि त्यांतला प्रत्येक जण निजरूपांत विलीन झाला.

आणि त्या नगरीचें पुढे काय झालें ? तिचें आता तिथे काय राहिलें आहे ? सड्याने भिजलेले आणि विखुरलेल्या फुलांनी सुशोभित झालेले रस्ते कुठे आहेत ? ते त्याच्या भोवतालचे प्रचंड शालवृक्ष आणि तो दुर्लंघ्य खंदक कुठे आहे? आता तिथे त्या वेळचें जमिनीच्या पृष्ठभागाच्यावर कांहीहि राहिलें नाही. पुढे ती रामाची अयोध्या निर्मनुष्यच नव्हे तर अक्षरशः निर्मक्षिक झाली. शतकानुशतकें तशीच पडून राहिली. तिचीं मंदिरें-घरें कोसळलीं, भिंती ढासळल्या आणि त्यांचे अखेर जे मोठमोठे ढीग झाले तेच आज अयोध्येंतले मणिपर्वत, कुबेरपर्वत, सुग्रीवपर्वत झाले आहेत. जुनी अयोध्या त्यांच्याखाली गेली ती तिथेच राहिली. रामाची अयोध्या केवळ आठवणींत राहिली. पुढे अनेक शतकांनी कोणा तरी विक्रमादित्याने पुन्हा अयोध्या आपली राजधानी केली. अयोध्येचें भाग्य उजळलें. जुन्या स्थलांच्या

आठवणी जाग्या झाल्या. नवीं मंदिरें, राजमंदिरें, शाळा, धर्मशाळा बांधल्या गेल्या. जुन्या अयोध्येवर नवी अयोध्या उभी राहिली. ती आजची अयोध्या.

ती अयोध्या आता रामाची राजधानी राहिलेली नाही. ती रामभक्तांची पुण्यभूमि झाली आहे. यात्रेकरूंचें तीर्थक्षेत्र झाली आहे. साहजिकच तिथे रामाचीं मंदिरें सगळयांत अधिक आहेत, मारुतीचींहि अर्थातच आहेत. रामाशीं संबंध असलेल्या सर्व स्थानांमध्ये त्याचें जन्मस्थान सर्वांत पवित्र आणि सर्वांत महत्त्वाचें आहे. पण तिथे जाण्यापूर्वी हनुमानगढीला गेलें पाहिजे. कारण प्रत्यक्ष राजाचें दर्शन घेण्यापूर्वी त्याच्या द्वारीं उभ्या असलेल्या त्याच्या सेवकाचें दर्शन घेणें आवश्यक असतें. त्यांतून पुन्हा हनुमान म्हणजे सामान्य सेवक नव्हे. जन्मतांक्षणींच प्रत्यक्ष सूर्यावर झेप घेणारा, ज्या प्रसादामुळे रामाचा जन्म झाला त्याच प्रसादाच्या अंशापासून जन्म पावलेला भीमपराक्रमी सेवक आहे तो. हनुमानगढी हें खरोखरच हनुमानाला साजेसें भक्कम दगडी कोट असलेलें स्थान आहे, आणि प्रत्यक्ष मंदिरापर्यंत जाण्यासाठी बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागत असल्यामुळे विपुल श्वासोच्छवास करावा लागून वायुपुत्राच्या दर्शनाला जातांजातां वायूची उपासनाहि केल्याचें श्रेय मिळतें. गढी हनुमानाची असल्यामुळे साहजिक तिथे, उत्तर प्रदेशांत सर्वत्र दिसणाऱ्या माकडा-वानरांची अधिकच वर्दळ आहे. ते तिथले खरे अधिकारी आणि हक्कदार आणि आपण उपरे आणि आगंतुक. तिथलीं वंशपरंपरेचीं रहिवासी तींच. त्यांना जर प्रसन्न ठेवलें नाही तर आपली यात्रा निर्विघ्न होणें कठीण. पण एकंदरींत इथली वानर-मंडळी पुष्कळच समंजस आणि सुसंस्कृत असावी असें वरसईकर गोडसे भटजींनी त्यांच्यासंबंधी एक आख्यायिका सांगितली आहे तिच्यावरून दिसतें. पूर्वी अयोध्येंत परशुरामबोवा नांवाचे एक कोकणस्थ ब्राह्मण साधु राहत होते. (कोकणस्थ ब्राह्मणांत साधु आणि संत ह्यांची संख्या किती कमी आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे परशुरामबोवांचें माहात्म्य अधिकच वाटतें.) ग्वाल्हेरच्या शिंदेमहाराजांची त्यांच्यावर फार भक्ति होती. एकदा परशुरामबोवांनी सरकारांना सांगितलें की आपल्या मनांतून अयोध्येंतल्या सर्व वानरांना बुंदीच्या लाडवांचें भोजन द्यायचें आहे, त्याची सरकारांनी व्यवस्था करावी. शिंदेमहाराजांनी विचारलें, "किती वानरें असतील ?" बोवा म्हणाले, "असतील पांच-सहा हजार." त्याप्रमाणे वानरांच्या समाराधनेचा दिवस ठरला. बोवांनी आदल्या दिवशीं अयोध्येंतल्या सर्व वानरांना आमंत्रण केलें आणि दुसऱ्या दिवशीं हनुमानगढीवर यायला विनंती

केली. त्याप्रमाणे ठरल्या दिवशी दहाबारा हजार बुंदीचे लाडू करून हनुमानगढीवर त्यांच्या राशी रचण्यांत आल्या. आमंत्रणानुसार अयोध्येंतलीं सर्व वानरें तिथे आलीं होतीं. बोवांनी हात जोडून वानरांना विनंती केली की, प्रत्येकाने दोन-दोन लाडू न्यावे. त्याप्रमाणे सर्व वानरांनी प्रत्येकीं दोन-दोनच लाडू घेतले. बोवांनी हेंच आमंत्रण माणसांना केलें असतें तर त्यांनी एवढी शिस्त आणि संयम दाखविलीं असतीं अशी खात्री देववत नाही.

हनुमानगढीवर हनुमंताचें दर्शन घेऊन रामाच्या जन्मस्थानीं जायचें. अयोध्येंतलें सगळ्यांत महत्त्वाचें स्थान तें. त्या स्थानामुळे अयोध्येचें माहात्म्य आहे. पण त्या ठिकाणीं आता मोगल साम्राज्याचा संस्थापक बादशहा बाबर ह्याने बांधलेली मशीद उभी आहे. ती त्याने पूर्वीचें त्या ठिकाणचें मंदिर पाडून त्याचेंच साहित्य घेऊन बांधली. त्या मंदिराचे खांब मशिदींत वापरलेले स्पष्ट दिसतात. चारशे वर्षांहून अधिक काल ती मशीद रामजन्मस्थानीं उभी आहे. मग भक्तांनी त्या मशिदीच्या कमानीखाली मिंबरसमोर उभें राहून “माता रामो मत्पिता रामचंद्र:” अशी गद्‌गद्‌ स्वरानें रामाची आळवणी करायची काय? नाही. त्यांच्यासाठी मशीदीच्या बाहेर बाजूला एक ओटा केला आहे. तिथे त्या मानीव जन्मस्थानीं आता जन्मस्थानाचे सर्व सोपस्कार केले जातात.

समर्थ रामदासस्वामी देशभरच्या तीर्थयात्रा करीत जेव्हा इथे आले असतील तेव्हा ही मशीद त्यांनी खासच पाहिली असेल! देशस्थितीविषयी अत्यंत जागृत असलेल्या त्यांच्या मनाला त्या वेळीं किती यातना झाल्या असतील! पंढरपुरांत विठ्ठलासमोर उभें राहून “इथें कां रे उभा श्रीरामा?” असा त्यांनी प्रश्न विचारला. तसाच रामाच्या ह्या जन्मस्थानीं रामाची मूर्ति नाही, इतकेंच नव्हे तर तिथे एक मसजिद उभी आहे, हें पाहून त्यांनी “इथें कां न दिससि श्रीरामा?” असा प्रश्न विचारला असेल काय?

गोस्वामी तुलसीदासजींनी आपलें ‘रामचरित-मानस’ श्रीशंकराच्या आज्ञेनुसार अयोध्येंतच राहून लिहिलें. त्यांनीदेखील रामजन्माच्या स्थानावरची ही मसजिद पाहिलीच असेल. “बंदौ अवधपुरी गुनखानी” असें म्हणत असतांना त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या काळांतली अयोध्या असेल, की आपल्या कल्पना-वारूवर आरूढ होऊन रामायणाच्या कालांत शिरून पाहिलेली अयोध्या असेल, की रामभक्तीने प्रेरित होऊन त्यांनी आपल्याच मनाने ती निर्मिली असेल?

कैकयीमहल, सुमित्रामहल, कौसल्यामहल, सीताकी रसोई पाहत पाहत, —'सीताकी रसोई?' सबंध आयुष्यांत अयोध्येंत राहून स्वयंपाक करण्याचा प्रसंग सीतेवर किती वेळां आला असेल? आणि अयोध्येंत असतांना तिला स्वतः स्वयंपाक करण्याची तरी काय गरज? पण अयोध्येंत 'सीताकी रसोई' आहे. ती पाहत पाहत—टीकमगढच्या राणीसाहेबांनी बांधलेल्या कनकभवनमध्ये आलों. 'कनकभवन' हें एकाद्या वाड्यासारखें आहे. मध्ये प्रशस्त चौक आहे. तीन बाजूंना ओसऱ्या आहेत. मधल्या समोरच्या दालनांत मध्यभागीं मूर्ती आहेत. सर्व व्यवस्था टीकमगढकडे आहे. एखाद्या राजासाठी जशीं विलास-साधनें असावींत तशीं ह्या वाड्याच्या वरच्या मजल्यावर रामासाठी विलाससाधनें ठेवलीं आहेत. निजण्यासाठी मऊ गाद्यागिरद्यांचा पलंग आहे. विडा खाण्या-साठी पानांचा चांदीचा डबा आहे. स्नानानंतर मुखावलोकनासाठी चांदीच्या मुठी-पाठीचा आरसा आहे. उन्हाळ्या-हिवाळ्यासाठी वेगवेगळीं रेशमी, लोकरी वस्त्रें आहेत. शिवाय वेगवेगळ्या सणावारांसाठी. त्याला कंटाळा आला तर वेळ घालवण्याचें साधन म्हणून बुद्धिबळाचा पट आणि सोंगट्या आहेत. सगळें साहित्य कांही हस्तिदंती, कांही चंदनी, कांही चांदी-सोन्याचें, कांही मुलाम्याचें, त्याच्या त्याच्या लायकीप्रमाणे आहे. फक्त ह्या विलासी रिकामपणाचा कंटाळा आल्यामुळे त्याला तशीच इच्छा झाली तर वाचण्यासाठी पुस्तकें आणि रोजचीं वर्तमानपत्रें मात्र ठेवलेलीं कुठे दिसलीं नाहींत. एक वर्दीधारी चोपदार सर्व वस्तु आणि सुखसोयी कौतुकाने आणि अभिमानाने, (आणि अर्थातच बक्षिसाच्या आशेने) दाखवीत होता. त्याला मीं ह्याबद्दल प्रश्न विचारला तेव्हा तो तोंड वासून आणि डोळे विस्फारून माझ्याकडे पाहतच राहिला.

कनकभवनासारखीं किती तरी भवनें, मंदिरें आणि धर्मशाळा अयोध्येंत आहेत. किंबहुना आज अयोध्येंत त्यांचीच संख्या जास्त आहे. रस्त्यारस्त्याला, वळणावळणाला तीर्थ आहे, कुंड आहे, मंदिर आहे. प्रत्येक ठिकाणीं दर्शन केल्याचें, स्नान केल्याचें, दान केल्याचें, ब्राह्मणाला भक्तिपूर्वक भोजन घातल्याचें पुण्य आहे. यात्रेकरूंसाठी, भाविकांसाठी हें गाव आहे.

एकदोन मोठे रस्ते सोडले तर बाकी सगळ्या फरसबंद गल्ल्याच आहेत. मंदिरें आणि भवनें पाहत पाहत बोळांतून वळणें घेत घेत आपण नदीकाठीं येतों. नदीकाठीं घाट आणि पुन्हा अनेक मंदिरें आहेत. रूपकलाचा घाट आहे, गुप्तार घाट आहे, लक्ष्मण घाट आहे. नागेश्वर मंदिर आहे. दशरथाने पुत्र-

कामेष्टि यज्ञ केल्याची जागा आहे. रामाने अश्वमेध केल्याची आहे. आणि जन्मस्थानाच्या बरोबरीच्या महत्त्वाचें आणि पवित्र स्थान—स्वर्गद्वार—आहे.

स्वर्गद्वारीं राम वैष्णव तेजांत विलीन झाला. तिथेच त्याच्या देहाला अग्निसंस्कार करण्यांत आला. रामाच्या जन्मस्थानीं भारतांतल्या मोगल राजवटीचा संस्थापक बाबर ह्याने मशीद बांधली आहे तशी स्वर्गद्वारीं औरंगजेबाने—मोगल बादशहां-पैकी महत्त्वाच्या अशा शेवटच्या बादशहाने—बांधली आहे. त्याचप्रमाणे त्याने 'त्रेता का ठाकूर' ह्या ठिकाणीं म्हणजे जिथे रामाने अश्वमेध केला त्या ठिकाणींहि एक मशीद बांधली आहे. रामाच्या आयुष्यांतल्या अत्यंत महत्त्वाच्या स्थानांवर आज अशा मशिदी उभ्या आहेत.

ह्या मशिदींसंबंधीं विचार करीत करीत रूपकला घाट, गुप्तार घाट, लक्ष्मण घाट, वगैरे घाटांवरून जातांजातांना नदीकडे पाहिलें की सगळे विचार नाहीसे होतात आणि मन हरखून जातें. लांबवर पसरलेल्या तिच्या भव्य-विशाल पात्रावर हिरव्या-निळ्या-काळ्या लाटा सारख्या उसळत असतात. तिच्याकडे पाहतांना इतर सगळ्याचा विसर पडतो. आपल्या पाठीकडली नगरीहि विसरतों. शतकानुशतकें ती अयोध्येशेजारून वाहत आहे. रामाची अयोध्या रामानंतर उध्वस्त झाली. उजाड झाली. स्मृतिशेष झाली. शतकांमागून शतकें गेलीं. नवी नगरी उभी राहिली. ह्या सगळ्याला ही सरयू साक्षी आहे.

आपल्यामागली नगरी पूर्वीची नसेल. पण आपल्यासमोरची नदी तीच आहे. तिच्या काठीं दशरथाने यज्ञ केला. तिच्याच काठी रामाने अश्वमेध केला. तिच्यांतच प्रवेश करून लक्ष्मण शेषाशीं एकरूप झाला. आणि अवतारसमाप्तीच्या वेळीं तिच्याच जलाचें रामाने आचमन केलें. तिच्या काठीं उभें राहून तिच्या-कडे पाहतांना, तिच्यांत प्रवेश करून तिच्या जलाचें आचमन करतांना, रामाचें सबंध चरित्र आठवतें आणि मन भारावून मूक होतें. आणि मग आजची अयोध्या 'मनुना निर्मिता पुरी' आहे की नाही हा प्रश्नहि मनांत येत नाही.

■ ■

# बिठूर

" शेषशायी भगवानाच्या नाभिकमलांतून ब्रह्मदेव निघाले ते ह्या ठिकाणीं वर आले, म्हणून ह्याला ब्रह्मावर्त म्हणतात. हें आहे ब्रह्मेश्वर मंदिर. आणि सृष्टि निर्माण करण्याचें काम पूर्ण झाल्यानंतर भगवान् ब्रह्मदेवांनी अश्वमेध यज्ञ केला, त्या घोड्याच्या पायाचा चांदीचा नाल हा इथे आहे. दुनियाभरमें इतना पवित्र अस्थान और कोई नहीं है."

गंगेच्या त्या घाटावरच एका छोट्या दगडी मंडपाखाली एक चांदीचा नाल खिळे ठोकून बसवलेला गंगाप्रसादने मला दाखवला, त्याला मीं वंदन केलें.

" गंगाजीमें नहाकर कुछ पूजा वगैरह होना चाहिये बाबूजी." तो पुढे म्हणाला.

पण मी बिठूरला आलों होतों तो बिठूर पाहण्यासाठी. मला कुणी तरी महाराष्ट्रीय माणूस हवा होता. म्हणून मीं त्याला म्हटलें, "स्नानाचें वगैरे नंतर पाहूं. मला तूं आधी कोणा तरी दक्षिणी ब्राह्मणाच्या घरीं घेऊन चल."

ब्रह्मघाटाजवळ जेव्हा मी बसमधून उतरलों तेव्हा बसमध्ये उतारू असा मी एकटाच राहिलों होतों. बाकीचे सगळे गावांत बस शिरल्याबरोबर उतरून गेले होते. मला उतरवून बसदेखील निघून गेली आणि भर दुपारच्या वेळीं मी तिथे एकटाच राहिलों. आसपास दुकानें वगैरे जीं होतीं तीं सगळीं बंद होतीं. जवळपास माणसेंहि कुणी दिसत नव्हतीं. दिवस उन्हाळ्याचे आणि वेळ

दुपारची होती हें खरें असलें तरी गाव इतकें पेंगलें—सुस्तावलेलें असेल अशी माझी कल्पना नव्हती. थोडासा इकडेतिकडे हिंडलों तेव्हा कमरेला पंचा गुंडाळलेले आणि खांद्यावर अंगोछा टाकलेले एक गंगापुत्र मला दिसले. त्यांनाच मीं वाटाड्या केलें. त्यांचेंच नांव गंगाप्रसाद.

मला आधी दक्षिणी ब्राह्मणाकडेच जायचें आहे हें पाहिल्यावर तो म्हणाला, "चलिये, ले चलता हूं." आणि मी त्याच्यामागून चाललों.

तो पुढे आणि मी मागे असे बोळाबोळांतून चाललों होतों. मिनिटांमागून मिनिटें जात होतीं. तो मला कुठे नेतो आहे आणि मी कुठे चाललों आहें हें मला कळत नव्हतें. वाटेने जाणारें-येणारें कुणीहि भेटत नव्हतें. रस्त्याच्या दोन्ही अंगांचीं घरें बहुतेक जमीनदोस्त झालेलीं होतीं. कांही घरांच्या भिंती अर्ध्यामुर्ध्या उभ्या दिसत होत्या तर कांहींच्या आपल्याच विटां-मातीखाली पार दबलेल्या. दहापांच घरें गेलीं म्हणजे एखादें घर शाबूत दिसायचें. पण त्याचींहि खिडक्यादारें बंद होतीं. सगळें उदास, भगभगीत होतें. मिनिटेंच चाललीं होतीं, पण वाटत होतें, तास चालले आहेत. अनोळखी गाव, मी एकटा मुसाफर. वाटेने कुणी दिसत-भेटत नाहीं. दुतर्फा सोबत फक्त पडक्या ओसाड घरांची. मन अस्वस्थ होऊं लागलें. पण तसें दाखवतांहि येईना. तरी पण मध्येच एकदा हिय्या करून मीं विचारलें, "क्यों भई, कहां रहते हैं वह?"

"यह आगया जी बाबूजी उनका मकान." असें म्हणून तो तसाच पुढे चालूं लागला. आणि त्याच्या मागून मी.

थोड्या वेळाने बोळांतून बाहेर पडून आम्ही पुन्हा नदीसामोरे आलों. तेव्हा तो म्हणाला, "यह लछमन घाट है."

घाटाच्या वरच्या अंगाने आम्ही चालतच राहिलों.

अखेर एका दाराशीं आल्यावर तो त्यांतून आंत शिरला. आवाराच्या भिंतींतल्या त्या दाराची गणेशपट्टी जागेवर होती, पण वरच्या कमानीच्या मधल्या दोनचार विटा पडल्या होत्या. त्यामुळे ती पुढले दांत पडलेल्या तोंडाच्या बोळक्यासारखी दिसत होती. उंबऱ्याचा मधला भाग झिजून नाहीसा झाला होता. दाराचें झडप एकच जागेवर होतें. भिंतीच्या चुन्याची विरी गेल्यामुळे गिलावा झडून गेला होता आणि आंतल्या विटा खलगट झाल्या होत्या. सगळीकडे दमट-कुबट वास येत होता. त्या दारांतून त्याच्यामागोमाग आंत शिरलों आणि

पांचसहा पायऱ्या चढून एका अंगणांत आलों. समोरच एका घराचें एक दार उघडें होतें, त्यांत डोकावून गंगाप्रसाद मोठ्याने म्हणाला,

"गुरुजी, यह कोई आपसे मिलने आये हैं."

आंतून स्वागताची हांक येण्यापूर्वीच मी पुढे होऊन जोडा काढून आत गेलों. समोर एक सत्तर-पाऊणशे वर्षांचे गृहस्थ एका झिजलेल्या, काड्या गळत चाललेल्या, चटईवर आडवे झालेले दिसत होते. आणि त्याच खोलींत पलीकडच्या बाजूला एक गृहस्थ, सुमारें पन्नास वर्षांचे, कसली तरी पोथी वाचीत बसले होते. त्या दोघांनाहि मीं नमस्कार केला आणि त्यांनी दाखवलेला पाट ओढून घेऊन त्यावर बसत विचारलें,

"आपण महाराष्ट्रीय काय?"

त्यांनी होकारार्थी उत्तर दिलें आणि मी आडनांव विचारलें, तेव्हा ते म्हणाले, "शेजवलकर."

आडनांव ऐकल्यावर साहजिकच माझें कुतूहल जागृत झालें. मग मीं त्यांना विचारलें, "आपलं मूळ गाव कुठलं?"

"तिकडे कुठे रत्नागिरीकडे आहे असं ऐकतों. आमच्या इथेच चारपांच पिढ्या झाल्या. आम्ही कांही तिकडे कधी गेलों नाही." थोडा वेळ थांबून म्हणाले, "हे आमचे वडील. मी हमेशा लष्करला असतों. तिथे भिक्षुकी करतों. वडील बीमार पडले म्हणून परवाच आलों. सप्तशतीचा पाठ चालू आहे."

मीं आजूबाजूला पाहिलें. त्या घराच्या जवळपास एकहि राहतें घर नव्हतें. मागे परसूं, त्यांत घराच्या पडलेल्या भागाची विटा-माती. पुढे अंगण. घर म्हणजे एक आडवी लांबोळकी खोली होती. आम्ही बसलों होतों तेवढीच. घरांत तिसरें माणूस—बायको किंवा पुरुष—कोणीच दिसत नव्हतें. हे गृहस्थ इथे कसे राहत असतील? हे नसतांना म्हातारबुवांचें हवें नको तें कोण पाहत असेल! एखाद्या गूढ-भयानक कथानकांतल्यासारखें वातावरण होतें तें. मी अस्वस्थ झालों, पण मला कांही विचारवेना.

मला पेशव्यांचा वाडा किंवा त्याचे कांही अवशेष असतील तर ते पाहायचे होते. टोप्यांचा वाडा वगैरे कांही असेल तर पाहायचें होतें. पण शेजवलकरांचा सप्तशतीचा पाठ चालला होता. त्यामुळे ते माझ्याबरोबर येऊं शकत नव्हते. खरें म्हणजे जमलें तर त्यांच्याकडे जेवावें असा माझा पूर्वीचा बेत होता.

पण त्यांचा संसार पाहिल्यावर त्या वेताचा मागमूसहि राहिला नाही. पण तशाहि स्थितींत त्यांनी मला गंगेचें गार पाणी आणि गुळाचा खडा दिला, तो मीं घेतला. ते म्हणाले,

"बावन बिघे जमीन वाड्याखाली होती. पण इंग्रजांनी सगळा खणून काढला. एक वीट शिल्लक ठेवली नाही. एक विहीर राहिली आहे ती हा गंगाप्रसाद तुम्हांला दाखवील. तात्या टोप्यांचं घर तिकडे लष्करांत आहे—मैल-दोन मैलांवर. भय्या, इनको सब बता देना."

शेजवलकरांचा निरोप घेऊन निघालों आणि गंगाप्रसादच्या मागोमाग बाहेर पडून पुन्हा नदीच्या काठाकाठाने जाऊं लागलों. हा आपल्याला कुठे नेतो आहे असें आधी वाटत होतें, तें त्याने खरोखरीच मला महाराष्ट्रीय गृहस्थाकडे नेलें ह्याचें आता समाधान वाटत होतें.

नदीवर एकहि मनुष्य किंवा गाय-वासरूं नव्हतें. सगळीकडे शांत, स्तब्ध, नीरव होतें. समोर खाली गंगेचा रुंद निळा-करडा संथ प्रवाह होता. पलीकडे स्वच्छ पिंगट वाळवंट होतें आणि त्याच्या पलीकडे शेतें आणि झाडी.

थोडा वेळ चालून गेल्यावर, लांब एका उंचवट्यावर असलेल्या एका मशिदीकडे बोट दाखवून गंगाप्रसाद म्हणाला, "ती मसजिद पाहा. ती बादशहा औरंगजेबानं, ज्या ठिकाणीं लक्ष्मणानं सीतामाईला आणून सोडलं त्या ठिकाणीं बांधली आहे."

हें ऐकल्यावर मी कांही वेळ अगदी सुन्न झालों. अयोध्येंत रामाच्या देहाला ज्या ठिकाणीं अग्नि दिला तिथेहि औरंगजेबानेच मशीद बांधली आहे. आणि जिथे रामाने अश्वमेध केला तिथेहि आहे. त्या मीं आदल्याच दिवशीं पाहिल्या होत्या. टाकून दिलेल्या सीतेच्या ऐवजी 'कांचनी' सीता रामाने जवळ बसवली ती त्याच अश्वमेधाच्या वेळीं.

सीतेला लक्ष्मणाने इथे आणून सोडलें असेल तर समोरच नदीच्या पलीकडल्या तीरावर त्याने तिला रथांतून उतरवलें असेल. रथांतून गंगेचा प्रवाह पाहतांच लक्ष्मणाला रडूं कोसळलें. कारण आपण इथे कशाकरता आलों आहों हें त्याला माहीत होतें. पण सीतेला तें ठाऊक नव्हतें. त्याला रडतांना पाहून ती म्हणाली,

"तूं असा रडतोस कां? किती दिवसांपासून माझ्या मनांतून इथे यायचं होतं, ती आता आलें. अशा आनंदाच्या वेळीं तूं मला दुःखी कां करतोस?

रामावर तुझं फार प्रेम आहे तें मला ठाऊक आहे. पण दोन दिवस त्याचा विरह झाला म्हणून तूं इतका खिन्न झालास ? राम मलाहि प्रिय आहे. तो माझा ' जीवतादपि दयित ' आहे, हें तुला ठाऊक आहे. मग मी कुठे दुःख करीत नाही ती ? चल, लवकर पैलतीराला चल. मी तिथे मुनींना भेटेन. त्यांना वस्त्राभरणं देईन. आपण एक रात्र तिथे काढूं. आणि परत अयोध्येला जाऊं. त्यांत इतकं वाईट वाटून घेण्यासारखं काय आहे ? "

तें ऐकून लक्ष्मण अधिकच उदास झाला. त्याने नावाड्यांना बोलावलें. सीतेला आधी नावेवर चढवून तिच्यामागून तो नावेंत चढला. सुमंताला रथ घेऊन थांबायला आणि नावाड्यांना नाव चालू करायला सांगितलें. ऐलतीरावर ह्या ठिकाणीं आल्यावर लक्ष्मणाने सीतेच्या पायावर डोकें ठेवलें. आणि तिला रामाच्या सांगण्यावरून इथे कसें आणि कशासाठी आणलें तें सांगितलें. तो म्हणाला, " असल्या कामीं माझी योजना झाली त्यापेक्षा मला मरण येतं तर बरं होतं. "

रामाने आपल्याला लोकापवादामुळे टाकलें, हें ऐकतांच सीता क्षणभर मूर्च्छितच पडली. सावध झाल्यावर ती दीनवाणीने म्हणाली, " खरोखर माझा देह दुःख सोसण्यासाठीच निर्माण झाला असावा असं दिसतं. गेल्या जन्मीं मीं काय पाप केलं असेल ? कुणाची बायको त्याच्यापासून दूर केली असेल म्हणून मला हें भोगावं लागतं आहे ? मला रामाने कोणत्या कारणासाठी टाकलें हें इथल्या मुनींना मीं कुठल्या शब्दांनी सांगूं ? "

पण एवढें बोलून त्या सत्त्वधीर स्त्रीने आपलें दुःख आवरलें, रामाला आणि सासवांना नमस्कार सांगितला, आणि सर्व दिरा-जावांना उचित निरोप सांगितले.

मोठ्या कष्टाने हुंदके आवरीत लक्ष्मणाने तिचा निरोप घेतला. तो सारखा पुन्हा पुन्हा वळून तिच्याकडे पाहत होता. त्याला रथावर चढतांना आणि रथांत बसून निघून जातांना तिने इथूनच पाहिलें. तो दृष्टिआड झाला आणि तिने आपल्या मनाला घातलेले संयमाचे बांध कोसळले. ती स्फुंदून रडूं लागली.

आपल्या आश्रमांत धर्मसमाधींत असलेल्या वाल्मीकीला अंतर्ज्ञानाने हें कळलें होतें. तापस कुमारांनीदेखील त्यांना कुणी तरी स्त्री गंगेवर बसून रडते आहे हें सांगितलें. ते इथे आले आणि " स्वागतं ते पतिव्रते ! " असें म्हणून त्यांनी तिला आपल्या आश्रमांत नेलें. त्यांचे ते स्वागताचे शब्द ऐकल्यावर

अयोध्येंतला आपल्यासंबंधीचा लोकापवाद आठवून तिच्या मनांत काय काहूर उठलें असेल !

रामायणांतली ही अत्यंत शोककारक आणि हृदयस्पर्शी घटना मी उभा होतों तिथून पांचपन्नास पावलांवर घडली होती. तिथे औरंगजेबाने मशीद बांधली होती. मी किती तरी वेळ त्या मशिदीकडे बघत राहिलों. मला तिथे उभें राहवेना, आणि तिथून हलवेना. पण निघणें भाग होतें.

पडक्या भिंतींचे अवशेष, दगडा-विटांच्या लहानमोठ्या राशी आणि झाडें-झुडपें ओलांडीत आम्ही एका मैदानांत आलों तेव्हा गंगाप्रसाद म्हणाला, " हीच पेशव्यांच्या वाड्याची जागा. "

त्या सबंध मैदानांत विटेवर वीट उभी अशी नव्हती. आजूबाजूला कांही घरें चिरून उभीं करून ठेवल्यासारखीं होतीं. तीं कदाचित् पेशव्यांच्या सरदार-जहागिरदारांचीं किंवा आश्रिता-नातेवाइकांचीं असतील. त्यांतल्या कांहींच्या माड्यांवरचे रिकामे कोनाडे, भिंतींतलीं भगदाडें आणि दारा-खिडक्यांच्या वेढब पोकळ्या, जिथे एक वेळ त्यांचा आधार आणि आश्रयदाता वाडा उभा होता त्या भूमीकडे भकास नजरेने पाहत होत्या. त्या पडक्या घरांत आता कदाचित् त्यांच्या पूर्वीच्या मालकांचीं भुतेंच राहत असलीं तर असतील. किंवा कदाचित् तरसा-कोल्ह्यांनी त्यांनाहि हुसकून लावलें असेल.

तिथेच एका ठिकाणीं शेजवलकरांनी जिच्याबद्दल सांगितलें ती विहीर होती. ब्रह्मावर्तांत आल्यावर गोऱ्या शिपायांनी वाडा लुटला, तेव्हा कदाचित् ह्याच विहिरींतून लक्षावधी रुपयांच्या किंमतीचें सोनें-नाणें आणि सोन्या-रुप्याचीं भांडींकुंडीं त्यांनी नेलीं असतील. ह्या मैदानांतच कुठे तरी पेशव्यांचें देवघर असेल. रामदासांनी शिवाजीमहाराजांना आणि शाहूमहाराजांनी श्रीमंत पेशव्यांना दिलेल्या, चंदनाच्या पेटींत जपून ठेवलेल्या छाट्या, रत्नमोलाचें वडाचें फूल, गौरीशंकराचा तेजस्वी बाण, दक्षिणावर्त शंख इत्यादि पवित्र आणि बहुमूल्य वस्तू ज्या देवघरांतून उचलून नानासाहेबांनी ब्रह्मावर्त सोडतांना शेल्यांत बांधून घेतल्या तेंच तें देवघर. तें इथेच कुठे तरी असेल. वरसईकर गोडसे पेशव्यांच्या ज्या होमशाळेवर मुख्य होते, आणि जिथे मनुताई तांबेचे वडील मोरोपंत तांबे कामाला होते ती होमशाळाहि ह्याच मैदानांत कुठे तरी असेल. भरगच्च गालिच्यांनी, मऊ गाद्यांच्या कोचा—खुर्च्यांनी, लकलकणाऱ्या प्रचंड हंड्या—झुंबरांनी, आरशा-तसबिरींनी सजवलेल्या ज्या दिवाणखान्यांत नानासाहेबांनी ब्रिटिश

अफसरांना आणि त्यांच्या मडमांना जाफती दिल्या (आणि ज्या त्यांनी आनंदाने स्वीकारल्या), जिथे गाणारणींचे स्वर घुमले आणि नाचणारणींच्या पैंजणांचे पडसाद् उठले, जिथे आनंदाचे हास्यकल्लोळ उसळले आणि कारस्थानांची कुजबुज उमटली ते पेशव्यांच्या वाड्याचे दिवाणखानेहि इथेच कुठे तरी असतील.

आता ह्यापैकी कशाचा तिथे मागमूसदेखील नाही. बिठुरांत पेशव्यांची आठवण करून देणारें कांहीसुद्धा राहतां कामा नये, अशी खबरदारी ब्रिटिशांनी घेतली होती. आता तिथल्या मातीच्या कणांनाच जिभा फुटल्या तर त्या तेव्हाच्या घटनांसंबंधी कांही तरी सांगूं शकतील. वाड्यांतून सगळींजणें निघून गेल्यावर नानासाहेबांची मुलगी मैनाबाई एकटीच तिथे कशी राहिली, तिला पकडून कानपुराला कसें पाठवलें तेंहि कदाचित् त्या सांगतील.

पण पेशव्यांची आठवण बिठुरांत पेशव्यांच्या वाड्याच्या परिसरांतच पुन्हा उभी राहिली आहे. नानासाहेब पेशव्यांच्या अर्धपुतळ्याची आता तिथे प्रतिष्ठापना झाली आहे. बसमध्ये एक उतारू मला म्हणाला होता, "बाबूजी, नानासाहब कैसा बहादुर आदमी था—और बिठूर में उनका फोटू देखिये कैसा है—बिलकुल पार्सलबाबू दिखता है !" नानासाहेब पार्सलबाबूसारखे कांही दिसत नाहीत. एखाद्या सुखवस्तु सद्गृहस्थासारखे दिसतात. रत्नजडित शिरपेच, कानांत भिकबाळी , तुळतुळीत विंचरलेली दाढी, भेदक आणि तेजस्वी डोळे असें जें त्यांचें परिचित चित्र आहे, तसे मात्र ते मुळीच दिसत नाहीत. आणि नानासाहेबांना 'उर्फ' दिला आहे "धूधूपंत". धोंडोपंतांच्या ऐवजी धूधूपंत !

दुपार टळून गेली होती. माझ्याबरोबर पायपीट करून लाभ नाही हें गंगाप्रसादने ओळखलें होते. त्याने दक्षिणा आणि निरोप घेतला. त्याचें जेवण व्हायचें होतें. माझेंहि व्हायचें होतेंच. गावांत एकहि हलवायाचें दुकान किंवा हॉटेल उघडें नव्हतें. थोडीशी शोधाशोध केली तेव्हा एका महाराष्ट्रीय गृहस्थाचें घर बाजारपेठेंतच सापडलें. यजमानांनी अतिशय अगत्याने माझें स्वागत केलें. त्यांच्याहि घराचा राहण्याजोगा जेवढा भाग होता त्यापेक्षा अधिक भाग पडून जमीनदोस्त झालेला होता. त्यांच्याहि बिठुरांत चारपांच पिढ्या झाल्या होत्या.

टोप्यांचें घर बिठूर-लष्करमध्ये ब्रह्मावर्तापासून मैलभरावर आहे. गोविंदराव माझ्याबरोबर यायला तयार झाले. गाव सुटतांच पुन्हा पडके वाडे दिसूं लागले.

त्यांच्यामधून रुळलेल्या वाटेने चालतां चालतां गोविंदराव एकेक घर हें अमक्या सरदाराचें, हें अमक्या सावकार-गोसाव्याचें, अशी माहिती देत होते. ते म्हणाले, " पंचवीस-तीस वर्षांपूर्वी दक्षिणी ब्राह्मणांचीं बिठूर-ब्रह्मावर्तांत तीनशेक घरें होतीं. आता फार तर तीसेक राहिलीं. इथे धंदा-रोजगार कांही नाही. लोक कानपूर, लखनौ, अलाहाबाद, झांशी, लष्करकडे जातात. "

वाटेंत एक खूप मोठा दरवाजा, आणि त्याच्या दोन्ही बाजूंना देवड्या असलेला प्रचंड वाडा दिसला. दाराशेजारींच 'वक्तृत्वोत्तेजक सभा' अशी पाटी होती.

गोविंदराव म्हणाले, " हा सुभेदारांचा वाडा. "

मीं म्हटलें, " हे सुभेदार कोण ? "

" ते दक्षिणी ब्राह्मणच आहेत. त्यांचे पूर्वज पेशव्यांच्याकडे होते. वाडाहि पेशव्यांचाच होता. विशेष कामगिरी केल्याबद्दल ब्रिटिशांनी त्यांना वाडा, जहागीर आणि सुभेदारी दिली. आता आपण बिठूर स्टेशन पाहिलें. तें सुभेदारांमुळेच झालें. आणि रेल्वेला इथले लोक सुभेदारांची रेल्वेच म्हणतात."

गंगेच्या काठाकाठाने चाललों होतों. वाटेनें लहानमोठे घाट, घरें, देवळें लागत होतीं. त्यांत दुसऱ्या बाजीरावांनी बांधलेलें गंगासरस्वतीश्वराचें सुरेख संगमरवरी देऊळ आहे. सरस्वतीबाई ह्या नांवाची रूपागुणांनी अत्यंत तेजस्वी अशी त्यांची आवडती पत्नी होती. तिच्या स्मरणार्थ त्यांनी हें देऊळ बांधलें.

टोप्यांचें घर गंगेच्या अगदी काठावर आहे. समोर गंगेचा प्रसन्न प्रवाह आणि तिचें विशाल पात्र दिसतें. वाडा टोप्यांच्या वेळचा नाही. पण त्याच वाड्याच्या जागेवर बांधलेला आहे. आंतून किंवा बाहेरून मनांत भरण्यासारखी भव्यता किंवा प्रसन्नता त्यांत नाही. इतर सुखवस्तु घरें असावीं तसें आहे. बैठकीच्या लांबोळक्या दालनांत हातांनी काढलेल्या बऱ्याच तसबिरी आहेत. त्यांत साहजिकच तात्या टोप्यांच्या अधिक आहेत. एक अतिशय गोऱ्यापान, वृद्ध पण देखण्या पुरुषाची पेशवाई थाटाची छोटी तसबीर आहे. दालनाच्याच एका टोकाला देवघर आहे. त्यांत तात्यांच्या वेळचे त्यांच्या पूजेचे देव आहेत. तात्यांच्याबरोबर लढायांत आणि धावपळींत ते सतत त्यांच्याबरोबर असत म्हणतात.

परतायची वेळ झाली. टोप्यांच्या वाड्यांतून बाहेर पडलों. गंगेच्या शेजारींच आणखी खालच्या बाजूला, एका टेकडीवजा उंचवट्यावर वाल्मीकीचा आश्रम आहे. तो गोविंदरावांनी लांबूनच दाखवला. "ब्रूहि रामचरितम्" अशी ब्रह्मदेवाने

आज्ञा केल्यावरून ह्याच आश्रमांत वाल्मीकीने रामायणाची रचना केली. ह्याच आश्रमांत सीता प्रसूत झाली. ह्याच आश्रमाच्या परिसरांत कुशीलव मोठे झाले. इथेच त्यांनी रामायण मुखोद्गत केलें आणि इथेच रामाचा अश्वमेधाचा घोडा अडवला.

ह्याच गंगेच्या घाटावर एकदा श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे स्नानसंध्या करीत बसले असतांना त्यांना ब्रिटिशांकडून मिळणाऱ्या तनख्याचे आठ लक्ष रुपये आले. ते भलत्या वेळीं आले म्हणून श्रीमंतांनी गंगेंत टाकायला सांगितलें आणि ब्रिटिशांना पुन्हा पैसे पाठवावे लागले. अजूनसुद्धा पूर येऊन गेल्यावर नदीच्या वाळूंत त्यांतले रुपये कधी कधी सापडतात, पण त्याला नशीब पाहिजे म्हणतात.

ह्याच गंगेच्या घाटावर श्रीमंत नानासाहेब पेशवे तशीच स्नानसंध्या करीत बसले असतांना कानपुराहून भरधाव घोडा दौडवीत आलेला एक स्वार त्यांच्यापुढे उभा राहिला, आणि त्याने श्रीमंतांना ब्रिटिशांविरुद्ध लढाईला उभें राहावें असा कानपूरच्या बंडखोरांचा निरोप दिला. आणि अखेर लढाईत पराभव मिळाल्यानंतर ह्याच गंगेच्या घाटावर उभ्या असलेल्या सहस्रावधी दुःखी गावकऱ्यांना, एका अंधाऱ्या रात्रीं नावेंत उभें राहून, नानासाहेबांनी निरोप दिला आणि कुटुंबांतल्या माणसांसह गावकऱ्यांकडे पाठ फिरवून ते गंगापार होण्याला निघाले. प्रवाहाच्या मध्यावर पोचतांच, शेल्यांत बांधून आणलेल्या पवित्र आणि मूल्यवान् वस्तू त्यांनी ह्याच गंगेच्या स्वाधीन केल्या आणि मग पैलतिरावर उतरून तिथल्या अंधारांत ते इतिहासांतून नाहीसे झाले—आणि त्यांच्याबरोबरच त्यांच्या वेळचें बिठूरहि.

■ ■

# धनुष्कोडी

"तुम्ही धनुष्कोडीला मुळींच जाऊं नका. तिथे कांही पाहण्यासारखं नाही. उगीच रणरणत्या उन्हांतून मैल-दोन मैल वाळू तुडवीत जावें लागेल. पस्तावाल."

एका 'सुप्रसिद्ध' प्रवासलेखकाने आम्हांला सल्ला दिला होता.

तरी आम्ही वाळू तुडवीत चाललों होतों. समुद्रकाठची वाळू ती. कोरडी, शुष्क. अगदी बारीक आणि मऊ. प्रत्येक पाऊल वाळूंतून ओढून उचलून पुढे टाकायचें आणि पुढे टाकलें की तें भसकन् आत जायचें. असा हा पोटऱ्यांचा व्यायाम चालला होता.

मागल्या अंगाला रेल्वे स्टेशन आणि आवार, दगडी कोळशांचा डोंगर, पाण्याचें उंचावरचें टाकें, पत्र्याच्या घरांच्या बैठ्या रांगा, आणि समोर वाळूचा विस्तार. लांबवर गेलेला. संध्याकाळीं चार साडे-चाराचा सुमार. दिवस उन्हाळ्याचे. पाठीवर उन्हाचा तिरपा मार बसत होता. अंगावरला कपडा पाठीला बुरणुसासारखा बोचत होता. वृत्तींत एक प्रकारची उद्वेगयुक्त विरक्ति आली होती. पवित्र क्षेत्राच्या ठिकाणीं अशी वृत्ति फारच उचित अशी स्वतःची समजूत घालीत पावलांची उचल-ठेव चालवली होती. चौफेर कुठेहि झाड-झुडुप दिसत नव्हतें. दगड-खडक दृष्टीस पडत नव्हता. खळगे-चवटे, उंचढउतार लागले तरी ते वाळूचे, वाऱ्यांनी रचलेले. त्या पाय ओढणाऱ्या रेताड विस्ताराचा आणि

त्याच्या पांढुरक्या-पिंगट रंगाचा तोच-तोपणा मधूनमधून मोडे, तो मध्येच कुठे तरी देवीच्या वणांसारखे खळगे असलेले पांढुरके प्राणिज खडक पडलेले होते त्यांमुळे. त्यांच्याभोवती गोळा झालेल्या वाळूच्या ढिगाऱ्यांत, वीत-दोन विती लांब, पिंगट-तपकिरी रंगाच्या, कारंज्याच्या उसळत्या धारांसारख्या, विस्तारलेल्या दर्भांसारख्या काटेरी पात्यांच्या वनस्पतींचे पुंज दिसत, त्यांमुळे. पंचवटींत झालेल्या अपमानामुळे आलेल्या रागाच्या भरांत शूर्पणखेने आपल्या पिंगट झिंज्या उपटून लंकेंत जातां जातां इथे टाकल्या असतील, त्यांचे हे रूपांतरित अवशेष असावेत. फिकट-पिंगट वाळू, फिकट-पांढुरके प्राणिज खडक आणि कुंचल्याच्या फराट्यांसारखे दिसणारे पिंगट-तपकिरी तृणपुंज ह्यांची एक मंद-पिंगट रंगसंगति तिथे झालेली होती.

वाळू तुडवतां तुडवतां कशासाठी आम्ही हें करीत होतों ह्याचाहि विसर पडण्याची वेळ आली. तेवढ्यांत कुठे तरी गंभीर गर्जना झाल्यासारखें वाटलें. कुठून आणि काय ऐकूं येत आहे असें मनाशींच विचारीत वर मान करतों तो समोर क्षितिजापर्यंत हिरव्या-निळ्या लाटांचें हेलावणारें जग पसरलेलें दिसलें. त्या समुद्राच्या लाटांचीच ती गर्जना होती.

विलंबित लयींतली, अविश्रांतपणे चाललेली ती गंभीर गर्जना, तिच्यांतूनच निघणारा सुस्कार आणि पुळणीवरचें पुटपुटणें, आणि ह्या सर्वांशीं संवाद साधणारें हिरव्या-काळ्या-निळ्या लाटांचें आंदोलन, ह्यांच्या ताल-मेळांत कान-डोळे आणि त्याबरोबरच मन इतकें गुंगून गेलें की मागलें स्टेशन, दगडी कोळशाचा डोंगर, पत्र्याच्या घरांच्या रांगा वगैरे नुसतींच मागे राहिलीं नाहीत तर त्यांचें स्मरणहि राहिलें नाही. निळ्या लाटांच्या आणि त्यांच्या ध्वनीच्या साथीने पिंगट वाळूच्या ओल्या पट्ट्यावरून चालत चालत हिंदुस्थानाच्या भूमीचा सुळका जिथे लंकेच्या दिशेने पुढे घुसला होता, जिथे रत्नाकर आणि महोदधी एकमेकांना क्षेमालिंगन देत होते, तिथे केव्हा पोचलों तें कळलेंहि नाही. निळे-जांभळे ढग ओळंबून येऊन क्षितिजाशीं समुद्रावर उतरले होते. आणि आपला रंग त्यांनी समुद्राला दिला होता.

समुद्र आणि मेघ एकरूप होऊन क्षितिजाची रेषा लुप्त झाली होती. आकाश आणि समुद्र ह्यांची एखाद्या जगड्व्याळ गुहेसारखी प्रचंड पोकळी तयार झाली होती. त्या निळ्या-जांभळ्या विस्तीर्ण पोकळींतला आपला इवलेपणा जाणवून भीती वाटायची. मनाच्या कोपऱ्यांत आंत कुठे तरी थरकापल्यासारखें वाटायचें. पण

तसें वाटलें नाही. कारण त्या निळ्या-जांभळ्या विस्ताराला कललेल्या उन्हाची झिलई मिळाली होती. त्यामुळे सुंदर आणि भयानक ह्यांचें तिथे लोकविलक्षण, शब्दातीत, आकर्षक मिश्रण झालें होतें. गोष्टींतल्या राजपुत्रांना मोह घालणाऱ्या, आणि समुद्राच्या तळाशीं असणाऱ्या आपल्या रत्नखचित विलासमंदिरांत त्यांना खेचून नेणाऱ्या, नागकन्या खात्रीने तिथे विहार करीत असतील. आम्ही गोष्टींतले राजपुत्र नव्हतों, म्हणूनच त्या आम्हांला दिसल्या नाहीत आणि म्हणूनच आम्ही बचावलों म्हणायचे!

नागकन्यांनी नाही तरी तिथल्या त्या हिरव्या-निळ्या-जांभळ्या हेलावणाऱ्या जादूने आम्हांला खेचलेंच आणि आमच्या नकळतच आम्ही कपडे बदलून पाण्यांत शिरलों, आणि शिरलों ते बाहेर निघायला मनच घेईना. पाण्यांतून बाहेर पडायला आणि तो देखावा सोडायला मन तयार होईना. पण सूर्य पश्चिम क्षितिजाकडे झपाट्याने उतरत होता. आणि आम्हांला पाण्यांतून बाहेर पडणें भाग होतें. बाहेर पडतां पडतां पाण्याच्या कडेशीं तांबूस-जांभळी ओली वाळू दिसली ती ओंजळभर उचलून घेतल्यावाचून राहवेना. हा सेतु आधी रामेश्वरांत सेतुमाधवाकडे आणि पुढें प्रयागाला वेणीमाधवाकडे न्यावा लागतो. तिथे त्याचें लिंग करून, त्याची पूजा करून, त्याचें त्रिवेणी संगमांत विसर्जन करावें लागतें. म्हणजेच यात्रेची सांगता होते असें सांगतात. सांगतेचें पुण्य पुढच्या जन्मीं मिळवतां येईल, ह्या जन्मीं ही मऊ जांभळी वाळू जवळ ठेवण्याचें सुखच तेवढें उपभोगावें असें ठरवलें.

इथला सेतु घ्यावा असें शास्त्र आहे ह्याचें कारण रामाचा सेतु इथूनच सुरू होतो. सेतु बांधण्याची कल्पना आधी रामाच्या मनांत नव्हती. सागराने दुभंगून आपल्याला आणि आपल्या वानरसैन्याला वाट करून द्यावी ही त्याची इच्छा. त्यासाठी सागराची यथासांग पूजा करून तीन रात्रीं तो दर्भांची शय्या आणि बाहूची उशी करून इथे राहिला. पण तरीहि सागर भेटीला येईना. तेव्हा रामाने "चापमानय सौमित्रे।" असें करड्या स्वरांत लक्ष्मणाला फर्माविलें. त्याचा राग लक्ष्मणावर नव्हता. सागरावर होता. "अद्य मे तरणं वाथ मरणं सागरस्य वा।" अशी त्याची प्रतिज्ञा होती. सागरावर शरसंधान करून "समुद्रं शोषयिष्यामि पद्भ्यां यान्तु प्लवंगमाः।" अशी घोषणा करून त्याने बाण सोडला. तेवढ्याने समुद्रांत एवढा प्रचंड खळबळाट झाला की नक्र-मकरांसकट विंध्य-मंदरांसारख्या उत्तुंग लाटा उठल्या. तरी सागर स्वतः रामाला भेटण्याला आला नाही. तेव्हा

क्रमांक २०९५९ दि. २१८


रामाने दुसरा बाण धनुष्याला लावला. मग मात्र आता आपलें कांही चालणार नाही हें सागराला कळून चुकलें आणि तो सामोरा आला. आपली प्रतिष्ठा आणि रामाची समुद्रतरणाची प्रतिज्ञा ह्या दोहोंचाहि मान राहावा म्हणून त्याने सेतु बांधण्याला अनुज्ञा दिली. सागराचें आश्वासन, रामाचा प्रभाव आणि नल हा प्रत्यक्ष विश्वकर्म्याचा पुत्र असल्याने त्याचें कौशल्य-सामर्थ्य, त्यामुळे सेतु बांधला गेला. त्यासाठी वानरांनी डोंगर, दगड, झाडें, बांबू, गवत जें जें उपयोगी पडेलसें वाटलें तें तें आणून टाकलें. सेतु उभा राहिला. राम ससैन्य लंकेला गेला. त्याचें कार्य झालें, सेतूचें कार्य संपलें. आता त्याची नुसती आठवण म्हणूनच ह्या टोका-पासून लंकेपर्यंत खडकांची एक रांग तेवढी राहिली आहे. आणि त्या प्रसंगाची आठवण म्हणूनच आपण तिथली वाळू घ्यायची. पण वाळूचा रंग आणि मऊपणा इतका मोह पाडणारा आहे की, शास्त्र असलें किंवा नसलें तरी ती उचलून घ्यावीशी वाटते.

मघाशीं समुद्राकडे जातांना समुद्राची ओढ तरी होती. आता ओढ मागे आणि जायचें पुढे असें झाल्यामुळे वाळू तुडवतांना अगदी जड वाटत होतें, आणि किती अजून चालायचें आहे असें मनाशींच मधूनमधून म्हणत होतों. पण तेवढ्यांत ढग गोळा झाले, सडसडून पाऊस आला आणि गार वाटलें. पावसाकडे पाहण्यासाठी म्हणून सहज वर पाहिलें आणि मागे नजर वळविली तो—धनुष्कोडीने आम्हांला अगदी चकित करायचा चंग बांधलेला दिसला. वर गडद निळें आभाळ, खाली स्वच्छ पिंगट-पांढरी वाळू, मागे पांढऱ्या शुभ्र फेसाच्या—हत्तीच्या सोंडेसारख्या लठ्ठ—शेकडो माळा अंगावर खेळवणारा हिरवा-निळा-काळा समुद्र आणि त्या सर्वांवर अगदी जमिनीपर्यंत येऊन टेकलेलें निर्मल उज्ज्वल इंद्रधनुष्य. देवधनुष्याचीं दोन्ही टोकें तिथे जमिनीला टेकल्यामुळे धनुष्कोटी हें त्या स्थानाचें नांव एका वेगळ्याच अर्थाने आमच्यापुरतें सार्थ झालें.

तो देखावा एखाद्या महापुरुषाच्या महोत्सवाला उचित होता. एवढा थाटाचा निरोप घ्यायची आमची योग्यता नव्हती. आणि तशा अपेक्षेने आम्ही तिथे गेलोंहि नव्हतों. पण निरोपाचा समारंभ अतिथीच्या योग्यतेइतकाच यजमानाच्या योग्यतेवरहि अवलंबून असतो नाही का? आणि थोर यजमान 'अयम् विशेषः अयम् न।' असा भेद कसा करील?

मला आठवण झाली. लाहोरला मेयोबागेंतलें प्राणिसंग्रहालय पाहून बाहेर पडण्याच्या बेतांत होतों. तेवढ्यांत शेजारच्या पिंजऱ्यांतल्या मोराने आपला पिसारा उभारला आणि आम्हांला बोलावून घेतलें. मंद लयींत ठेक्यावर पावलें टाकीत एखाद्या वस्त्रागारांतल्या, अंगसौष्ठवासह वेषप्रदर्शन करणाऱ्या, युवतीच्या ऐटींत डावें-उजवें-तिरकें वळत, मागेपुढे होत, तो आपलें रंगवैभव आणि पिसाऱ्याचें रचनासौष्ठव दाखवीत होता.

मेघांना पाहून मोर पिसारा उभारून नाचतो. इथे धनुष्कोडीला तर मेघच मोर होऊन आपल्या जलकणांच्या अजस्र पिसाऱ्याचें रंगवैभव आम्हांला सादर करीत होता.

किती तरी वेळ तें निर्मल-उज्ज्वल इंद्रधनुष्य आमची साथ करीत होतें.

आम्हांला मुरब्बी सल्ला मिळाला होता, "तुम्ही धनुष्कोडीला जाऊं नका." मला कोणीं विचारलें तर मीहि सल्ला देईन, "तुम्ही धनुष्कोडीला जाऊं नका. उगीच रणरणत्या उन्हांतून मैल-दोन मैल वाळू मात्र तुडवावी लागेल. झाड-झाडोरा नाहीच. हिरव्याची छटासुद्धा नाही."

पण माझा सल्ला ऐकून तो धनुष्कोडीला गेला नाही असें मला कळलें, तर मात्र मला वाईट वाटेल. कारण मीं कांही म्हटलें तरी तो तिथून आपल्या अशा वेगळ्याच, जपून ठेवण्यासारख्या, सुखावह आठवणी घेऊन आला नसता हें कशावरून ?

मी नाही का आणल्या ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १२९८८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रमांक ३०५८ दि: २२-५-...
क्रमांक २६ नों दि: २३/५/...